

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

३५वा वार्षिक अहवाल
२०१९ - २०२०



मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती निमित्त 'यशवंतराव चव्हाण यांचे प्रकट चिंतन - भारत: समाज आणि राजकारण' या पुस्तकाचे प्रकाशन करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार व व्यासपीठावर उपाध्यक्ष श्री. अरूण गुजराथी, सरचिटणीस श्री. श. गं. काळे, कोषाध्यक्ष श्री. हेमंत टकले, यशवंतराव चव्हाण पुरस्कार समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, डॉ. जयंत लेले, श्री. प्रदीप चंपानेरकर.




मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती कार्यक्रमात अध्यक्षीय भाषण करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार

# ३५वा वार्षिक अहवाल २०१९ - २०२०

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

जन. जगन्नाथराव भोसले मार्ग,
मुंबई - ४०० ०२१
दूरध्वनी क्र. २२०२८५९८, २२०४५४६०, २२८५२३४५.
फॅक्स : २२८५२०८१, २२८५२०८२

Email: ybchavan100@gmail.com
Visit us: ybchavanpratishthan.org

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

**वार्षिक अहवाल २०१९-२०२०**

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे विश्वस्त मंडळ, कार्यकारिणी मंडळ, कार्यकारी समिती, प्रतिष्ठानचे विभाग प्रमुख, प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्रांचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापन | ३-५ |
| २ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्रातील उपक्रम | ५-७ |
| ३ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या केंद्रात झालेले महत्वाचे कार्यक्रम | ७ |
| ४ | यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक, राष्ट्रीय पुरस्कार व इतर उपक्रम | ७-८ |
| ५ | विशेष कार्यक्रम | ८-१८ |
| ६ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | १८-१९ |
| ७ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर कार्यक्रम / उपक्रम | १९-२० |
| ८ | प्रतिष्ठानमार्फत देण्यात आलेली व मिळालेली अनुदाने | २० |
| ९ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या विभागांमार्फत झालेले कार्यक्रम / उपक्रम | २०-५४ |
| १० | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईची विभागीय केंद्रे | ५४-११८ |
| ११ | प्रतिष्ठानची प्रकाशने व व्हि.डी.ओ. कॅसेटस् | ११९-१२० |
| १२ | प्रतिष्ठानच्या वैधानिक लेखा परीक्षकाचे प्रमाणपत्र | १२१ |
| १३ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानची हिशोबपत्रके व संबंधित परिशिष्टे | १२२-१३६ |

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि. ने. एफ १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. ने. एम. एम. एच. / बी. ओ. एम. - ५३९/८५
यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी क्रमांक : २२०२८४९८, २२०४५४६० फॅक्स : २२८५२०८१/८२

**➢विश्वस्त मंडळ सदस्य➢**

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्री. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस |
| ५. | मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर | |
| ७. | मा. श्री. राम प्रधान | |
| ८. | मा. श्री. वसंतराव कार्लेकर | |
| ९. | मा. श्री. दिलीप वळसे-पाटील | |
| १०. | मा. श्री.अजित निंबाळकर | |
| ११. | मा. बी. के. अग्रवाल | |
| १२. | मा. श्री. अमित डहाणूकर | |
| १३. | मा. श्री. डॉ. समीर दलवाई | |
| १४. | मा. श्री. ना. धों महानोर | |
| १५. | मा. सौ. प्रभा कुलकर्णी | |

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१६. मा. श्री. नितीन करीर
प्रधान सचिव, नगर विकास विभाग

१७. मा. श्री. नितीन जिवणे
विधी सल्लागार-सहसचिव
विधी व न्याय विभाग

**➢कार्यकारिणी मंडळ सदस्य➢**

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. अरुण गुजराथी
३. मा. श्री. सुप्रिया सुळे
४. मा. श्री. श. गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धों. महानोर
९. मा. श्री.लक्ष्मण माने
१०. मा. श्री. विनायकराव पाटील
११. मा. श्री. के. बी. आवाडे
१२. मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१३. मा. श्री. जीवनराव गोरे
१४. मा. श्री. विजय शिर्के
१५. मा. श्री. जयराज साळगांवकर
१६. मा. श्री. गणपतराव पाटील
१७. मा. श्री. राजेश टोपे
१८. मा. श्री. शामराव पा. पाटील
१९. मा. श्री. चंद्रशेखर घुले-पाटील
२०. मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील
२१. मा. अध्यक्ष महाराष्ट्र राज्य सरकारी बँक लि. (पदसिद्ध)

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

२२. मा. श्री. नितीन करीर
प्रधान सचिव, नगर विकास विभाग

**➢ कार्यकारी समिती➢**

| | |
|---|---|
| १. मा. श्री. शरद पवार | अध्यक्ष |
| २. मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. मा. सौ. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस |
| ५. मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |
| ६. मा. श्री. अजित निंबाळकर | सदस्य |
| ७. मा. श्री. जीवनराव गोरे | सदस्य |
| ८. मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील | सदस्य |
| ९. मा. श्री. बी. के. अग्रवाल | सदस्य |

**प्रतिष्ठानचे विभाग**

| | | |
|---|---|---|
| १. सृजन | सृजन प्रमुख | सौ. सुप्रिया सुळे |
| २. वसंधरा कक्ष (पर्यावरण संवर्धन अभियान) | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| ३. कृषी व सहकार व्यासपीठ | निमंत्रक | श्री. अजित निंबाळकर |
| ४. कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. विनायकराव ना. कांबळे |
| ५. यशवंतराव चव्हाण माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडीअर श्री.सुशील गुप्तन |
| ६. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | कार्यक्रम व्यवस्थापक | श्री. दत्ता बाळसराफ |
| ७. महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजिका | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | कार्यकारी संयोजिका | श्रीमती ममता कानडे |
| ८. नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| ९. सांस्कृतिक विभाग | निमंत्रक | श्री. विनय नेवाळकर |
| १०. यशवंतराव चव्हाण ग्रंथालय | ग्रंथालय संसाधन व ज्ञान व्यवस्थापक | श्री. अनिल पाझारे |
| ११. यशवंतराव चव्हाण केंद्र सभागृहे | सरव्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| १२. वार्तापत्र | मानद संपादक | श्री. दत्ता बाळसराफ |
| १३. शिक्षण विकास मंच | प्रमुख संयोजक | श्री. वसंत काळपांडे |
| १४. अपंग हक्क विकास मंच | संयोजक | श्री. विजय कान्हेकर |
| १५. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | वित्त व लेखा व्यवस्थापक | श्री. महेश चव्हाण |

---

**प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्रांचे अध्यक्ष:**

| | | |
|---|---|---|
| १. विभागीय केंद्र, कराड | अध्यक्ष | श्री. बाळासाहेब ऊर्फ शामराव पाटील |
| २. विभागीय केंद्र, पुणे | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| ३. विभागीय केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| ४. विभागीय केंद्र, नाशिक | अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| ५. विभागीय केंद्र, औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. अंकुशराव कदम |
| ६. विभागीय केंद्र, लातूर | अध्यक्ष | श्री. डॉ. जनार्दन वाघमारे |
| ७. विभागीय केंद्र,, कोकण | अध्यक्ष | श्री. शेखर निकम |
| ८. विभागीय केंद्र अमरावती | अध्यक्ष | श्री. हर्षवर्धन देशमुख |
| ९. जिल्हा केंद्र अहमदनगर | अध्यक्ष | श्री. यशवंतराव गडाख - पाटील |
| १०. जिल्हा केंद्र अंबाजोगाई (बीड) | अध्यक्ष | श्री. अनिकेत लोहिया |
| ११. जिल्हा केंद्र सोलापूर | अध्यक्ष | - |
| १२. जिल्हा केंद्र, ठाणे | अध्यक्ष | श्री. मुरलीधर नाले |
| १३. जिल्हा केंद्र, पालघर | अध्यक्ष | श्री. सुनिल देवराव रणाईत |
| १४. जिल्हा केंद्र, जळगांव | अध्यक्ष | श्री. रवींद्र प्रल्हादराव पाटील |
| १५. नवी मुंबई केंद्र | अध्यक्ष | श्री. प्रमोद कर्नाड |
| १६. जिल्हा केंद्र, परभणी | अध्यक्ष | सौ. संध्याताई दुधगांवकर |
| १७. विभागीय केंद्र, नांदेड | अध्यक्ष | श्री. कमलकिशोर कदम |

---

इतर

| | |
|---|---|
| १. मानद वास्तु विशारद | मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएट्स |
| २. सांविधनिक लेखा परीक्षक | मे. सी. व्ही. के ॲण्ड असोसिएट्स |
| ३. अंतर्गत हिशेब तपासनीस | मे. घोरपडे मराठे ॲण्ड असोसिएट्स |

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचा सन २०१९-२० चा वार्षिक अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

## १. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे व्यवस्थापन :-

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा व कार्याचा प्रसार करण्यासाठी प्रतिष्ठानतर्फे विविध प्रकारचे उपक्रम प्रतिवर्षी राबविण्यात येतात.उपक्रमांची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी नेमलेल्या कार्यकारी समितीच्या यावर्षी १२ बैठका घेण्यात आल्या व विविध विषयांवर सांगोपांग चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. या आर्थिक वर्षात विश्वस्त मंडळाच्या व कार्यकारिणी मंडळाच्या पुढीलप्रमाणे प्रत्येकी ३ बैठका झाल्या. दिनांक ०७ सप्टेंबर २०१९, दिनांक २५ नोव्हेंबर २०१९ व दिनांक १२ मार्च २०२० तसेच कार्यकारी समितीच्या दिनांक ०४ एप्रिल २०१९, ०७ मे २०१९, ०१ जून २०१९, ०६ जुलै २०१९, ०३ ऑगस्ट २०१९, ०७ सप्टेंबर २०१९, ०५ ऑक्टोबर २०१९, ०२ नोव्हेंबर २०१९, ०७ डिसेंबर २०१९, ०४ जानेवारी २०२०, ०१ फेब्रुवारी २०२० व १२ मार्च २०२० अशा एकूण बारा बैठका घेतल्या.

प्रतिष्ठानच्या हिशेबाची तपासणी प्रत्येक महिन्याला अंतर्गत हिशेब तपासनीस मे. घोरपडे मराठे अॅन्ड असोसिएटस् यांच्यामार्फत करण्यात आली व त्यांचे अहवाल कार्यकारी समितीपुढे ठेवण्यात आले. वार्षिक हिशेबाची तपासणी सांविधिक हिशेब तपासनीस मेसर्स सी.व्ही.के. अॅन्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकाऊंटंट यांच्याकडून झाली असून त्याचा अहवालही विश्वस्त मंडळ व कार्यकारिणी मंडळासमोर ठेवण्यात आला. वार्षिक सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकास अधीन राहून प्रत्येक विभागीय केंद्रासाठी व मुख्य कार्यालयातील विविध विभागांना खर्चाचे अंदाजपत्रक दिले असून त्यांच्याकडून खर्चाचे तिमाही अहवाल मागवून तपासण्यात आले व कार्यकारी समितीपुढे सादर करण्यात येऊन त्रुटींची पूर्तता करून घेण्यात आली. प्रतिष्ठानची वेबसाईट ybchavanpratishthan.org असून ती वेळोवेळी अद्ययावत करण्यात येत आहे. तसेच प्रतिष्ठानचा ई-मेल ybchavan100@gmail.com हा आहे.

सभासद संख्या : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईची निरनिराळ्या प्रकारच्या सभासदांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

१. संस्थापक सदस्य – ३०, २. आजीव सदस्य – ३०३, ३. संस्था सदस्य – २८

महाराष्ट्र शासनाचे दोन प्रतिनिधी विश्वस्त मंडळावर नेमलेले आहेत. त्यापैकी मा.श्री. नितीन करीर, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांची कार्यकारिणी मंडळावरही नियुक्ती केलेली आहे.

## २. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्रातील उपक्रम :-

### २.१ सभागृहे :-

१.१ **मुख्य सभागृह :-** यशवंतराव चव्हाण केंद्रातील सभागृहाचा वापर प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांतील तसेच निरनिराळया सामाजिक संस्था, शासनातर्फे आयोजित केलेल्या सभा, संमेलने, चर्चा, परिषदा, चित्रपट, सांस्कृतिक कार्यक्रम यासाठी करण्यात आला. सभागृहामध्ये मराठी, हिंदी, गुजराती, व इंग्रजी नाटके, संगीत, सभा आदि कार्यक्रमही झाले.

१.२ **सांस्कृतिक व रंगस्वर सभागृह :** सांस्कृतिक सभागृह वर रंगस्वर या दोन्ही सभागृहात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. प्रतिष्ठानच्या 'रंगस्वर' मार्फत प्रत्येक महिन्याला किमान ४ ते ५ सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. तसेच 'दिवाळी पहाट' हा अतिशय दर्जेदार कार्यक्रम संपन्न होतो. वरील दोन्ही सभागृहे आवश्यक त्या सर्व सोयींनी युक्त व अद्ययावत करण्यात आली आहेत.

### २.२ यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय

यशवंतराव चव्हाण ग्रंथालय हे संदर्भ ग्रंथालय म्हणून ओळखले जाते. ग्रंथालय संदर्भ ग्रंथासोबत इतर माहितीचे स्त्रोत,

संदर्भ सेवा अशा सुविधांनी परिपूर्ण आहे. सभासदाना कमी वेळात हवी ती माहिती देणे, त्यांना आवश्यक असलेले ग्रंथ वा इतर साहित्य उपलब्ध करून देणे. यामध्ये चालू घडामोडी (CAS) वैशिष्ट्यपूर्ण माहिती (SDS), ऑनलाईन माहिती सेवा महत्वाच्या सेवा त्वरित उपलब्ध करून दिल्या जातात. उदा. ग्रंथालयात विविध नियतकालिके,MPSC-UPSC या स्पर्धा परीक्षांकरिता नियतकालिकांची बांधणी करून ती संदर्भाकरिता सभासदांना उपलब्ध करून दिली आहेत. समाजशास्त्र, शेती, इतिहास, कायदा, संस्कृती इ. विषयांवरील पुस्तके, आत्मचरित्र, धर्मकोश, विश्वकोश, गॅझिटीयर, अॅटलास, इअरबुक, डिक्शनरी, इन्सायक्लोपीडीया (Encyclopedia), निरनिराळ्या कायद्याचे ग्रंथ उपलब्ध आहेत. अभ्यासक्रमांचे ग्रंथ बऱ्याचदा महाग असतात. त्यामुळे, प्रत्येक विद्यार्थ्यास ते विकत घेणे शक्य होत नाही. म्हणून ही सर्व पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध केल्याने सर्व गरजू विद्यार्थ्यांना ग्रंथालयाकडून त्यांच्या शैक्षणिक वाटचालीत मदत होते. हे सर्व कार्य करत असताना वेळेची बचत करून जास्तीत जास्त काम करायचे असते. त्यासाठी या ग्रंथालय व्यवस्थापन प्रणालीचा (Library Management Software) चा उपयोग होतो. कमी वेळेत जास्तीत जास्त वाचकांना ग्रंथालयातील सोईसुविधांची तसेच सेवांची माहिती देऊन त्यांच्या गरजा पूर्ण केल्या जातात.

**ग्रंथालयीन सभासद :** 'यशवंतराव चव्हाण ग्रंथालय' हे संदर्भ ग्रंथालय असून तेथे ग्रंथ वाचण्याची किंवा घरी घेऊन जाण्याची सुविधा आहे. याकरिता वार्षिक वर्गणी रु. ५००/- व अनामत रक्कम रु. ५००/- आहे. सभासदांना एकावेळी एक पुस्तक/ग्रंथ देण्यात येतो. तो पंधरा दिवसात परत करणे आवश्यक असते. संदर्भग्रंथाचा उपयोग ग्रंथालयातच करता येतो. संदर्भ ग्रंथ घरी नेता येत नाही. भरलेल्या अनामत रक्कमेपेक्षा पुस्तकाची किंमत जास्त असेल तेव्हा अधिक अनामत रक्कम किंवा त्या पुस्तकाच्या किंमती एवढी अनामत रक्कम भरून पुस्तक घरी नेता येते. महाविद्यालयीन व उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी / संशोधक यांच्याकरिता सवलतीची वार्षिक वर्गणी रु. ५०/- व अनामत रक्कम १००/- आकारण्यात येते. या सभासदांना ग्रंथ किंवा नियतकालिके ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी / संदर्भासाठी देण्यात येतात. ते ग्रंथालयाबाहेर नेता येत नाहीत. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र यांच्या नियमाप्रमाणे 'ग्रंथालयाचे व्यवस्थापन' संगणकीकृत करण्यात आले आहे.

वृत्तपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या महत्त्वाच्या घडामोडींची कात्रणे ठेवण्यात आली आहेत. सन २०१९-२०२० मध्ये ग्रंथालयास महाराष्ट्र शासनाकडून रु. ४८ हजार इतके अनुदान मिळाले. सन २०१९-२०२० वर्षाकरिता रु. ४ लाख ७५ हजार इतकी रक्कम मंजूर केली होती व ग्रंथ खरेदीचा प्रत्यक्ष खर्च ३ लाख ४० हजार इतका झाला आहे. या रकमेतून वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, ग्रंथ, संदर्भग्रंथ खरेदी करण्यात आले त्यामध्ये ८७० ग्रंथ / पुस्तकांच्या खरेदीचा समावेश आहे.

दि. ३१.०३.२०२० रोजी ग्रंथालयाची सभासद फी व सभासदाची एकूण संख्या पुढीलप्रमाणे :

संयुक्त संस्था सभासदत्व (Corporate Membership): कॉर्पोरेट या शब्दाच्या व्याख्येत बसणारी संस्था या सभासदत्वासाठी पात्र असेल. ५ वर्षासाठी एकावेळची वर्गणी रु. ५०,०००/-.

अनामत रक्कम : सर्वसाधारणपणे अनामत रक्कम घेण्यात येणार नाही. परंतु एखाद्या दुर्मिळ व किमती पुस्तकासाठी प्रतिष्ठान निश्चित करेल तेवढी रक्कम घेण्यात येईल. एकावेळी जास्तीत जास्त १० पुस्तके देता येतील.

संस्था सभासदत्व (Institutional Membership) : यासाठी शिक्षण व संशोधन संस्था व सांस्कृतिक संस्था पात्र राहतील. परंतु शिक्षण व संशोधनसंस्था ही युजीसी, आय.सी.एस.एस.आर., आय.सी.सी.आर. किंवा आय.सी.एच.आर. यांच्याकडून मान्यता प्राप्त झालेली असावी, तर सांस्कृतिक संस्था ही महाराष्ट्र शासन, केंद्र शासन किंवा मान्यता प्राप्त अधिघोषित विद्यापीठ यांनी मान्यता दिलेली असावी.

संस्था सभासदत्व : ना परतावा प्रवेश फी रु. १,०००/- वार्षिक वर्गणी : रु. ५,०००/-

दीर्घ कालावधीसाठी संस्था सभासदत्व : ५ वर्षासाठी एकावेळी वर्गणी रु. २०,०००/-

एकावेळी देण्यात येणारी पुस्तके : एकावेळी जास्तीत जास्त १० पुस्तके दिली जातात.

संयुक्त संस्था सभासदत्व व संस्था सभासदत्व:

सभासदत्व संबंधित संस्थेच्या प्रमुखास देण्यात येते. त्यांना ग्रंथालयाचे ओळखपत्र देण्यात येते. संस्थेच्या प्रमुखास आवश्यक वाटल्यास ते त्यांच्या एक किंवा दोन कर्मचाऱ्यांना त्यांच्यावतीने पुस्तके घेण्यास, तसेच परत करण्यास नामनिर्देशित करू शकतात. नामनिर्देशन अधिकृत पत्राने करावे लागते. मात्र, पुस्तके अबाधितपणे वेळेवर परत करणे व ग्रंथालयाच्या नियमांचे पालन करणे ही जबाबदारी संस्था प्रमुखाची असते. वरील सभासदत्व देण्याचा किंवा कारण न देता नाकारण्याचा पूर्ण अधिकार प्रतिष्ठानला राहील.

सर्व सभासद : महाविद्यालयीन विद्यार्थी वार्षिक फी रु. ५०/- अनामत रु. १००/-, सर्वसामान्य सभासद फी रु. ५०/- अनामत रक्कम रु. ५००/-, विद्यार्थी रेफरन्स वार्षिक फी रु. ५००/-, विद्यार्थ्यांना महिन्यापर्यंतची फी रु. ५०/- प्रमाणे आहे. महाविद्यालयीन विद्यार्थी संशोधन / सभासद, सर्वसामान्य यांची एकूण संख्या ६२२, एकूण वर्गणी रु. ५२,९००/- व अनामत रक्कम रु. १९,८००/- इतकी रक्कम जमा झाली आहे, तसेच सन २०१९-२०२० या वर्षामध्ये प्रतिष्ठानने प्रकाशित केलेल्या पुस्तकांची विक्री करून एकूण रु. ४०,२०७/- इतकी रक्कम प्राप्त झाली आहे.

## ३. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या केंद्रात झालेले महत्त्वाचे कार्यक्रम :-

३.१ मा. चव्हाणसाहेबांची पुण्यतिथी व जयंती :- मा चव्हाणसाहेबांच्या ३५व्या पुण्यतिथीनिमित्त दिनांक २५ नोव्हेंबर २०१९ रोजी कराड येथील सदगुरु गाडगे महाराज महाविद्यालयाच्या पटांगणात झालेल्या कार्यक्रमास प्रतिष्ठानचे अध्यक्ष व माजी केंद्रीय कृषीमंत्री मा. श्री शरदराव पवार उपस्थित होते. या कार्यक्रमात 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक २०१९' प्रो.एन.डी. पाटील यांना प्रदान करण्यात आले. 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०१९' सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. अभिजीत बॅनर्जी यांना जाहीर करण्यात आला.

मा. यशवंतराव चव्हाण यांचा १०७ व्या जयंतीचा समारंभ दिनांक १२ मार्च २०२० रोजी चव्हाण सेंटरच्या मुख्य सभागृहात झाला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे मा. अध्यक्ष श्री. शरदराव पवार होते. समारंभाच्या पाहुण्यांचे स्वागत उपाध्यक्ष श्री. अरुण गुजराथी व प्रास्ताविक कोषाध्यक्ष श्री. हेमंत टकले यांनी केले. सन्मानपत्राचे वाचन मा. सरचिटणीस श्री. शरद काळे यांनी केले. राष्ट्रीय पुरस्कार प्रदान समारंभ मुख्य सभागृहात झाला. राष्ट्रीय पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष मा. डॉ. अनिल काकोडकर यांनी पुरस्कारासंबंधी मनोगत व्यक्त केले.

## ४. यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक, राष्ट्रीय पुरस्कार व इतर कार्यक्रम :-

४.१ **यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक** :- प्रतिष्ठानच्या उद्दिष्टांतील एक भाग म्हणून खालील क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या मान्यवर व्यक्ती व संस्थेला पारितोषिक व सन्मानपत्र देण्यात येते.

१. यशवंतराव चव्हाण कृषी औद्योगिक समाजरचना / व्यवस्थापन प्रशासन पारितोषिक

२. यशवंतराव चव्हाण सामाजिक एकात्मता / विज्ञान तंत्रज्ञान पारितोषिक

३. यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास / आर्थिक –सामाजिक विकास पारितोषिक

४. यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य संस्कृती / कला व क्रीडा पारितोषिक

सन २०१९ यावर्षीच्या पारितोषिकासाठी वर्तमानपत्रात प्रगटन देण्यात आले होते. या क्षेत्रामध्ये भरीव पथदर्शी कार्य करणाऱ्या व्यक्ती अगर संस्थांना शिफारस करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्या आवाहनाला प्रतिसाद देऊन अनेक प्रस्ताव प्राप्त झाले. या प्रस्तावावर निवड समितीत विचार होऊन प्रो. एन.डी.पाटील यांना पारितोषिक देण्याचे जाहीर करण्यात येऊन हे पारितोषिक दिनांक २५नोव्हेंबर २०१९ रोजी मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी दिनी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार यांच्या हस्ते कराड येथे देण्यात आले. पारतोषिकाचे स्वरूप २ लाख रु रोख, शाल, मानपत्र, व श्रीफळ असे आहे.

४.२ **यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार** :- मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही मूल्ये, सामाजिक-आर्थिक विकास या क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या नामवंत व्यक्तीला 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार व सन्मापत्र' देण्यात येते. रक्कम ५ लाख रुपये व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. सुयोग्य व्यक्तीची निवड करण्यासाठी डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. या समितीमध्ये (१) मा. डॉ. रघुनाथ माशेलकर, माजी महानिर्देशक वैज्ञानिक तथा औद्योगिक अनुसंधान परिषद, (२) मा. डॉ. रुपा शहा, माजी कुलगुरू. एस.एन.डी.टी. विद्यापीठ (३) मा. डॉ. सुहास पेडणेकर कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, (४) मा. डॉ. नरेंद्र जाधव, माजी सदस्य, योजना आयोग, (५) मा. श्री. आय.एम. काद्री, प्रख्यात वास्तुविशारद, व (६) डॉ. शीलू श्रीनिवासन् यांचा समावेश आहे.

या निवड समितीच्या शिफारशीनुसार नोबेल पुरस्कार विजेते डॉ. अभिजित बॅनर्जी यांनी मा. चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथी दिनी दि. २५ नोव्हेंबर २०१९ रोजी पुरस्कार जाहीर करण्यात आला.

## ५. विशेष कार्यक्रम /उपक्रम:-

### ५.१ १०वा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२०:-

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, पुणे फिल्म फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने व महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने दिनांक १७ जानेवारी २०२० ते २३ जानेवारी २०२० या दरम्यान चव्हाण सेंटर, मुंबई येथे दहावा 'यशवंत आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२०' आयोजित करण्यात आलेला होता.

महोत्सवात एकून ६५ विविध भाषेतील व विविध देशातील निवडक चित्रपट दाखविण्यात आले. या महोत्सवाचे उद्घाटन दि. १७ जानेवारी, २०२० रोजी प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्ष मा. सौ. सुप्रिया सुळे यांच्या अध्यक्षतेखाली व ज्येष्ठ अभिनेत्री, मा. मुख्य अतिथी श्रीमती शर्मिला टागोर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. या महोत्सवात रशिया, चीन, फ्रान्स, इस्राईल, तुर्की, चिली, स्पेन, मेक्सिको, श्रीलंका, यु.के., ब्राजील, पोर्तुगाल, नॉर्वे, कॅनडा, पोलंड, आयलंड, इटली, ग्रीस, जर्मनी, युक्रेन, बल्गेरीया, हंगेरी, इराण, सुदान, स्वित्झर्लंड, झेक रिपब्लिक, स्कोव्हाकीया, आदी देशातील चित्रपट दाखविण्यात आले. तसेच महोत्सवाची सुरुवात स्पेन देशातील 'द वीझेल्स टेल' या चित्रपटाने झाली. महोत्सवाची सांगता 'द हयुमुरिस्ट' या रशियन चित्रपटाने झाली.

'फिल्म ॲप्रिसिएशन वर्कशॉप' दि. ४ जानेवारी २०२० रोजी दुपारी २.०० ते सायं. ७.०० वाजेपर्यंत प्रतिष्ठानच्या रंगस्वर सभागृहात आयोजित करण्यात आले होते. या वर्कशॉपमध्ये श्री.समर नकाते यांनी व्याख्यान दिले.

महोत्सवात दि. १९ जानेवारी २०२० रोजी 'स्मिता पाटील मेमोरिअर लेक्चर' अंतर्गत प्रसिद्ध सिने अभिनेत्री, श्रीमती विद्या बालन यांची मुलाखत डॉ. जब्बार पटेल यांनी घेतली. या कार्यक्रमास तरुण युवकांचा मोठा प्रमाणात प्रतिसाद होता.

वरील सातही दिवस चित्रपट महोत्सवात तरुण वर्गाचा व ज्येष्ठांचा अतिशय चांगला प्रतिसाद लाभला. यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोतसवाची वर्तमानपत्रात प्रसिद्धी देण्यात आली होती.चित्रपट महोत्सव मुख्य सभागृह, रंगस्वर

सभागृह व सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आला होता.

**५.२ मा. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मघर स्मारक देवराष्ट्रे, तालुका कडेगांव जिल्हा सांगली:-**

दि १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२० या कालावधीत जन्मघर स्मारकास एकूण २०७० पर्यटकांनी भेटी दिल्या आहेत.

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार मा.यशवंतराव चव्हाण यांची ३४ वी पुण्यतिथी त्याच्या जन्मगावी देवराष्ट्रे येथे रविवार दि.२५ नोहेंबर रोजी विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली.या निमिताने मा.आ.मोहनराव कदम, मा.आ.विश्वजित कदम,सांगली जिल्हा परिषद अध्यक्ष श्री.संग्रामसिह देशमुख,राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश अध्यक्ष मा.अरुण अण्णा लाड याच्या सह अनेक मान्यवरांनी देवराष्ट्रे येथे यशवंतरावांच्या पूर्णाकृती पुतळ्यास व जन्मघर स्मारक मध्ये पुष्पहार घालून अभिवादन केले .

दि.२४/११/२०१९ रोजी जन्मघर स्मारकास श्री.शरद काळे सरचिटणिस, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई यांनी भेट दिली आहे.

दि.२५/११/२०१९ रोजी कडेगाव तहसीलदार कडेगाव डॉ.शैलजा पाटील यांनी मा.चव्हाण साहेबांच्या जन्मघरास भेट दिली, नेहमीप्रमाणे शासकीय अधिकारी या नात्याने त्यांनी मा.चव्हाण साहेबांच्या फोटोस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

दि २ डिसेंबर २०२० रोजी अमोल मिटकरी (प्रा.सरचिटणीस राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी)यांनी जन्मघरास भेट दिली.

दि.१९ फेब्रुवारी २०२० रोजी श्री.अस्लम शेख (मंत्री वस्त्र उद्योग महाराष्ट्र राज्य) श्री.डॉ.विश्वजित कदम (मंत्री कृषी व सहकार महाराष्ट्र राज्य) मंत्री श्री राजीव सातव यांनी यशवंतराव चव्हाण साहेबांच्या जन्मघरास भेट दिली.

दि.१२ मार्च २०२० रोजी सकाळी ८.३० वाजता पलूस व कडेगावचे उपविभागीय अधिकारी श्री.गणेश मरकड, व कडेगाव तालुक्याच्या तहसीलदार डॉ शैलजा पाटील यांनी यशवंतरावांच्या जन्मघरी उपस्थित राहून प्रतिमा पूजन करून आदरांजली वाहिली.

सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील पूर परिस्थिती पाहता हा पूर इतका भयंकर होता की लाखो लोकांची घरे पाण्याखाली गेली होती. किव्यक लोकांचे संसार उद्धवस्त झाले होते लोक बेघर झाले होते अशा परिस्थितीत प्रत्येक संस्थेने पूरग्रस्त लोकांसाठी काहीना काही मदत या लोकांना केली आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने सुद्धा आपला संसार उभारण्यासाठी या पूरग्रस्तांना मदत केली आहे. मंगळवार दि.१३/८/२०१९ रोजी प्रतिष्ठानने पाठवलेली मदत देवराष्ट्रे केंद्रा मध्ये पोहचली.मदत पाठनू दिलेली गाडी एका ठिकाणी उतरून घेतली गेली.व बुधवार दि-१४/८/२०१९ रोजी सदर मदतीची विभागणी व प्रतवारी केली गेली.

दि.१५/८/२०१९ रोजी देवराष्ट्रे मधून तयार केलेले संच इस्लामपूर मार्गे वाळव्याला पाठवण्यात आले. वाळवा गावच्या कोट भागात या सूयाचे च घरोघरी जाऊन वाटप करण्यात आले.

त्यानंतर एक आठवड्याने प्रतिष्ठानने पुन्हा मदतीची दुसरी गाडी पाठवून दिली. ही मदत ही शालेय मुलांसाठी होती.

**५.३ ज्येष्ठ नागरिक आनंद मेळावा – २०१९ :-**

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही रविवार दिनांक ०६ ऑक्टोबर २०१९ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्राच्या मुख्य सभागृहामध्ये ज्येष्ठ नागरिक आनंद मेळावा २०१९ आयोजित करण्यात आला. या वर्षी बांद्रा ते दहीसर या विभागातील कार्यरत असलेल्या अंदाजे २५ ज्येष्ठ नागरिक संघानी मेळाव्यामध्ये सहभाग घेतला.एकूण २५० ज्येष्ठ नागरिक मेळाव्याला उपस्थित होते.आता पर्यंत एकूण ६६ ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला आहे. त्यामधून पूर्वीच्या ४३ सत्कारमूर्तिंना बोलविण्यात आले होते. त्यापैकी १८ सत्कारमूर्ती उपस्थित होते.मेळाव्याच्या आयोजनामध्ये फेस्कॉमची भरीव मदत झाली.त्यामध्ये फेस्कॉमच्या, मुंबई विभागाचे अध्यक्ष श्री. शरद डिचोलकर यांची बहुमोल मदत झाली. मेळाव्याचे सर्वसाधारण स्वरुप खालीलप्रमाणे होते.

- कार्यक्रमांची सुरुवात सकाळी ९.०० वाजता झाली ९.०० ते ९.४५ या वेळेमध्ये नाव नोंदणी, नास्ता व चहापान कार्यक्रम झाला.

■ मुख्य कार्यक्रम सकाळी ९.४५ वाजता सुरु झाला. प्रतिष्ठानचे सरचिटणीस मा. श्री. शरद काळे समारंभाचे अध्यक्ष व डॉ. आनंद नाडकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. फेस्कॉमचे अध्यक्ष श्री. शरद डिचोलकर, सचिव श्री. विनायक खांबेटे हे समारंभाला उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रतिष्ठानचे सरचिटणीस मा.श्री.शरद काळे यांनी प्रमुख पाहुण्यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व पुस्तके देऊन स्वागत केले.

प्रमुख पाहुण्यांना सत्काराच्या वेळी खालील पुस्तके देण्यात आली.

(१) यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व व कर्तृत्व

(२) महाराष्ट्र दर्शन.

श्री.दत्ता बाळसराफ यांनी प्रास्ताविक केले. त्यामध्ये त्यांनी ज्येष्ठ नागरिक आनंद मेळाव्याचा इतिहास विशद करुन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईची व प्रतिष्ठानच्या सर्व विभागांची माहिती दिली. या वर्षीचे 'कर्तबगार ज्येष्ठ नागरिक' म्हणून खालील ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला.

■ कर्तबगारमहिला व पुरुष ज्येष्ठ नागरिक

(१) श्रीमती कुमुद मंगलदास पटेल.

(२) प्रो. श्रीमती निर्मला अशोक बतिजा.

(३) श्री. विरेंद्र चित्रे

(४) श्री. माधव अनंत पुरोहित

■ प्रमुख पाहुणे डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या हस्ते चारही सत्कारमूर्तींचा सत्कार करण्यात आला. सत्काराचे स्वरुप पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ, गौरवपत्र व खालील पुस्तकांचा संच असे होते.

(१) यशवंतराव चव्हाण जीवनप्रवाह फोटो अल्बम

(२) लोक माझे सांगाती

■ प्रमुख पाहुणे डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या हस्ते कर्तबगार ज्येष्ठ नागरिक संघ म्हणून 'सोबती' ज्येष्ठ नागरिक संघ – विलेपार्ले (पूर्व) या संघटनेला पुरस्कार देण्यात आला. 'सोबती' ज्येष्ठ नागरिक संघ या संघाचे कार्याध्यक्ष, श्री. मुकुंद सराफ व इतर पदाधिकारी यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, गौरवपत्रक व ढाल तसेच खालील पाच पुस्तकांचा संच देऊन गौरविण्यात आले.

(१) कर्मवीर भाऊराव पाटील एक दर्शन – रमेश चव्हाण

(२) महाराष्ट्रमध्ये दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन

(३) मराठी साहित्य समाज आणि संस्कृती

(४) प्रार्थना समाज पुरस्कृत धर्मरहस्य

(५) सह्याद्रीचे वारे

सकाळी ११.०० ते १२.०० पर्यंत श्री. पं. अमरेंद्र धनेश्वर यांनी शास्त्रीय संगीताचा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

**५.४ विज्ञानगंगा:-**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञानगंगा कार्यक्रमांतर्गत खालील व्याख्याने घेण्यात आली.

१) **ग्लास टेक्नॉलॉजी:-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने

विज्ञानगंगा कार्यक्रमांतर्गत ३७ वे व्याख्यान डॉ. जी. पी. कोठीयाल यांचे 'ग्लास टेक्नॉलॉजी' या विषयावर दिनांक २३ एप्रिल २०१९ रोजी आयोजित केले होते. आपल्या व्याख्यानात डॉ. कोठीयाल यांनी ग्लास (काच) या पदार्थाच्या शोधापासून आजच्या काच युगापर्यंतच्या प्रवासातील विविध टप्प्यांचे माहितीपूर्ण विवेचन केले. ज्यामधील प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे होते.

१. काच या पदार्थाचे स्वरूप व त्याची विविध रूपे तसेच त्याचे भौतिकी व रासायनिक गुणधर्म
२. काच या पदार्थाचे स्वरूप व त्याची विविध रूपे तसेच त्याचे भौतिकी व रासायनिक गुणधर्म
३. काचेच सूक्ष्म ते अति सूक्ष्म स्फटिकात्मक स्वरूप.
४. काचेचा विज्ञानाच्या विविध शाखांमध्ये व एकूणच आपल्या रोजच्या जीवनात होत असलेला वापर.
५. तंत्र व त्याचा वाढत असलेला वापर व महत्व.
६. फ्लोट ग्लास, टेम्पर्ड ग्लास, बुलेट विरोधक ग्लास, ऑप्टीकल फायबर ग्लास हे व असे काचेचे नानाविध प्रकार त्यांचे घटक, गुणधर्म निर्मिती प्रक्रिया इत्यादी.
७. ग्लास सिरामिक या पदार्थाबाबतची माहिती.

विषयाचे सदीप सादरीकरण करताना चित्रांचा योग्य वापर केला होता. एकूण व्याख्यान खूपच माहितीपूर्ण होते.

२) **आइनस्टाइनचा सापेक्षतावाद** :- शुक्रवार दिनांक १७ मे, २०१९ रोजी विज्ञानगंगा अंतर्गत डॉ. राजीव चिटणीस यांचे व्याख्यान 'आइनस्टाइनचा सापेक्षतावाद' या विषयावर झाले.

अँरिस्टोटल, कोपर्निकस, गॅलीलोओ आणि आइन्स्टाइन या चौघांनी गतीशास्त्राची प्रारूपे मांडली. गॅलीलोओने लम्बकावर प्रयोग केले. झोक्याचा कालावधी हा लन्बकाच्या दोरीच्या लांबीवर अवलंबून असतो. पिसाच्या कलत्या मनो-यावरून गॅलीलोओने विविध वजनांच्या टाकलेल्या वस्तू एकाच वेळी जमिनीवर पडल्या. युक्लीड, डार्विन आणि आइन्स्टाइन यांचे ग्रंथ हे विज्ञानातील महत्त्वाचे ग्रंथ मानले जातात. न्यूटनच्या बागेत पडलेले सफरचंद, चंद्रामुळे समुद्राला येणारी भरती आणि सूर्याभोवती फिरणारे ग्रह हे सर्व गुरूत्वाकर्षणामुळे घडते. उदाहरणे देऊन डॉ. चिटणीसांनी गॅलिलीअन आणि न्यूटोनिअन सापेक्षता म्हणजे काय हे सविस्तरपणे समजावून दिले. मॅक्सवेलने विद्युत व चुंबकीय क्षेत्रात काम केले. विद्युतशक्ती व चुम्बकत्व हे परस्परालंबी आहेत. विद्युत, चुंबकीय व प्रकाश या सगळ्यांचा वेग दर सेकंदाला ३ लाख किलोमीटर आहे. प्रकाश हा विद्युत व चुम्बकीयाचा अवतार आहे. १९०५ मध्ये आइनस्टाइनने अनेक निबंध लिहिले. त्यातील दोन ब्राउनियन मोशनवर, एक फोटो इलेक्ट्रिसिटीवर, एकासापेक्षतावादावर, असे होते. भौतिकशास्त्राचे नियम सर्व अत्वरणीय संदर्भ चौकटीत सारखेच असायला हवेत असे एकसमयेतील (simultaneous) गृहीतक आहे. याची उदाहरणे त्यांनी दिली.

आइनस्टाइनच्या सिद्धांताची पडताळणी एडिंग्टन १९१९ सालच्य खग्रास ग्रहणाच्या वेळी करून सिद्धांत बरोबर असल्याचे सांगितले.

३) **बहुपयोगी गणित** : शुक्रवार दिनांक २१ जून, २०१९ रोजी विज्ञानगंगा अंतर्गत डॉ. विवेक पाटकर यांचे व्याख्यान 'बहुपयोगी गणित' या विषयावर झाले.

ते म्हणाले, गणित जसे शिकलेल्या माणसाला लागते तसे ते न शिकलेल्या लोकांनाही लागते उदा. भिंतीला रंग लावायचा आहे आणि त्याचा भाव दर चौरस मीटरला अमुक अमुक असून भिंतीचे क्षेत्रफळ अमुक चौरस मीटर आहे, तर एकूण खर्च किती किंवा शेताला कुंपण घालायचे तर किती जाळी लागेल? वगैरे, अभिजात गणितात नवीन गणित येईल. मग त्याचे नवीन उपयोग व त्याबरोबर नवीन प्रश्नही येतील. गणिताचा उपयोग अनेक

शास्त्रे आणि तंत्रज्ञानात होतो. गणिताचे आता जंगल झाले आहे. आकाराविल्हेही पाहिले तर ए पासून ते झेडपर्यंत जाते. उदा. एमिकेबल, बायनरी, कार्डीनल... इंटिजर, इरेशनल,....रेशनल, रिअल,...झिरो फ्री नम्बर वगैरे. गणितात इंडायसेस, इंडिकेटर्स, टेबल्स, ग्राफस, रॉ फिगर्स असे अनेक प्रकार येतात. गणितात अनेक गुणांक येतात. उदा. बुद्धिमत्ता गुणांक (इंटीलाजन्स कोशंट), भावनिकता गुणांक (इमोशनल), परभावानुभावता गुणांक (एम्पेथी), अध्यात्मिकता गुणांक (स्पिरिच्युल) इत्यादी. गणित व्यवहारात अनेक ठिकाणी लागते. उदा चटई निर्देशांक, दृष्टिगोचरता, विकेंद्रीकता (आटोपशीरता), अंकीय दरी इत्यादी येतील. उदा काही वर्षापूर्वी छत्रपती शिवाजीमहाराज स्थानक आणि मुंबई सेन्ट्रल स्थानकाची पाहणी केली. लोकांच्या उपयोगाचे २० मापदंड ठरवले. उदा. प्लॅटफार्म, टॅक्सी स्टॅन्ड, तिकीट खरेदीची खिडकी, प्रसाधनगृह वगैरे आणि यातील एका ठिकाणी उभा राहिल्यावर बाकीच्या सोयींचे बोईस तेथून दिसतात का? हे व्हीजीबिलीटीचे उदाहरण आहे. तर यात व्ही. टी. स्टेशनाला १०० पैकी ४२.६ गुण मिळाले. आणि मुंबई सेंट्रलला ४१.८ गुण मिळाले. शहर विकास निर्देशांकात पायाभूत सुविधा, कचरा, आरोग्य, शिक्षण, शहराचे उत्पन्न असे निर्देशांक येतील. युनोने वेगवेगळ्या गोष्टींसाठी वेगवेगळे निर्देशांक काढले आहेत. त्यातला मनुष्य विकास निर्देशांकात भारत जगातल्या १९८ देशात १३० वा आहे. आनंदीपणाच्या निर्देशांकात १५६ देशात आपण १२० वे आहोत. दहशतवादात आपण सातवे आहोत. शांततावादात १६३ देशात आपण १२३ वे आहोत. भूमितीचा विकास पाहिला तर युक्लिड हा इसवी सनपूर्व ३०० वर्षाचा आहे. त्याची प्रतल भूमिती. त्यानंतर १६३० नंतर प्रक्षेप भूमिती. १६५० नंतर आली युक्लिडेतर भूमिती. ती १८५० पुढे सम्मिती भूमिती. ती १९०० सालातली. फ्रेक्टल भूमिती रक्तवाहिन्यांच्या जाळ्यासाठी उपयोग पडते. याचा शास्त्रज्ञ आहे मांडलबोट. संध्या हॉलिवूड सिमेमातील चित्रे प्रत्यक्ष नसतात. तर ती फ्रेक्टल भूमिती वापरून बनवलेली असतात. भ्रमणध्वनीच्या यंत्रणेत सहा प्रकारची गणिते लागतात. गोंधळ ऊर्फ केऑस गणित हे हवामान खात्याला उपयोग पडते. त्यांना उद्या पाऊस पडेल का ते सांगता येत नाही पण पुढील तीन महिन्यात अमूक इतका पाऊस पडेल हे सांगता येते. गोंधळ सिद्धांत, लष्करी क्रीडा, मानसोपचार, वैद्यकीय, वनस्पतीशास्त्र, वाहतूक, लोकसंख्याशास्त्र इत्यादी अनेक ठिकाणी वापरला जातो. वैद्यकीय क्षेत्रात जुन्या रूग्णांची माहिती साठवून ठेवली तर नवीन रूग्णांची लक्षणे तीच असतील तर जुन्या रूग्णाचे औषध त्याला उपयोग पडू शकते. सायंस फिक्शनसारखे आता गणित फिक्शनही आले आहे.

स्पोर्टस मेथेमेटिशियन याला टीव्हीवर चांगली मागणी असते. गणित वापरून बोधचिन्हे बनवतात.

४) **भारतीय गणित परंपरा**:- शुक्रवार दिनांक १९ जुलै २०१९ रोजी विज्ञानगंगा अंतर्गत डॉ. सुधाकर आगरकर यांचे व्याख्यान 'भारतीय गणित परंपरा' या विषयावर झाले.

५) **आग आणि शांततेची भूमी**:- शुक्रवार दिनांक १६ ऑगस्ट २०१९ रोजी विज्ञानगंगा अंतर्गत श्री समीर लोंढे यांचे व्याख्यान 'आग आणि शांततेची भूमी' : शुक्रवार दिनांक १६ ऑगस्ट २०१९ रोजी विज्ञानगंगा अंतर्गत श्री समीर लोंढे यांचे व्याख्यान 'आग आणि शांततेची भूमी' या विषयावर झाले.

श्री समीर लोंढे यांनी त्यांच्या व्याख्यानाला सुरूवात करण्यापूर्वी हे स्पष्ट केले की त्यांच्या व्याख्यानाचा विषय हा आग आणि बर्फ याची भूमी असा आहे. परंतु काही गैरसमजामुळे तो विषय आग आणि शांततेची भूमी असा प्रसिद्ध केला गेला. त्यांनी पुढे असेही स्पष्ट केले की ही या भूमीचे शांतता हे देखील एक महत्वपूर्ण वैशिष्टय असल्यामुळे व्याख्यानाचा विषय असा आहे.

पृथ्वीवर अशा काही भूमी आहेत की जेथे जागृत ज्वालामुखी, गरम व सल्फरयुक्त पाण्याचे झरे व कारंजी, हिमनद्या व हिमनग अशा परस्पर विसंगत असणाऱ्या गोष्टी एकाच ठिकाणी आढळतात व ध्रुवप्रभा किंवा धृवीय

प्रकाशाचे देखील या भूमीवरून विलोभनीय दर्शन होते. यासंदर्भात पृथ्वीवरील सर्वात वैशिष्टयपूर्ण भूमी ही आईसलड हा देश असून या देशाच्या अनुषगांने या सर्व गोष्टींची भूगर्भशास्त्रीय कारणमीमांसा श्री लोंढे यांनी आपल्या व्याख्यानात केली. सर्वप्रथम त्यांनी वरील प्रत्येक गोष्ट अत्यंत सोप्या भाषेत समजावून दिली नंतर ते या गोष्टींच्या भूगर्भशास्त्रीय कारणमीमांसेकडे वळले. यामध्ये पृथ्वीच्या आंतरभागाची रचना त्यांनी अंड्यांचे सोपे उदाहरण देऊन समजावून दिली. यामध्ये पृथ्वीची खोली (पृथ्वीचा मध्य व पृष्ठभागातील अंतर), यातील वेगवेगळे थर, हे थर कसे बनलेले असतात इत्यादी गोष्टींचा विस्ताराने उहापोह केला.

आपल्या विवेचनात त्यांनी असे नमूद केले की पृथ्वीवरील सर्व देश हे त्यांच्या भौगोलिक सीमारेषांनुसार ओळखले जात असले तरी वस्तुत: हे सर्व देश ज्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्लेट्सवर असतात त्या प्लेट्स एकमेकांपासून दूर जात असतात, जवळ येत असतात व एकमेकांसोबत घर्षण पावत असतात व यातून ज्वालामुखी, समुद्र या गोष्टी व त्यांच्या हवामान यासारख्या गोष्टींच्या अनुषंगाने गरम व सल्फरयुक्त पाण्याचे धरे कारंजी, हिमनद्या व हिमनग या सारख्या गोष्टींची निर्मिती होत असते. आईसलंड या देशाच्या भौगोलिक स्थान वैशिष्ठ्यामुळे या सर्व गोष्टी तेथे आढळतात. आईसलंडच्या भूमीवरून होणाऱ्या धृवीय प्रकाशाच्या दर्शनाचे शास्त्रीय विवेचन देखील श्री लोंढे यांनी आपल्या व्याख्यानात केले.

वरील विवेचनानंतर श्री लोंढे या भूमीच्या शांतता या वैषिष्ठयाकडे वळले. तेथील जनसंख्या, उद्योगधंदे, लोकांच्या उत्पन्नतील समानता ज्यायोगे शून्य गुन्हेगारी, शून्य भ्रष्टाचार, त्या देशाल सैन्यच नसणे यासारख्या गोष्टींमुळे आईसलंड ही खऱ्या अर्थाने शांतता भूमी (Land of peace) कशी ठरते हेदेखील त्यांनी दाखवून दिले. व्याख्यान सुरू असतानाच उपस्थितांपैकी काहीनी शंका / प्रश्न विचारले ज्याचे वक्त्यांनी समाधानकारक निरसन केले.

श्री लोंढे यांचे व्याख्यान संदीप सादरीकरणासह झाले ज्यामध्ये आईसलंड या देशातील वरील अनेक गोष्टींच्या सरकचित्रांचा (स्लाईडस) चा अंतर्भाव होता ज्यायोगे या सर्व गोष्टींची शास्त्रीय माहिती मिळतानाच व्याख्यान रंजकही झाले.

६) **आय ओ टी चे तंत्रज्ञान (Internet of things):-** गुरूवार दिनांक १९ सप्टेंबर २०१९ रोजी विज्ञानगंगा अंतर्गत डॉ. रामचंद्र सत्यदेव तिवारी यांचे व्याख्यान 'आय ओ टी चे तंत्रज्ञान' या विषयावर झाले.

डॉ. तिवारी यांनी व्याख्यानाच्या सुरूवातील १८ व्या शतकापासून सुरू झालेल्या औद्योगिक क्रांतीच्या विविध टप्प्यांचा थोडक्यात परामर्श घेतला जसे की १८ १९ व २० व्या शतकात अनुक्रमे वाफेचे इंजिन, विद्युतशक्ती व संगणक या गोष्टींच्या शोधांचा या क्रांतीत फार महत्त्वाचा वाटा होता. २१ व्या शतकात मात्र वस्तूंचे मायाजाल ही संकल्पना औद्योगिक क्रांती पुढे नेत असल्याचे नमूद करताना वस्तूंचे मायाजाल ही संकल्पना अत्यंत सोप्या पण रोचक पद्धतीने व रोजच्या व्यवहारातील अत्यंत साधी उदाहरणे देऊन त्यांनी स्पष्ट केली.

आजच्या युगात इंटरनेटच्या माध्यमातून व्यक्ती-व्यक्तीमधील अंतर पुसले जाऊ लागले आहे व जग फार लहान असल्यासारखे भासू लागले आहे. त्याच इंटरनेटच्या माध्यमातून मानवास आता अंतराचे बंधन न बाळगता इतर सजीव व निर्जीव वस्तूंना नियंत्रित करणे कसे शक्य झाले आहे ते अत्यंत साध्या उदाहरणातून दाखविलेले आहे. कार्यालयात असलेला आपला पती त्याच्या बरोबर असलेल्या बाटलीतील पाणी पुरेश्या प्रमाणात व वेळच्यावेळी पितो की नाही हे घरी राहून देखील पत्नी, त्या बाटलीला लावलेला सेन्सर, योग्य असा लघु नियंत्रक व भ्रमण ध्वनी सारखे साधन इत्यादीच्या योग्य पद्धतीच्या जोडणीतून कसे बघू शकते. अशा तऱ्हेने व अत्यंत प्रगत

तंत्रज्ञानाद्वारे मानवाला सजीव व निर्जीव वस्तू कशा नियंत्रित करता येतात हे अनेक उदाहरणे देऊन त्यांनी स्पष्ट केले. तसेच मानवी जीवन व्यवहारात व वेगवेगळ्या क्षेत्रात या तंत्रज्ञानाचा किती व्यापक उपयोग होतो याबाबतही त्यांनी विवेचन केले. यामध्ये प्रामुख्याने सुरक्षा, आपत्कालीन व्यवस्थापन, सुनामी, वादळे, भूकंप यासारख्या नैसर्गिक आपत्तींबाबत पूर्वसूचना मिळणे, विविध अवयावरील शस्त्रक्रिया इत्यादी गोष्टिंचा समावेश होता.
व्याख्यानापश्चात मूलत: संगणक व वस्तूचे मायाजाल या संकल्पनेशी संबंधीत इतर आधुनिक संकल्पना जशा की कृत्रिम बुद्धिम मशीन लर्निंग याबाबातही त्यांनी उहापौह केला व उपस्थितांच्या शंकाचे निरसर केले.

डॉ. तिवारी यांचे व्याख्यान सदीप सादरीकरणासह झाले ज्यामध्ये सरकचित्रांचा (स्लाईडस) चा व दृकश्राव्य फितींचा अंतर्भाव होता, ज्यायोगे या सर्व गोष्टींची शास्त्रीय. माहिती मिळतानाच व्याख्यान अतिशय रंजकही झाले.

७) **पेट्रोरसायनांची दुनिया:-** शुक्रवार दिनांक १८ ऑक्टोबर, २०१९ रोजी विज्ञानगंगा अंतर्गत, श्री अ.पां.देशपांडे यांचे व्याख्यान पेट्रोरसायनांची दुनिया' या विषयावर झाले.

सुरूवातीस त्यांनी समुद्रातील जमिनीखाली क्रूड ऑईल म्हणजेच कच्चे तेल कसे तयार होते हे सांगून हे तेल जेव्हा तेलशुद्धीकरण कारखान्यात आणून एलपीजी वायू, पेट्रोल, केरोसीन, डीझेल, डांबर बनवतात, तेव्हा पेट्रोल व केरोसीन यांच्यामध्ये नाफथा नावाचा ज्वालाग्राही व हवेत चटकन उडून जाणारा पदार्थ मिळतो असे सांगितले. हा पदार्थ हायड्रोकार्बनच्या बाबतीत समृद्ध असल्याने त्यापासून अनेक रसायने बनतात. पेट्रोलियम पदार्थापासून बनणारी रसायने म्हणून यांना पेट्रोरसायने म्हणतात. नाफथा कारखान्यात ८००-९०० अंश सेल्सियस तापमानाला उकळवतात, तेव्हा त्यातून इथेन व प्रोपेन नावाचे वायू मिळतात. त्यांचे द्रवीभवन करून त्यापासून प्रोपिलीन व इथिलीन हे दोन द्रवरूप वायू मिळतात. त्यापासून पुढे बऱ्याच प्रकारची औद्योगिक सॉल्व्हंटस, इथिलिन ग्लायकोल्स, बेन्झीन, ब्युटाइन, पीव्हीसी असे पदार्थ मिळतात. भारताची १९४७ साली ३५ कोटी एवढी लोकसंख्या होती ती आता १३० कोटी झाली आहे. अशीच लोकसंख्या वाढ जगभर सर्वत्र दिसून येते. या लोकसंख्येच्या जगण्यासाठी कपडे, अन्न, औषधे, इमारती अशा नाना गोष्टी लागतात. त्यासाठी पूर्वी लोकसंख्या कमी असताना शेतीतून मिळणारा कापूस, धान्य, लाकूड, जमिनीखाली मिळणारे धातू, कोळसा, हे पुरे पडत, पण वाढलेल्या लोकसंख्येसाठी नैसर्गिक साधन-सामग्रीबरोबर इतर मार्गाने तरतूद करण्याची गरज निर्माण झाली. ही गरज संशोधकांनी पेट्रोरसायनांद्वारे भरून काढली. वर उल्लेखिलेल्या पेट्रोरसायनांद्वारे औषधे, दारूगोळा, टेरिलीन, नायलॉन, अन्नपदार्थ, सर्व प्रकारच्या वस्तू बनवण्यासाठी उपयोगी पडणारे प्लास्टिक हे पदार्थ मिळाले. या पदार्थातील प्लास्टिकविरूद्ध हल्ली खूप टीका ऐकू येते ती तिचा वापर झाल्यावर ते नष्ट कसे करायचे यावरून. सतत चालू असलेल्या संशोधनावरून नष्ट होणारे (डिग्रेडेबल) प्लास्टिक आता दूर राहिले नाही.

पेट्रोरसायन कारखान्यात वापरल्या जाणाऱ्या डिस्टीलेशन कॉलम्स, हीट एक्सचेन्जर्स, स्टोरेज टॅन्क्स, बॉल टॅन्क्स, धुराडी (फ्लेअर स्टॅक्स) इत्यादी उपकरणांबद्दलही श्री. देशपांडे यांनी माहिती दिली. भारतात १९६० च्या दशकात मुंबई व ठाण्यात नोसिल, हर्डेलीया केमिकल्स, युनियन कार्बाईड, अंबानींचा गुजरातेतील कारखाना, आयपीसीएलचे वडोदरा व थळचे कारखाने असे अनेक कारखाने निघाले. त्यातील काही काळाच्या ओघात बंदही पडले. शेवटी अशा कारखान्यांना बरेच पाणी लागते का, या कारखान्यांमुळे किती प्रदूषण होते, भोपाळ कारखान्यातील अपघात अशी बरीच प्रश्नोत्तरे झाली.

८) **आनुवांशिक जनुकशास्त्र (एपिजेनेटिक्स):-** शुक्रवार दिनांक १५ नोव्हेंबर, २०१९ रोजी विज्ञानगंगा अंतर्गत प्रा. सागरिका दामले यांचे व्याख्यान 'आनुवांशिक जनुकशास्त्र (एपिजेनेटिक्स) या विषयावर झाले.

डीएनए /आरएनए पेशीत असतो. पेशी सर्व सजीवात असतात. प्रत्येक सजीवाकडे ५० टक्के जनुके आईकडून आणि ५० टक्के जनुके वडिलांकडून येतात. तरीही प्रत्येकाकडे फक्त आईचे व वडिलांचे ५०-५० टक्के गुण येतातच असे नाही कारण प्रत्येक सजीवावर परिस्थितीचा परिणाम होत असतो. या परिस्थितीजन्य बदलाचे बरेच भाग आहेत. एक आहे, होमोस्थेसीस तो व्हायला एक क्षणही पुरा पडतो. उदा. कडाक्यात्या थंडीत आपले दात कडकडायला लागतात, अंगावर रोमांच उठतात. दुसऱ्या बदलाला न्यूरोप्लास्टिसिटी म्हणतात. हे बद्दल घडायला महिन्यांपासून काही वर्षांपर्यंतचा वेळ लागू शकतो. उदा. नृत्य-गाणे शिकणे. त्यानंतर हळूहळू होणारे बदल म्हणजे एपिजेनेटिक्स तर लाखो वर्षाने होणाऱ्या बदलांना नॅचरल सिलेक्शन म्हणतात. उदा माकडाचा माणूस होणे. डीएनएची प्रथिने असतात. त्यांना हिस्टॉन म्हणतात. त्याची ए.टी.जी आणि एस ही चार मुळाक्षरे आहेत माणसात ४६ जनुके आहेत, उंदरात ४२, सशात ४४, गौरीलामध्ये ४६ तर फुलपाखरात ३८० असतात.जसा जनुकाच्या संख्येत बदल होतो,तशी वागणूकही बदलते. आरएनए ही जनुकाची प्रत असते. डीएनए हा मोठा भाऊ तर आरएनए हा धाकटा भाऊ. काही मुले सतत बोलतात, त्या मुलात सतत प्रथिने तयार होत असतात. जनुके नीट वागली नाहीत तर आपले आरोग्य बिघडते. उंची वाढवणारे जनुक विशिष्ट काळापर्यंत काम करते. उदा. उंची वयाच्या १७-१८ वर्षांपर्यंतच वाढते. जनुकांचे नियंत्रण कोणाकडे असते? उदा. मधुमेह, उच्च रक्तदाब, कर्करोग या सगळ्यांची जनुके प्रत्येकात असतात. पण ती सहसा काम करीत नाहीत. आणि सध्या शास्त्रज्ञांचे प्रयत्न अशा जनुकांनी कधीच काम करू नये या दिशेने आहेत. हेच एपिजेनेटिक्स आहे. वडिलांना मधुमेह असेल तर तो मुलात उतरतो. तो उतरू नये म्हणून सध्या प्रयत्न चालू आहेत. जर आज आपण फास्टफूड खात असू, खूप वेळ टीव्ही पाहत असू, खूप वेळ मोबाईल वापरत असू तर त्यामुळे होणारे दुष्परिणाम पुढील पिढयांवर नक्की होणार. आपल्याला मिळालेल्या वडिलोपार्जित जनुकांसारखेच केवळ आपण दिसणार नाही तर, त्यावर वातावरणाचा परिणामही होत राहणार, कोर्नाड वेडिंग्टन यांनी १९४२ मध्ये प्रथम एपिजेनेटिक्स हा शब्द वापरला. हैड्रोन हा या शास्त्रातील दुसरा शास्त्रज्ञ. एखादे जनुक काम करायला नको असेल तर त्यासाठी मिथायलायझेशन ही प्रक्रिया करावी लागते. तर ती चालू करायला असिटायलेशन प्रक्रिया करावी लागते. आहारात जर द्राक्षे, ब्रोकोली, लसूण, हळद सोयाबीन यांचा वापर केला तर मिथयलायझेशनचा परिणाम मिळू शकतो. जसे आईने मुलाकडे दुर्लक्ष केले तर मुलाची अस्वस्थता वाढते अशा वेळी मिथयलायझेशन परिणाम होतो. मात्र व्यवस्थित लक्ष पुरवले तर असिटायलेशन परिणाम मिळू शकतो.

९). **आश्चर्यजनक आवर्तनेः मूलद्रव्यांचीः-** शुक्रवार दिनांक २७ डिसेंबर, २०१९ रोजी विज्ञानगंगा अंतर्गत डॉ. मानसी राजाध्यक्ष याचे व्याख्यान 'आश्चर्यजनक आवर्तने : मूलद्रव्यांची' या विषयावर झाले.

डॉ. मानसी राजाध्यक्ष यांनी व्याख्यानाच्या प्रास्ताविकात मूलद्रव्यांची आश्चर्यजनक आवर्तने ज्या आवर्तसारणीमध्ये प्रतीत होत असतात. तो आवर्तसारणी हा विषय विविध कंगोरे असलेला अत्यंत आव्हानात्मक विषय असून, या आवर्तसारणीमध्ये पूर्ण रसायनशास्त्राला सामावून घेण्याची क्षमता असल्याचे अधोरेखित केले. आवर्तसारणी रसायनशास्त्राचा पाया असून रसायने कशी तयार होतात, ती कशी वागतात म्हणजे त्यांचे गुणधर्म काय असतात या सर्व गोष्टींचे आकलन आवर्तसारणीच्या अभ्यासात होत असल्याचे त्यांनी नमूद केले. आपल्या व्याख्यानात आवर्तसारणीचा प्रवास घडवताना त्यांनी विविध मुद्यांचा परामर्ष घेतला व त्यावर सखोल विवेचन केले,

ते मुद्दे प्रामुख्याने असे :

१. आवर्तसारणी हे क्लिष्ट गणिती परिगणनाचे सोपे सादरीकरण असून ते समजण्यास अवघड नाही.

२. मूलद्रव्याचाअणु म्हणजे काय? अणुची रचना कशी असते व त्यामधील विविध कणांची माहिती व त्यांचे आकारमान व त्यानुसार ठरणारे अणुचे वजन तसेच अणुमधील कणांवरील ऋण किंवा धन भार, इत्यादी.

३. आवर्तसारणीतील प्रत्येक मूलद्रव्याचा अणुक्रमांक ही त्याची प्राथमिक ओळख असते. त्या क्रमांकानुसार त्याचे आवर्तसारणीतील स्थान निश्चित होते व त्यानुसार त्याचे वैज्ञानिक व रासायनिक गुणधर्म आढळून येतात.

४. सध्याच्या प्रचलीत आवर्तसारणीपर्यंतचा प्रवास कसा झाला व यापूर्वीच्या सारणीमधील दोष व त्यांच्या मर्यादा.

५. प्रचलीत आवर्तसारणीची वैशिष्टये, विशेषत: त्यातील स्तंभ व रांगा, त्यांचे आंतरसंबंध, आवर्तसारणीमधील स्थानानुसार ठरणारे मूलद्रव्याचे गुणधर्म याबाबतचे उदाहरणासहित सखोल विवेचन.

६. मूलद्रव्यांचे धातू व अधातू असे वर्गीकरण कसे होते व त्या अनुषंगाने त्यांचे वैज्ञानिक व रासायनिक गुणधर्म कसे ठरतात.

७. मूलद्रव्याची इतर मूलद्रव्यांसोबत होणारी रासायनिक अभिक्रिया त्याच्या आवर्तसारणीमधील स्थानावर कशी अवलंबून असते हे उदाहरणासह दाखवून दिले.

८. प्रचलित आवर्तसारणीमधील रिकाम्या जागा व कालांतराने या जागा घेतलेल्या मूलद्रव्यांचे लागलेले शोध व या अनुषंगाने आवर्तसारणीची परिपूर्णता

९. संक्रमक, आंतरसंक्रमक मूलद्रव्यांबाबतची माहिती.

एकूणच आवर्तसारणीचा अत्यंत मनोरम प्रवास त्यांनी सोप्या पद्धतीने घडवला तसेच या प्रवासास त्यांनी रासायनिक अभिक्र्रियांबाबत प्रात्याक्षिके व सदीप सादरीकरणाची जोड दिल्यामुळे हा प्रवास रंजकही झाला.

१०) **प्रकाश आणि अंधार**:- २४ जानेवारी २०२० रोजी विज्ञानगंगा अंतर्ग प्रा. विनय आर. आर यांचे व्याख्यान 'प्रकाश आणि अंधार' या विषयावर झाले.

विज्ञानगंगा व्याख्यानमालेतील सेहेचाळिसावे पुष्प पुण्याच्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयातील रसायनशास्त्राचे निवृत्त प्राध्यापल विनय र.र. यांनी 'प्रकाश आणि अंधार' या विषयावर गुंफले. वाढत्या शहरातील रात्रीचा उजेड वाढत चालला आहे. घरातही प्रकाशासाठी लावलेल्या दिव्यांशिवाय, टेलिव्हिजन, मोबाईल, संगणक या उपकरणांमुळेही प्रकाश वाढत चालला आहे. हे प्रकाशाचे प्रदूषण आहे. पूर्वी दिवसा झगझगीत सूर्यप्रकाश असे आणि रात्री दिवे लावले तरी त्यामानाने कमी प्रकाश असे. ही परिस्थिती मानवी शरीराने आत्मसात केल्याने रात्री लोकांना अंथरुणावर पडल्या पडल्या झोप लागत असे... आता दिवसा अनेक कार्यालयात पडदे लावून विजेच्या दिव्याचा प्रकाश पाडला. जातो.त्यामानाने रात्रीचा प्रकाश बाहेरच्या अंधारामुळे वाढला असल्याने रात्री लोकांना अंथरुणावर पडल्यानंतर १५ मिनिटे ते ४५ मिनिटे एवढा वेळ झोप लागण्यासाठी प्रतीक्षा करावी लागते. आपल्या मेंदूत मेलॅटोनीन नावाचे रसायन तयार होत असते.त्यामुळे शरीरास विश्रांती मिळते मात्र मेलॅटोनीन वाढल्यास लेप्टीन नावाचे रसायन तयार होते. पण या रसायनामुळे आपली भूक कमी होते. समुद्राकाठीही दिवे लावल्याने कासवांचा अंडी घालायचा काळ अलीकडे एक महिन्याने पुढे गेला आहे. वर्ध्याच्या सेवाग्रामजवळील एका गाईंच्या गोठ्याजवळ नगरपालिकेने रस्त्यावर लावलेल्या झगझगीत दिव्यांमुळे गायींना नीट झोप येत नाही, याचा परिणाम त्यांच्या दूध देण्याच्या क्षमतेवर येईल अशी भीती वाटते. दिवसभर उन्हात काम करणाऱ्या शेतकऱ्यांच्या अंगावर ६००० लक्स एवढा प्रकाश पडतो तर शाळेत जाणाऱ्या मुलाच्या अंगावर ५०० लक्स एवढा प्रकाश पडतो. रात्रीचा सर्वसामान्य प्रकाश ६७० लक्स एवढा असतो. मोबाईलचा प्रकाश निळसर असतो. त्याच्या अति वापरामूळे मेलॅटोनीनची निर्मिती कमी होते. एलईडी दिवे कमी वीज खर्च करतात,

जास्त दिवस टिकतात पण प्रखर उजेड देत असल्याने दरवर्षी २ टक्के प्रदूषण वाढत आहे. आज ८३ टक्के लोकांना प्रकाशाच्या प्रदूषणाने त्रास होत आहे.झोप नीट न आल्याने शरीराच्या क्रिया अनियमित होत आहेत. झोप न आल्याने भूक वाढते व जाड्य येते. या जाड्यामुळे हृदयविकार व कर्करोग संभवतो दिवसा चांगला उजेड आणि रात्री चांगला अंधार असेल तर आरोग्य नीट राहते.

**११) महाराष्ट्रातील दुष्काळ**:- बुधवार दिनांक १८ फेब्रुवारी २०२० रोजी विज्ञानगंगा अंतर्गत श्री. अतुल देऊळगावकर यांचे व्याख्यान 'महाराष्ट्रातील दुष्काळ' या विषयावर झाले.

दुष्काळ दोन प्रकारचा असतो. एका कोरडा दुष्काळ आणि दुसरा ओला दुष्काळ. मराठवाड्यात यंदा जून ते सप्टेंबर या काळात कोरडा दुष्काळ लोकांनी अनुभवला तर ऑक्टोबर-नोव्हेंबर या महिन्यात पडलेल्या प्रचंड पावसाने ओला दुष्काळ लोकांनी अनुभवला. दोन्ही प्रकारच्या दुष्काळात शेतीचे नुकसान होते, कोरड्या दुष्काळामुळे पिण्याच्या पाण्याचे हात होतात आणि लोक आपापली गावे सोडून पुण्या-मुंबईकडे धाव घेतात. ओल्या दुष्काळात शेतीबरोबर घरांचेही नुकसान होते.गेल्या काही वर्षात आपण अनुभवत असलेला हवामान बदल जगभर असून त्याचा सगळ्यात मोठा धोका आता मानवतेला आहे. हा धोका ओळखून स्वीडनची ग्रेटा थनबर्ग ही ११ वर्षाची मुलगी सातवीत असताना स्वीडीश संसदेबाहेर हातात फलक घेऊन एकटीच बसली होती. दुसऱ्या दिवशी तिला ५० लोकांनी साथ दिली. त्नंतर १००० माणसे झाली. आता मात्र तिला जवळच्या दोन देशातील मिळून दीड कोटी लोकांचा पाठिंबा मिळाला आहे. जगातली ती सर्वात लोकप्रिय व्यक्ती आहे अशी तिच्यावर टाइम मासिकाने कव्हर स्टोरी केली आहे. भारतीय माणूस दरवर्षी दीड टन कार्बन उत्सर्जन करतो तर अमेरिकन माणूस १५ टन करतो आणि स्वत:चे विमान वापरणारा बिल गेटस २५०० टन उत्सर्जन करतो.

जगात सगळीकडे तापमान वाढत आहे. काल ( १७ फेब्रुवारी, २०२० रोजी) मुंबईत ३८ अंश सेंटीग्रेड तापमान होते. उन्हाळ्यात लातूरला ४७ अंश असते, राजस्थानात ५० अंशापर्यंत तापमान जाते. जगात अन्यत्र ५४ पर्यंत जाते. आणि आता पुढील दशकात ही वाटचाल ६० अंशाकडे जाईल असे दिसते. आपण हवामानाच्या आणीबाणीत आहोत. आपण रोज ५५० लिटर शुद्ध ऑक्सिजन घेतो, म्हणजे ३ सिलेंडर जगाला आता धोका बॉम्बचा नसून हवामानाचा आहे. आता १२ ला फक्त १०० सेकंद बाकी आहेत, एवढा तो धोका जवळ आला आहे. त्यातल्या त्यात हा हवामानाचा धोका किनाऱ्यानजीक जास्त आहे. फिनलँड, फिजी, बांगला देश इत्यादी देश बुडून जाणार आहेत.लहान मुलेसुद्धा या संकटात मदत करू शकतात. २००० साली अटल बिहारी बाजपेयी पंतप्रधान असताना, ८-९वीतील मुलांनी संसदेबाहेर निदर्शने करून शुद्ध हवेचा अधिकार आम्हालाही आहे असे फलक हातात घेतले होते. ते पाहून सरकारने दिल्लीतील डिझेलवर चालणारी वाहने बंद करून ती इंधन वायूवर सुरु केली. आता कमीतकमी वेळात जास्त पाऊस येणारे पाऊस वाढले आहेत. २०४० साली ध्रुवावर बर्फ असणार नाही. २६% सागराचे आम्लीकरण होईल, ७०० ठिकाणचा ऑक्सिजन नष्ट होईल, २१०० साली प्रवाळाचा अंत होईल. सध्याच जीवसृष्टीतील १० लक्ष प्रजाती नष्ट झाल्या आहेत. सूक्ष्मजीव नष्ट झाले की रोगप्रसार होतो. ऑस्ट्रेलियात गेल्या महिन्यात १० कोटी प्राणी आगीत नष्ट झाले. वनखात्यात काम करणाऱ्या भागवतराव धोंडे यांनी डोंगरावर पडणारे पावसाचे पाणी डोंगरातच मुरावे म्हणून समतल चर खणल्याने डोंगर हिरवेगार झाले. त्याला भोजपुरी २०००म्हणतात. लातूरमध्ये १० वर्षापेक्षा जुनी झाडे नाहीत.

एक लिटर दूध मिळवायला १००० लिटर पाणी लागते.शास्त्रज्ञांपुढे १००० लिटरऐवजी ते कमी पाणी वापरून एक लिटर दूध कसे मिळवता येईल हे आव्हान आहे. आता कोरड्या मातीत मका काढण्याचे प्रयोग जेनिफर थॉमसन या बाईंनी यशस्वी करुन दाखवले. आता काही ठिकाणी गारपिटीचे रूपांतर तोफा मारून पाण्यात केले जात आहे.

International Centre for Climate Change अशी संस्था ढाक्क्यात आहे. तशा संस्था आपल्याकडे हव्यात. १९९५ पासून आतापर्यंत ७५ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, त्या मुलीच्या लग्नापायी किंवा शिक्षणाच्या खर्चापायी होतात. आणि आता दररोज २००० शेतकरी देशात शेती सोडत आहेत. ही धोक्याची घंटा आहे.

६. **यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी (YCPAIT) :-**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनी अनेक संगणकीय अभ्यासक्रम चालविते. प्रबोधिनी हे अभ्यासक्रम सी-डॅक व महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (म) यांच्यासोबत संयुक्त विद्यमाने चालविते.

ह्यावर्षी झालेल्या अभ्यासक्रमांची सूची खालीलप्रमाणे:-

PG DAC (पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन अॅडवान्सड कॉम्प्युटींग) - ६ महिने पूर्णवेळ

Pre DAC (प्रि-डॅक) - २ महिने अर्धवेळ

CCMC (सर्टीफिकेट कोर्स इन मल्टीमिडिया क्रिएशन्स) - २ महिने अर्धवेळ

CCIT (सर्टीफिकेट कोर्स इन इन्फोर्मेशन टेकनोलॉजी ) - ४ महिने अर्धवेळ

MS-CIT (महाराष्ट्र स्टेट सर्टीफिकेट कोर्स इन इन्फोर्मेशन टेकनोलॉजी) - २ महिने अर्धवेळ

Klic Certificate Course In Fainancial Accounting (Tally with GST) - २ महिने अर्धवेळ

Klic Certificate Course In Advance Excel - २ महिने अर्धवेळ

Klic Certificate Course In Photo Editing - २ महिने अर्धवेळ

Klic Certificate Course In Adobe (DTP) २ महिने अर्धवेळ

Klic Certificate Course In Graphic Designing - २ महिने अर्धवेळ

Klic Certificate Course In Content Illustrator - २ महिने अर्धवेळ

Klic Certificate Course In Video Editing - २ महिने अर्धवेळ

Klic Certificate Course In Web Designing - २ महिने अर्धवेळ

वरील अभ्यासक्रमांकडे पाहून आपल्याला लक्षात आले असेल की काही अभ्यासक्रम लघुरुप कालावधीचे आहेत व काही सहामाही आहेत.

प्रत्येक कोर्ससाठी आलेला विद्यार्थी आपल्याला तितकाच महत्वाचा असतो. तरीही डॅक कोर्सचे विद्यार्थी आपल्या सोबत सहा महिने असतात त्यामुळे ते अधिक जवळचे होतात. या मुलांचा अभ्यासक्रम अतिशय क्लिष्ट असतो व त्यांना दिवसातील जवळजवळ १६ तास व्यस्त ठेवतो.

आपल्याकडे ह्यावर्षी डॅक कोर्ससाठी साधारण २०० विद्यार्थी होते. अभ्यासासोबत आपण त्यांना इतर फायदेही देतो. उदा: व्यवस्थापकीय व्याख्याने इत्यादि. डॅकच्या मुलांचा निरोप समारंभ म्हणजे एक सोहळाच होता. देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेले हे विद्यार्थी ६ (सहा) महिने एकत्र अभ्यास करतात. ह्या मुलांना अनेक कंपन्येंकडून नोकरीची ऑफर केली जाते. प्रबोधिनीला, मुलांना नोकरी मिळाल्याचा आनंद आहे. अनेक आय.टि. क्षेत्रातील कंपनीज् डॅकच्या विद्यार्थ्यांना कंपनीमध्ये भरती करुन फायद्यात असतात. म्हणूनच ते मुलांना वेतनसुद्धा उत्तम देतात.

सहा महिन्यांच्या ह्या तणावपूर्ण अभ्यासाच्या वातावरणात मुलांच्या मानसिक विरंगुळयाचा पण विचार केला जातो. वेगवेगळया स्पर्धा जसे की रांगोळी, गाथन, कॅरम, टेबल टेनिस इ. आयोजित केल्या जातात.

डॅक कोर्सला प्रवेश मिळविण्यासाठी प्रवेशपरीक्षा द्यावी लागतो. ही प्रवेशपरीक्षा (CCAT) उतीर्ण होण्यासाठी विद्यार्थ्यासाठी प्रशिक्षण वर्ग Pre DAC (प्रि-डॅक) चालविला जातो.

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित MSCIT आणि KLic अभ्यासक्रम चालविण्याची परवानगी प्रबोधिनीला वर्ष २०२० साठी मिळाली. MKCL च्या MS-CIT कोर्सला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद आहे. ह्या कोर्सचा भविष्यात विद्यार्थ्यांना उपयोगही होतो.

दहावीच्या विद्यार्थ्यांना MKCL ने ALL THE BEST चे KIT देऊन परीक्षेत यश मिळविण्याकरिता शुभेच्छा दिल्या. प्रतिष्ठानने वेगवेगळया शाळा व क्लासेसच्या दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी समारंभ आयोजित केला होता.

**उद्दिष्ट:** गरजू आणि अपंग विद्यार्थ्यांना माफक दरामध्ये शिक्षण उपलब्ध करुन देण्याची संधी AIT देते. अनेक कोर्सेस मध्ये पडताळणी नंतर माफक दरात प्रवेश देण्यात येतो. AIT (YCP) तर्फे लष्कर आणि पोलिस खात्यातील व्यक्ती आणि त्यांचे कुटुंबीय यांसाठी फी मध्ये सवलत दिली जाते. इच्छुक आणि शैक्षणिक पात्रता असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी फी भरण्याची सुविधा देण्यात येते.

वेगवेगळया कार्यक्रमाद्वारे तसेच इतर संस्थांच्या सहाय्याने अधिकाधिक संगणकीय प्रशिक्षणवर्ग चालविणे, हेच AIT चे उद्दिष्ट आहे.

ह्या सर्व कार्यक्रमाची छायाचित्रे http://www.ycpait.org या संकेत स्थळावर पहावयास मिळतील.

## ७ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर कार्यक्रम / उपक्रम :-

७.१ **प्रथम – मुंबई शिक्षण उपक्रम:-** मुंबई शहरात झोपडपट्टीवासियांच्या मुलांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून बालवाड्या चालविणे, संगणकाचे प्रशिक्षण देणे, झोपडपट्टीतील स्थानिक रहिवाशांमधून उपक्रमाकरिता शिक्षक – शिक्षिका तयार करणे इत्यादी महत्वपूर्ण कामे प्रथम – मुंबई शिक्षण उपक्रमामार्फत डॉ. माधव चव्हाण व श्रीमती फरिदा लांबे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणावर केली जातात. संस्थेच्या उपक्रमास प्रतिष्ठानकडून सहकार्य करण्यात येते. या संस्थेस प्रतिष्ठानच्या केंद्रीय इमारतीच्या चौथ्या मजल्यावर जागा दिली

७.२ **युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्स:-** युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या भारतीय विभागाचे सहकार्य प्रतिष्ठानच्या उपक्रमांना लाभत असून महाराष्ट्रातील व्यापार, उद्योग व सहकार या सामाजिक क्षेत्रांच्या भरीव वृद्धीसाठी ते फार महत्वाचे आहे. युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्स इन इंडियाद्वारे निरनिराळया क्षेत्रात प्रकल्प उभारण्यासाठी आर्थिक मदत कशी उपलब्ध करुन घेता येइल, याची माहिती प्रसिध्द केली जाते. या संस्थेस प्रतिष्ठानने केंद्र इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर जागा दिली आहे.

७.३ **महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ:-** महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ या संस्थेची स्थापना प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी सन १९५७ मध्ये केली. ही संस्था महाराष्ट्राचा आर्थिक व औद्योगिक विकास वेगाने आणि संतुलितपणे होण्यासाठी संशोधनाचे कार्य करते. महाराष्ट्रामध्ये उद्योग सुरु करण्यासाठी इच्छुक असणाऱ्या उद्योजकांना सांख्यिकीय माहिती पुरविणे, योग्य निर्णय घेण्यासाठी राज्य शासनाच्या धोरणात्मक निर्णयांची माहिती देणे, चिकित्सक पद्धतीने अधिकृत आकडेवारी पुरविणे तसेच महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या उद्योगसंधीविषयी माहिती देण्याचे काम ही संस्था करते. संस्थेतर्फे उद्योजकांसाठी परिसंवाद, परिषदा व कार्यशाळा आयोजित केल्या जातात. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व सदरची संस्था परस्पर सहकार्याने काम करतात. या उपक्रमासाठी महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाला केंद्र इमारतीतील तिसऱ्या मजल्यावरील जागा उपलब्ध करून देण्यात आाली आहे.

७.४ **बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्चफाउंडेशन (बॉम्बे फर्स्ट) :-** बॉम्बे फर्स्ट ही संस्था बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्रिज आणि बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्च फाउंडेशन या संस्थांच्या पुढाकाराने व औद्योगिक / वाणिज्य क्षेत्रातील अनेक आस्थापनांच्या आर्थिक पाठबळावर १९९५ मध्ये अस्तित्वात आली. या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट मुंबई शहरातील वाढत्या लोकसंख्येचे आव्हान स्वीकारुन येथील पायाभूत सुविधामध्ये विकास करुन नागरिकांच्या राहणीमानाची पातळी उंचावणे, काम करण्याच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे आणि भांडवली गुंतवणूकदारांना आकर्षित करणे हे आहे. मुंबई शहराच्या विविध प्रश्नांवर विचार करण्यासाठी शासन, महानगरपालिका व इतर स्वयंसेवी संस्था यांचे समन्वयक म्हणून

ही संस्था कार्य करते. संस्थेचा वाढता व्याप लक्षात घेऊन प्रतिष्ठानने या संस्थेला केंद्र इमारतीतील तिसऱ्या मजल्यावर जागा दिली आहे.

## ८. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई मार्फत देण्यात आलेले अनुदान :-

८.१ **सार्वजनिक उत्सव समिती, नवी दिल्ली** : सार्वजनिक उत्सव समिती, नवी दिल्ली ही संस्था मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ दरवर्षी नवी दिल्ली येथे 'यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह' आयोजित करते. यावर्षी मा.चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठन, मुंबई तर्फे रु. २ लाख इतके अनुदान दिले आहे.

८.२ इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन, मुंबई शाखा यांच्यामार्फत दरवर्षी मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ व्याख्यान आयोजित केले जाते. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र शासनातील उच्च अधिकारी तसेच प्रतिष्ठानचे पदाधिकारी उपस्थित असतात. त्यासाठी प्रतिष्ठानने रु. वीस हजार इतकी आर्थिक मदत केली आहे.

८.३ प्राज्ञ पाठशाळा मंडळ वाई, यांना धर्मकोष प्रकल्पासाठी रूपये ५ लाख इतके अनुदान देण्यात आलेले आहे.

## ९. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या विभागांमार्फत झालेले कार्यक्रम / उपक्रम :-

### ९.१ कृषी व सहकार विभाग:-

१) प्रश्नमंजुषा स्पर्धा (ग्रामीण): एकूण ५५ शाळांतील इयत्त ८ वी चे १५११ विद्यार्थी व ९ वी चे १४५७ विद्यार्थी असे एकूण २९६८ विद्यार्थी यांनी डॉ. राधाकृष्णन प्रश्नमंजुषा स्पर्धेत सहभाग घेतला. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या ९ विभागीय केंद्रांवर वरील विद्यार्थ्यांमध्ये साधारणपणे ८ वी चे पाच आणि ९ वी चे पाच असे शाळांमधून गुणानुक्रमे आलेल्या विद्यार्थ्यांची द्वितीय स्तर परीक्षा दि. ५-१२-२०१९ रोजी घेण्यात आली. ८ वी साठी दहा व ९ वी साठी दहा अशी रोख पारितोषिक प्रत्येकी गुणानुक्रमे रू. ५००/- रू. ४००/- रू. ३००/- व उत्तेजनार्थ ७ पारितोषिके प्रत्येकी रू. २००/- या प्रमाणे पुणे शिक्षण मंडळामार्फत वाटण्यात आली.

२) निबंध स्पर्धा ग्रामीण: प्रश्न मंजुषेप्रमाणे त्यानंतर इयत्ता ८ वी व ९ वी विद्यार्थ्यांसाठी डॉ. राधाकृष्णन् या विषयावर निबंध स्पर्धांचे आयोजन केले होते. सर्व निबंध सौ. शाळीग्राम, माजी शिक्षिका, कै. वसंतदादा पाटील विद्या निकेतन यांनी तपासले. एकूण विद्यार्थ्यांमधून एकत्रितपणे १० पारितोषिके वाटण्यात आली.

३) महाराष्ट्र को-ऑपरेटीव्ह सोसयटीज (निवडणूक) नियम: महाराष्ट्र शासनाने शासन राजपत्र क्र. ३९० दि. २४ ऑक्टोबर २०१९ नुसार सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी निवडणूक नियम जाहीर केले. त्यावर व्यासपीठाच्या २९ ऑक्टोबर २०१९ च्या सभेमध्ये चर्चा झाली. त्यास अनुसरून मा. सचिव (सहकार) महाराष्ट्र शासन यांना काही सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत. अद्याप नवीन नियम कार्यवाहीत आले नसून निवडणुका वेळोवेळी पुढे ढकलण्यात आल्या आहेत. (२९.२.२०२० पर्यंत) शासनाकडून सुधारित निवडणूक नियम अपेक्षित आहेत.

४) गृहनिर्माण संस्था / अपार्टमेंट सभासदांच्या नावे प्रॉपर्टी कार्डस: शासनाकडे १५ वर्षावरील सहकारी संस्थांसाठी त्यांच्या खालील जमिनीचे हस्तांतरण करणेबाबत प्रकरण सादर केले होते. त्या अनुषंगाने संस्था व अपार्टमेंट सभासद यांचे नावे प्रॉपर्टी कार्ड करण्याबाबतचे आदेश महसूल व वन विभाग नोटीफिकेशन दि. ३० ऑगस्ट २०१९ रोजी निघाले. ते रात्रपत्र असाधारण क्र. ३०२ दिनांक ३१.८.२०१९ रोजी निघाले. ते राजपत्र असाधारण क्र. ३०२ दिनांक ३१.८.२०१९ मध्ये प्रसिद्ध झाले. मध्यंतरी याबाबत शासन मोहीम राबविणार आहे असे वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाले होते. डॉ. तोष्णीवाल, अपर निबंधक, सहकार यांचेकडे २१ नोव्हेंबर २०१९ नुसार पत्र व्यवहार केला आहे. जेणेकरून सहकारी गृहनिर्माण संस्था सभासदांना याचा फायदा त्वरित मिळू शकेल.

५) लॉ ऑफ लिमिटेशन सन १९६३: दि. २७ डिसेंबर २०१९ रोजी, सुप्रीम कोर्ट सिव्हील अपिल ७७६४/२०१४ व स्पेशल लिव्ह पिटीशन ८३३२-७/२०१४ यावरील सुप्रीम कोर्ट निर्णय ७.८.२०१९ यावर सदर निवाड्यातील लिमिटेशन कायदा सार्वजनिक मालमत्तांना लागू करण्यात येऊ नये असे सुचविले आहे. याबाबत १.२.२०१९ चे व्यासपीठाच्या सभेत चर्चा करण्यात आली. काय दरुस्ती सुचवावी यावर सिनियर ॲड. यांचा सल्ला घेण्यात येत आहे.

६) नारी सबलीकरण: वरील विषयावर एक प्रस्ताव, मा. जावडेकर माहिती व प्रसारण मंत्री यांना २३.१.२०२० चे पत्राने पाठविला आहे. त्याची प्रत मा. सौ. सुप्रियाताई सुळे यांना मुख्यालयात पाठविली आहे.

७) कर्जदार शेतकरी अडचणी निवारण: यासंबंधीचा एक प्रस्ताव मा. महेशकुमार जैन (डेप्युटी गव्हर्नर, रिझर्व बँक) यांना दि. ६.१२.२०१९ चे पत्राने सादर केला आहे.

सालाबादाप्रमाणे दिवाळी पहाटचा कार्यक्रम दि. ७ ऑक्टोबर २०१९ रोजी सकाळी ५ ते ९ पार पडला. संपूर्ण संयोजन मा. काकडे सो. यांने केले. बहारदार गाण्यांनी कार्यक्रमाची लज्जत वाढली. हजारो प्रेक्षकांचे मनोरंजन झाले. कुमार आर्य काकडे याने मावळ्याच्या वेशातील तडफदार नृत्याविष्कार सादर केला. तसेच त्याच्या ताशा वादनाचे टाळ्यांच्या गजरात प्रेक्षकांकडून कौतुक झाले. कार्यक्रमांमध्ये माहिती अधिकार कायदा याचे हिरीरीचे पुरस्कर्ते श्रीयुत विवेक वेलणकर यांचा सत्कार मा. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे व मिलिंद जोशी, महाराष्ट्र साहित्य परिषद यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन मा. सुनिल महाजन यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यास श्रीयुत सुरतवाला व त्यांचे सहकारी यांचे साहाय्य झाले.

९.२ **महाराष्ट्र महिला व्यासपीठ :-**

महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या वतीने महिलांची शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक अशा विविध दृष्टीने सक्षमता वाढावी यासाठी विविध उपक्रम, विविध कार्यशाळा आणि इतर कार्यक्रम यांच्या माध्यमातून कृतिशील प्रयत्न केले जातात. संयोजिका रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजिका ममता कानडे महिला व्यासपीठाचे काम पाहतात. त्यांना संजना पवार यांचे सहकार्य असते.

९.१ **वाचे बरवे कवित्व :-** महाराष्ट्र महिला व्यासपीठ आणि रंगस्वर तर्फे 'वाचे बरवे कवित्व' या काव्यमैफलीचे गुरूवार दिनांक १९ एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले होते. अनुपमा उजगरे, गौरी कुलकर्णी, लता गुठे, ज्योती कपिले, पल्लवी बनसोडे, संगिता अरबुने, उषा चांदुरकर, जयश्री संगीतराव, हेमांगी नेरकर, प्रतिभा सराफ आणि महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या प्रमुख संयोजिका रेखा नार्वेकर यांनी स्वलिखित कविता आणि गझल सादर केली. कवितेवर प्रेम करणाऱ्या प्रेक्षकांच्या उपस्थितीत ही काव्यमैफल अत्यंत सुरेख पार पडली.

दिनांक ७ मे २०१९ रोजी सन २०१९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश आणि सहकारी गृहनिर्माण संस्थांवर काम करण्याचा त्याचा प्रभाव या विषयावरती विनामूल्य व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. ॲड. प्रमोद कुमार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. विभाग १५४ब-२ मध्ये सहकारी संस्थांची नोंदणी कशी केली जाते, सहकारी संस्था कशा पद्धतीने काम करतात अशा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम अंतर्गत येणाऱ्या सर्व गोष्टींबाबत त्यांनी संपूर्ण माहिती दिली.

९.२ **स्वाक्षरी विश्लेषण कार्यशाळा :-** मंगळवार दिनांक १४ मे रोजी 'स्वाक्षरी विश्लेषण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. स्वाक्षरीमुळे आपल्या आयुष्यात खूप फरक पडत असतो. स्वाक्षरी करण्याच्या पद्धतीवर आपले यश-अपयश अवलंबून असते. स्वाक्षरीवरून माणसाची विचार करण्याची पद्धत, माणसाचा स्वभाव ओळखता येतो. असे प्रशिक्षक प्रकाश मोहिते म्हणाले. या कार्यशाळेत स्वाक्षरी कशी असावी, प्रगतीतील अडथळे दूर करण्याचे उप्राय, आर्थिक प्रगतीचे

व यशाचे उपाय, राग नियंत्रित करणे, आत्मविश्वास वाढविणे, स्मरशक्ती व एकाग्रता वाढविणे, ताण तणाव कमी करण्याचे उपाय अशा विविध विषयांवर प्रकाश मोहिते यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद मिळाला. कार्यशाळा पूर्ण करणाऱ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

दिनांक १ जून २०१९ पासून २३ वे शनिवार व रविवारचे खास वर्ग सुरू झाले आहेत. ३८ प्रशिक्षणार्थींनी या प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतला आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थांकडून त्यांच्या कामकाजाकरिता प्रशिक्षित व्यवस्थापकांची मागणी वाढू लागली आहे. त्यामुळेच पूर्णवेळ, अर्धवेळ व्यवस्थापक तसेच सल्लागार म्हणून या क्षेत्रामध्ये रोजगाराच्या अनेक संधी शिक्षित लोकांसाठी उपलब्ध आहेत. स्त्रियांचा, त्याचबरोबर समाजाचा सर्वांगीण विकास हेच उद्दिष्ट सामोरे ठेऊन आम्ही स्त्री व पुरूष ह्या सर्वांना उपयुक्त असे सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रशिक्षण सुरू केले. प्रशिक्षण घेतलेल्या स्त्रिया व पुरूष अनेक गृहनिर्माण संस्थेत व्यवस्थापक म्हणून काम पाहत आहेत. संस्थेचे हिशोब व इतर महत्त्वाच्या जबाबदाऱ्याही पार पाडत आहेत. काही महिलांनी स्वत:ची सल्लेविषयक संस्थाही सुरू केली आहे. स्त्रियांसाठी सुरू केलेले हे प्रशिक्षण पुरूषांनाही मोलाचे ठरले. प्रशिक्षणानंतर परीक्षा घेतली गेली व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले. प्रशिक्षणादरम्यान २९ ऑगस्ट २०१९ रोजी इन्कम टॅक्स आणि जीएसटी संबंधित को-ऑपरेटिव्ह सोसायटी या विषयावर महाराष्ट्र सोसायटी वेल्फेअर असोसिएशन (MSWA) अध्यक्ष, सीए रमेश प्रभू यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

दिनांक ६ जुलै २०१९ रोजी महाराष्ट्र सहकार कायदा १९६० मधील पुनर्विकाससंबंधित सुधारित बदल याविषयी मा. विजय सामंत यांचे व्याख्यान आयोजित केले गेले. लोकांना नवीन सुधारित कायद्याविषयी फार महत्त्वाची माहिती मिळाली.

९.३ **सुपर फुड**:- दिनांक २२ ऑगस्ट रोजी सिलेब्रेटी शेफ मा. स्मित देव यांचे 'सुपर फुड' अंतर्गत 'हेल्दी सूप्स व सॅन्डविचेस' यांचे विनामूल्य प्रात्यक्षिक ठेवण्यात आले. महिलांना आपले जेवण अधिक आरोग्यदायी कसे करता येईल याविषयी मार्गदर्शन मिळाले व या पदार्थांची चवही घेत आली.

स्वयंपाकघरात पारंपरिक लोखंडाची व बीडाची भांडी का वापरावी व त्यात शिजवलेल्या जेवणाचे महत्त्व काय, त्यांची निगा कशी राखावी याबाबत 'गेटकीच' च्या सर्वेसर्वा मा. प्रिया दिपक यांचे मार्गदर्शन मिळाले. महिलांनी या वस्तूंची खरेदीही केली.

दिवाळीचे औचित्य साधून दिनांक १९ ऑक्टोबर रोजी मंजिरीच्या सोप्या व सुंदर रांगोळ्यांची कार्यशाळा घेण्यात आली. महिलांना अगदी बेसिक रांगोळी सोप्या पद्धतीने कशी काढावी याबाबत मार्गदर्शन मिळाले.

महाराष्ट्र महिला व्यासपीठ व AAA हेल्थ केअर अंतर्गत शनिवार दिनांक ३०नोव्हेंबर २०१९ रोजी फर्स्ट एड व सी पी आर चे विनामूल्य प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते. ४५ ते ५० महिला व पुरूषांनी या प्रात्यक्षिकाचा लाभ घेतला. त्यात युवा वर्गाबरोबर वयस्कर प्रशिक्षणार्थींचा समावेश होता. प्रथम व्याख्यान व नंतर प्रात्यक्षिक असे या कार्यक्रमाचे स्वरूप होते.

AAA हेल्थ केअर डॉ. कामत यांनी फर्स्ट एड व सी पी आर याबाबतचे व्याख्यान दिले. पॉवर पॉईंटच्या माध्यमातून त्यांनी लोकांना जर अचानक काही गोष्टी घडल्या, तर कुठली प्राथमिक काळजी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले. दोन अडीच तासाच्या व्याख्यानानंतर जेवणाची सुट्टी झाली व नंतर डॉ. कामत यांनी प्रात्यक्षिकास सुरूवात केली. लोकांनीही यात सहभाग घेतला. प्रत्यक्षात असे प्रसंग घडले तर कुठल्या प्राथमिक गोष्टी कराव्या याबाबतीत मार्गदर्शन मिळाले. डॉ. कामत यांनी प्राथमिक प्रशिक्षणार्थींना जर असा प्रसंग घडला तर सी पी आर कसे द्यावे याचे प्रात्यक्षिक करून दाखवण्यास सांगितले. संध्याकाळी ५:१५ वाजता कार्यक्रम संपला. सहभागी विद्यार्थ्यांनी आम्हाला खूप महत्त्वपूर्ण

मार्गदर्शन मिळाले असे बोलून महिला व्यासपीठाचे धन्यवाद मानले.

दिनांक ११ जानेवरी २०२० रोजी महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे इलेक्ट्रिसिटी रेग्युलेशन्स आणि सेफ्टी ऑडीट या विषयांवर श्री. प्रकाश कुलकर्णी यांचे माहितीपर विनामूल्य व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी ३४ वर्षे शासकीय सेवा करून यशदा, टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर अशा अनेक ठिकाणी सदर विषयांवर व्याख्यान व ट्रेनिंग दिली आहेत. त्यांची सदर विषयांवर अनेक पुस्तके प्रकाशित आहेत.

सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत त्यांनी सदर विषयाची माहिती पॉवर पॉईंट मार्फत दिली. २५ लोकांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला. त्यात आमच्या सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन वर्गातील प्रशिक्षणार्थी व इतर लोकांचा ही समावेश होता. श्री. कुलकर्णी यांनी विषयाचे महत्व किती आहे हे सहभागींना पटवून दिले. सदर विषयाबद्दल असणारे कायदे, त्याच्या तरतुदी तसेच लिफ्टच्या वापराबद्दल घेण्यात येणारी काळजी याबद्दलही माहिती सांगितली. विद्युत अधिनियम आणि सुरक्षा लेखापरीक्षा (ऑडिट) किती महत्त्वाची आहे याविषयी माहिती सांगितली. आपत्ती येण्यापूर्वी आपण ती आपत्ती कशी टाळावी या बाबत लोकांना दक्ष केले. लोकांनीही बरेच प्रश्न विचारून आपापल्या शंकांचे निरसर केले.

त्यांची या विषयांवर पुस्तके प्रकशित आहेत याची ही त्यांनी माहिती दिली. आपणही आपल्या सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन वर्गातील अभ्यासक्रमात त्यांचा हा विषय समाविष्ट केला आहे. लोकांमध्ये जगजागृती व्हावी या उद्देशाने हे व्याख्यान फार उपयोगी पडले.

मंगळवार दि. २८ जानेवारी रोजी ज्येष्ठ साहित्यिक वीणाताई गवाणकर यांची मुलाखत आयोजित करण्यात आली होती. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. व्यासपीठाच्या संयोजिका रेखा नार्वेकर व प्रा. सुहासिनी किर्तीकर यांनी या मुलाखतीतून वीणाताईंचा साहित्यिक प्रवास उलगडला. व्यासपीठाच्या कार्यकारी संयोजिका ममता कानडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली, डॉ. आयडा स्कडर, गोल्डा मेयर, सर्पतज्ज्ञ रेमंड डीट्मार्स, रोझलीन फ्रॅंकलीन, डॉ. खानखोजे यांच्या जीवनावरील त्यांचे लिखाण उल्लेखनीय आहे. जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर हा अमेरिकेत जन्मलेला अनाथ गुलाम, त्याने कृषी क्षेत्रात जी क्रांती केली त्याची कथा वीणाताईंनी आपल्या 'एक होता कार्व्हर' या पुस्तकातून लोकांसमोर मांडली. या पुस्तकाबरोबरच वीणाताई यांचे नाव साहित्य जगतात ओळखीचे झाले. अशा अनेक पुस्तकांचा संदर्भ या मुलाखती दरम्यान लोकांच्या समोर आला. साहित्य लिहिताना एक लेखिका म्हणून झालेला प्रवास, या प्रवासात आलेले वेगवेगळे अनुभव अशा अनेक गोष्टींचा उलगडा त्यांनी या मुलाखतीतून केला.

सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रशिक्षण अभ्यासक्रम या कार्यशाळेचे २३ वर्ग यशस्वी झाले व आतापर्यंच ८०० हून अधिक लोकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला आहे. दिनांक १ फेब्रुवारी २०२० पासून २४ वा शनिवार व रविवारचा खास वर्ग सुरू झाला आहे. या यशस्वी प्रशिक्षणाबरोबर Goverment Deiploma In Co-Operation & Accountancy चे प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. सलग तीन महिने शनिवार / रविवार हा वर्ग सुरू राहणार आहे. ४४ प्रशिक्षणार्थींनी या प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतला आहे.

वर नमूद केलेली सर्व प्रशिक्षणे व कार्यक्रम अत्यंत माफक फीमध्ये 'ना नफा ना तोटा' तत्त्वावर सुरू आहेत. ज्यासाठी बाहेर खूप पैसे मोजावे लागतात. या सर्व प्रशिक्षणात आम्ही प्रशिक्षंर्थीची संख्या मर्यादित ठेवली आहे. जेणेकरून मार्गदर्शकास प्रत्येकाकडे लक्ष देता येईल.

आमची उद्दिष्टे सरळ, सोपी व समाजाचे भले व्हावे या दृष्टिकोनातूनच आहेत. आम्ही सतत लोकांना काय उपयुक्त देऊ शकतो हाच विचार करत असतो. खूप मोठ्या प्रमाणात नाही पण ज्या समाजात आपण वावरतो व ज्याच्याकडून

आम्हालाही खूप काही शिकायला मिळते, त्या समाजाचे देणे परत करणे, हा आमचा खारीचा नाही पण मुंगीचा वाटा नक्की आहे. आजही आमच्या प्रत्येक प्रशिक्षणार्थीकडून आम्हाला कामाची मिळालेली दाद व भविष्यासाठीच्या शुभेच्छा हेच आमचे उद्दिष्ट सफल करते. याच विचाराने आम्ही भविष्यातही खूप काही स्त्रियांसाठी व समाजासाठी करत राहणार आहोत.

**९.२ नवमहाराष्ट्र युवा अभियान :-**

नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे काम संयोजक दत्ता बाळसराफ सहसंयोजक विश्वास ठाकूर, समन्वयक विजय कान्हेकर, संघटक निलेश राऊत हे पाहतात. कार्यालयीन संघटक म्हणून सुरेश पाटील व सहाय्यक म्हणून मिनल सावंत, रमेश मोरे, मनीषा खिल्लारे, महेश साळवी कार्यरत आहेत.

२.१ **हवामान बदलाचे संकट रोखूया...!:**जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलाचे संकट समस्त मानवजात आणि पृथ्वीतलावरील सृष्टीला ग्रासून टाकत आहे. स्वाभाविकपणे भारत आणि महाराष्ट्रही यातून सुटलेला नाही. आपण सर्वजण आपापल्या क्षमतेनुसार पर्यावरण संरक्षणाच्या कामात सक्रीय अहोत. जागतिक तापमानवाढ दीड अंश सेल्सिअसच्या खाली आणणे. हे जागतिक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शासनव्यवस्थेपासून सामान्य नागरिकापर्यंत सर्वांनाच कटिबद्ध व्हायचं आहे.

यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या वतीने बुधवार दिनांक १७जुलै, २०१९रोजी सकाळी १०.३० ते सायं. ५.३० यावेळेत वरील विषयावर बैठक व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत पर्यावरणाच्या क्षेत्रातील विविध मान्यवर सहभागी झाले होते. प्रथमत: प्रतिष्ठानचे कार्यक्रम व्यवस्थापक श्री. दत्ता बाळसराफ यांनी उपस्थितांचे स्वागत केले व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे सरचिटणीस मा. श्री. शरद काळे यांनी प्रास्ताविक केले. टेरी संस्थेच्या डॉ. अंजली पारसनीस यांनी 'हवामान बदल' या विषयावर सादरीकरण केले. महाराष्ट्राचा हवामान बदल विषयक आराखडा तयार करताना टेरी संस्थेने महाराष्ट्रातील विविध भौगोलिक पट्ट्यातील स्थानांचा आणि तेथील हवामानाचा अभ्यास करताना आलेले अनुभव तसेच तयार केलेला अभ्यास डॉ. अंजली पारसनीस यांनी मांडला. त्याच बरोबर पुढील ५० वर्षात महाराष्ट्राचे हवामान विषयक चित्र कसे असेल यांचे भविष्यचित्रही दाखवले. या परिणामकारक सादरीकरणामुळे उपस्थितांना हवामानबदल समस्येचे गांभीर्य तसेच त्यावर करावयाच्या तातडीच्या उपाययोजनांची गरज लक्षात आली. बर्ड लाईफ इंटरनॅशनलच्या आशियाई विभागाचे प्रमुख श्री. प्रशांत महाजन यांनी हवामान बदल आणि जैवविविधता यावर भर देत हवामान बदलाचा पक्ष्यांवर होत असलेल्या परिणामांवर सादरीकरण केले; पार्थ बापट यांनी निश्चित ध्येय धोरणे येऊन योग्य दिशेने कृतिशील उपक्रमांद्वारे या समस्येला उत्तर शोधले पाहिजे असे प्रतिपादन केले. यानंतर स्त्री मुक्ती संघटनेच्या श्रीम. ज्योती म्हापसेकर महाराष्ट्र निसर्ग उद्यानाचे श्री. अविनाश कुबल, श्रीम. रश्मी जोशी, श्री. भगवान केसभट, श्री. फिरोज मसानी, श्री. सुनील तांबे, प्रतिष्ठानचे कार्यक्रम व्यवस्थापक श्री. दत्ता बाळसराफ, श्री. प्रशांत शिंदे यांनी चर्चेमध्ये सहभागी होऊन कृती आराखडा तयार करण्याच्या दृष्टीने विविध मुद्दे सुचवले. त्यानुसार महाराष्ट्रातील ५० शाळा आणि ५०महाविद्यालये हा कृती आराखडा राबविण्यासाठी निवडले जातील. ही बैठक यशस्वीपणे आयोजित करण्यासाठी प्रतिष्ठानच्या वतीने श्रीम. मनिषा खिल्लारे, श्रीम. मीनल सावंत, श्री. उमाकांत जगदाळे, श्री. महेश साळवी यांनी विशेष प्रयत्न केले.

२.२. **महापुरात अडकलेल्यांना मदतीचा हात:-** न भूतो न भविष्यती कोसळणाऱ्या पावसामुळे सातारा, सांगली, आणि कोल्हापूर येथे आलेल्या महापुरात आपल्या हजारो लोकांचे केवळ संसारच उद्ध्वस्त झाले नाहीत तर अनेकांना आपला जीवही गमवावा लागला. दिनांक ६ ते १४ ऑगस्ट यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे या भागातील सर्व मोठी धरणे पूर्ण क्षमतेने भरली. त्यातून होणाऱ्या मोठ्या प्रमाणातील विसर्गामुळे पंचगंगा, कृष्णा, वारणा नद्यांना पुराचे स्वरूप आले. सतत

संततधार आणि विसर्ग यामुळे महापुराने सांगली आणि कोल्हापूर या दोन शहरांमध्ये हाहाकार उडाला. जवळपास दीड लाख लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले.

ही अशी परिस्थिती असताना अनेक संस्था, संघटना,मंडळे यांच्यावतीने पूरग्रस्तांना मदत दिली जाते होती. याप्रमाणेच यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व विभागीय केंद्र यांच्या वतीने पूरग्रस्तांसाठी मदतीने आवाहन करण्यात आले. त्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या वतीने सातारा, सांगली, कोल्हापूर येथील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी आदरणीय सुप्रियाताईंच्या मार्गदर्शनानुसार मुंबईकरांना केलेल्या आवाहनाला मुंबईकरांनी उत्तम प्रतिसाद दिला व एका दिवसात प्रचंड मदत चव्हाण प्रतिष्ठानमध्ये आणून दिली.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई येथून सांगली, सातारा, कोल्हापूर येथील पूरग्रस्तांच्या मदतीकरिता पहिली गाडी रवाना करण्यात आली. यामध्ये १०० बॉक्स बिस्लरी, २५ बॉक्स बिस्कीटे, साखर, डाळ, तांदूळ, गहू, टूथपेस्ट, टूथब्रश, चहापावडर, बेडशीट, चादर, ब्लँकेट, नॅपकिन, सॅनिटरी नॅपकिन, खाद्यतेल, शेंगदाणे, फरसाण, कपड्याचे साबण, अंघोळीचे साबण, लहान मुलांचे कपडे, महिलांचे तयार ड्रेस, साड्या, ब्लाउज, पुरुषांचे शर्ट, टी शर्ट, फुल पॅन्ट, हाफ पॅन्ट, ट्रॅक पॅन्ट, स्वेटर, टॉवेल, ओडोमॉस इत्यादी जीवनावश्यक वस्तू पाठविण्यात आल्या.

यासाठी प्रतिष्ठान मधील सर्व पदाधिकारी, कर्मचारी, सुरक्षा रक्षक यांनी भरभरून मदत आणि सहकार्य केले. सेंट्रल कॅटरर्सचे श्री. सुधाकर शेट्टी, त्रिमुर्ती सोसायटी, नवी मुंबई, श्री. रेडकर, श्री. राजु आंबेकड यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यानुसार पुढील तारखांना पूरग्रस्तांना मदत पाठविण्याचे काम पूर्ण केले.

| दिनांक | पूरग्रस्तांसाठी मदतीने स्वरूप |
|---|---|
| १२ ऑगस्ट, २०१९ | देवराष्ट्रे (तालुका – वाळवा)<br>- धान्य, कपडे, मिनरल वॉटर बॉटल्स, सॅनिटरी नॅपकीन, साबण, टूथब्रश, टूथपेस्ट, बिस्कीट पुडे, १०० ब्लँकेटस, |
| १५ ऑगस्ट, २०१९ | तालुका – कराड<br>धान्य, मिनरल वॉटर बॉटल्स, खाण्याच्या वस्तू,कपडे, इत्यादी. |
| २९ ऑगस्ट, २०१९ | तालुका – पलूस<br>धान्य, मिनरल वॉटर बॉटल्स, कपडे, शालेय वस्तू, (पेन, वह्या, पट्टी, रबर, इतर आवश्यक वस्तू) |
| | औरंगाबाद – २ ट्रक धान्य, मिनरल वॉटर बॉटल्स, खाण्याच्या वस्तू कपडे इत्यादी. |
| | परभणी- १ ट्रक धान्य, मिनरल वॉटर बाटल्स, खाण्याच्या वस्तू, कपडे इत्यादी. |

२.३ **युवा स्वातंत्र्य ज्योत रॅली :** दरवर्षीप्रमाणे या वर्षीही यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या वतीने युवा स्वातंत्र्य ज्योत रॅलीचे आयोजन स्वातंत्र्य दिनांच्या पूर्वसंध्येला दि. १४ऑगस्ट २०१९ रोजी राज्यभरात करण्यात आलेले होते. यामध्ये मुंबई, नागपूर, नाशिक सोलापूर, बारामती, किनवट, डोंगरकडा, हिंगोली, कळमनुरी आदी ठिकाणी आयोजन करण्यात आले होते. यावेळी शहरातील ज्येष्ठ नागरिक विद्यार्थी, पत्रकार, व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते.

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्र पुरुषांना अभिवादन करण्यासाठी तरुणांमध्ये स्वांतत्र्य दिनाविषयी आदराची जाणीव व जागृती निर्माण व्हावी यासाठी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या वतीने रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीची सुरुवात श्री. सुरज भोईर यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी सदर युवा

स्वातंत्र्य ज्योत रॅलीचा उद्देश सहभागींसमोर मांडला. यानंतर प्रमुख पाहुणे मा. डॉ. जी. जी. पारीख (ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी व अध्यक्ष - युसफ मेहेरअली सेंटर) यांनी तसेच गांधी बुक सेंटर चे विश्वस्त आर. के. सोमय्यसर यांनी आपले मनोगत व्यक्त केले व युवा पिढीच्या भविष्यात काय काय अपेक्षा आहेत आणि त्यांचे दायित्व काय आहे आणि असावे यावर विवेचन केले. यानंतर मा.डॉ. जी. जी. पारीख यांच्या हस्ते ज्योत प्रज्वलित करण्यात आली व 'स्वांतत्र्य दिन चिरायू होवो' या घोषणेने रॅलीचे उद्घाटन झाले. 'वंदे मातरम,''भारतीय संविधानाचा विजय असो,''युवा पिढीका नारा हैं, भारत देश हमारा है,''स्वातंत्र्यदिन चिरायू होवो' अशा घोषणा देत रॅली मार्गस्थ झाली. पुढे ही अभिवादन रॅली गावदेवी मार्गे ऑगस्ट क्रांती मैदान येथे पोहोचली. तेथील गांधी स्मृती स्तंभाला अभिवादन व पुष्पांजली अर्पण करून महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदानास उजाळा दिला गेला. त्यानंतर श्री. किसनदादा जाधव (माजी नगरसेवक), आणि श्री. अमोल मडामे (संविधान अभ्यासक) यांनी सहभागींना संबोधित केले. तसेच युवा अध्यक्ष श्री. निलेश भोसले यांनी उपस्थितांशी संवाद साधला. यानंतर श्री. सूरज भोईर यांच्या उत्स्फूर्त गीतांनी सर्वांचे लक्ष्य वेधून घेतले. तसेच सुरज भोईर आणि श्री. रमेश सांगळे यांनी भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचे जाहीर वाचन करून शेवटी राष्ट्रगीत गायन केले. श्रीम. मनिषा खिल्लारे यांनी शेवटी पाहुण्यांचे व सहभागींचे आभार मानून रॅलीची सांगता केली.

शदर युवा स्वातंत्र्यज्योत रॅली आयोजनाकरिता श्री. रमेश सांगळे, श्री. सुरज भोईर, श्री. सूरज चव्हाण, श्री. महेश साळवी, श्री. रमेश मोरे, आणि श्रीम. मनिषा खिल्लारे यांनी परिश्रम घेतले. तसेच श्वेता, मनाली, स्नेहा, प्राजक्ता आणि टीम, श्रीम. रेशमा, श्रीम. मंजू, श्री. निलेश भोसले व टीम ह्या सगळ्यांमुळे रॅली अधिक उत्साहात संपन्न झाली.

२.४ **नियतकालिक स्पर्धा पारितोषिक वितरण : भुसावळ, जि. जळगाव**:- आज तंत्रज्ञानाने समाजातील विविध माध्यमे विद्यार्थ्यांना आपले मतप्रदर्शन करण्याकरिता व आपल्या साहित्यकृती लोकांपर्यंत पोहोचविण्याकरिता उपलब्ध झाली आहेत. त्याचा योग्य वापर करून अभिव्यक्त व्हावे व चांगल्या दर्जाची कलाकृती घडवावी, असे आवाहन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-विभागीय केंद्र जळगावचे अध्यक्ष मा. रविंद्र भैय्या पाटील यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या वतीने आयोजित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. १०जुलै २०१९रोजी हा कार्यक्रम पार पडला. भुसावळ येथील भुसावळ कला, विज्ञान आणि पु. ओं.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय या महाविद्यालयास नियतकालिक स्पर्धेत उत्तेजनार्थ क्रमांकाचे राज्यस्तरीय पारितोषिक मिळाले असून त्यानिमित्ताने विशेष समारंभ महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मिनाक्षी वायकोळे या उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संदीप पाटील यांनी परिश्रम घेतले.

२.५ **नियतकालिक स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ : मानवत जि. परभणी** :- विद्यार्थी दशेत तुम्ही जे लिहाल, त्यात सत्व असेल तर ते सगळे स्वीकारतील. आपण त्यासाठी आपले निरीक्षण व अनुभव समृद्ध करायला हवे. महाविद्यालयीन नियतकालिक त्या लिखाणाची सुरुवात करण्याची योग्य संधी आहे. त्यातून आपण अभिव्यक्त व्हावे, असे आवाहन साहित्य अकादमी पुरस्कार विजेते प्रसिद्ध लेखक व पत्रकार आसाराम लोमटे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या वतीने आयोजित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा २०१८च्या पारितोषिक वितरण कार्यक्रमप्रसंगी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. मानवत जि. परभणी येथील के. के. एम महाविद्यालयास यंदाचा उत्तेजनार्थ पुरस्कार या स्पर्धेत मिळाला आहे, त्याच्या वितरण प्रसंगी ११ जुलै २०१९ रोजी लोमटे बोलत होते.

मा. आसाराम लोमटे यांच्या हस्ते महाविद्यालयास पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष विजयकुमारजी कत्रूवार, सचिव बालकिशन चांडक,

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्कर मुंडे, प्रतिष्ठानचे कार्यक्रम संयोजक दत्ता बाळसराफ, परभणी केंद्राचे सचिव विजय कान्हेकर, नांदेड केंद्राचे सचिव शिवाजी गावंडे, अंकाच्या संपादक डॉ. शारदा राऊत, डॉ. दुर्गेश रवंडे, प्रा. अनंत मोगल याप्रसंगी उपस्थित होते.

नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक निलेश राऊत यांनी याप्रसंगी उपस्थितांचे स्वागत केले. विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

२.६ **नियतकालिक स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ : वारणा जि. कोल्हापूर :-** वारणानगर : माणसाची जीवनशैलीच बदलत चालली असून जाणीवा, संवाद बदलत आहेत. आधुनिक साधनांचा उपयोग करणारी नवी संस्कृती तयार होत आहे. दर्जेदार लिखाणासाठी अभ्यासपूर्ण माहिती पुरवून, आदर्श, नवीन मूल्य जपणारे नवविचाराने प्रेरित असणारे साहित्य आणि साहित्यकार घडणे ही आजच्या काळाची गरज आहे. नवलेखकांच्या लिखाणावर, आशयावर संस्कार करण्याची गरज असून नियतकालिकाच्या माध्यामातून त्यांना दर्जेदार लेखन लिहिण्यास प्रवृत्त करण्याचे आवाहन शिक्षकांच्या पुढे असल्याचे मत 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले यांनी व्यक्त केले.

वारणानगर येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयात 'वारणा वार्षिक' नियतकालिकास मुंबईच्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा प्रथम पुरस्कार प्रदान समारंभ १३ जुलै २०१९ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमात वसंत भोसले बोलत होते.

दत्ता बाळसराफ यांनी प्रतिष्ठानच्या कार्याची माहिती दिली व ते म्हणाले की, नवलेखकांनी आजच्या समाजाचे वास्तव साहित्याच्या माध्यमातून मांडावे, गेल्या साठ-सत्तर वर्षात देशाने खूप प्रगती केली असून सन २०१४ नंतरच देश प्रगत होत आहे हा गैरसमज पसरत असल्याचे त्यांनी सांगितले. ऑनलाईनच्या जमान्यातही माध्यमांनी समाजाच्या व राजकारणाच्या वास्तव घडामोडी समाजापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन बाळसराफ यांनी केले. कार्यक्रमात दत्ता बाळसराफ, नवमहाराष्ट्र युवा अभियानचे राज्य संघटक निलेश राऊत, संयोजक विजय कान्हेकर, वारणा शिक्षण मंडळाच्या प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम, प्राचार्य डॉ. सुरेखा शहापुरे प्रामुख्याने उपस्थित होते. प्रारंभी नवमहाराष्ट्र युवा अभियानचे राज्य संघटक निलेश राऊत यांनी प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या राज्यस्तरीय 'शब्दगौरव वक्तृत्व स्पर्धे' ची माहिती दिली. ज्येष्ठ पत्रकार पद्मभूषण देशपांडे यांनी २००हून अधिक नियतकालिक स्पर्धेतून वारणा, हे नियतकालिक स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त करून यशस्वी ठरल्याचे सांगितले.

१.७ **नियतकालिक स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ : मुंबई:-** अमेरिका नावाचा खंड अस्तित्वात आहे याची सुतराम कल्पना कोलंबसला नव्हती. परंतु अमेरिका युरोपियन लोकांच्या कल्पनेत होती. तिची कल्पना त्यांनी केली होती. त्या कल्पनेचा पाठपुरावा करताना अमेरिका त्यांना गवसली. तसेच आपल्या जागेवरून न हलता काही किलोमीटर अंतरावरील माणसाशी आपण बोलू शकतो ही कल्पना ग्रॅहॅम बेलने केली. त्यांनतर टेलिफोनचा शोध लागला. जे आजवर कुणालाही ज्ञात नाही अशा अज्ञातातला एखादा कण वा तुकडा शोधायचा असेल तर कल्पना करावी लागते. आणि ती प्रत्यक्षात आणण्याचा ध्यास धरावा लागतो. भारतीयांकडे कल्पनाशक्तीची वानवा आहे. आपल्याला कोकणचा कॅलिफोर्निया करायचा असो, मुंबईचं सिंगापूर वा शांघाय. आपण पाश्चात्यांकडून कल्पना घेतो. आपण नव्या जगाची कल्पना करत नाही.

तंत्रज्ञानाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी या पुढील काळात या आदर्शांचे उदाहरण डोळ्यासमोर ठेऊन नावीन्यपूर्ण कल्पना अस्तित्वात आणाव्यात असे आवाहन ज्येष्ठ पत्रकार व लेखक सुनील तांबे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या वतीने दिल्या जाणाऱ्या महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी ते बोलत होते. या स्पर्धेचे द्वितीय पारितोषिक मुंबई येथील

के.जे.सोमय्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी यांनी मिळाले असून, त्या महाविद्यालयात २५ जुलै २०१९ रोजी पुरस्कार वितरण कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उकरंडे, प्रतिष्ठानचे कार्यक्रम व्यवस्थापक दत्ता बाळसराफ, उपप्राचार्य डॉ. अनिता पाटील, अंकाच्या संपादक प्रा. वृषाली देवळे उपस्थित होते. नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या वतीने राज्य संघटक निलेश राऊत यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

२.८ **नियतकालिक स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ, नागपूर**:- विद्यार्थ्यांनी आपल्या लिखाणात सहजता आणावी, त्यामुळे ते लोकांचे लिखाण होईल, सर्वसामान्यांना त्यांचे वाटेल. त्यासाठी लिखाणाचे तंत्र देखील समजून घ्यायला हवे, याकरिता पुस्तके आपली मित्र बनवा. साहित्य हे तुम्हाला माणूस म्हणून जगण्याची प्रेरणा देते. जे जिंकले त्यांचे अभिनंदन! व पुढील काळात यांच्यातूनच साहित्याच्या नव्या प्रवाहांची निर्मिती व्हावी, असे मत प्रसिद्ध कवी ज्ञानेश वाकुडकर यांनी व्यक्त केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या वतीने आयोजित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन नियमकालिक स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. नागपूर येथील कमला नेहरू कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स या महाविद्यालयास नियतकालिक स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे राज्यस्तरीय पारितोषिक मिळाले असून त्यानिमित्ताने ८ सप्टेंबर २०१९ रोजी विशेष समारंभ महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा मा. सुहासिनी वंजारी यांची उपस्थिती होती. तर प्रतिष्ठानचे कार्यक्रम व्यवस्थापक मा. दत्ता बाळसराफ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक कांबळे, उपप्राचार्य डॉ. प्रदिप दहीकर, अंकाचे संपादक सिद्धेश देव, सुहास तेंडूलकर, निशिकांत काशीकर आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संघटक निलेश राऊत व अभिजीत राऊत यांनी उपस्थितांचे स्वागत केले. विद्यार्थी व प्राध्यापकांची मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थिती होती.

२.९ **यशवंत शब्दगौरव राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेची विभागीय फेरी**:- यशवतंराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - नवमहाराष्ट्र युवा अभियान, आणि एमजीएम जनसंवाद व वृत्तपत्रविद्या महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता 'यशवंत शब्दगौरव महाविद्यालीयन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेची विभागीय फेरी मंगळवार, दि. २० ऑगस्ट २०१९ रोजी एमजीएम वृत्तपत्रविद्या महाविद्यालयाच्या चित्रपती व्ही. शांताराम सभागृहात प्रसिद्ध चित्रपट समीक्षक अशोक राणे, डॉ. रेखा शेळके, विभागीय केंद्राचे सचिव निलेश राऊत, सुहास तेंडूलकर, दिग्दर्शक शिव कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी औरंगाबाद, जालना, बीड, परभणी या जिल्ह्यांतील ८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

प्राथमिक फेरीत स.भु.विज्ञान महाविद्यालयाची विद्यार्थिनी रेणुका विनोद धुमाळ हिने प्रथम पुरस्कार पटकाविला. तिला रुपये पाच हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. द्वितीय पुरस्कार माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालयातील विद्यार्थिनी कल्याणी मधुकर काकडे हिने पटकाविला. तिला रुपये तीन हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तृतीय पारितोषिक मातोश्री डॉ.कंचन महाविद्यालयातील विद्यार्थी हर्षद शेखर औटे यास रुपये दोन हजार, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तर उत्तेजनार्थ दोन पारितोषिके देवगिरी महाविद्यालयातील विद्यार्थिनी पौर्णिमा ईश्वर तोटेवाड व मौलाना आझाद महाविद्यालयातील विद्यार्थी शेख इरफान इक्बाल यांना प्रत्येकी रुपये एक हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तर इतर सहभागी सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्रीकांत देशपांडे, सचिन दाभाडे, दिपक पवार यांनी काम पाहिले. यावेळी प्रसिद्ध समीक्षक अशोक राणे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रम यशस्वितेसाठी नवमहाराष्ट्र युवा अभियानचे विभागीय संघटक सुबोध जाधव, मंगेश निरंतर, गणेश घुले,

प्रा. आशा देशपांडे, कविता सोनी, विशाखा गारखेडकर, मंगेश मर्ढेकर, विनोद काकडे, महेश हरबक आदींनी परिश्रम घेतले.

२.१० **यशवंत शब्दगौरव महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा विभागीय फेरी, पुणे :-** वक्तृत्व कला फक्त तुमचे विचार व्यक्त करण्याचे साधन नाही, तर त्याचा उपयोग तुम्हाला आयुष्यातील विविध टप्प्यांवर तुमच्या करिअरसाठी होऊ शकतो. त्यासाठी तुम्ही अधिक चौकस राहून घडणाऱ्या गोष्टींचे निरीक्षण केले पाहिजे. तसेच विविध क्षेत्रांमधील पुस्तकांचे वाचन करून तुमच्या कल्पनाशक्तीला वाव द्यायला हवा. मनुष्य आणि प्राण्यात तो मोठा फरक आहे. मनुष्याला कल्पनाशक्तीचा वापर करता येतो. त्याचा उपयोग करून आपले वक्तृत्व अधिक सकस करावे, असे आवाहन प्रसिद्ध रेडिओ जॉकी संग्राम खोपडे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - नवमहाराष्ट्र युवा अभियान व रयत शिक्षण संस्थेचे एसएमजोशी कॉलेज हडपसर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित यशवंत शब्दगौरव महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या विभागीय फेरीच्या पारितोषिक वितरण समारंभात २७ ऑगस्ट २०१९ रोजी ते बोलत होते. वितरण सोहळयाच्या अध्यक्षस्थानी नगरसेवक चेतन तुपे पाटील होते, तर या कार्यक्रमास माजी स्थायी समिती सभापती व नगरसेवक विशाल तांबे, संतोषकुमार फड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद बुरुंगुले, विजय कान्हेकर आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत पुणे, सोलापूर व अहमदनगर जिल्ह्यातील १६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. तीन सभागृहात सदरील स्पर्धेचे आयोजन करून नंतर दुसरी फेरी घेण्यात आली. सदर स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे : प्रथम क्रमांक – कु. भक्ती अरविंद देशमुख, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, द्वितीय क्रमांक – तेजस दिनकर पाटील, मॉडर्न महाविद्यालय, तृतीय क्रमांक – अंकिता संजय शिवतारे, एस. पी. कॉलेज, उत्तेजनार्थ - शुभम सतीश शेंडे, एस.एम. जोशी कॉलेज व शेख आतिक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ. या स्पर्धेत परीक्षक म्हणून प्राचार्या डॉ. सुषमा चाफळकर, ॲड. हनुमंत शिंदे, संतोश सहाणे, पांडुरंग कंद, अश्विनी पंढरपुरे आणि प्रा. महेश अचिंतलवार यांनी काम पाहिले. स्पर्धा यशस्वितेसाठी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक निलेश राऊत, डॉ. अमित नागरे, डॉ. पांडुरंग भोसले, प्रा. ठाकरे, प्रा. दीपक गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

२.११ **यशवंत शब्दगौरव राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा विभागीय फेरी, कोल्हापूर :-** वेगवेगळ्या भागातून आपली बोली घेऊन आलेल्या वक्तृत्वाची जोपासना करणाऱ्या विद्यार्थी स्पर्धकांनी आपली बोली सोडून शुध्द भाषा बोलण्याच्या प्रयत्नात आपल्या मूळ भाषेचा गोडवा हरवू देऊ नये. वक्तृत्व कला तुम्हाला आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण वाढायला मदत करते. मी महाविद्यालयीन काळात वक्तृत्व स्पर्धांमधून सहभाग नोंदविला.आज मला न्यायाधीश म्हणून न्यायदान करताना त्या आकलनाचा मोठा उपयोग होतो. असे प्रतिपादन कोल्हापूर कौटुंबिक न्यायालयाच्या प्रधान न्यायाधीश डॉ. अनिता जाधव यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - नवमहाराष्ट्र युवा अभियान व महावीर महाविद्यालय, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता यशवंत शब्दगौरव महाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन २९ ऑगस्ट २०१९ रोजी करण्यात आले होते. त्याच्या पारितोषिक वितरण समारंभात त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवृत्त प्राचार्य डॉ. श्रीधर येरवाडे होते. तर प्राचार्य डॉ. आर.पी.लोखंडे, विशाल तांबे, रोहित पाटील, सुवर्णा भुजबळ, आदिल फरास, बाळासाहेब महामुलकर, कल्पेश चौगुले, राकेश कामठे, डॉ. किरण देशमुख, प्रतिष्ठानचे कार्यक्रम संयोजक दत्ता बाळसराफ, विजय कान्हेकर आदींची याप्रसंगी प्रमुख उपस्थिती होती. ताज मुलानी व प्रा. महेश अचिंतलवार यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

कोल्हापूर विभागीय फेरीत कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील ५० स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे : प्रथम क्रमांक – गणेश ज्ञानदेव लोखगे – अशोकराव माने महाविद्यालय, वाठार, द्वितीय क्रमांक – आलिशा अनिल मोहिते - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, सांगली केंद्र, तृतीय क्रमांक – स्वरदा चंद्रशेखर फडणीस, के.आय.टी. अभियांत्रिकी महाविद्यालय कोल्हापूर, उत्तेजनार्थ - मयूर संजय शिरतोडे, ई एमसी ए राजमाची ? कराड व अक्षय अरविंद पाटील, विश्वासराव नाईक महाविद्यालय, बत्तीस शिराळा.

स्पर्धेच्या यशस्वितेसाठी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक निलेश राऊत, प्रा. संजय ओमासे, प्रा. प्रकाश चव्हाण आदींनी परिश्रम घेतले.

२.१२ **यशवंत शब्दगौरव राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा विभागीय फेरी, रत्नागिरी**:- वक्तृत्व कलेत भाषेचा वापर हा अतिशय महत्त्वाचा असतो. वाचन चिंतन व संवादातून तुमची भाषेबद्दलची समज अधिक समृध्द होत जाते. कोकणाला विचारवंत, लेखक, साहित्यिक, राजकीय वक्ते यांची मोठी परंपरा आहे. आणि कोकणात बोलल्या जाणाऱ्या मराठी भाषेचाही एक वेगळा गोडवा आहे. तोच गोडवा आजच्या पिढीतील वक्तृत्व स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्येही कायम आहे असे मत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - विभागीय केंद्र कोकणचे अध्यक्ष श्री. शेखर निकम यांनी व्यक्त केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - नवमहाराष्ट्र युवा अभियान व सह्याद्री शिक्षण संस्थेचे महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता यशवंत शब्दगौरव महाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. शुक्रवार दि. ३० ऑगस्ट २०१९ रोजी, सकाळी १० वा. मुख्य सभागृह, सह्याद्री शिक्षण संस्थेचे महिला विद्यालय, चिपळूण येथे विभागीय फेरी संपन्न झाली. याप्रसंगी श्री. निकम बोलत होते. या स्पर्धेत रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेला परीक्षक म्हणून प्राचार्य डॉ. टी.वाय. कांबळे व प्रा. महेश अचिंतलवार यांनी काम, पाहिले.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे : प्रथम क्रमांक – लक्ष्मण विठ्ठल कचरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, महाड, जि. रायगड, द्वितीय क्रमांक – प्रतिक प्रभाकर गमरे, डॉ. तात्यासाहेब नातू महाविद्यालय, मार्ग ताम्हाणे, तृतीय क्रमांक – संकेत जयंत लाड, शरदचंद्रजी पवार कृषी महाविद्यालय, दहिवली, उत्तेजनार्थ क्रमांक – अनिकेत विनायक कांगणे, जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी व कौस्तुभ हेमंत फाटक, देव घैसासकिर वरिष्ठ महाविद्यालय, रत्नागिरी.

स्पर्धा यशस्वितेसाठी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचें राज्य संघटक निलेश राऊत, विभागीय केंद्र रत्नागिरीचे सचिव अभिजीत खानविलकर, विश्वनाथ कांबळे, सुनील घोडेकर, संदेश संसारे आदींनी परिश्रम घेतले.

२.१३ **यशवंत शब्दगौरव राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा विभागीय फेरी, मुंबई**:- भाषणकला तुमचे आयुष्य घडवते परंतु पाठांतर करून बोलणे म्हणजे भाषण नव्हे, भाषण करताना तुमचे विचार आणि भूमिका स्पष्टपणे दिसल्या पाहिजेत. त्यामुळे तुमचे व्यक्तिमत्त्व उभे राहते. तुमच्या व्यक्तिमत्त्वात ठामपणा येतो. आताच्या सोशल मीडियावरील ट्रोलर्सच्या काळात तुमच्यातील ठामपणा आणि विवेकी विचारांची गरज आहे. ती अंमलात आणा, तुमच्या मनातील विचार हे भाषण कलेतून मांडा, पाठांतर करून नव्हे, असे आवाहन प्रसिद्ध नाट्यचित्रपट दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - नवमहाराष्ट्र युवा अभियान व मराठी विभाग, रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित यशवंत शब्दगौरव महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या मुंबई विभागीय फेरीच्या पारितोषिक वितरण सोहळ्यात ३१ ऑगस्ट २०१९रोजी ते बोलत होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मनीष हाटे, नवमहाराष्ट्र युवा अभियाचे संयोजक दत्ता बाळसराफ मराठी विभागाच्या प्रमुख डॉ. लीना केदारे, विजय कसबे उपस्थित होते.

मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे व पालघर या चार जिल्ह्यातील८० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला. या

स्पर्धेत परीक्षक म्हणून जयदेवी स्वामी, दीपा कदम, अस्मिता मोहिते, महेश अचिंतलवार यांनी काम पाहिले.

स्पर्धेच्या मुंबई विभागीय फेरीचा निकाल पुढीलप्रमाणे : प्रथम क्रमांक – प्राची श्रीकांत जोशी, के.व्ही.पेंढारकर महाविद्यालय, डोंबिवली, द्वितीय क्रमांक : अभिजीत जाधव, सी.एच.एम. महाविद्यालय, उल्हासनगर, तृतीय क्रमांक : प्रतीक पवार, रुईया महाविद्यालय, माटुंगा, उत्तेजनार्त : प्राजक्ता जाधव, रुईया महाविद्यालय व प्रचिती परब, डी.जी. रुपारेल महाविद्यालय.

स्पर्धेच्या यशस्वितेसाठी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक निलेश राऊत, अनघा पेंडसे, रमेश मोरे, मनिषा खिल्लारे, डॉ. अमित नागरे, मीनल सावंत, विवेक कनावजे, महेश साळवी, रणजीत बायस आदींनी परिश्रम घेतले.

२.१४ **यशवंत शब्दगौरव राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा विभागीय फेरी, नांदेड :-** वक्तृत्व विकासाकरिता वाचन व चिंतनाची गरज असते, त्याकरिता आपल्या प्रमाणभाषेची गरज नाही, तुम्ही तुमचा अभ्यास व विचार आपल्या बोलभाषेचा वापर करून देखील व्यक्त करू शकता. प्रमाण भाषेचे ओझे अंगीकारण्याची काही गरज नाही, असे मत प्रसिद्ध साहित्यिक डॉ.जगदीश कदम यांनी ४ सप्टेंबर २०१९ रोजी व्यक्त केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - नवमहाराष्ट्र युवा अभियान व पीपल्स कॉलेज नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित यशवंत शब्दगौरव महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या नांदेड विभागीय फेरीच्या पारितोषिक वितरण सोहळ्यात ते बोलत होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.आर.जाधव, प्रतिष्ठानचे कार्यक्रम संयोजक दत्ता बाळसराफ, विभागीय केंद्राचे सचिव शिवाजी गावंडे, कोषाध्यक्ष शिवानंद सुरकूतवार, सदस्य बापू दासरी, कल्पना डोंगळीकर, डॉ. मनोरमा चव्हाण, डॉ. विशाल पतंगे, नामदेव दळवी, जर्नलसिंग गाडीवाले, श्रीकांत मांजरमकर, दासराव पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

नांदेड, हिंगोली, लातू व उस्मानाबाद या जिल्ह्यालील ७६ विद्यार्थी स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धेला परीक्षक म्हणून सुचेता पाटील, ॲड. राजा कदम, डॉ. स्वाती वाठ व महेश अचिंतलवार यांनी काम पाहिले.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे : प्रथम क्रमांक – अमित रामराव कदम, महात्मा बसवेश्वर कॉलेज, लातूर. द्वितीय क्रमांक – नितीन माधवराव कसबे, राजीव गांधी कॉलेज, नांदेड, तृतीय क्रमांक : अलमास अमीन शेख, फार्मसी कॉलेज, नांदेड, उत्तेजनार्थ क्रमांक – आशिष साडेगावकर, डॉ. शंकरराव सातव महाविद्यालय, कळमनुरी,जि. हिंगोली व कृष्णा व्यंकट तिडके, राजीव गांधी महाविद्यालय, नांदेड.

स्पर्धेच्या यशस्वितेसाठी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक निलेश राऊत, विभागीय केंद्राचे सचिव शिवाजी गावंडे, पीपल्स कॉलेजचे डॉ. विशाल पतंगे, अक्षय पतंगे, सौरभ करंडे, दिनेश तोटावाड, विजय घायार, अविनाश काळेकेकर आदींनी परिश्रम घेतले.

१.१५ **यशवंत शब्दगौरव राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा विभागीय फेरी, अमरावती :-** आजच्या काळात विचारमंथन घडणे आवश्यक आहे, असे पाच जिवंत विषय आणि पाच विषयांची ८३ स्पर्धकांनी आपापल्या शैलीत केलेली अभ्यासपूर्ण मांडणी व या मांडणीतून आजच्या ज्वलंत विषयांच्या बाबत समोर आलेली तरुणाईच्या मनातील गंभीरता याने ६ सप्टेंबर २०१९ रोजी येथील श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयात दिवसभर चाललेली 'यशवंत शब्दगौरव' महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेची अमरावती विभागीय फेरी प्रचंड गाजली. जीवन प्रकाश गावंडे या विद्यार्थ्याने या स्पर्धेचा प्रथम पुरस्कार पटकावला तर कु. आकांक्षा अविनाश असनारे व कु. साक्षी राजकुमार इंगोले यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय पारितोषिक पटकावले. कु. ऋतुजा सुभाष हरणे आणि अक्षय अजय सुरोसे यांनी उत्तेजनार्थ पुरस्कार पटकावून मुंबई येथे होणाऱ्या अंतिम स्पर्धेसाठी आपली निवड पक्की केली.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई नवमहाराष्ट्र युवा अभियान व श्री.शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या

संयुक्त विद्यमाने 'यशवंत शब्दगौरव' महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या अमरावती विभागीय फेरीचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय लोकशाही व निवडणूक व्यवस्था, यशवंतराव चव्हाण यांची कारकीर्द: शोध आणि बोध, महाराष्ट्राच्या महिला धोरणाची २५ वर्षे, जातीचं काय करायचं ? व्यवस्थापन की निर्मूलन, सोशल मिडिया : मी आहे नेहमी ऑनलाईन या पाच विषयांवर अमरावती विभागातील अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम व यवतमाळ या पाच जिल्ह्यांच्या विविध महाविद्यालातील एकूण ८३ स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. या स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांच्या हस्ते झाले तर श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप बाबू इंगोले यांच्या अध्यक्षतेत आणि सुप्रसिद्ध कवी बबन सराडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पारितोषिक वितरण समारोह झाला.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे कार्यक्रम व्यवस्थापक दत्ता बाळसराफ यांनी समारोपीय कार्यक्रमात या स्पर्धेच्या आयोजनामागची भूमिका विशद केली तर दिलीपबाबू इंगोले, बबन सराडकर, प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांनी आपल्या भाषणातून सहभागी स्पर्धकांचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या. स्पर्धेचे परीक्षक म्हणून महेश अचिंतलवार, प्रा. दिपाली देशमुख, क्षिप्रा मानकर व प्रा. विनय सोनुले यांनी काम पाहिले. डॉ. जयराम गायकवाड यांनी कार्यक्रमाचे संचालन व डॉ. वर्षा चिखले, प्रा. सिमा चोपडे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे आणि स्पर्धेचे समन्वयक निलेश राऊत, प्रा. कविता पाटील, डॉ. सुवर्णा गाडगे, डॉ. महेंद्र मेटे, डॉ. कुमार बोबडे, डॉ. व्ही.एच.भटकर, डॉ. मनोज जोशी, प्रा. गजानन केतकर, डॉ. अपर्णा सरोदे, प्रफुल्ल घळवे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविणारा श्री. शिवाजी कला वाणिज्य महाविद्यालयाचा विद्यार्थी जीवन गावंडे याला रु. पाच हजार रोख, स्मृतिचिन्ह, ग्रंथ व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. दुसरा क्रमांक पटकाविणारी विद्यार्थिनी कु. आकांक्षा असनारे हिला रु.तीन हजार रोख, स्मृतिचिन्ह, ग्रंथ व प्रमाणपत्र देण्यात आले. तृतीय क्रमांक मिळविणारी प्रा. राम मेघे महाविद्यालय, बडनेराची विद्यार्थिनी कु. साक्षी इंगोले हिला रु. दोन हजार रोख, स्मृतीचिन्ह, ग्रंथ व प्रमाणपत्र आणि उत्तेजनार्थ पुरस्कार प्राप्त करणारी श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. ऋतुजा हरणे आणि फुलसिंग नाईक महाविद्यालय, यवतमाळचा अक्षय सुरोसे याला रु. एक हजार रोख, स्मृतिचिन्ह, ग्रंथ व प्रमाणपत्र देण्यात आले. या विभागीय स्पर्धेत विजयी झालेल्या पाचही स्पर्धकांची मुंबई येथे होणाऱ्या अंतिम स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

२.१६ **यशवंत शब्दगौरव राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा विभागीय फेरी, नागपूर :-** सध्या देशात झुंडशाहीच्या विचारांचे प्राबल्य आहे. तुम्ही कसे वागायचे, काय बोलायचे, काय वाचायचे हे ठरवणारे लोक निर्माण झाले आहेत. तुम्ही त्याच्या विरोधात गेलात की तुम्ही देशद्रोही होता. पण तो विचार माणुसकीला धरून नसेल तर त्याचे समर्थन करू नका. आपला विवेकी विचार जिवंत ठेवा आणि तोच तुमच्या शब्दांमधून व्यक्त करा, असे आवाहन ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, - नवमहाराष्ट्र युवा अभियान व युगांतर शिक्षण संस्थेचे तिरपुडे समाजकार्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंत शब्दगौरव महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या नागपूर विभागीय फेरीचे आयोजन करण्यात आलेले होते. त्याच्या पारितोषिक वितरण सोहळ्याप्रसंगी जोशी बोलत होते. या स्पर्धेच्या आयोजनासाठी विभागीय केंद्राचे अध्यक्ष गिरीश गांधी, संस्थेचे अध्यक्ष राजकुमार तिरपुडे, सचिव विवेक कोबाडे यांचे मार्गदर्शन लाभले, याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार प्रमोद काळपांडे, सरचिटणीस गणेश गौरखेडे, प्राचार्य डॉ. दीपक मसराम, डॉ. स्वाती धर्माधिकारी, कार्यक्रम समन्वयक डॉ. अर्शिया सैय्यद, प्रा.दिगंबर दूले. प्रा. सचिन हुंगे, बाबा कोम्बाडे, अभिजीत राऊत, निशिकांत काशीकर, जगदीश पंचबुद्धे आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत परीक्षक म्हणून डॉ. कल्पना उपाध्याय, डॉ. मंजुषा सावरकर, प्रा. महेश अचिंतलवार यांनी काम पाहिले.

या स्पर्धेत नागपूर, वर्धा, भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील ६० स्पर्धक विद्यार्थी सहभागी झाले होते.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे : प्रथम क्रमांक – अभिजीत खोडके, सी.पी.अँड बेरार महाविद्यालय, नागपूर, द्वितीय क्रमांक – विनय भीमराव पाटील, सी.पी.अँड बेरार महाविद्यालय, नागपूर, तृतीय क्रमांक – श्रावणी प्रकाश चव्हाण, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय, नागपूर, उत्तेजनार्थ क्रमांक – पूनम जगदीश रामटेके, नरेंद्र तिडके महाविद्यालय, रामटेक व विशाखा गणोरकर, एल. ई. डी. महाविद्यालय, नागपूर.

स्पर्धेच्या यशस्वितेसाठी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक निलेश राऊत, विभागीय संघटक अभिजीत राऊत, दिनेश मासोदकर, संजय पुसाम, प्रवीण राठोड, नीलिमा, निलेश झालटे, राहुल कामळे आदींनी परिश्रम घेतले.

**२.१७ यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय सामाजिक व क्रीडा युवा पुरस्कार जाहीर...**

यशंवतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे दरवर्षी दिल्या जाणाऱ्या 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा सामाजिक व क्रीडा पुरस्कार २०१९'ची घोषणा करण्यात आली आहे. यंदाचे पुरस्काराचे हे २३ वे वर्ष आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी युवा आंदोलनाच्या क्षेत्रात विधायक व रचनात्मक काम करणाऱ्या युवक-युवतींना सामाजिक युवा पुरस्कार देण्यात येतो. महाराष्ट्रातील खेळाडूंच्या कार्याचे मूल्यमापन होऊन त्यांच्यातील अंगभूत गुणांचा गौरव व्हावा आणि प्रोत्साहन मिळावे हे क्रीडा पुरस्काराचे उद्दिष्ट आहे. या वर्षीचा यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय सामाजिक युवा पुरस्कार कुलदीप आंबेकर (भूम, जि. उस्मानाबाद, (सध्या पुणे) या युवकास महाराष्ट्रातील शहरात शिक्षण घेत असलेल्या दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी मोफत भोजन उपलब्ध करून देणे, त्यांना खाजगी व शासकीय वसतिगृहात जागा मिळवून देणे, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणात आर्थिक मदत करणे, शिक्षण घेत असताना गरजू व होतकरू विद्यार्थी-विद्यार्थिनींना अर्धवेळ नोकरी मिळवून देणे यासाठी देण्यात आला आहे. लतिका राजपूत (धडगाव, जि. नंदुरबार) ह्या तरूणीस आदिवासी भागात अतिदुर्गम ठिकाणी वसलेल्या नर्मदा जीवनशाळांचे २०१० पासून व्यवस्थापन व समन्वय प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन व मदत या कार्यासाठी, देण्यात आला आहे. क्रीडा पुरस्कार युवक व युवती क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल अक्षय राऊत, अंबेजोगाई, ता. बीड (सध्या मुंबई) (बॅडमिंटन - राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये पारितोषिके) व समृद्धी वामन, सावेडी, अहमदनगर (धनुर्विद्या - राज्य व राष्ट्रीय स्पर्धेमध्ये पारितोषिके) यांना 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय सामाजिक युवा व क्रीडा पुरस्कार' प्राप्त झाला आहे.

**२.१८ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई राज्यस्तरीय महाविद्यालयीन नियतकालिक पुरस्कार:-** नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्यावतीने दरवर्षीप्रमाणे 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा' आयोजित करण्यात येते. राज्यातील विद्यार्थ्यांच्या विचारांचे आणि भावनांचे प्रतिबिंब असंख्या महाविद्यालयीन नियतकालिकांमध्ये पडलेले पहावयास मिळते. या नियतकालिकांमध्ये आपले लेख, कविता लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांमधूनच उद्याचे साहित्यिक घडत असतात. युवांना आपले मत मांडायची संधी देतानात त्यांच्यातील कलागुणांना वाव देणाऱ्या नियतकालिकांचे महत्व लक्षात घेऊन राज्यातील उत्कृष्ट नियतकालिकांचे महत्त्व लक्षात घेऊन राज्यातील उत्कृष्ट नियतकालिकांचा सन्मान करणारा हा महाराष्ट्रातील एकमेव उपक्रम आहे.

स्पर्धेत राज्यातील उत्कृष्ट महाविद्यालयीन नियतकालिकांस यशवंतराव चव्हाण पारितोषिकाने सन्मानित केले जाते. प्रथम पारितोषिक रू. १०,०००/- चा धनादेश, द्वितीय पारितोषिक रू. ७,०००/- चा धनादेश, तृतीय पारितोषिक रू. ५,०००/-चा धनादेश, उत्तेजनार्थ (पंधरा पारितोषिके - प्रत्येक विद्यापीठातून एक) रू. ३,०००/- प्रत्येकी, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे पारितोषिकाचे स्वरूप आहे. सादर केलेल्या नियतकालिकांचे यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालयामध्ये जतन करून ते विद्यार्थी व अभ्यासकांसाठी उपलब्ध केले जाते. यंदाही राज्यस्तरीय नियतकालिक स्पर्धा २०१९/२० चे

आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये एकूण १०० महाविद्यालयांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आहे.

**९.३ कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम :-**

समाजातील गोरगरीब, दीनदुबळे व मागास वर्गाच्या लोकांना त्यांच्या आर्थिक अपात्रतेमुळे किंवा मागासलेपणामुळे अन्याय सहन करण्याची पाळी येऊ नये यासाठी उपाय योजावेत अशा प्रकारचे मार्गदर्शन आपल्या संविधानामध्ये करण्यात आले आहे. या तरतुदीला अनुसरून भारतीय संसदेने १९८७ मध्ये विधी सेवा प्राधिकरण अधिनियम पारित केला आहे. त्या अधिनियमानुसार संपूर्ण देशामध्ये गरीब व तळागाळातील लोकांना मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला पुरविला जातो.

१९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण अधिनियमात अंतर्भूत असलेली मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना राबविण्याचे काम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत केले जाते. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रतिष्ठानने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम या विभागाची निर्मिती केली आहे. या विभागामध्ये अंदाजे ३५ वकील व समाजसेवक काम करीत असून ते आपली सेवा या योजनेसाठी देत आहेत. विभागाचे सदस्य - सचिव मा. श्री. विनायकराव कांबळे व सहाय्यक म्हणून श्रीम. मनिषा खिल्लारे आणि श्री. अनिल चिंदरकर हे कार्यरत आहेत.

**३.१ 'आपला कायदा जाणून घ्या' या व्याख्यानमाले अंतर्गत - हिंदू विवाह कायदा... एक आढावा**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, कायदे विषयक सहाय्य व सल्ला फोरम आणि नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या वतीने 'आपला कायदा जाणून घ्या' व्याख्यानमालेअंतर्गत 'हिंदू विवाह कायदा... एक आढावा' या विषयावर दि. १४ जून, २०१९ या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. जे. बी. पाटील हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले होते. प्रथमत: कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरमचे सदस्य सचिव श्री. विनायकराव कांबळे यांनी वक्त्यांचे पुष्पगुच्छ व सन्मान चिन्ह भेट स्वरूपात देऊन स्वागत केले व त्यांची ओळख करून दिली. मा. जे.बी. पाटील हे गेली ३५ वर्ष अनेक महाविद्यालयातून प्राध्यापक राहिले आहेत. तसेच वरील विषयावर त्यांचा सखोल अभ्यास आहे. मा. जे. बी. पाटील यांनी सुरूवातीला हिंदू धर्मसंस्कार याबद्दल थोडक्यात माहिती दिली. हिंदू विवाह कायदा हा १९५५ मध्ये आला. त्यावेळी आपल्या भारतात वेगवेगळ्या लग्नाच्या पद्धती होत्या. ब्राह्म, दैव, आर्ष, प्रजापिता, असुर, गांधर्व, राक्षस, पिशाच्च असे काही प्रकार होते. परंतु आता सध्या दोनच पद्धती आहेत एक म्हणजे ब्राह्म आणि असुर.

१९५५ मध्ये हिंदू विवाह कायदा आल्यानंतर हा बदल फार नव्हता परंतु आता सध्याच्या कायद्यामध्ये पुढील तरतुदी करण्यात आल्या आहेत. ज्यामध्ये मोनोगामी म्हणजे एक पत्नी आणि एक कायदा, इंटर कास्ट मॅरेज अलौड, रजिस्ट्रेशन ऑफ मॅरेज सोय, जुडिशेअल सेपरेशन, रेस्टीट्यूशन ऑफ कन्ज्युगल राईट्स, नलीटी ऑफ मेरेज, या तरतुदी कायद्यात अंतर्भूत केल्या आहेत. डायवोर्स बाय कन्ज्युगल राईट्स, मेंटेनन्स-पती आणि पत्नी दोघानाही मिळण्याची तरतूद, इर्टिट्रीव्हेबल ब्रेक डाऊन ऑफ मेरेज, अशा पद्धतीने डॉ. जे.बी. पाटील यांनी सध्या लागू असलेल्या कायद्याविषयी थोडक्यात ओळख करून दिली.

हिंदू विवाह कायदा-१९५५ हा कायदा संपूर्ण भारतात जम्मू काश्मीर सोडून सर्वत्र लागू आहे. जे जे धर्माने हिंदू आहेत त्यांना हा कायदा लागू आहे. अशी माहिती आपल्या व्याख्यानातून डॉक्टरांनी दिली. हिंदू विवाह कायदा, त्याअंतर्गत येणाऱ्या गोष्टी, घटस्फोट याविषयीची संपूर्ण माहिती त्यांनी दिली. शेवटी प्रश्नोत्तर भागात त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

**३.२ 'आपला कायदा जाणून घ्या' या व्याख्यानमाले अंतर्गत 'मानवी हक्का संरक्षण कायदा - १९९३' :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई कायदे विषयक साहाय्य व सल्ला फोरमच्या वतीने 'आपला कायदा जाणून घ्या'

व्याख्यानमालेअंतर्गत 'मानवी हक्कसंरक्षण कायदा-१९९३' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन दिनांक १३ डिसेंबर, २०१९ या दिवशी सांस्कृतिक सभागृह येथे करण्यात आले होते. डॉ. सुरेंद्र धाकतोडे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले होते. प्रथमत: चव्हाण केंद्रांचे ग्रंथपाल श्री. अनिल पाझारे यांनी उपस्थितांचे स्वागत केले व कार्यक्रमाविषयी थोडक्यात माहिती दिली. कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरमचे सदस्य-सचिव श्री. विनायकराव कांबळे यांनी वक्त्यांना भेट म्हणून पुष्पगुच्छ व ग्रंथ देऊन त्यांचे स्वागत केले व त्यांची ओळख करून दिली. मा. डॉ. सुरेंद्र धाकतोडे हे गेली ३५ वर्षं रसायनशास्त्र प्रमुख म्हणून महाविद्यालयातून प्राध्यापकी करत आहेत. तसेच ते एक संशोधन करत असून त्यांनी तीन ग्रंथ प्रकाशित केले आहेत. वरील विषयावर त्यांच्या सखोल अभ्यास आहे. मा. डॉ. सुरेंद्र धाकतोडे यांनी सुरूवातीला, मानवी हक्क किंवा मानवी अधिकार हे मूलभूत हक्क आहेत. ते जागतिक असून सर्वांना समान असतात अशी माहिती दिली तसेच हे हक्क उपजत असतात किंवा कायदेशीर असू शकतात.

जीवनाधिकार (Right to life)

यातनांपासून मुक्तता (Freedom from tourture)

गुलामगिरीपासून मुक्ता (Freedom from slavey)

कोर्ट सुनावणीचा अधिकार (Right to a fair trial)

भाषण स्वातंत्र्य (freedom of speech)

वैचारिक व / वा धार्मिक स्वातंत्र्य (Freedom of thought, conscience and religion)

राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, राज्य मानवी हक्क आयोग मानवी हक्क न्यायालय इ. यांची स्थापना करणे हा 'मानवी हक्क सरंक्षण कायदा-१९९३ चा उद्देश आहे. मानवी म्हणजे काय ? कायद्यांतर्गत त्यात कोणत्या तरतुदी येतात ? कायद्याचा उपयोग काय ? अशा अनेक गोष्टींची त्यांनी उपयुक्त माहिती दिली. उपस्थितांना प्रश्नोत्तराच्या वेळी त्यांनी शेवटी मार्गदर्शन केले.

३.३ **विधी साक्षरता कार्यशाळ संपन्न - संघमित्र ग्रुप गोरेगाव (पू) :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरम (संघमित्रा ग्रुप) निर्मला निकेतन कॉलेज ऑफ सोशल वर्क एक्सटेंशन सेंटर गोरेगाव (पू.) येथे सामाजिक संस्थेत कार्यरत असणाऱ्या तसेच सामाजिक कार्यक्षेत्रातील संघमित्रा ग्रुपच्या माजी विद्यार्थ्यांसाठी 'विधी साक्षरता' कार्यशाळेचे आयोजन दिनांक ०३ जानेवारी, २०२० रोजी करण्यात आले होते. ही कार्यशाळा दिनांक ०३ जानेवारी, २०२० रोजी करण्यात आले होते. ही कार्यशाळा दिनांक २२ डिसेंबर २०१९ रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत गोरेगाव (पू.) येथील सेन्टरमध्ये घेण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरूवात भारतीय संविधानाच्या सरनाम्याच्या वाचनाने झाली. कार्यक्रमाच्या सुरूवातीला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या कामकाजाची माहिती करून देण्यात आली. तसेच कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरमच्या कामाबद्दल तसेच पुरविल्या जाणाऱ्या मदतीबद्दल माहिती देण्यात आली.

व्याख्यानाच्या प्रथम सत्रात विभागाचे प्रमुख मा. विनायकराव कांबळे यांनी महिला व बालंकासाठीचे अत्याचार व सुरक्षितता यांबाद्दल माहिती दिली.

व्याख्यानाच्या प्रथम सत्रात विभागाचे प्रमुख मा. विनायकराव कांबळे यांनी महिला व बालकांसाठीचे अत्याचार व सुरक्षितता यांबाबत कायद्याची पार्श्वभूमी स्पष्ट केली. यामध्ये महिला व बालकांवरील अत्याचार आणि त्यांची सुरिक्षितता याबाबत माहिती दिली गेली. तर महिलांवरील होणारे विविध अत्याचार व उपाय याबाबत मा. दिलीप तळेकर यांनी माहिती दिली. 'मुलांसाठी लैंगिक प्रतिबंध कायदा - POSCO' बाबत मा. प्रॉस्पर डिसुझा यांनी अगदी खेळीमेळीच्या वातावरणात माहिती दिली. यामध्ये बालकामगार, शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी यांसोबत घडणाऱ्या लैंगिक

छळाबद्दल आणि अत्याचाराबद्दल माहितीचा समावेश होता. मुलांचा शारीरिक, भावनिक, बौद्धिक आणि सामाजिक विकास सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक टप्प्याला अधिक महत्त्व देत मुलांचे हित आणि आदर करण्याचे महत्व विशद केले. यानंतर भोजनोत्तर दुसऱ्या सत्रात मा. प्रकाश धोपटकर यांनी महिलांचे अश्लील देह प्रदर्शन प्रतिबंधक कायदा १९८६ या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि त्यांना ह्या विषयाची आपल्याला काय माहिती आहे असे विचारल्यास विद्यार्थ्यांनीदेखील त्यांच्या प्रश्नाला उत्तम प्रतिसाद दिला. स्त्री देह, देहाकृती, किंवा स्त्रीदेहाच्या कोणत्याही भागाच्या सादरीकरणामुळे जर स्त्री प्रतिमेची अवहेलना होत असेल, त्यामुळे समाजातील नैतिकता आणि जीवनमूल्यांचे हनन होत असेल तर ते सादरीकरण प्रतिबंधित आहे असे सांगितले. मा. जगन्नाथ पाटील यांनी 'हिंदू विवाह कायदा' याबाबत व्याख्यान देत विवाहाची पार्श्वभूमी तसेच विवाह संस्था इथपर्यंत १९५५ मध्ये हिंदू विवाह कायदा आल्यानंतर फार बदल नव्हता. परंतु आता सध्याच्या कायद्यामध्ये पुढील तरतुदी करण्यात आल्या होत्या. ज्यामध्ये मोनोगामी म्हणजे एक पत्नी आणि एक पती कायदा, आंतरजातील विवाहाची सुविधा, रजिस्ट्रेशन ऑफ मॅरेज सुविधा, ज्युडिशिअल सेपरेशन, रेस्टीट्यूशन ऑफ कंज्युअल राईट्स, नलीटी ऑफ मॅरेज, या तरतुदी कायद्यात अंतर्भूत केल्या आहेत. डायव्होर्स बाय म्युच्युअल कन्सेंट, मेंटेनन्स - पती आणि पत्नी दोघांनाही मिळण्याची तरतूद, इर्रिट्रिव्हेबल ब्रेक डाऊन ऑफ मॅरेज, अशा पद्धतीने डॉ. जे. बी. पाटील यांनी सध्या लागू असलेल्या कायद्यांविषयी थोडक्यात ओळख करून दिली.

'हिंदू विवाह कायदा - १९५५' हा कायदा संपूर्ण भारतात जम्मू काश्मीर सोडून सर्वत्र लागू आहे. जे जे धर्माने हिंदू आहेत त्यांना हा कायदा लागू आहे अशा माहिती आपल्या व्याख्यानातून डॉक्टरांनी दिली. हिंदू विवाह कायदा, त्याअंतर्गत येणाऱ्या गोष्टी, घटस्फोट याविषयीची संपूर्ण माहिती त्यांनी यावेळी दिली. शेवटी प्रश्नोत्तर भागात त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. मा. भूपेश सामंत यांनी 'ज्येष्ठ नागरिक संरक्षण कायदा' याबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले, की कायद्यास आई-वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम - २००७ असे संबोधण्यात येते. सदर कायद्यात ज्येष्ठ नागरिकांवर होणारे परिणाम विविध समस्या आणि त्यावर कायद्यान्वये होणारे उपाय हे स्पष्ट करण्यात आले. मा. निलेश पावसकर यांनी 'गुन्हेगारी कायदा' याबाबत माहिती दिली. ज्याला विद्यार्थ्यांनीदेखील उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना कार्यशाळेचे प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरमचे सदस्य सचिव विनायकराव कांबळे, श्री. दिलीप तळेकर, श्री. प्रॉस्पर डिसूझा, श्री. प्रकाश धोपटकर, श्री. जे.बी. पाटील, श्री. भूपेश सामंत, श्री. निलेश पावसकर व प्रतिष्ठामधील श्री. अनिल चिंदरकर आणि श्रीम. मनिषा खिल्लारे आदि उपस्थित होते. शेवटी राष्ट्रगीत घेऊन कार्यशाळेची सांगता करण्यात आली.

३.४ **विधी साक्षरता कार्यशाळा - जीवनदीप महाविद्यालय, खर्डी:-** मोफत कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या वतीने जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण जि. ठाणे येथे शनिवार दिनांक २५ जानेवारी २०२० रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत 'विधी साक्षरता कार्यशाळा' आयोजित केली होती. महाविद्यालयाच्या वतीने भारतीय संविधानाचे पूजन करून करण्यात आली. या कार्यशाळेला महाविद्यालयातील एकूण दोनशे विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. सर्व प्रथम विद्यार्थ्यांना व उपस्थित प्रतिनिधींना भारतीय संविधानाच्या सरनाम्याचे वाटप करून त्याचे सामूहिक वाचन करण्यात आले आणि लगेचच व्याख्यानास सुरूवात करण्यात आली.

प्रथम सत्रात श्री. दिलीप तळेकर यांनी 'महिलांचे बाबतीत विविध अत्याचार व कायदा' याबाबत उपस्थित मुलांना व्याख्यान दिले. ज्यामध्ये महिला आरक्षण, कौटुंबिक हिंसा, गर्भनिदान, हुंडाबंदी, एकल महिला मातृत्व प्राप्ती कायदा,

भरपगारी रजा, गर्भारपणाची पूर्व आणि पश्चाच सुरक्षिततेची व्यवस्था, महिला आयोग-विशाखा कमिटी, कार्यालयीन स्थळी होणारे शोषण, स्त्री समानता, समान वेतन या विषयांवरील माहिती दिली. स्त्री म्हणजे कोणत्याही वयाची बाईमाणूस ही व्याख्या कायद्याने केलेली आहे ही महत्त्वाची गोष्ट मुलांना नव्याने समजली. यानंतर श्री. धोपटकर यांनी अल्पवयीन मुलांच्या संरक्षणाच्या तरतुदी या विषयावर व्याख्यानास सुरूवात केली. 'मानसिक स्वास्थ्य अधिनियम-१९८७' या कायद्याविषयी श्री. भूपेश सामंत यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. मानसिक आरोग्य म्हणजे आयुष्यात येणाऱ्या सगळ्या बऱ्यावाईट अनुभवांना खंबीरपणे सामोरे जाणे, कुटुंबातील आणि समाजातील इतर लोकांशी चांगले नाते असणे असा अर्थ आहे. समाजातील इतर लोकांशी चांगले नाते असणे असा अर्थ आहे. सामाजिक आरोग्य, मानसिक आरोग्याबाबत जनजागरूकता, मतिमंद मुले, मानसिक आरोग्य, सामाजिक आरोग्य, मानसिक आरोग्य आणि आजार, मानसिक आजारांचे वर्गीकरण, मेंदूची रचना व कार्य यांबाबत माहिती देण्यात आली.

दुसऱ्या सत्रात श्री. प्रॉस्पर डिसुझा यांनी 'सायबर क्राईम आणि कायदे' यांबद्दल मुलांना माहिती दिली. सायबर क्राईमचे प्रकार, सायबर बुलिंग, पॉर्न, इ-मेल, फिशिंग, डेटा थेफ्ट, व्हायरस, मोबाईल, इंटरनेट अशा अनेक प्रकारे आपण सायबर क्राईमच्या जाळ्यात कसे अडकले जाऊ शकतो हे उदाहरणे देऊन स्पष्ट केले व त्यानुसार कोणते आहेत हेही श्री. डिसुझा यांनी मुलांना सविस्तर समजावून सांगितले. श्री. विनायकराव कांबळे यांनी 'अंधश्रद्धा निर्मूलन आणि जादूटोणा विरोधी कायदा' याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. अज्ञानामुळे पोसल्या जाणाऱ्या अनिष्ट व दुष्ट प्रथांपासून समाजातील सर्वसामान्य लोकांचे संरक्षण करण्याच्या दृष्टिने, आणि समाजातील सर्वसामान्य लोकांचे शोषण करुन त्याद्वारे समाजाती लघडी विस्कटून टाकण्याच्या दुष्ट हेतूने भोंदू लोकांनी सर्वसामान्यत: जादूटोणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तथाकथित अलौकिक शक्तिच्या किंवा भूतपिशाच्च यांच्या नावाने निर्माण केलेल्या नरबळी आणि अमानुष, दुष्ट, अनिष्ट व अघोरी प्रथांचा मुकाबला करून त्यांचे समुळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीने, समाजामध्ये जनजागृती व सामाजिक जाणीव निर्माण करण्याकरिता ह्या कायद्याची आवश्यकता होती असे विविध उदाहरणांद्वारे श्री. कांबळे यांनी पटवून दिले. यानंतर श्री. जगन्नाथ पाटील यांनी 'शिक्षण हक्क कायदा' या विषयावर व्याख्यान दिले. शिक्षणाचा हक्क जो मानवी हक्क म्हणून ओळखला जातो. आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक; वरील आंतरराष्ट्रीय करारानुसार शिक्षणाचा हक्क म्हणजे सर्वांसाठी मोफत सक्तीचे प्राथमिक शिक्षण तसेच माध्यमिक शिक्षण सर्वांसाठी वापरण्याजोगे करावे म्हणून एक बंधन. ज्या लोकांनी आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण केले नाही त्यांच्यासाठी पायाभूत शिक्षण देण्याची जबाबदारी शिक्षणाच्या हक्कात येते. शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी शिक्षण संस्थेच्या सर्व पातळीवरील भेदभाव कमी करण्याच्या बंधनाचा शिक्षणाच्या हक्कात समावेश होतो. वय वर्ष ६ ते १४ या वयोगटातील मुलांना मोफत सक्तीचे शिक्षण देण्यात यावे. इतर महत्वाच्या शिक्षणविषयक कायद्याबाबत श्री. पाटील यांनी माहिती दिली.

ही कार्यशाळा ज्या विभागात घेतली गेली तेथे जास्तीत जास्त लोक हे आदिवासी विभागातील रहिवासी होते. महाविद्यालयाच्या मागणीनुसार त्यांना 'महिला रोजगार योजना' बद्दल माहिती द्यावी अशा विनंतीनुसार महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) येथून श्री. हेमंत पाटील यांना पाचारण करण्यात आले होते. त्यांनी महिला रोजगार योजना कशा तयार कराव्यात व कशा अंमलात आणाव्यात तसेच आदिवासी प्रवर्गातील लोकांसाठी कोणत्या विशेष योजना आहेत याबाबत सविस्तर माहिती दिली.

उपस्थित विद्यार्थ्यांनी दिवसभराच्या व्याख्यानांवर आपले मत मांडले, कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरमच्या वतीने आयोजित ही माहिती व कार्यशाळा त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईचे विशेष आभार व्यक्त केले. प्रसंगी जीवनदीप संस्थेचे विश्वस्त मा. श्री. रवींद्र घोडविंदे, प्राचार्य, श्रीमती कैलास कळकटे,

उपप्राचार्य श्रीमती निर्मला मॅडम, निहारिका देशमुख आणि शिक्षकवृंद, प्रतिष्ठानची कायदेविषयक सहाय्य व सल्ला केंद्राची सर्व टीम उपस्थित होती. उपस्थितांपैकी काही विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्राचे वाटप करून कार्यक्रमाच्या शेवटी आभारप्रदर्शन केले व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**९.४ रंगस्वर सांस्कृतिक विभाग :-**

प्रतिष्ठाच्या रंगस्वरतर्फे नाट्य, चित्रपट गायन आदी कार्यक्रम होतात. रंगस्वराची वार्षिक वर्गणी पती- पत्नीसाठी रु.२,०००/-, वैयक्तिक रु. १,२००/-, अपंगासाठी रु. ५००/- भरुन रंगस्वरचे सभासद होता येते. रंगस्वरच्या सदस्यांना तसेच प्रतिष्ठानच्या सदस्यांना कार्यक्रमाचा आस्वाद घेता यतो. जानेवारी २०१९ मध्ये यशवंत आंतरराष्ट्रय चित्रपट महोत्सव याचे आयोजन करण्यात आले. यशवंतराव चव्हाण सेंटरच्य मुंबई येथील सभागृहात विविध सांस्कृतीक कार्यक्रम रंगस्वरच्या वतीने नियमीतपणे सादर केले जातात. सर्व सभासद व रसिकांसाठी विनामूल्य प्रवेश दिला जातो. रंगस्वरसाठी सभासद नोंदणी सुरु आहे.

**९.५ सृजन :-**

५.१ **गणपती मूर्ती कार्यशाळा :-** गणेश चतुर्थी हा दहा दिवसांचा उत्सव असून गणपतीचा सन्मान करण्यासाठी हा उत्सव साजरा केला जातो. इको-फ्रेन्डलीचा शाब्दिक अर्थ पृथ्वीसाठी अनुकूल आहे किंवा पर्यावरणाला हानिकारक नाही असा आहे. प्राचीन काळापासून लोक शेतीतील चिखलाचा वापर करून स्वत:ची गणेश मूर्ती तयार करून त्यांची पूजा करीत होते; पण अखेरीस मातीची जागा प्लास्टर ऑफ पॅरिस आणि इतर हानिकारक पेंट्सने घेतली. ज्यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण होऊ लागला. परंतु सध्या आपण आपल्या मुळांकडे परत जात आहोत, मूर्ती तयार करण्यासाठी चिखल (चिकणमाती) वापरत आहोत. म्हणूनच जेव्हा मूर्ती नैसर्गिक जल संस्थांमध्ये विसर्जित केली जातात तेव्हा त्यामध्ये विरघळली जातात आणि कोणत्याही प्रकारचा त्रास होत नाही. इको फ्रेंडली मूर्ती बनविण्याकरिता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांच्या संकल्पनेतून साकार 'सृजन' तर्फे घेण्यात आलेली गणपती कार्यशाळा यशस्वीरित्या घेण्यात आली. प्राची घाणेकर, पूजा शिंदे आणि अनिकेत विश्वासराव यांनी ही कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेला ८० विद्यार्थी उपस्थित होते.

५.२ **हवामान पूरक सकस आहार - कोशिंबीरी :-** ऑगस्ट महिन्यातील पहिल्या रविवारी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या 'सृजन' अंतर्गत हवामान पूरक सकस आहार - कोशिंबीरी हा कार्यक्रम घेण्यात आला. हवामान बदलाचा पहिला तडाखा हा आपल्या आरोग्यावर पडत असतो. सतत बदलत्या हवामानामुळे सर्दी-खोकला-ताप असे आजार होत असतात. अशावेळी कोणत्या प्रकारचा आहार घेतला असता मुले निरोगी राहू शकतील यावर सृष्टी संस्थेच्या संगीता खरात यांनी मार्गदर्शन केले.

त्याचबरोबर कडधान्ये, दुधी भोपळा, लाल भोपळा, पडवळ, कच्ची पपई, कोबी यासारख्या मुले शक्यतो खात नाहीत अशा भाज्यांपासून विविध कोशिंबीरी बनवण्याचे प्रात्यक्षिकही घेण्यात आले. मुलांनी भाज्या चिरणे, साले काढणे, किसणे अशा सर्व कामात खूप उत्साहाने भाग घेतला.

अन्नपचन संस्था उत्तम राबवण्यासाठी प्रथिने, जीवनसत्वे आणि चोथा हे खूप महत्त्वाचे घटक अन्नामधून मिळवायचे असतील तर कोशिंबीरी हे पूर्णान्न म्हणून उपयुक्त आहे. त्याशिवाय मुलांमध्ये जेवण बनवण्यासाठी प्राथमिक पायरी म्हणून कोशिंबीरी बनवणे हा महत्त्वाचा टप्पा आहे.

५.३ **बांधणी कार्यशाळा :-** भारतात विशेषत: गुजरात आणि राजस्थान राज्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या प्राचीन हस्तकलांपैकी

बांधणी ही एक आहे. भारतात साडी, कुर्ता व ओढणी तयार करण्यासाठी बांधणी कला वापरली गेली आहे, 'बांधणी' हा शब्द बंधन पासून बनलेला आहे. ज्याचा अर्थ कापड बांधणे असा आहे. कापड तयार करण्याचे वेगवेगळे प्रकार आहेत जे वायब्रेंट रंग वापरून नमुने आणि फॉर्म तयार करतात. प्राचीन भारतीय संस्कृती आणि कलांबद्दल मुलांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी, यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. पूजा शिंदे, प्राची घाणेकर, शिवानी धनावडे यांनी या कार्यशाळेत मुलांना मार्गदर्शन केले. ठळक आणि उज्वल रंग मुलांना सृजनशीलता, सकारात्मकता आणि एकत्रितता आणण्यास प्रोत्साहित करतात.

५.४ **ओरिगामी / पेपर क्राफ्ट कार्यशाळा:-** दिनांक ६ ऑक्टोबर २०१९ रोजी सृजन कार्यशाळा ओरिगामी/ पेपर क्राफ्ट या विषयावर आयोजित करण्यात आली होती. ही कार्यशाळा प्रिती सुद्रिक आणि अभिषेक सुद्रिक या कलाकार दांपत्याने घेतली. सदर कार्यशाळेत पारंपरिक पद्धतीने कागदापासून कंदिल कसे बनवायचे, ओरिगामी पद्धतीने कंदिलाचे तोरण व त्याचबरोबर पेपरपासून वॉल हँगिंग या गोष्टीचे प्रात्यक्षित देऊन ते मुलांकडून करून घेतले.

५.५ **प्राण्यांशी मैत्री कार्यशाळा:-** मानव अभ्यास संघ, महाराष्ट्र ॲनिमल रेस्क्यू असोसिएशन आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सृजन विभागाद्वारे 'प्राण्यांची मैत्री' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मासे, बेडूक, खेकडा, उंदीर, हॅमस्टर, कोबंडी, कडकनाथ, बदक, लव बर्ड, आफ्रिकन पोपट, सिल्की कोंबडी, विंचू, घार, इगवाना इ. प्राणी व पक्ष्यांशी मुलांनी मैत्री केली. पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी ही कार्यशाळा मुलांना प्रेरणा देऊन गेली. यावेळी मनपा शाळेचे शिक्षक, सर्पमित्र सुनिल कदम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

५.६ **सृजन विभागातर्फे आरोग्य शिबिराचे आयोजन:-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई सृजन विभाग आणि न्यू होरायझन्स हेल्थ अँड रिसर्च फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार १ डिसेंबर रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे आरोग्य शिबिर संपन्न झाले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर 'सृजन' विभागामार्फत शालेश विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास आणि विविध कलांची तोंडओळख करून त्यांचे विद्यार्थी जीवन समृद्ध व्हावे या करिता 'सृजन' हा उपक्रम चालविण्यात येतो. सर्जनशीलतेचा आविष्कार विद्यार्थ्यांसोबत घडवून त्यांच्यामधील सुप्तकलागुणांना बाब देण्याचा हा प्रयत्न आहे.

९.६ **शिक्षण विकास मंच:-**

महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण योगदान देण्याचे काम २००८ पासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या शिक्षण विकास मंचाने केले आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे शिक्षण विषयक कार्यक्रम शिक्षण विकास मंचामार्फत आयोजित केले जातात. शिक्षण विकास मंचाच्या निमंत्रक मा. खा. सुप्रिया सुळे आहेत. डॉ. वसंत काळपांडे मुख्य संयोजक आणि बसंती रॉय या विशेष सल्लागार म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. दत्ता बाळसराफ हे संयोजक आहेत. नजमा काझी, शुभदा चौकर, सुरेश पाटील हे सदस्य आहेत. समन्वयक म्हणून माधव सूर्यवंशी, मीनल सावंत काम पाहतात. शिवाय विविध कार्यक्रमानुरूप महाराष्ट्रातील शिक्षण तज्ज्ञ, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक यांचे वेळोवेळी सहकार्य मिळत असते.

६.१ **नवीन शैक्षणिक धोरणाचे स्वगत: मात्र अंमलबजावणी बाबत शंका शिक्षक कामावरचा सूर:-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या वतीने आयोजित नवीन शैक्षणिक धोरण मसुदा-२०१९ या विषयावर चर्चा करीत असताना कट्ट्यावरील मान्यवरांनी धोरणाचे स्वागत केले. मात्र नेहमीप्रमाणे कागदावर चांगल्या असणाऱ्या योजना अंमलबजाणीत फसतात; या धोरणाचे असे होऊ नये अशी अपेक्षा व्यक्त केली. शिक्षणकट्ट्यासाठी उपस्थित असणाऱ्यांचे स्वागत शिक्षण विकास मंचचे समन्वयक माधव सूर्यवंशी यांनी केले. प्रास्ताविक करताना ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि मुख्य

संयोजक डॉ.वसंतराव काळपांडे यांनी नवीन शैक्षणिक धोरणाची मांडणी केली आणि उपस्थितांना या धोरणातील चांगल्या तरतुदी कोणत्या आहेत ? आणखी कोणत्या तरतुदींचा अंतर्भाव यात असावा ? कोणत्या तरतुदी बरोबर नाहीत त्यात काय बदल व्हावा ? यासंदर्भात आपले विचार व्यक्त केले जावे असे आवाहन केले.

'शिक्षण कट्ट्या च्या संयोजक श्रीमती बसंती रॉय यांनी नवीन शक्षैणिक धोरणातील शालेय शिक्षणाबाबतच्या तरतुदींवर चर्चा केली आणि त्या धोरणाची माहिती उपस्थिताना दिली. यानंतर उपस्थित प्रतिनिधींनी धोरणाबाबत आपल्या सूचना, प्रतिक्रिया मांडल्या. यासंदर्भात माजी मुख्याध्यापिका सुचेता भवाळकर यांनी शिक्षकांच्या जबाबदाऱ्यांवर भाष्य केले. शिक्षकांना दिलेल्या कामाचे मूल्यमापन होण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले. म.गांधी विद्या मंदिरच्या दीपिका गावडे यांनी पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक शाळांच्या एकत्रिकरणावर भर देऊन त्यांचा समन्वय साधावा असे मत व्यक्त केले. प्रा. मिलिंद आव्हाड यांनी सर्व बोर्डाचे एकत्रीकरण करून समानीकरण करण्यासाठीची गरज व्यक्त केली. 'शिक्षक भारती' चे सरचिटणीस आणि शैक्षणिक विषयाचे अभ्यासक मा. जालिंदर सरोदे यांनी अगामी काळात या धोरणामुळे अभ्यासक्रमात येणाऱ्या सर्व विषयांना पूर्णवेळ शिक्षक देण्याची, अंगणवाडी सेवकांना शिक्षकांचा दर्जा देण्याची गरज प्रतिपादन केली. D.ED., B.ED ची महाविद्यलये बंद करून तेथील कर्मचारी वर्गाचे काय करणार असा प्रश्न उपस्थित केला नाशिकचे सतील नाडगौडा यांनी देशात 'एक बोर्ड, एक अभ्यासक्रम लागू करावा अशी मागणी करून मातृभाषेतून शिक्षणाची गरज प्रतिपादन केली. नंदादीप विद्यालयाचे उपक्रमशील शिक्षक मच्छिंद्र बोराडे यांनी धोरणाच्या अंमलबजावणीकडे लक्ष देण्याची गरज प्रतिपादन केली. अभ्यासक मंडळाचे सदस्य साहेबराव महाजन यांनी संवाद कौशल्य, उद्योजकता, व्होकेशनल याला महत्व देण्याची गरज असल्याचे सांगितले. शिवाय शिक्षण विभागाने फॉलोअप घेण्याची यंत्रणा उभी करावी अशी अपेक्ष व्यक्त केली. माजी मुख्याध्यापिका शैलजा मुळे यांनी ९, १०, ११, १२ या वर्गाचे एकत्रीकरण कसे करणार ? असा प्रश्न उपस्थित केला. रयत शिक्षण संस्थेचे शिक्षक तुषार म्हात्रे यांनी मुलांना विषय निवडीचे स्वातंत्र्य मिळाले असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. शिवाय सर्व विषय उपलब्ध करून देण्यात यावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. डॉ.फादर स्वामी, शुभदा चौकर, संपदा जोशी, प्रशांत शिंदे यांनीही या धोरणाबद्दलची मते व्यक्त केली. उपस्थितांना केलेल्या सूचना आयोगाकडे पाठविणार असल्याचे शेवटी मुख्य संयोजक डॉ.वसंतराव काळपांडे यांनी सांगितले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे कार्यक्रम प्रमुख दत्ता बाळसराफ यांनी उपस्थितांचे आभार मानले.

६.२ **राष्ट्रीय शिक्षण धोरण मसुदा सर्वसमावेशक, प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे गरजेचे : डॉ. वसंत काळपांडे :-** केंद्र शासनाच्या वतीने चर्चा व सूचनासाठी जाहीर करण्यात आलेला राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा मसुदा सर्वसमावेशक व शिक्षण प्रक्रियेतील प्रत्येक घटकाचे विचार करून बनवलेला असून, त्यावर कुठल्याच एका राजकीय विचारप्रक्रियेची छाप नाही. हे त्याचे वेगळेपण आहे. यातील तरतुदींचा अभ्यास करून केंद्र शासनाला आपण वैयक्तिक पातळीवर देखील सूचना पाठवू शकतो. तीस जून ही सूचना पाठविण्याची शेवटची तारीख आहे. असे प्रतिपादन राज्याचे माजी शिक्षण संचालक व शिक्षण विकास मंचाचे संयोजक डॉ. वसंत काळपांडे यांनी केले.

६.३ **नवीन शैक्षणिक धोरण मसुदा २०१९ वर चर्चा :-** दि. ६ जुलै रोजी शिक्षण मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या वतीने सदरील शिक्षण कट्ट्यावर पुण्यातील गांधीभवन येथे चर्चा आयोजित करण्यात आली होती. या चर्चेची सुरुवात ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आशि शिक्षण विकास मंचाचे मुख्य संयोजक मा.डॉ. वसंतराव काळपांडे यांच्या प्रास्ताविकाने झाली. प्रास्तविकात त्यांनी भारतीय शिक्षण पद्धती, आतापर्यंत आलेले आयोग, त्यांचा शिक्षणावर झालेला परिणाम, येऊ घातलेले नवीन शैक्षणिक धोरण यांवर मुख्यत्वे मांडणी केली. सोबत धोरण अंमलबजावणीसाठी समाजाचा सहभाग

महत्वाचा आहे. याकडेही त्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. शिक्षण विकास मंचच्या मुख्य सल्लागार श्रीमती बसंती रॉय यांनी त्यानंतर नवीन शैक्षणिक धोरणाचे आढावा घेतला. उपस्थित सदस्यांनी चर्चेत भाग घेतला.

चर्चेच्या सुरुवातीला प्रभाकर खाडिलकर प्राथमिक शिक्षण मातृभाषेतूनच मिळावे. निवृत्त तज्ज्ञ व्यक्तींच्या ज्ञानाचा शिक्षण व्यवस्थेने फायदा करुन घ्यावा, अशी सूचना केली. सोबतच अंगणवाडी - पूर्व प्राथमिक शिक्षण दर्जेदार असणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. यानंतर नीलिमा सप्रे यांनी शिक्षक प्रशिक्षण कसे राबविले जाणार... ? प्रशिक्षण जबाबदारी शाळेवर द्यावी तसेच शिक्षकांनी स्वत: आपला अभ्यासक्रम तयार करावा. सोबतच पालकांचे उद्बोधन आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

रयत शिक्षण संस्थेचे कमलाकर महामुनी यांनी कला, क्रीडा-शिक्षकांच्या जागा भरण्याकडे शासनाचे दुर्लक्ष होते या धोरणातही याबाबत शंका कायम आहेत, विद्यार्थी शिक्षक होण्यास उत्सुक नाहीत. नाइलाजाने या क्षेत्रात येणारी संख्या वाढली आहे. यावर विचार व्हावा, अश्या सूचना मांडल्या.

श्री भास्कर भुसारी यांनी 'disaster management, prides and failures या क्षेत्रांचा शिक्षणात अंतर्भाव व्हावा, असे मत व्यक्त केले. सुरेखा सोनवणे यांनी हे धोरण पालक शिक्षकांपर्यंत जायला हवे यावे आणखी चर्चा व्हायला हवी. शाळेत शैक्षणिक साधनांची कमतरता असल्याने ८वी नंतर ज्ञान रचनावादी शिक्षण अवघड जाते. सरकारी शाळांमध्ये मुले पाठवण्यासाठी पालकांनी प्राधान्य द्यायला हवे, याबद्दल आपले मत मांडले. अंजली सोपण यांनी 'पूर्व प्राथमिक टप्पा सुधारणे अत्यावश्यक आहे. पालकांचा इंग्रजी माध्यमाचा ओढा हा मोठा अडथळा मातृभाषेतून शिक्षणासाठी आहे, याकडे उपस्थितांचे लक्ष वेधले.

शरद जावडेकर यांनी नवीन धोरणात समतेचा उल्लेख नाही. हे खाजगी शिक्षण सम्राटांचे हितसंबंध राखणारे आहे. स्कूल कॉम्प्लेक्स कल्पना प्रत्यक्षात येणे अवघड असल्याचे निरीक्षण नोंदविले. अनिल कुलकर्णी यांनी RTE मध्ये असलेल्या त्रुटी, कृती आराखडा यावर मत व्यक्त केले. प्रीतेश कांबळे यांना प्रशिक्षण तसेच लैगिक शिक्षण आवश्यक असल्याचे (शिक्षक व विद्यार्थी दोघांसाठी) मत व्यक्त केले.

मुकुंद किंदत आणि इंदापूरकर यांनी पूर्व प्राथमिक शिक्षण महत्वाचे असल्याचे सांगितले. श्री रवींद्र झेंडे यांनी ११, १२वी व्यवसायामधील शिक्षण पुढे उच्च शिक्षणाशी जोडून घेण्याचा मार्ग कोणता ? याचा धोरणात विचार करावा. डॉ. श्रुती पानसे यांनी मातृभाषेतून शिक्षण असावे, मात्र, त्याच अभ्यासक्रम विद्यार्थ्यांचे वय लक्षात घेऊन त्यांना सहज समजेल अशा पद्धतीचा असावा. सध्याचा अभ्यासक्रम क्रूर वाटतो. बौद्धिक क्षमता आणि आर्थिक क्षमता यातील फरक कसा कमी करता येईल ? यासंदर्भात नवीन धोरणात तरतूद असावी ही अपेक्षा व्यक्त केली. प्रसिद्ध साहित्यिक राजीव तांबे यांनी मुलांना शिकण्यातला आनंद कळावा, मुलांनी माझा प्रश्न मी सोडवणे आवश्यक आहे. सोबतच प्रश्न विचारू शकतील असं वातावरण आवश्यक असल्याचे मत नोंदवले ते पुढे म्हणाले, शाळा घरात आणि घर शाळेत आले पाहिजे, असे वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. वैशाली कार्लेकर यांनी महत्त्वाकांक्षी धोरण आहे. मात्र खाजगी शाळांवर हे धोरण लागू करणे किती शक्य आहे ? असा प्रश्न उपस्थित कला. सर्व शिक्षण मंडळ एकत्र करून देशासाठी एकच शिक्षण मंडळ करणे आवश्यक वाटते. असेही मत त्यांनी नोंदवले.

कार्यक्रमाच्या शेवटी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई कार्यक्रम प्रमुख दत्ता बाळसराफ यांनी उपस्थितांचे आभार मानले. ह्या धोरणावर आणखी चर्चा झाली पाहिजे. ही अपेक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमास पालक, शिक्षक, मुख्याध्यापक, पत्रकार यांची उपस्थिती होती.

दिनांक २४ नोव्हेंबर २०१९ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि शिक्षण विकास मंचद्वारा आयोजित 'शालेय शिक्षण आणि वाचन संस्कृती' या विषयावर रंगलेल्या दहाव्या राज्यस्तरीय परिषदेत...

व्हॉट्सॲप, फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम, गुगल यांसारख्या सोशल मीडियाच्या आहारी गेलेली हल्लीची पिढी नक्की वाचते तरी काय, आजकाल मुले वाचतच नाहीत, ही सतत ऐकू येणारी ओरड कितपत खरी आहे? आधीची पिढी तरी हल्ली काय वाचते? शाळकरी मुलांमध्ये वाचन संस्कृती कशी रूजविता येईल? त्यातील नेमके अडथळे कोणते? वाचनाची गोडी लागावी म्हणून कोणकोणते उपाय करता येतील? या सगळ्यात शाळा, शिक्षक, पालक यांची भूमिका काय असावी? या आणि अशा अनेक प्रश्नांच्या उत्तरांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला गेला.

या प्रसंगी ग्रंथाली प्रकाशनचे संस्थापक, वाचन चळवळीचे प्रणेते दिनकर गांगल, शिक्षण विकास मंचाचे मुख्य संयोजक डॉ. वसंत काळपाडे, राजीव तांबे (बालसहित्यिक), विजय जोशी (झुरिक, स्वित्झर्लंड), किरण केंद्रे (संपादक 'किशोर' मासिक), शुभदा चौकर (संपादक, 'वयम्' मासिक), नरेंद्र लांजेवार (ग्रंथपाल, साहित्यिक आणि वाचन चळवळीचे कार्यकर्ते), अरविंद शिंगाडे (उपक्रमशील माध्यमिक शिक्षक), गीतांजली देगावकर (अस्तित्व प्रतिष्ठानच्या अध्यक्ष), ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ रेणू दांडेकर आणि डॉ. राजा दांडेकर, मेंदूविज्ञानाच्या अभ्यासक आणि लेखिका डॉ. श्रुती पानसे आदी मान्यवर उपस्थित होते.

दर वर्षीप्रमाणे यंदाही आयोजित केल्या गेलेल्या या एक दिवसीय परिषदेची दमदार सुरूवात तरूण पिढीचा आयकॉन 'बुकलेट बॉय' अमृत देशमुख याच्या वाचनप्रवासाची 'रंजक' ओळख ध्वनिचित्रफितीच्या माध्यमातून करण्यात आली. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचेच एक अंग म्हणजे शिक्षण विकास मंच. त्याची स्थापना २००८ साली झाली. मंचाच्या स्थापना वर्षापासून यंदाच्या परिषदेपर्यंत आयोजित करण्यात आलेल्या वैविध्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांचा साद्यंत परिचय शिक्षण विकास मंचाच्या विशेष सल्लागार बसंती रॉय यांनी करून दिला.

२००८ सालापासून दरवर्षी एका शैक्षणिक विषयावर राज्यस्तरीय शैक्षणिक परिषदेचे आयोजन केले जाते. शिक्षण विकास मंचाचे नेमके फलित काय, हे सांगताना मागील सर्वच राज्यस्तरीय शिक्षण परिषदांचे वर्षनिहाय विषय, त्यातील चर्चा, शैक्षणिक ग्रंथ निर्मिती, शिक्षक साहित्य संमेलने व त्यातील नामवंत साहित्यिकांचे उद्‌बोधक विचार, डॉ. कुमुद बन्सल यांच्या स्मृतीप्रित्यर्थ प्रतिवर्षी दिला जाणारा उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार, त्याचे स्वरूप आणि मानकरी, शिक्षक तसेच मुख्याध्यापक यांच्यासाठी विविध प्रशिक्षणे व कार्यशाळा, शिक्षणातील ताज्या समस्या, धोरणे आणि घडामोडींवर अनौपचारिक गप्पांची मैफल असणारा शिक्षण कट्टा, फक्त शिक्षण याच विषयावर सखोल चर्चा करणारे सुमारे साडेसातशेहून अधिक शिक्षणप्रेमींचे अतिशय शिस्तबद्ध तीन व्हॉट्सॲप समूह, पालक मेळावा, आगामी काळातील उपक्रमांचे समग्र - दर्शन डॉ. बसंती रॉय यांनी उपस्थितांना घडवले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षण विकास मंचाचे मुख्य संयोजक डॉ. वसंत काळपांडे यांनी केले. परिषदेसाठी 'शालेय शिक्षण आणि वाचन संस्कृती' या विषय निवडीमागील हेतू कथन करताना ''हल्ली मुले वाचतच नाहीत, ती सारखी सोशल मिडियाचा वापर करतात अशी विधाने सतत कानी पडतात. त्याबाबत वस्तुस्थितीचा मागोवा घेण्याचा एक प्रयत्न करायचे ठरवले''

६.४ **डॉ. कुमुद बन्सल उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार वितरण:-** यंदाचा 'डॉ. कुमुद बन्सल उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार' दोन पुस्तकांना घोषित करण्यात आला. डॉ. मंजिरी निमकर यांनी संपादित केलेल्या ज्योत्सना प्रकाशनच्या 'मुलांचे ग्रंथालय' तसेच ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ रेणू दांडेकर यांच्या सुरेश एजन्सी, पुणे द्वारा प्रकाशित 'नवी पालकनीती' या ग्रंथांना दिनकर गांगल यांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले. यातील उल्लेखनीय बाब म्हणजे रेणूताईंना हा पुरस्कार दुसऱ्यांदा प्राप्त झाला आहे. यावेळी डॉ. मंजिरी निमकर यांच्या वतीने (त्या भारतात नसल्यामुळे) विद्यादेवी काकडे यांचा, तसेच ज्योत्स्ना प्रकाशनच्या विकास परांजपे आणि रेणूताई दांडेकर यांचा सन्मान करण्यात आला. पाच हजार रूपये रोख, गौरवपत्र आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

या प्रसंगाचे औचित्य साधून आबा महाजन यांच्या 'आनंदाचे झाड' या काव्यसंग्रहाचा तर परभणी जिल्हा परिषदेच्या शाळातील प्राथमिक शिक्षक लेखक युवराज माने यांच्या बंजारा भाषेत अनुवादित केलेल्या 'आनंदेरो झाड' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा साजरा करण्यात आला.

६.५ **बीजभाषण : दिनकर गांगल:-** मनोगतातील डॉ. वसंत काळपांडे यांनी नोंदविलेली निरीक्षणे आणि निष्कर्षांचा नेमका धागा पकडून आपल्या बीजभाषणाचा शिखरबिंदू गाठत दिनकर गांगल यांनी वाचन संस्कृती रूजवण्यासाठी नेमके काय केले पाहिजे याचा सोप्या शब्दांत वेध घेतला. १९८२ च्या 'वाचा रे वाचा' ह्या वाचन चळवळीतील स्वानुभवावर आधारित हा वेध ते व्यापक अर्थाने इतका सर्वसमावेशकपणे घेत राहिले, की श्रोत्यांची मनोमन 'हो खरंय, हे असंच आहे आणि असंच व्हायलां हवं' अशी उत्स्फूर्त दाद टाळ्यांमधून आपसूकच मिळत गेली. आपल्या बीजभाषणातून 'लोकल ते ग्लोबल' असा सुमारे चार दशकांच्या वाचन संस्कृतीचा वेध घेताना गांगल यांनी प्रारंभीच १९८२ हे भारतीय स्लोगन वर्ष असल्याचे सांगितले. यावेळी व्यांच्यासह सर्वांनी 'वाचा रे वाचा' अशी घोषणा दिली. यात ''वाचा रे..., म्हणजे तुम्ही वाचा... आम्ही नाही''अशी मिस्कील टिप्पणी करत श्रोत्यांना खळखळून हसवले. दुसऱ्याला वाचा म्हणणे हे खूप सोपे आहे. मात्र वाचन ही काही सोपी गोष्ट मुळीच नाही. भारतीय संस्कृतीत पुस्तके ही पवित्र तथा हळद-कुंकू वाहून पूजनीय बाब म्हणून गणली जाणे ही दिशाभूलच ठरते. कारण पावित्र्य हे पुस्तकांना नसून त्यातून वाढणाऱ्या जिज्ञासा, उत्कंठा आणि कुतूहल यांना आहे. ''आपल्याकडे ज्ञान म्हटले, की त्याला आध्यात्मिक म्हणावे.'' हे त्यांनी दिलखुलासपणे गप्पांची मैफल रंगवत श्रोत्यांना पटवून दिले. वाचन हे अतिशय महत्त्वाचे माध्यम असले तरी ज्ञानप्राप्तीची इतरही माध्यमे महत्त्वाची आहेतच. आजच्या पिढीला अनेक माध्यमांतून माहिती मिळवण्याची इंस्टंट सोय उपलब्ध असल्याने त्यांचा हेतू फोकस्ट आहे. त्यांचा चौकसपणे संदर्भ घेत अवांतर वाचनात आवड वाढविणे हे पालकांपुढे आव्हान आहे. वाचनसंस्कृती रूजवायची असेल तर मुलांमधील उत्सुकता, उत्कंठा वाढवली पाहिजे हल्लीच्या मुलांना वाचतानाच कल्पकतेने सृजनशील अनुभव कसा देता येईल याचे दिलखेचक प्रात्यक्षिक देताना दिनकर गांगल ''एक घनदाट जंगल होते..'' असे म्हणत थबकले. आता समोर बसलेल्यांच्या मनात शेकडो जंगले उभी राहिली . हेच जर एकाच चित्रात पुढे ठेवले असते तर सर्वांचे एकमेव जंगल झाले असते. यातून मुलांची उत्कंठा वाढली, की वाचनाची आवड निर्माण करणे ती टिकवणे सोपे जाते, असे सोदाहरण पटवून दिले. वाचनसंस्कृती रूजवण्यासाठी हल्लीची गतिमान माध्यमे आणि मुले अवगत करून काळानुरूप बदल करणे आवश्यक आहे. आजोबांच्या तत्कालीन गरजा आणि नातवांच्या गरजा यातील तफावत मोठी असून ते जाणून घेणे आजच्या घडीला क्रमप्राप्तच ठरते, असे मत त्यांनी व्यक्त केले. भविष्यात अक्षर लिपीचा प्रवास चित्रलिपीकडे होत जाऊन आजची मुद्रण साधने २०३३ पर्यंत वस्तुसंग्रहालयात पहायला मिळतील, असे वेधक विधान करून आपल्या बीजभाषणातून आगामी काळाचे चित्र उपस्थित श्रोत्यांपुढे उभे केले. एकूणच भूतकाळातील होऊन गेलेल्या आणि भविष्यात होऊ पाहणाऱ्या वाचन संस्कृतीचा वर्तमानाशी बदलता दृष्टिकोन अचूक टिपत शालेय शिक्षण आणि वाचन संस्कृती या विषयाची उत्तम बीज पेरणी करत गांगल यांनी वाचन परिषदेत आधुनिक नवदृष्टिकोन निर्माण केला.

६.६ **मुलांसोबत वाचू या - राजीव तांबे:-** दिनकर गांगल यांच्या बीज भाषणाचा तात्विक आणि रंजक अनुभवाचा आलेख तसाच पुढे चढता ठेवत 'मुलांसोबत वाचू या' ह्या मनोगतातून सुप्रसिद्ध बालसाहित्यिक राजीव तांबे यांनी शून्य ते पाच वर्षे वयोगटातील बालकांच्या मनोविश्वाची अंतर्मुख होण्यास उद्युक्त करणारी सफरच जणू उपस्थितांना घडवून आणली. सतत खळखळून हसत ठेवत, कानपिचक्या देत शिक्षक आणि पालकांनी कोणते शिशुसाहित्य कसे हाताळावे याचे खुमासदार शैलीत वर्णन त्यांनी केले. या वयोगटांचील मुलांमध्ये वाचनाच्या प्रवासाची सुरूवात चित्र पाहता पाहता जे माहीत आहे त्यापासून जे कधी पाहिलेच नाही, अशा फँटसीच्या जगात कशी होत जाते याचे गुज

उलगडले. पालकांनी मुलांवर शिस्त, संस्कार, मूल्ये आणि गुड हॅबीट आणि बॅड हॅबीट या गोष्टी मुलांच्या मनावर सतत बिंबवल्यास मुलांच्या अंतर्मनातील नेमकी कोणती स्वगते उमटू लागतात, याचे विलक्षण सुंदर विवेचन त्यांनी केले. मराठी साहित्यात अद्याप तरी वर्डलेस बुक ही निर्मिती झाली नसल्याचे सांगत एरॉन बेकर याचे 'द जर्नी' या पानोपानी अद्भुत, उत्कंठावर्धक पुस्तकाची ओळख करून दिली. आपल्या बालसाहित्यातील प्रचंड तोचतोचपणा आणि साचलेपणा अधोरेखित करीत 'ज्यात पुस्तक उघडताच मुलांची कल्पनाशक्ती चहूबाजूंनी सुसाट हुंदडू लागते, त्यायोगे नकळत शिक्षण घडते, मुलांनी जे कधीच पाहिले नाही ते हळूवारपणे उलगडत नेते, जे पुस्तक पाहता पाहता मूल रमून जाते, ज्यातील विश्व त्याला आपलेच वाटू लागते, नव्हे तर त्याच्या विश्वाचा भाग बनते, अशी शक्तिस्थाने असलेली पुस्तके मुलांना उपलब्ध करून द्यावीत' असे त्यांनी निक्षून सांगितले, मुलांविषयी सतत तक्रारी नकोतच त्यांच्याविषयी चांगले बोलण्यातूनच मुले वाचनाकडे वळू शकतील असे त्यानी सांगितले मुलांविषयीचा निकोप दृष्टिकोन व त्यांच्यामध्ये मिसळून जात बाल्य सांभाळून केला जाणारा संवाद किती महत्त्वाचा आहे हे राजीव तांबे यांनी वारंवार अधोरेखित केले.

६.७ **परिसंवाद: मुलांमध्ये वाचनाची आवड कशी वाढवावी?:-** सध्याच्या वाचनविषयक विविध ज्वलंत प्रश्नांचा समाचार घेत आपापल्या परीने मुलांमध्ये वाचनाची आवड कशी वाढवली? वाचनासाठी अहोरात्र ध्यास घेऊन काम करणाऱ्या मातब्बर वाचनप्रेमींनी कोणकोणते पठडीबाहेरील उपक्रम कसे राबविले, अशा प्रश्नांची उत्तरे मिळविण्याचा प्रयत्न शुभदा चौकर यांनी या परिसंवादाच्या माध्यमातून केला. यात गीतांजली देगावकर, नरेंद्र लांजेवार, किरण केंद्रे, अरविंद शिंगाडे यांनी आपले सृजनशील प्रयोग विशद केले.

बुलढाण्याचे माध्यमिक शिक्षक आणि समुपदेशक अरविंद शिंगाडे यांनी मुलांचे बोलीभाषेचे शब्दोचारण हेच वाचनातील मोठा अडसर असल्याचे सांगत प्रमाण भाषा विरूद्ध स्थानिक बोलीभाषा यातून मार्ग काढत बोलीभाषेचा सर्रास स्वीकार करून सर्वप्रथम मुलांमधील वाचनातील गंड भावना घालवणे पसंत केल्याचे सांगितले. पुस्तक आणि विद्यार्थी यांतील अंतर वाढण्यास शिक्षकच मोठ्या प्रमाणात जबाबदार असल्याचे ते खेदाने म्हणाले. सप्तरंग पुरवणीतील राजीव तांबे यांच्या कथांचे शाळेत प्रकट वाचन घेऊन गोडी निर्माण केली. स्वत:च्या लेखणीतून 'ऑफ पीरियड', 'सेंडॉफ' या वृत्तपत्र सदरांतून गोष्टिवेल्हाळ मुलांना वाचते करण्याचा प्रयत्न केला असे ते म्हणाले.

महाराष्ट्र शासनाच्या 'लोकराज्य' आणि बालभारतीच्या 'किशोर' मासिकाचे अनुक्रमे सहसंपादक व संपादक म्हणून प्रदीर्घ काळ अनुभव असलेले किरण केंद्रे यांनी 'किशोर' मासिकाच्या बत्तीस हजार पानांचे डिजिटलायझेशन करण्याचे अजस्त्र 'शिवधनुष्य' लीलया पेललं आहे. मासिकातील कथा, त्यातील चित्रं, पात्र इत्यादी मुलांना आपलंसं वाटण्याकडे विशेष लक्ष दर्शवत अनेक सुधारणा घडवून आणल्याचे ते सांगतात. या मासिकातील कथांच्या वाचनाने अर्जुनी मोरगाव येथील एका मुलाने प्रेरणा घेऊन खराखुरा वणवा विझवण्यासाठी धाव घेतल्याचे सांगितले. इतका परिवर्तनीय परिणाम बालमनावर करू शकणारी पुस्तके ही खरी प्रभावी माध्यम आहेत. या दिनकर गांगल यांच्या मताला त्यांनी पुष्टी दिली.

६.८ **वाचनाने मला काय दिले : सोहम कुलकर्णी:-** आजची पिढी, आजची पिढी असा परिषदेत वारंवार होणारा उल्लेख ज्यांना अनुलक्षून केला गेला त्याच आजच्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारा, राष्ट्रीय पातळीवर जलतरण स्पर्धेत घवघवीत यश संपादन केलेला आणि राज्यभर गाजलेल्या 'वयम्' बालमासिक आणि ठाण्यातील प्रसिद्ध इन्स्टिट्यूट ऑफ सायकॉलॉजिकल हेल्थ (आय पी एच) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'बहुरंगी बहर' स्पर्धेत अव्वल स्थान पटकावलेल्या नाशिकच्या सोहम कुलकुर्णी यांच्या 'वाचनाने मला काय दिले? या विषयावरील मनोगतातून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. आपल्यातील अष्टपैलू व्यक्तिमत्त्व बहराचे गुपित म्हणजे आपले वाचनसंस्कृती

जोपासणारे व्यासंगी आई बाबा आणि आपली शाळा हेच असल्याचे सोहम सांगतो. सुस्पष्ट आवाज, आरसपानी शब्दोच्चार, मराठी, हिंदी, संस्कृत आणि इंग्रजी या सारख्या भाषांवर असलेले प्रभुत्व, अतिशय सुसंगत, मुद्देसूद विषयाची आणि विचारांची मांडणी तसेच आजवर त्याने वाचलेल्या पुस्तकांच्या नावांची नुसती जंत्री ऐकूनच या वाचनवेड्या शाळकरी वयातील सोहमच्या गगन भरारीचा अंदाज आल्याशिवाय राहत नाही.

६.९ **मुलांचे वाचन : लोकल ते ग्लोबल - विजय जोशी**:- शालेय शिक्षण आणि वाचन संस्कृती' या यंदाच्या राज्यस्तरीय शिक्षण परिषदेचा आवाका आणि व्याप्ती आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत वृद्धिंगत करणारे आणि उपस्थित श्रोत्यांना वाचन संस्कृतीचा ग्लोबल वेध घेण्यास मार्गदर्शक ठरणारे, खास या परिषदेसाठी (झुरिक, स्वित्झर्लंड) येथून आवर्जून उपस्थित राहिलेले श्री. विजय जोशी यांचे भोजनोत्तर सत्रातील मनोगत हे विशेष आकर्षण बिंदू ठरले.

ऐंशी लाख लोकसंख्येच्या आणि महाराष्ट्रातील विदर्भ व मराठवाडा मिळून होणाऱ्या भौगोलिक क्षेत्रफळाइतका असलेल्या स्वित्झर्लंड या देशाचे शैक्षणिक, क्रीडा, आधुनिक तंत्रज्ञान, आर्थिक स्थान या सर्वच क्षेत्रांत सुस्थितीत असण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे तेथील शिक्षण प्रणाली होय. इतकी कमी लोकसंख्या असूनही २८ नोबेल पुरस्कार मिळविणाऱ्या या देशाची शिक्षणपद्धती मुळात समानतेच्या तत्त्वावर आधारित आणि उपयोजनवादी प्राथमिक विद्यार्थ्यांसाठी एकाच वर्गात एकाच शिक्षकांकडून होणारे अध्यापन, फ्रेंच, जर्मन, इटालियन या भाषा शिकण्याची संधी, इथे पहावयास मिळते. खाजगी शिक्षणाचे प्रमाण सुमारे पाचच टक्के आहे. सकाळी आठ ते साडेअकरा आणि दुपारी दोन ते साडेचार ही शाळेची वेळ, शिक्षण आणि व्यावसायिक कला कौशल्य, वाचन, क्रीडा यांची संपूर्ण जबाबदारी ही इथल्या शाळा व शिक्षकांवरच असल्याचे पाहावयास मिळते. ही बाब या शिक्षणपद्धतीचे वेगळेपण विशद करते. येथील कुटुंबव्यवस्था पाहता सुमारे पन्नास टक्के लोक घटस्फोटित आहेत. साहजिकच मुलांच्या भावविश्वावर त्याचे काही परिणाम आढळून येतात. येथील माध्यमिक शिक्षण रियल स्कूल म्हणून ओळखले जाते. यात मुलांच्या आवडीचे करिअर आणि त्याला पूरक विषय निवडता येणे शक्य होते. वयाच्या पंधराव्या वर्षापासूनच स्व-कमाई करत येथील मुले शैक्षणिक वाटचाल करतात. येथील वाचनसंस्कृती पालककेंद्रित नसून बव्हंशी शिक्षककेंद्रित असल्याचे विजय जोशी यांनी सांगितले. वाचनसंस्कृती परिषदेचे हे सत्र उत्कंठा वाढवणारे, महाराष्ट्रासह देशाच्या शिक्षण आणि वाचन संस्कृतीचा स्वित्झर्लंडशी तौलनिक विचार करायला उद्यक्त करणारे ठरले.

६.१० **मुक्त संवाद** :- 'शालेय शिक्षण आणि वाचनसंस्कृती' या विषयातील बहरत गेलेल्या चर्चेच्या अंतिम टप्प्यात समस्त वाचनप्रेमी श्रोतृवर्गांला देखील हे व्यासपीठ खुल्या चर्चेसाठी उपलब्ध करून देण्यात आले. या सत्राचे संयोजन डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय आणि किरण केंद्रे यांनी केले. वाचनाबद्दल संपूर्ण दिवसभर विचारमंथन केल्यानंतर प्रेक्षकांना त्यांची मते, सूचना, त्यांनी राबवलेले उपक्रम, अनुभव कथन, वाचन परिषद किंवा विषयाशी संबंधित पडलेले काही नवीन प्रश्न, यावर व्यक्त होण्याची संधी देण्यात आली. या सत्रात सुमारे तासभर उत्तमोत्तम प्रतिक्रिया, दर्जेदार उपक्रम, नवनवीन संकल्पना, श्रोत्यांचे विचार आणि सर्जनशील कल्पनांची मुक्तहस्ते देवाणघेवाण झाली. अनेक श्रोत्यांनी मर्यादित वेळेअभावी आपल्या प्रतिक्रिया सोशल मीडियाच्या माध्यमातूनदेखील आयोजकांपर्यंत पोहोचवून समाधान व्यक्त केले. त्यांतील काही निवडक प्रतिक्रिया नोंदवणे हे खरे वाचन आणि श्रवण संस्कृतीला पोषक ठरणारे आहे. त्या सर्वच प्रतिक्रियादेखील या नितांत सुंदर परिषदेचे अंगच ठरते.

६.११ **समारोप**:- भारत हे अनादी काळापासूनच जगाचे भावनिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक नेतृत्व करणारे सुसंस्कृत राष्ट्र मानले जाते. एकविसाव्या शतकाच्या सुरूवातीला इंटरनेट आणि संगणक युगाने एकूणच मानवी जनजीवनास सर्वार्थाने बदलाच्या उंबरठ्यावर उभे केले. आजच्या पिढीतील शालेय शिक्षण आणि संस्कारक्षम वयातील मुलेही त्याला अपवाद राहू शकत नाहीत. ज्ञानार्जनाचे महत्त्वाचे अंग मानल्या जाणाऱ्या वाचनात परिस्थितीसापेक्ष बदल होत

असलेल्या नव्या पिढीला वेगवेगळ्या माध्यमांतून स्वीकारताना मागच्या दोन पिढयांनी नेमका कोणता दृष्टिकोन अंगिकारावा ह्याचे अप्रतिम सुंदर उत्तर म्हणजे 'शालेय शिक्षण आणि वाचन संस्कृती' ही राज्यस्तरीय परिषद होय. तो दृष्टिकोन प्राप्त करून देणारे जर साक्षात वाचन चळवळीचे अध्वर्यू असतील, तर त्यासारखा दुर्मीळ 'ज्ञानयोग' विरळाच समजावा. लेखक, वाचक, शिक्षक, विद्यार्थी, पालक, शिक्षणतज्ज्ञ, पत्रकार, संपादक, शिक्षण अभ्यासक, गावच्या शिवारापासून जगाच्या उंबरठ्यावरील वाचनप्रेमींच्या मांदियाळीने खेचलेली ही प्रत्यंचा म्हणजे 'वाचन संस्कृतीचा ग्लोबल वेध' ठरतो. शिक्षण विकास मंचाच्या ऋषितुल्य डॉ. वसंत काळपांडे, डॉ. बसंती रॉय आणि माधव सूर्यवंशी यांनी हे शिवधनुष्य लीलया पेलले. श्रीमती वैशाली सरवणकर यांनी आपल्या 'काव्यशास्त्र विनोदमयी' सूत्रसंचालनातून विचारवंतांच्या मौक्तिकांची केलेली गुंफण हा एक देखणा पैलू या परिषदेतील श्रोत्यांना अनुभवायला मिळाला.

शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान या 'उत्प्रेरकाच्या' भूमिकेतून शिक्षणप्रेमींना भेटण्यासाठी सदैव तत्पर आहे.

६.१२ **परिषदेचे फलित:-** तज्ज्ञ आणि सहभागी होणारे इतर तज्ज्ञ यांच्या परस्पर भेटी हा अशा परिषदांचा खूप मोठा फायदा असतो. तो या परिषदेतसुद्धा उपस्थित प्रतिनिधींनी घेतला. महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या प्रतिनिधींचे विचार, कल्पना, उपक्रम यांची अनौपचारिकरीत्या देवाणघेवाण झाली. खुल्या चर्चेत प्रतिनिधींना त्यांचे विचार, कल्पना आणि उपक्रम मांडता आले.

बालभारती, ग्रंथाली, ज्योत्सना प्रकाशन अशा विविध प्रकाशकांनी पुस्तक प्रदर्शनात ठेवलेल्या पुस्तकांमधून निवड करून अनेकांनी मुलांना आणि शिक्षकांना उपयागी होतील, अशी पुस्तके खरेदी केली.

शिक्षण विकास मंचचे तीन व्हॉटस ॲप समूह होते. या समूहांची संख्या आता पाच होऊन २०० नवीन सदस्यांची भर पडली आहे. केवळ शिक्षणावर दर्जेदार स्वरूपाच्या चर्चा करणारे अशा प्रकारचे समूह असण्याचे महाराष्ट्रात हे एकमेव उदाहरण आहे. या परिषदेत पुढील उपक्रम आयोजित करण्याचे ठरले :

शाळांच्या पातळीवर वाचन कट्टे आयोजित करणे. यासाठी मुलांनी वाचावी आणि मुलांना वाचून दाखववावी, अशा ललित आणि ललितेतर, विषयांवरील, मराठीप्रमाणेच इंग्रजी आणि हिंदी भाषांतील पुस्तकांची यादी तयार करण्यात येईल. वाचन कट्ट्यात पुस्तके वाचणे आणि वाचून दाखवणे, याबरोबरच वाचलेल्या पुस्तकांवर आधारित सर्जनशील लेखन, नाट्य रूपांतर, प्रयोग, वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा, प्रश्न मंजुषा, प्रयोग आणि विविध स्पर्धा असे उपक्रम आयोजित करण्यात यावेत. वाचन कट्टे आयोजित करणारे स्वयंसेवक आणि स्वयंसेवी यांच्यासाठी प्रशिक्षण आणि इतर मदत या दृष्टींनी शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान शक्य ती व्यवस्था करेल. शाळांच्या ग्रंथालयात विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यासाठी कोणती पुस्तके असावीत हे ठरवण्यासाठी मार्गदर्शक स्वरूपाची यादी तयार करण्यात येईल.

आपल्याकडे असलेली पुस्तके वाचून झाल्यानंतर ती पुन्हा पुन्हा वाचण्याची गरज नसेल तर त्यांचे घरात ग्रंथालय उभारण्याऐवजी एखाद्या शाळेला द्यावीत, यासाठी मोहीम घेण्यात यावी.

शिक्षक आणि मुले यांच्यासाठी विविध विषयांवरील डिजिटल साहित्याची यादी तयार करण्यात येईल.

मागणीनुसार 'शालेय शिक्षण आणि वाचनसंस्कृती' या विषयावर विभागवार परिषदा आयोजित करण्यात येतील. पुढील परिषद अमरावती येथे आयोजित करण्यात येईल. या परिषदांत त्या त्या विभागात काम करणारे शिक्षक, ग्रंथपाल, वाचन चळवळीतील कार्यकर्ते आणि स्वयंसेवी संस्था यांना सहभागी करून घेण्यात येईल.

**९.७ अपंग हक्क विकास मंच :-**

महाराष्ट्रातील अपंग व्यक्तींच्या विविध समस्या, संवाद व समन्वयाच्या भूमिकेतून सोडविण्यासाठी अपंग हक्क विकास मंचाची निर्मिती झाली. मंचाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे आहेत. मंचाचे संयोजक विजय कान्हेकर व दत्ता बाळसराफ तर समन्वयक सुहास तेंडूलकर, अभिजीत कान्हेकर व दत्ता बाळ सराफ तर समन्वयक सुहास तेंडूलकर, अभिजीत राऊत, विजय कसबे आणि या मंचाचे संघटक म्हणून सौ. सुकेशनी मर्चंडे-शेवडे हे काम पाहतात. या मंचामार्फत महाराष्ट्रातील अपंगासाठी विविध जिल्ह्यांत मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिरांचे आयोजन केले जाते. दिव्यांगांची पूर्वतपासणी करून त्यांना आवश्यक त्या कृत्रिम साधनांसाठी किंवा अवयवांसाठी त्याचे मोजमाप घेऊन मोफत साहित्य उपलब्ध करून दिले जाते. उदा जयपूर फूट, कॅलिपर, कुबडी, एल्बो क्रचेस, वॉकिंग स्टिक, वॉकर, सर्जिकल शुज, ट्रायसिकल, व्हीलचेर, सिल्पंट्स, कमोड चेअर, सी.पी.चेअर, एम. आर.कीट, ब्रेल कीट, अंधकाठी, अंध गॉगल, श्रवणयंत्र, बेल्ट्स, आदी साहित्याचे वितरण मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिरात करण्यात येते. सन २००९ पासून ते आजपर्यंत शासकीय योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील एकूण ६७,६३८ दिव्यांग व्यक्तिंना कृत्रिम अवयव व साहित्य साधनांचा थेट लाभ देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला गेला आहे. तसेच मंचाच्या वतीने अपंगांच्या विविध विषयांवर समस्यांवर नियमित चर्चा व कार्यशाळेचे आयोजन करून त्यांच्या समस्यांचे निरसन करण्यात येते. तसेच मार्गदर्शन व सल्ला दिला जातो.

७.१ **जिल्हा पुणे : वयोश्री योजने अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत कृत्रिम अवयव व साधन वाटप शिबिराचे आयोजन :-** सामाजिक न्याय एवं अधिकारिता मंत्रालय भारत सरकार भारतीय कृत्रिम अंग निर्माण (अल्मिको) कानपूर, जिल्हा परिषद पुणे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-अपंग हक्क विकास मंच आणि जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे जिल्ह्यातील ९ तालुक्यांमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी वयोश्री योजनेअंतर्गत ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधने वाटप शिबिराचे आयोजन मंगळवार दि. १२ फेब्रुवारी, २०१९ रोजी ग.दि. माडगूळकर सभागृह, विद्या प्रतिष्ठान, एम.आय.डी.सी., बारामती, पुणे येथे सकाळी १०.०० ते सायं. ६.०० पर्यंत करण्यात आले. यापूर्वी झालेल्या तपासणी व मोजमाप शिबिरात तपासणी करून एकूण १२००० ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या आवश्यकतेनुसार कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्यात आले.

७.२ **जिल्हा परभणी : मोफत कृत्रिम अवयव साधने वाटप करण्यासाठी नोंदणी व मोजमाप शिबिरांचे आयोजन :-** सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-अपंग हक्क विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ परभणी, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र परभणी आणि समाज कल्याण विभाग जिल्हा, परिषद, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने परभणी जिल्ह्यातील गरजू अपंगाना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्याकरिता दिनांक ७ एप्रिल, २०१८ रोजी सकाळी १०.०० ते सायं ५.०० पर्यंत जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, योगक्षेम कॉलनी, जिंतूर रोड, परभणी येथे दिव्यांगांची नांव नोंदणी व मोफत तपासणी करण्यात आली. सदर शिबिरामध्ये एकूण ७० दिव्यांगांना व्हिलचेअर, श्रवणयंत्र, कुबडीजोड, एम.आर.कीट इत्यादी करिता नाव नोंदणी तर जयपूर कीट, कॅलिपर, एफ.ओ.के.एफ.ओ. इत्यादींसारखे दिव्यांगाना आवश्यक कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांकरिता दिव्यांगाची मोफत तपासणी करण्यात आली.

७.३ **सिंधुदुर्ग जिल्हा : मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप करण्यासाठी नोंदणी व मोजमाप शिबिरांचे आयोजन :-** सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, आणि समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने सिंधुदुर्ग जिल्हयातील गरजू अपगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्याकरिता मंगळवार दिनांक २८ मे, २०१९ रोजी सकाळी ११.०० ते सायं ५.०० पर्यंत जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र सिंधुदुर्ग, जिल्हा रुग्णालय परिसर येथे दिव्यांगांची नाव नोंदणी व मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री यतिन अहिरे (वै.सा.का.), श्रीमती देवरुखकर, मा. श्री. बाळासाहेब पाटिल (अशासकीय सदस्य जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र) संस्थेचे कर्मचारी मान्यवर उपस्थित होते. सदर शिबिरामध्ये एकूण ७८ दिव्यांगांची नाव नोंदणी करून ५६ पात्र दिव्यांग लाभार्थ्यांचे मोजमाप घेण्यात आले.

७.४ **जिल्हा रायगड मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप करण्यासाठी नोंदणी व मोजमाप शिबिरांचे आयोजन :-** सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-अपंग हक्क विकास मंच. महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, रायगडच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यातील गरजी अडंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्याकरिता बुधवार दिनांक २९मे, २०१९ रोजी सकाळी ११.०० ते सायं. ५.०० पर्यंत नवीन पनवेल, रायगड येथे दिव्यांगांची नांव नोंदणी व मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. किशोर वेखंडे (वै.सा.का.) कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते. सदर शिबिरामध्ये एकूण ५३ दिव्यांगांची नाव नोंदणी करून ३० पात्र दिव्यांग लाभार्थ्यांचे मोजमाप घेण्यात आले.

७.५ **बदलापूर (जिल्हा ठाणे): मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप करण्यासाठी नोंदणी व मोजमाप शिबिराचे आयोजन :-** सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने पालघर जिल्हयातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरीता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे वाटत करण्याकरीता शनिवार दिनांक १ जून, २०१९ रोजी सकाळी ११.०० ते सायं. ५.०० पर्यंत श्रीराम मंदिर मंगल कार्यालय, बोईसर जिल्हा पालघर येथे दिव्यांगांची नांव नोंदणी व मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री देवीदास राठोड, मा. श्री. संजय भानुशाली, श्री विलास बोने, श्री किशोर पाटील व संस्थेचे कर्मचारे आदी मान्यवर उपस्थित होते. सदर शिबिरामध्ये एकूण १३२ दिव्यांगांची नाव नोंदणी करुन ८९ पात्र दिव्यांग लाभार्थ्यांचे मोजमाप घेण्यात आले.

७.६ **जिल्हा नाशिक : मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप करण्यासाठी नोंदणी व मोजमाप शिबिराचे आयोजन :-** सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान-मुंबई-अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधीसेवा संघ, परभणी, आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक जिल्ह्यातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता सोमवार दिनांक ३ जून, २०१९ रोजी सकाळी ११.०० ते सायं.५.०० पर्यंत कुसुमाग्रज सभागृह, गंगापूर रोड, नाशिक येथे दिव्यांगांची नांव नोंदणी व मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय केंद्राचे कार्याध्यक्ष मा. श्री. सचिन हांडे, श्री ज्ञानेश्वर शिरसाट व संस्थेचे कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते. सदर शिबिरामध्ये

एकूण १९३ दिव्यांगांची नाव नोंदणी करून १६२ पात्र दिव्यांग लाभार्थ्यांचे मोजमाप घेण्यात आले.

७.७ **बदलापूर (जिल्हा ठाणे) : मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन :-** सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, ठाणेच्या संयुक्त विद्यमाने ठाणे जिल्ह्यातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्याकरिता रविवार दिनांक ३० जून रोजी सकाळी ११.०० ते सायं.५.०० पर्यंत यशस्विनी भवन, बदलापूर, जिल्हा ठाणे येथे दिव्यांगांची नांव नोंदणी व मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. पार्थ पवार, (नगरसेवक)मा. कॅप्टन आशिष दामले, मा. श्री विठ्ठल मोरे, मा. श्री विजय कान्हेकर, श्री सूरज शिंदे व संस्थेचे कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते. सदर शिबिरामध्ये ४४ पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले.

७.८ **जिल्हा नाशिक : मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन :-** सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक जिल्ह्यातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्याकरिता गुरुवार दिनांक १८ जुलै, २०१९ रोजी सकाळी ११.०० ते सायं. ५.०० पर्यंत कुसुमाग्रज सभागृह, गंगापूर रोड, नाशिक येथे दिव्यांगांची नांव नोंदणी व मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय केंद्राचे कार्याध्यक्ष मा. श्री. विश्वास ठाकूर, वैसाका मा. श्री. पाटील साहेब. श्री राजू देसले, श्री सचिन हांडे, श्री ज्ञानेश्वर शिरसाट व संस्थेचे कर्मचारी आदी मान्यवर उपिस्थत होते. सदर शिबिरामध्ये एकूण १९३ दिव्यांगांची नाव नोंदणी करून १६२ पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले.

७.९ **जिल्हा अमरावती : मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन :-** सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती जिल्ह्यातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्याकरिता मंगळवार दिनांक ६ ऑगस्ट, २०१९ रोजी सकाळी ११.०० ते सायं. ५.०० पर्यंत कुरळपुर्णा, ता. चांदुरबाजार, जिल्हा अमरावती, येथे मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विधायक मा. श्री. बचू कडू, मा. श्री नितीन तायडे (उपआयुक्त, आदिवासी विकास विभाग, अमरावती) श्री उमेश खोडके (तहसीलदार-चांदूरबाजार) श्री. निर्भय जैन (तहसीलदार-अचलपूर) श्री. वसु महाराज व संस्थेचे कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते. सदर शिबिरामध्ये नाव नोंदणी करुन ७७ पात्र दिव्यांगांना त्यांच्या आवश्यकतेनुसार जयपूर फ्रुट, कॅलीपर, व्हिलचेअर, हिअरींग एड, गॉगल स्टीक, ब्रेल कीट, एम. आर कीट, कुबडी जोड, निकेज, स्प्लींट, वॉकर, इ. साहित्याचे वाटप करण्यात आले.

७.१० **पुणे : मोफत डिजिटल श्रवणयंत्र वाटप करण्यासाठी नाव नोंदणी व कर्णसाच्याची तालुकानिहाय मोजमाप शिबिरे :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपॅग हक्क विकास मंच, स्टार्की फाउंडेशन अमेरिका, ठाकरसी ग्रुप मुंबई, विद्या प्रतिष्ठान बारामती आणि महात्मा गांधी सेवा संघ, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र पुणे, यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे जिल्ह्यातील विविध तालुक्यांत ग्रामीण व शहरी विभागातील कर्णबधिर मुलांना व ज्येष्ठ नागरिकांना मोफत वैद्यकीय तपासणी करुन नाव नोंदणी व कर्णसाच्या मोजमाप शिबिराचे आयोजन तालुका निहाय करण्यात आले होते.

शिबिराचे तालुक्यातील वेळापत्रक पुढील तक्त्यात दिले आहे :

| अ.क्र. | दिनांक | तालुका | आयोजनाचे ठिकाण | एकूण लाभार्थ्यांची नोंद |
|---|---|---|---|---|
| १. | ०६.०८.२०१९ | भोर | उपजिल्हा रुग्णालय, भोर | १०७ |
| २. | ०७.०८.२०१९ | वेल्हे | प्राथमिक आरोग्य केंद्र, वेल्हे | १४७ |
| ३. | ०८.०८.२०१९ | मुळशी | सेनापती बापट सभागृह, पौड | १४७ |
| ४. | ०९.०८.२०१९ | सासवड | ग्रामीण रुग्णालय, जेजुरी | १२२ |
| ५. | १०.०८.२०१९ | दौंड | प्राथमिक विद्यालय यवत, दौंड | १६ |
| ६. | ११.०८.२०१९ | बारामती | राष्ट्रवादी भवन, बारामती | ७७ |
| ७. | १२.०८.२०१९ | बारामती | राष्ट्रवादी भवन, बारामती | १५९ |
| ८. | १३.०८.२०१९ | इंदापूर | कर्णबधिर विद्यालय, इंदापूर | १९२ |
| ९. | १४.०८.२०१९ | खडकवासला, पुणे | निसर्ग मंगल कार्यालय, पुणे | १६४ |
| १०. | १६.०८.२०१९ | खडकवासला, पुणे | निसर्ग मंगल कार्यालय, पुणे | १२० |
| ११. | १७.०८.२०२० | कर्जत, जामखेड | | २९० |
| १२. | १२.०८.२०१९ | कर्जत, जामखेड | | २३२ |
| | | | एकूण लाभार्थी | १,८८० |

पुणे : दिनांक २४ ऑगस्ट व २५ ऑगस्ट, २०१९ रोजी : मोफत डिजिटल श्रवणयंत्र वाटप शिबिरे तालुका निहाय संपन्न झाली.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-अपंग हक्क विकास मंच, स्टार्की फाउंडेशन अमेरिका, ठाकरसी गुप मुंबई-अपंग हक्क विकास मंच, स्टार्की फाउंडेशन अमेरिका, ठाकरसी ग्रुप मुंबई, विद्या प्रतिष्ठान आणि महात्मा गांधी सेवा संघ, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र पुणे, यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे जिल्ह्यातील विविध ग्रामीण शहरी विभागातील कर्णबधिर मुलांना व ज्येष्ठ नागरिकांना मोफत वैद्यकीय तपासणी करून नाव नोंदणी व कर्णसाच्या मोजमाप शिबिराचे आयोजन तालुका निहाय करण्यात आले आहे.

त्याचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे :

| अ.क्र. | दिनांक | ठिकाण | एकूण लाभार्थी | यावेळी उपस्थित प्रमुख पाहुणे |
|---|---|---|---|---|
| १. | २४ व २५ आगस्ट २०१९ | ग.दि.माडगुळकर सभागृह, बारामती | ८४० | मा.श्री. शरद पवार |
| २. | २६ ऑगस्ट २०१९ | निसर्ग मंगल कार्यालय, पुणे | ५८ | मा.खा.सुप्रिया सुळे |
| ३. | २८ व २९ ऑगस्ट,२०१९ | श्रीराम मंगल कार्यालय कर्जत, जिल्हा अहमदनगर | | मा.सौ.सुनंदा वहिनी पवार |

७.११ **जिल्हा सांगली : मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन :-** सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा

संघ, परभणी, आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने सांगली जिल्ह्यातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी त्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्याकरिता रविवार ८सप्टेंबर, २०१९ रोजी सकाळी ११.०० ते सायं. ५.०० पर्यंत जयंत दारिद्र्य निर्मूलन अभियान, ता. इस्लामपूर, जि. सांगली, येथे मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विधायक मा. श्री. जयंतराव पाटील, विधायक मा. श्री. मानसिंग नाईक, श्री. शामराव पाटील. श्री. विनायक पाटील, श्री. बाळासाहेब पाटील, श्री. संजय पाटील, श्री. दादासाहेब पाटील, श्री. प्रतिक जयंतराव पाटील, श्री. राजवर्धन जयंतराव पाटील, श्रीमती सुश्मिता जाधव, श्री. विजय पाटील, श्री. इलियाज पिरजादे वासंस्थेचे कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते. सदर शिबीरामध्ये नाव नोंदणी करून १२१ पात्र दिव्यांगांना त्यांच्या आवश्यकतेनुसार जयपूर फुट, कॅलीपर, व्हीलचेअर, हिअरिंग एड, गॉगल, स्टीक, ब्रेल कीट, एम.आर.कीट, कुबडी जोड, निकेज, स्प्लींट, वॉकर इ, साहित्याचे वाटप करण्यात आले.

७.१२ **जिल्हा कोल्हापूर : मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन**:- सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कोल्हापूर जिल्ह्यातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी त्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्याकरिता सोमवार दिनांक ९ सप्टेंबर, २०१९रोजी सकाळी ११.०० ते सायं. ५.०० पर्यंत प्रशासकीय इमारत कसबा-बावडा रोड, जि. कोल्हापूर येथे मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्री. दिपक घाटे, श्री. बागडे सर, श्रीमती स्वाती गोखले व संस्थेचे कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते. सदर शिबिरामध्ये नाव नोंदणी करून ३१ पात्र दिव्यांगांना त्यांच्या आवश्यकतेनुसार जयपूर फुट, कॅलीपर, व्हीलचेअर, हिअरींग एड, गॉगल, स्टीक, ब्रेल कीट, एम.आर.कीट, कुबडी जोड, निकेज, वॉकर, इ.साहित्याचे वाटप करण्यात आले.

७.१३ **जिल्हा सिंधुदुर्ग : मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयेजन**:- सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी त्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्याकरिता मंगळवार दिनांक १० सप्टेंबर, २०१९ रोजी सकाळी ११.०० ते सायं. ५.००पर्यंत जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, शासकीय रुग्णालय ओरस, जि. सिंधुदुर्ग येथे मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता श्री. यतिन अहिरे व संस्थेचे कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते. सदर शिबिरामध्ये नाव नोंदणी करून ५६ पात्र दिव्यांगांना त्यांच्या आवश्यकतेनुसार जयपूर फुट, कॅलीपर, व्हीलचेअर, हिअरींग एड, गॉगल, स्टीक, ब्रेल कीट, एम.आर.कीट, कुबडी जोड. निकेज, वॉकर, इ. साहित्याचे वाटप करण्यात आले.

७.१४ **चिपळूण (जिल्हा रत्नागिरी) : मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन**:- सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने रत्नागिरी जिल्ह्यातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी त्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्याकरिता बुधवार दिनांक ११सप्टेंबर, २०१९रोजी सकाळी ११.०० ते सायं. ५.०० पर्यंत माध्यमिक महिला विद्यालय, पाग, झरीरोड, पोलीस स्टेशनच्या मागे, ता. चिपळूण, जिल्हा रत्नागिरी येथे मोफत कृत्रिम

अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सभापती सौ. पूजा निकम, श्री. सुचय रेड्डी (अध्यक्ष नवकोकण एज्युकेशन), श्री. नितीन ठसाळे, श्री. माळी सर, श्री. अभिजीत खानविलकर, श्री. सुवर्णा जोशी व संस्थेचे कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते. सदर शिबिरामध्ये नाव नोंदणी करून २०१ पात्र दिव्यांगांना त्यांच्या आवश्यकतेनुसार जयपूर फुट, कॅलीपर, व्हीलचेअर, हिअरींग एड, गॉगल, स्टीक, ब्रेल कीट, एम.आर.कीट, कुबडी जोड, निकेज, वॉकर, इ.साहित्याचे वाटप करण्यात आले.

७.१५ **जिल्हा रायगड : मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन :-** सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, आणि समाज कल्याणं विभाग, जिल्हा परिषद रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी त्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्याकरिता शुक्रवार दिनांक १३ सप्टेंबर, २०१९रोजी सकाळी ११.०० ते सायं. ५.०० पर्यंत जिल्हा परिषद दिव्यांग विभाग, अलिबाग, जिल्हा रायगड, येथे मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता श्री. किशोर बेखंडे, श्री. साईनाथ पवार, लाभार्थ्यांचे पालक व संस्थेचे कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते. सदर शिबिरामध्ये नाव नोंदणी करून २०१ पात्र दिव्यांगांना त्यांच्या आवश्यकतेनुसार जयपूर फुट, कॅलीपर, व्हीलचेअर, हिअरींग एड, गॉगल, स्टीक, ब्रेल कीट, एम.आर.कीट, कुबडी जोड, निकेज, वॉकर, इ.साहित्याचे वाटप करण्यात आले.

७.१६ **अंध प्रवर्गासाठी चर्चासत्र :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-अपंग हक्क विकास मंच आणि ब्लाइंड ग्रॅज्युएट फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या दोन वर्षापासून दर महिन्याच्या चौथ्या शनिवारी अंध प्रवर्गासाठी चर्चा सत्राचा उपक्रम नियमित राबविला जातो. या सत्रात अंधांना विविध क्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञांना बोलावून त्यांच्या संबंधित विषयावर मार्गदर्शनपर चर्चा केली जाते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शिक्षणातील झालेले बदल, नोकरीत, सामान्य जीवनात येणारे अडथळे अशा विषयांवर चर्चा केली जाते. त्यामुळे या प्रवर्गातील अपंगांना त्यांचे आयुष्य कसं सोप्या पद्धतीने जगता येऊ शकते याबद्दल विशेष मार्गदर्शन मिळते आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यात मदतही होते. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अपंग हक्क विकास मंचाच्या संघटक सौ. सुकेशनी मर्चंडे-शेवडे विशेष परिश्रम घेतात.

## ९.८ वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान :-

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि सृष्टीज्ञान संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान बदल विषयक शैक्षणिक आणि कृती प्रकल्प मुंबईतील शाळांमध्ये राबवला जात आहे. या प्रकल्पाकरिता स्वीडनमधील क्लायमेट ॲक्शन आणि फ्यूचर अर्थ या संस्थांचेही सहकार्य लाभले आहे. हवामान बदल या समस्येला सामोरे जाण्यासाठी स्थानिक पातळीवरील पर्यावरणीय उपाययोजना करण्याकरिता विद्यार्थी, शिक्षक आणि शाळांची तयारी करून घेणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. मार्च ते ऑक्टोबर या कालावधीमध्ये प्रकल्पात मुख्यत: विद्यार्थ्यांचे हवामान अध्ययन केंद्र, जलसंवर्धन, हवामान पूरक सकस आहार विषयक विविध कृतिशील उपक्रम वर्षभर राबविण्यात आले.

मार्च महिन्यामध्ये शाळांमधील विद्यार्थ्यांबरोबर हवामान अध्ययन करण्यासाठी दिल्या गेलेल्या तापमापक, आर्द्रतामापक, हवादाब मापक आणि पर्जन्यमापक या उपकरणांबद्दल माहिती दिली गेली आणि विद्यार्थ्यांनी त्यानुसार हवामानाच्या नोंदी ठेवण्यास सुरूवात केली. २६ मार्च हा जागतिक हवामान दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने प्रकल्पात सहभागी विद्यार्थ्यांची कुलाबा येथील हवामान विभागाच्या वेधशाळेला भेट आयोजित करण्यात आली होती. तेथे विद्यार्थ्यांना शास्त्रीय दृष्ट्या हवामान मापन कसे करावे, उपकरणे कशी हाताळावीत, नोंदी कधी व कशा पद्धतीने घ्याव्यात

याबाबत मार्गदर्शन मिळाले.

जून महिन्यात शाळा सुरू होताच प्रथम नवीन शैक्षणिक सत्रातील उपक्रमांचे नियोजन करण्यासाठी प्रकल्पात सहभागी शिक्षकांची कार्यशाळा कार्यान्वित करण्यात आली होती. यात हवामान विभागीय केंद्राच्या शास्त्रज्ञ श्रीम. शुभांगी भुते यांनी मान्सून बद्दल माहिती दिली. त्याचप्रमाणे पुढील महिन्यांमध्ये घ्यावयाच्या उपक्रमांचे नियोजन करण्यात आले. जलसंवर्धनासाठी नळ-दुरूस्ती शिकणे हा महत्त्वाचा उपक्रम कसा राबविता येईल याबाबत चर्चा करण्यात आली.

शहरी भागामध्ये गळक्या नळांद्वारे दररोज हजारो लीटर पाणी वाया जात असते. म्हणूनच या गळक्या नळांची दुरूस्ती करणे म्हणजेच वाया जाणारे पाणी वाचवणे होय. त्यानुसार जुलै महिन्यात नवीन पनवेल येथील प्रथम प्लंबिंग सेंटर येथे शिक्षक आणि विद्यार्थी प्रतिनिधींची क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली. तेथे विद्यार्थ्यांना प्लंबिंगची विविध उपकरणे हाताळावयास मिळाली तसेच नळ दुरूस्ती कशी करावी हे ही शिकवण्यात आले. यानंतर प्रत्येक शाळेमध्ये नळ-दुरूस्तीची कार्यशाळा घेतली गेली. आता प्रत्येक शाळेमध्ये दहा विद्यार्थ्यांची वॉटर ब्रिगेड तयार करण्यात आली आहे आणि हा विद्यार्थ्यांचा गट शाळेतील, आजूबाजूच्या परिसरातील गळके नळ दुरूस्त करेल.

त्याचप्रमाणे हवामान बदलाचे संकट रोखण्यामध्ये जनसमूहाचा सहभाग मिळवण्याच्या दृष्टिकोनातून एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्रात टेरी संस्थेच्या पश्चिम विभागाच्या सहायक संचालक डॉ. अंजली पारसनीस, बर्डलाईफ इंटरनॅशनल या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या आशियाई विभागाचे प्रमुख श्री. प्रशांत महाजन, सोमैया महाविद्यालयाचे श्री. पार्थ बापट, स्त्री मुक्ती संघटनेच्या श्रीम. ज्योती म्हापसेकर, श्रीम. रश्मी जोशी, श्री. अविनाश कुबल, श्री. भगवान केसभाट, श्रीम. श्रेया भानप आणि गौरी गुरव असे पर्यावरणाच्या क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित झाले होते. श्री. दत्ता बाळसराफ यांनी प्रतिष्ठानच्या वतीने २०२० मध्ये पुढील हवामान विषयक परिषद होईल अशी घोषणा केली आणि त्यावेळी सर्व कार्यकर्ते, अभ्यासक, शासकीय प्रतिनिधी यांनी पुन्हा एकत्र येऊन 'हवामान बदल' या समस्येवर काम करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. या वर्षी शालेय विद्यार्थी आणि महाविद्यालयीन युवकांमध्ये हवामान बदल विषयक जाणीव-जागृती करण्यासाठी महाराष्ट्रातील ५० शाळा व आणि ५० महाविद्यालयांमध्ये कृतीशील उपक्रम राबविले जावेत असा मनोदय व्यक्त केला. त्यासाठी उपस्थिताकडून कोणते उपक्रम घ्यावेत आणि त्यात त्यांचा काय सहभाग राहील याची चर्चा केली आणि सर्व उपस्थितांनी त्यासाठी सहमती दर्शवली.

दि. ३ ऑक्टोबर रोजी हवामान बदल या विषयावर श्री. अतुल देऊळगावकर यांचे व्याख्यान आयोजित केले होते. हवामान बदल रोखण्यासाठी जागतिक पातळीवरील ग्रेटा थुनबर्ग हिने हवामान बदल रोखण्यात जगाला येणाऱ्या अपयशाविरूद्ध उठवलेला आवाज आणि मुंबईच्या आरे कॉलनीतील वृक्षतोडीबद्दल मुंबईतील पर्यावरणप्रेमींनी उठवलेला आवाज यासारख्या चळवळींचे महत्त्व आहे. एक समाज म्हणून वैयक्तिक, कुटुंबाचे, गावाचे, शहराचे, राज्याचे, देशाचे आणि जगाचे कर्ब उत्सर्जन कमी करणे हे उद्दिष्ट आपण बागळणे आवश्यक आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. या व्याख्यानाला मुंबईतील विविध संस्थांचे प्रतिनिधी, शाळांचे विद्यार्थी, शिक्षक हे मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी श्री. अतुल देऊळगावकर यांना अनेक शंका, प्रश्न विचारले आणि त्यांनीही सर्व विद्यार्थ्यांचे पूर्ण समाधान केले. हवामान बदल या समस्येबाबत एक जागतिक भान या व्याख्यानाने दिले ही जमेची बाजू!

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई आणि सृष्टीज्ञान संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने 'हवामानबदल विषयक शैक्षणिक आणि कृती प्रकल्प' मुंबईतील शाळांमध्ये राबवला जात आहे. या प्रकल्पाकरिता स्वीडनमधील 'क्लायमेट ॲक्शन' आणि 'फ्युचर अर्थ' या संस्थांचेही सहकार्य लाभले आहे. हवामान बदल या समस्येला सामोरे जाण्यासाठी स्थानिक पातळीवरील पर्यावरणीय उपाययोजना करण्याकरिता विद्यार्थी, शिक्षक आणि शाळांची तयारी करून घेणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश

आहे. डिसेंबर ते फेब्रुवारी या कालावधीमध्ये प्रकल्पात मुख्यत: सौर ऊर्जा संवर्धन, कचरा व्यवस्थापन, पौष्टिक रूजवण आणि हवामान पूरक सकस आहार विषयक विविध कृतीशील उपक्रम राबविण्यात आले.

डिसेंबर महिन्यामध्ये पुनर्नवीकरण उर्जेचा स्त्रोत म्हणून सौर उर्जेची माहिती विद्यार्थ्यांना दिली. सौर उर्जेचा दैनंदिन जीवनात कसा वापर करता येईल हे समजून घेण्यासाठी सोलार मोबाईल चार्जर बनवण्याच्या कार्यशाळा प्रकल्पात सहभागी शाळांमध्ये घेण्यात आल्या. हरीशचंद्र निशाद आणि तन्मय मांजरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सोलार चार्जर बनवले आणि वापरायलाही सुरूवात केली. भौतिक शास्त्रातील अवघड सर्किट अतिशय सोप्या पद्धतीने या कार्यशाळांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष बनवले व हाताळलेही.

जानेवारी महिन्यामध्ये कचरा व्यवस्थापनअंतर्गत घन कचऱ्याचे वर्गीकरण कसे करावे आणि सेंद्रिय कचऱ्यापासून खत कसे तयार करावे याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांबरोबर घेण्यात आले. शाळांमध्ये सच्छिद्र ड्रम्समध्ये ओला कचरा, सुका पालापाचोळा आणि शेणखत वापरून खत तयार करण्यात येत आहे. या खताचा वापर शाळांमध्ये असलेल्या झाडांच्या कुंड्यांमध्ये करण्यात येईल. त्याचप्रमाणे घरी ओल्या कचऱ्यापासून कुंड्या भरून त्यात पौष्टिक रूजवण कसे घालावे याचेही प्रात्यक्षिक घेण्यात आले. रूजून आलेल्या पौष्टिक पानांचा रोजच्या आहारात कसा वापर करावा हेही सांगण्यात आले.

## १०. यशवंतराव चव्हाण मुंबईची विभागीय केंद्र

## १०.१ विभागीय केंद्र, पुणे

१.१ **२५० सभासदापर्यंतच्या गृहनिर्माण संस्थांच्या निवडणुका:-** कृषी व सहकार व्यासपीठाचे चर्चासत्रांत विचारविनिमय करुन शासनास दिनांक १९.०४.२०१९ रोजीच्या पत्राने निवडणूक करुन शासनास दिनांक १९.०४.२०१९ रोजीच्या पत्राने निवडणूक नियमातील 'डी' टाईप संस्थासाठीचे नियम २५० सभासदांपर्यंतच्या गृहनिर्माण, त्याचप्रमाणे अन्य म्हणजे जंगल कामगार, मजूर सहकारी, औद्योगिक सहकारी, अशा प्रकारच्या आर्थिकदृष्टया कमकुवत सहकारी संस्थांसाठी लागू करण्याची शिफारस शासनास केली आहे. त्याचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

१.२ **सहकारी तत्त्वांचा महाराष्ट्र सहकार कायद्यात समावेश**:- मा. सचिव, सहकार यांना येत्या दिनांक १७.०६.२०१९ पासून सुरु होणाऱ्या अधिवेशनात अन्य सहकार कायद्यांतील दुरुस्त्यांसोबत सहकारी तत्वांचा अंतर्भाव केंद्रशासनाच्या सहकारी संस्था कायद्याच्या धर्तीवर परिशिष्ट १ म्हणून करण्यात यावा असा प्रस्ताव दिनांक १५.०४.२०१९ चे पत्राने मा. अंकुश काकडे यांचे सहीने सादर केला आहे.

१.३ **नोंदणीकृत गृहनिर्माण संस्था स्वयंविकासाला चालना:-** शासनाने वरील विषयाला चालना देण्यासाठी म्हणून महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१९/ प्र.क्र.१०/दु.व.प. - १, दिनांक ०८.०३.२०१९ ने, मा. अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली व मा. अपर मुखख सचिव (महसूल), मा. प्रधान सचिव (नगर विकास - १ व २) मा. प्रधान सचिव (सहकार) व दोन तज्ज्ञ यांची उचाधिकारी समिती नेमून आपल्या शिफारशी शासनास ३ महिन्यात सादर करण्यास सुचविले होते. दिनांक ०३.०५.२०१९ रोजी कृषी व सहकार व्यासपीठाच्या सभेत त्याबाबत चर्चा करुन गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या स्वयंपुनर्विकासाला चालना मिळण्याप्रमाणेच, महाराष्ट्र अपार्टमेंट औनरशिप ॲक्टखाली कंडोमिनियम ऑफ अपार्टमेंटस नोंदविण्याची सोय असल्याने गृहनिर्माण संस्थाप्रमाणेच अपार्टमेंटनाही अशाच सवलती देण्याचा विचार व्हावा, याबाबतचा प्रस्ताव सादर केला

आहे. (पत्र क्र. यचप्र/कृ.व.स. दिनांक ०८.०५.२०१९) त्याप्रमाणे सदर विषयावर शासकीय समितीलाही (सर्व सभासदांना) दिनांक १५.०५.२०१९ रोजीच्या पत्राने द्यावयाच्या सवलतींबाबत सविस्तर शिफारशी केल्या आहेत.

१.४ **टेस्ट ऑडीटला (वैधानिक) बंदी :-** मा. सहकार आयुत्त यांनी सर्व सहकारी संस्थापैकी २०% संस्थाचे टेस्ट ऑडीट करण्याबाबतच्या सूचना दिनांक २५ ऑक्टोबर २०१७ रोजी पारित केल्या होत्या. त्या मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने निष्प्रभावित केल्यामुळे त्यासाठी असलेल्या लेखापरीक्षण सेवक वर्गाचा योग्य उपयोग होण्यासाठी महाराष्ट्र अपार्टमेंट ओनरशिप ॲक्टखाली नोंदलेल्या अपार्टमेंटवर मा. निबंधक, सहकारी संस्था हे अशा अपार्टमेंटवर कायद्याचा अंमल चालविण्यासाठी सक्षम अधिकारी म्हणून आहेत. सध्या सहकार खात्यामार्फत पुरेशा सेवकांच्या अभावामुळे या संस्थांवर काहीच नियंत्रण नसल्याने मुंबई हायकोर्टाच्या खंडपीठाच्या आदेशाने मोकळा झालेला लेखापरीक्षण सेवक वर्ग या कामासाठी वापरण्यात यावा, असा प्रस्ताव दिनांक २७.०५.२०१९ रोजीच्या पत्राने मा. सहकार आयुक्तांना सादर केला आहे.

१.५ **विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा :-** व्यासपीठातर्फे प्रामुख्याने ग्रामीण तसेच शहरी विद्यार्थ्यांचे, सामान्यज्ञानामध्ये भर पडावी व त्यांना आपल्या शैक्षणिक कारकीर्दीनंतर, बाहेरील जगातील तीव्र स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी आणि प्रामुख्याने, त्यांचेवर शालेय जीवनामध्ये चांगले संस्कार होण्याचे उद्देशाने दरवर्षी, एखाद्या थोर पुरुषाचे गोष्टीरुप चरित्र, डॉ. दिलीप गरुड या निवृत्त मुख्याध्यापक तसेच कोषाध्यक्ष अ. भा. बालकुमार साहित्य संमेलन यांचेतर्फे लिहून घेतले जाते. पुस्तकांच्या प्रत्येकी ५ प्रती प्रतिष्ठानतर्फे प्रत्येक शाळेतील ८ वी व ९ वीतील विद्यार्थ्यांमध्ये सर्क्युलेशन करुन वाचनासाठी उपलब्ध करण्यात येतात. त्यावर आधारित इयत्ता ८ वी व ९ वीच्या प्रश्नमंजुषा व निबंध स्पर्धा घेण्यात येतात. यंदा या स्पर्धांसाठी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन या जागतिक कीर्तीचे तत्त्वज्ञ व माजी राष्ट्रपती यांचे ८० पानी चरित्र लिहून घेऊन त्याच्या प्रती किंमत प्रत्येकी रु. ७०/- (घाऊक सवलत मूल्य रु. पंचवीस प्रमाणे खरेदी) करुन शंभर एक शाळांना त्याच्या प्रती वाटण्यात आल्या.

त्याशिवाय शाळांना या स्पर्धांमध्ये भाग घेण्यास उधुक्त करण्यासाठी भिडे परिवार (मंगेशी) यांचेतर्फे शैक्षणिक वर्षाचे सुरुवातीसच ११२ निवडक शाळांना शिक्षकांसाठी शाळेला प्रत्येकी एक याप्रमाणे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचे वर उल्लेखलेल्या चरित्राची प्रत्येकी एक प्रत सविस्तर सूचनासह शिक्षकांनी निबंध स्पर्धेत भाग घ्यावा यासाठी, व त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना स्पर्धेत भाग घेण्यास उद्युक्त करण्यासाठी पाठविण्यात आल्या. शिवाय सर्व विभागीय केंद्रांनाही याच धर्तीवर कार्यक्रम घेण्यासाठी त्या पुस्तकाच्या प्रती पाठविण्यात आल्या.

१.६ **शहरी विभाग :-** त्यानंतर याचा पाठपुरावा वेळोवेळी करण्यात आला. त्यास अनुसरुन शहरी भागांतील १ हजार २९७ विद्यार्थ्यांनी प्रश्नमंजूषा स्पर्धेत सहभाग घेतला. त्यातून १११ विद्यार्थ्यांना निवंध स्पर्धेत सहभागासाठी निवडले. शहरी भागातील विद्यार्थ्यांना प्रश्नमंजूषा बक्षीसे न वाटता एक दिवसाच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले व त्यांच्या त्याच विषयावर निवंध स्पर्धा घेतल्या. त्यामधून प्रत्येक इयत्तेसाठी अनुक्रमे प्रथम रु. ५००/-, द्वितीय रु. ४००/- व तृतीय रु. ३००/- व उत्तेजनार्थ रु. २००/- ची प्रत्येकी सात अशा एकूण १० बक्षीसे वाटण्यात आली. त्यांतील पहिले तीन विजेते खालीलप्रमाणे :

**निबंध स्पर्धा विद्यार्थी**

**इयत्ता ८ वी**

१. प्रथम : रु.५००/- तोंडारे सु.मो. अभिनव विद्यालय हायस्कूल,

२. द्वितीय : रु. ४००/- पाटील सिध्दी दत्तात्रेय, नूतन माध्यमिक विद्यालय सांगवी

३. तृतीय : रु. ३००/- घोलप प्राची प्रदीप, वामनराव ओतूरकर मा. विद्यालय पुणे

**इयत्ता ९ वी**

१. प्रथम : मुलाणी मुस्कान मियॉसाहेब यासीन इमानदार मा. विद्यालय पुणे

२. द्वितीय : गुहागरकर ऐश्वर्या विकास श्री. भेकराईमाता मा. विद्यालय

३. तृतीय : पाटील भाग्यश्री युवराज अभिनव विद्यालय हायस्कूल पुणे ४

१.७ **प्रश्नमंजूषा स्पर्धा ग्रामीण :-** पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासंबंधी श्री. अंकुशराव काकडे यांच्या श्री. कदम सचिव पुणे जिल्हा शिक्षण मंडळ यांच्याशी झालेल्या पत्रव्यवहाराचे अनुषंगाने प्रतिष्ठानचे सर्वश्री भिडे, डॉ.गरुड व शिक्षण मंडळाच्या सर्व ५५ शाळांमध्ये स्पर्धा घेण्याचे ठरले. त्याप्रमाणे एकूण ५५ शाळांमधून आठवीचे १५११ विद्यार्थी व ९वीच्या १४५७ अशा एकूण २९६९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यांना प्रतिष्ठानतर्फे दिलेल्या प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका तसेच सदर उत्तरपत्रिकांची शाळेमार्फत तपासणी यासाठी प्रतिष्ठानला रु. ११,८७२/- एवढा खर्च आला.

आलेल्या उत्तर पत्रिकांमधून ८ वीचे ४५ शाळांचे प्रत्येक एक याप्रमाणे गुणानुक्रमे ४५ विद्यार्थी निवडण्यात आले. त्यांच्या पेपरांची छाननी करुन ८ वीच्या १० विद्यार्थ्यांना बक्षीसे अनुक्रमे रु. ५००/-, रु.४००/-, रु.३००/- व रु. २००/- ची सात बक्षीसे वाटण्यात आली. त्यातील पहिले तीन क्रमांक खालीलप्रमाणे

१. प्रथम : फड प्राची नामदेव. भैरवनाथ माध्यमिक विद्यालय, करंडे

२. द्वितीय : तायडे संघमित्रा सुंदर. म्हाळसाकांत विद्यालय आकुर्डे

३. तृतीय : दुर्गे साक्षी हनुमंत. न्यू इंग्लिश स्कूल कोळवाण

१.८ **निबंध स्पर्धा ग्रामीण :-** त्याचप्रमाणे सदर ४५ शाळांमधून तपासून आलेले निबंध इयत्ता ८वी विद्यार्थी २२५ व इयत्ता ९ वी विद्यार्थी २३० यामधून प्रत्येक शाळेचा ८वी चा गुणानुक्रमे प्रथम तसेच प्रत्येक शाळेचे ९वीचा गुणानुक्रमे प्रथम यांचे निबंध पुणे येथील डॉ. वसंतदादा पाटील विद्यानिकेतनच्या निवृत्त शिक्षिका सौ. शाळीग्राम यांचेकडून तपासून घेतले आणि त्या निबंध स्पर्धेच्या एकूण ४५५ विद्यार्थ्यांमधून एकूण १० बक्षीसे वाटली ती अनुक्रमे रु. ५००/-, रु.४००/-, रु.३००/- व उत्तेजनार्थ रु. २००/-

१. प्रथम : जाधव आविष्कार जिजाभाऊ. संभाजी विद्याालय, बोरी

२. द्वितीय : भोर किरण अविनाश विघ्नहर विद्यालय, ओझर

३. तृतीय : जावळकर वैष्णवी श्रीकांत महात्मा गांधी विद्यालय, खानापूर

१.९ **रिअल इस्टेट रेग्यूलेशन ॲण्ड डेव्हलपमेंट ॲक्ट २०१६ व दस्त नोंदणी कार्यवाहीबाबत :-** वरील विषयावर सहकारी गृह निर्माण संस्थांचे नोंदणीबाबत प्रतिष्ठान व पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था महासंघ म. यांचेवतीने कृषी व सहकार व्यासपीठाची सभा महासंघाचे कार्यालयात निमंत्रितांचे सहभागासाठी व चर्चा करण्यासाठी
दि. ६.११.२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता आमंत्रित केली होती.

सदर सभेस, मा. नोंदणी महानिरीक्षक महाराष्ट्र राज्य पुणे श्री. कवडे साहेब यांना मार्गदर्शनार्थ आमंत्रित केले होते. त्यांचेवतीने त्यांच्या मुख्यालयातील सर्वश्री गरड सेक्शन अधिकारी, श्री. देशपांडे ॲडमिनिस्ट्रेटीव्ह अधिकारी तसेच पुणे शहर सह निबंधक श्री. कोळेकर हजर होते. व्यासपीठाच्या निमंत्रितांमध्ये सर्वश्री शेळके माजी स्पेशल कमिशनर सहकार, श्री. भिडे संयोजक व्यासपीठ व माजी सहनिबंधक सहकार, श्री. एस.बी. पाटील माजी ऑफीसर ऑन स्पेशल डयूटी (सहकार) मंत्रालय, श्री. देशपांडे, माजी डी.डी.आर. ॲडव्होकेट, वर्तक माजी उपमुख्याधिकारी राज्य सहसंघ, श्री. भगत, माजी असिस्टंट रजिस्टर श्री. वर्तक तसेच, पुणे गृहनिर्माण सह.महासंघाचे अध्यक्ष श्री. पटवर्धन, माजी अध्यक्ष बापट व अन्य व्यवस्थापकीय संचालक तसेच काही गृहनिर्माण संस्था प्रतिनिधी हजर होते. नोंदणी खात्याचे अधिकाऱ्यांनी

चर्चेमध्ये उपस्थित केलेल्या प्रश्नाचे अनुषंगाने त्यांच्या खात्याची भूमिका विशद केली. प्रामुख्याने शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. मुद्रांक २०१७/२४५३/प्रक्र.४१०/म-१ (धोरण) यामधील उल्लेखलेल्या नोंदणी नियम १९६१ चे नियम ४४च्या उपनियम (१) मधील बाब (आय) उक्त रेरा कायद्याला लागू होते किंवा कसे ? याबाबतच्या स्पष्टीकरणात्मक सूचनावर चर्चा झाली.त्यातही नोंदणी कायदा कलम २१ मधील डीस्क्रीप्शन या शब्दावर काथ्याकूट झाला. त्यावर महासंघाचे वकील श्री. खुर्जेकर यांनी रुल्समधील तरतुदी या मार्गदर्शनपर आहेत अशी बाजू मांडली असता नोंदणी कायद्यामध्ये ज्याप्रमाणे निर्जीव दस्तांची नोंदणी केली जाते तसेच सहकार खात्याचे अधिकाऱ्यांना सहकारी संस्था नोंदणीचे अधिकार असून सहकार कायदा, कानू नियम व उपविधीतील नोंदलेल्या तरतुदीही सहकारी संस्थेसारख्या लीगल पर्सन अन्य सर्वांना लागू असतात ही विषमता दाखवून देण्यात आली. नोंदणी महानिरीक्षकांचे प्रतिनिधींनी यावर न बोलता मूक संमती दिल्याचे दिसले. कारण प्रॉपर्टी डीस्क्रीप्शनमध्ये फक्त मेन अपार्टमेंटचे आकडे घालून जे त्या अपार्टमेंटचे डीस्क्रीप्शनचा उदा. रीस्ट्रीक्टेड कॉमन एरियाज व फॅसिलिटीजचा उल्लेख सूची दोन मध्ये टाकण्याचा सदर खात्याचा प्रघात नाही. त्यामुळे अनेक वाद विवाद उद्भवून बिल्डर डेव्हलपरचे फावते व खरेदीदार अडचणीत येऊन त्याला न्यायासाठी कोर्टाचा मार्ग पत्कारावा लागतो. त्यामध्येही खोटे नकाशे जोडून कडी करण्यात येते व त्यासाठी फौजदारी कोर्टाची पायरी चढावी लागते असे दिसते. सर्वसामान्य सदनिका खरेदीदार हे करु इच्छित असला तरी आजूबाजूच्या इनफॉर्मल दंडशक्ती (आणि) कोर्टाची खर्चिक वेळ पध्दती यामुळे त्या वाटेला खरंतर चिवट अपार्टमेंट ग्राहकांशिवाय कोणी जाऊ शकत नाही असे दिसते.

शेवटी ऊहापोहानंतर हे स्पष्ट झाले की, रेरा २०१६ या कायद्याखाली, न आलेल्या प्रकल्पांना नोंदणी नियम ४४ उपनियम (१) मधील बाब (आय) म्हणजे अशाप्रकारे नोंदणीसीठी आलेल्या दस्तांबाबत सदर दस्त रेरा कायद्यांतील, येत नसले म्हणजे छोटे प्रकल्प म्हणजे ५०० स्क्वेअर मीटर्स पेक्षा कमी क्षेत्राचे वा ८ अपार्टमेंटपेक्षा कमीचे प्रोजेक्ट असले व राज्य शासनाने त्यामध्ये कमी केलेल्या क्षेत्रफळांचे व अपार्टमेंटचे असले म्हणजे त्यासंबंधी विक्रीची जाहिरात केलेली व त्या अटीचे उल्लंधन करुन ते विकलेले वा ॲडव्हान्स घेऊन बुक केलेले नाहीत ना हे नोंदणी करताना पहावेच लागेल. यामुळे कदाचित खरेदीदार व विक्रेता या दोघांकडूनही तशा प्रकारची डॉक्यूमेंटस् सादर करावी लागेल. त्याबाबतची वस्तुस्थिती समजू शकली नाही वा तशी अट सदर कॉन्ट्रॅक्टमध्ये घालण्यात येईल आणि त्यामुळेही नवे वादविवाद उद्भवू शकतील.

१.१० **२५० सभासदांपर्यंतच्या, गृहनिर्माण संस्थांच्या निवडणुका, (दुरुस्त) नियमाबाबत**:- वरील बाबतीत मा. सहकार आयुक्तांचे मार्फत, शासनाला प्रतिष्ठानतर्फे, पाठपुरावा करण्यात येत होता. त्याचप्रमाणे सदर बाब जिल्हा गृहनिर्माण सहकारी संस्था महासंघांमार्फतही शासनाकडे मांडण्यात आली होती. अशी दुरुस्ती सुचविण्याचा मूळ उद्देश निवडणुका कमी खर्चात, पण ९७ व्या घटना दुरुस्तीला अनुसरुन नव्या परिस्थितीत, लोकशाही निवडणुकांची पथ्ये पाळून सुटसुटीत करणे अपेक्षित होते. पूर्वी म्हणजे ९७ व्या घटना दुरुस्तीपूर्वी अशी व्यवस्थाही होतीच. मात्र ती आता ९७व्या घटना दुरुस्तीस अनुसरुन सहकार कायद्यात केलेल्या दुरुस्तीच्या अनुषंगाने करणे अपेक्षित होते. शासनाने वर उल्लेखलेल्या पाठपुराव्यानंतर आता हे नियम महाराष्ट्र शासन गॅझेट नोटिफिकेशन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. असाधारण क्र.३९० काढले परंतु त्यामध्ये प्रसिध्द झालेले नियम अपेक्षेनुसार नसल्याने दि. ६.११.२०१९ ची व्यासपीठाच्या सभेत त्यावर सविस्तर चर्चा करुन निर्णय घ्यावा यासाठी सदर सभेची निमंत्रणे पाठविली आहेत.

१.११ **नागरी सहकारी बँकामधील, कर्जदारांवर अन्याय अटीसंबंधी**:- श्री. डांगे, माजी मुख्याध्यापक, महात्मा फले विद्यालय तसेच श्री. घोरपडे यांनी अनुक्रमे अर्बन बँक व सातारा सैनिक बँक यांचेकडून मुदत कर्ज काढली होती. त्यात कर्ज वितरणानंतर सहा महिन्यांतच व्याजाचा दर १ टक्के वाढविण्यात आला आणि तो त्यांना सांगितला गेला नाही. तसेच,

मासिक हप्त्यांत ह्यामुळे झालेली वाढही कळविली नाही. पण हप्ते, दंड व्याज असे कापून घेतले. श्री. घोरडे यांच्याबाबत बँकेने केलेला सहकार कायदा कलम १०१ चे कारवाईत उपनिबंधक (वसुली) यांनी सातारा सैनिक सह. बँकेवर नैसर्गिक न्याय विरुद्ध कर्जदारावर कारवाई केल्यामुळे प्रकरण दुरुस्तीसाठी परत केले असतानांही बँक वर्षभर त्या आदेशावर कार्यवाही न करत कर्जदारास त्रास देत आहे. त्याबाबत अतिरिक्त निबंधक सह संस्था डॉ. तोष्णीवाल यांच्याकडे प्रतिष्ठाननेही पाठपुरावा केला. त्याबाबत सहकार आयुक्त वानिबंधक सह. संस्था यांनी परिपत्रक क्र. जा.क्र.४ सआ/कायदा व वैधानिक कार्य/कर्जधारिका/प्रत५९३/२०१९ दि.१९ ऑगस्ट २०१९ ने कर्जदारांना व जामिनदारांना मंजूर कर्ज प्रकरणांची फाईल उपलब्ध करुन देण्याबाबतचे परिपत्रकीय आदेश काढण्यात आले असून त्यामुळे नोटीस बोर्डावर बँकेने व्याजदर वाढविले वा कमी केले त्याबाबतही कर्जधारकाला व जामीनदाराला कर्जप्रकरणातील दुरुस्तीचे (वाढीव व्याजाची) माहिती देणे बंधनकारक केले आहे. त्यामुळे कर्जदारांना व जामिनदारांना अंधारात ठेवून त्यांचे खाती एखाद्या अटीप्रमाणे खर्चात वाढविल्याचे स्पष्टपणे कळवावे लागले. त्यासाठी अर्थात जरुर ती कारणेही द्यावी लागतील. मनमानीपणे खर्च टाकता येणार नाही.

१.१२ **सहकारी गृहनिर्माण संस्था इमारती पुनर्विकास**:- प्रतिष्ठानचे मा.अंकुशराव काकडे यांचे पत्र क्र. कृ.व स. दि. डिसेंबर २०१८ प्रमाणे प्रतिष्ठानने यापूर्वी सहापानी टिपण माननीय मुख्यमंत्री महोदयांना सादर केले होते व त्याचा पाठपुरावा वेळोवेळी केला होता. त्यास अनुसरुन शासनाने शासन निर्णय गृहनिर्माण विभाग क्र. संकीर्ण २०१९/प्र.क्र.१०/दुवपु-१ दि.८ मार्च २०१९ ने अपर मुख्य सचिव गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. त्यामध्ये गृहनिर्माण खात्याचे अपर सचिव तसेच प्रधान सचिव (नगर विकास १) तसेच (नगर विकास २) या दोन तसेच अपर सचिव (महसूल) व प्रधान सचिव (सहकार) यांचा समावेश होतो. त्यास अनुसरुन या प्रकरणी शासकीय यंत्रणेत काही गती प्राप्त झाल्याचे दिसून आले. कारण शासनाने प्रतिष्ठानच्या ६ पानी टिपणीतील सूचनांचा विचार करुन पूर्वीच्या शासनाच्या सहकारी गृहनिर्माण संस्था इमारती पुनर्विकास क्र. स.गृ.यो. २००७/प्र.क्र./१४ दि. ३ जानेवारी २००९ च्या सहापानी आदेशांत प्रतिष्ठानच्या अनेक सूचनांचा अंतर्भाव करुन १२ पानी सविस्तर आदेश दि.४ जुलै २०१९ ने निर्गमित केले.

महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग यांनीही प्रतिष्ठानच्या काही सूचना लक्षात घेऊन शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१९/प्र.क्र.१०/ दुवपु-१दि. १३ सप्टेंबर २०१९ प्रमाणे, गृहनिर्माण सह. संस्था पुनर्विकासास पात्रता, एक खिडकी योजना, योजनेस मंजूरी व कालमर्यादा, चटईक्षेत्र निर्देशांक/प्रोत्साहन क्षेत्रफळ, पुनर्विकासासाठी रस्तारुंदीबाबत सवलती, हस्तांतरीय विकास हक्क, प्रिमियम दरांत सवलत, प्रिमियम भरणा टप्पे, विविध कर / शुल्क सवलती, मुद्रांक शुल्क, वस्तू व सेवा कर सवलती इत्यादी अनेक विषयांवर सविस्तर सूचना निर्गमित केल्या आहेत.

प्रतिष्ठानने, सहकारी तत्वांचा राज्याचे सहकार कायद्यात समावेश, गृहनिर्माण संस्था उपविधींत सुधारणा, गृहनिर्माण संस्थांचे डीम्ड कन्व्हेअन्स इत्यादी विषयांच्या पाठपुरावाही वेळोवेळी मा. मुख्यमंत्री महोदय, शासन गठीत वर उल्लेखलेली उच्यस्तरीय समिती, तसेच सहकार आयुक्त यांच्याकडे करण्यात येत आहे

१.१३ **केंद्र शासनाचे नवे शैक्षणिक धोरण २०१९**:- प्रतिष्ठानचे डॉ. वसंतराव काळपांडे, माजी शिक्षण संचालक, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शनाखाली व डॉ.न.म. जोशी या ४० वर्षे, अध्यापनाचा वेगवेगळया स्तरावरील अनुभव असणाऱ्या व शेवटी प्राचार्यपदी राहिलेल्या साहित्यिकाचे अध्यक्षतेखाली दि. २० जुलै २०१९ रोजी एक चर्चासत्र आयोजित केले होते. त्यामध्ये या नव्या शैक्षणिक धोरणाबाबत शिक्षक, प्राध्यापक इत्यादींना सहभागी करुन चर्चासत्र संपन्न केले. त्याचा ८ पानी सविस्तर अहवाल अंकुश काकडे यांचे सहीने सेक्रेटरी डिपार्टमेंट ऑफ स्कूल एज्युकेशन ॲण्ड लिटरेचर यांना दि.१ ऑगस्ट २०१९ रोजी सादर केला. त्यात यामुळे अधिकारांचे होणारे मोठया प्रमाणांतील केंद्रीकरण, व्यावसायिक

व ॲकेडेमिक कोर्सेसची आवश्यकता, कंडेन्सड प्रोफेशनल कोर्सेस, पीएचडीसाठी कोणते विषय निवडावेत त्याचे निष्कर्ष, ऑन द जॉब प्रशिक्षणाची आवश्यकता, उच्यस्तरीय संस्थांत प्रवेश, योजनेमुळे अनावश्यक होणार सेवकवर्ग इत्यादी अनेक मुद्द्यांवर सूचना करण्यात आल्या आहेत.

१.१४ **पुणे केंद्र: वारकऱ्यांसाठी**:- सालाबादप्रमाणे, पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना डोळयांच्या नंबराप्रमाणे चष्मेवाटप, अल्पोपाहार आणि औषध वाटपाचा कार्यक्रम प्रतिष्ठानने गुरुवार दि.२७ जून २०१९ रोजी आयोजीत केला होता. त्यासाठी मा.अजित निंबाळकर व अंकुश काकडे आणि शांतीलाल सुरुतवाला यांचे मार्गदर्शन लाभले. हजारो वारकऱ्यांना इडली, वडा चटणी, चहा, बिस्किटे असा अल्पोपाहार वाटण्यात आला. रंगिलदास सुरतवाला ट्रस्ट तर्फे वाचता येणाऱ्या वारकऱ्यांना नंबर तपासून चष्मे व वाचता न येणाऱ्या वारकऱ्यांना दरवर्षीप्रमाणे गॉगलचे मोफत वाटप करण्यात आले.

## १०.२ विभागीय केंद्र, कराड

स्व. यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या ३५ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या भव्य प्रतिमेस मा. श्री. अशोकराव गणपतराव चव्हाण यांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आले. सौ. वेणूताई चव्हाण स्मारक ट्रस्टमधील देशनेते स्व. यशवंतराव चव्हाण व सौ. वेणूताई चव्हाण यांच्या पुतळ्यास सकाळी ८:३० वाजता आदरणीय शरदचंद्रजी पवारसाहेब यांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आले. या प्रसंगी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र कराडचे अध्यक्ष व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट कराडचे कार्याध्यक्ष मा. श्री. कल्लाप्पाण्णा आवाडे, मा. श्री. सुनिल पवार मा. श्री. राजेश पाटील (वाठारकर), मा. श्री. नंदकुमार बटाणे व इतर मान्यवर उपस्थित होते. वेणूताई चव्हाण ट्रस्टची वार्षिक सभा सन्माननीय श्री. शरदचंद्रजी पवारसाहेब यांच्या अध्यक्षतेखाली सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट येथे पार पाडली.

२५ नोव्हेंबरला दुपारी ४ वाजता सजविलेल्या बग्गीमध्ये स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांची प्रतिमा ठेवून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सचिव श्री. मोहनराव डकरे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून पदयात्रेस प्रारंभ झाला. सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्ट येथून या पदयात्रेस प्रारंभ झाला. ही पदयात्रा विरंगुळा येथील साहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून, विजय दिवस चौकातून, पुढे टिळक हायस्कूल येथील स्व. लोकमान्य टिळक व स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालण्यात आले. त्यानंतर स्व. पी.डी. पाटील यांच्या निवासस्थानातील त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर कन्या शाळा, चावडी चौक, मार्गे पदयात्रा प्रीतीसंगम बागेतील स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या समाधी स्थळी पोहोचली. या पदयात्रेस शिवाजी शिक्षण संस्थेच्या यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज व सौ. वेणूताई चव्हाण कला व वाणिज्य कॉलेजचे प्राचार्य त्याचप्रमाणे सर्व प्राध्यापक बंधू भगिनी तसेच यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट या दोन्ही संस्थाचे कर्मचारी उपस्थित होते. समाधीस्थळी सर्व मान्यवरांनी पुष्पांजली वाहिली.

स्वतंत्र भारताच्या ७० व्या प्रजासत्ताक दिनानमित यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र कराड व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट कराड या दोन्ही ठिकाणी कराड केंद्राचे सचिव श्री. मोहनराव डकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी दोन्ही संस्थांचे सर्व कर्मचारी तसेच सौ. वेणूताई चव्हाण स्मारक अभ्यासिकेतील विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

२.१ **स्व. सौ. वेणूताई चव्हाण ९४ वी जयंती**:- सौ. वेणूताई चव्हाण भारतीय स्त्री जीवनाचा आदर्श होत्या यशवंतरावजींच्या राजकीय जडण-घडणीमध्ये मातोश्री ति. विठामाता यांच्याप्रमाणेच सौ. वेणूताईंचा अग्रक्रमाने वाटा

होता. स्व. वेणूताईंच्या ९४ व्या जयंती दिननिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, कराड येथे २ फेब्रुवारी २०२० रोजी सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट येथील स्व. यशवंतराव चव्हाण व सौ. वेणूताई चव्हाण यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालण्यात आले यावेळी कर्मचारी वर्ग व अभ्यासिकेतील विद्यार्थी वर्गही उपस्थित होता.

## १०.३ विभागीय केंद्र नागपूर

३.१ **खुले कवीसंमेलन :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नागपूर व दिवंगत कवयित्री सौ. अपर्णाताई सहस्त्रबुद्धे स्मृती आयोजन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने अपर्णाताईंच्या स्मृतीप्रीत्यर्थ सत्कार व खुल्या कवीसंमेलनाचे आयोजन तसेच श्री. अंकुश शिंगाडे यांच्या लेखसंग्रहाचे प्रकाशन शुक्रवार दि. ५ एप्रिल, २०१९ रोजी करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कथाकार व कादंबरीकार मा.सुप्रिया अय्यर होत्या.प्रमुख अतिथी म्हणून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नागपूरचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी होते. विशेष अतिथी म्हणून कवयित्री मा. प्रा.सौ. मीनल येवले होत्या. अध्यक्ष कवी मा.श्री.श्रीराम केदार होते.

३.२ **श्री. अजिंक्य कोत्तावार यांच्याशी संवाद व सत्कार समारंभ :-** वयाच्या अवघ्या २५व्या वर्षी सर्व रेकॉर्ड ब्रेक करून सर्वात जास्त पेटंट स्वत:च्या नावावर करणारा 'अजिंक्य तारा' असा नावलौकिक मिळविणारा यवतमाळचा श्री. अजिंक्य रविंद्र कोत्तावार याच्या यशोगाथेतून विज्ञान, संशोधनकार्य याकडे बघण्याचा योग्य तो दृष्टिकोन लोकांमध्ये निर्माण व्हावा व तरुणांना प्रेरणा मिळावी यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने श्री.अजिंक्य रविंद्र कोत्तावार यांचा गौरवपूर्ण सत्कार तसेच मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला विज्ञानाची व्याप्ती संशोधकवृत्ती जनसामान्यापर्यंत पोहोचावी हा या कार्यक्रमाचा उद्देश सत्कार समारंभ व संवाद रविवार दि. १४ एप्रिल, २०१९ रोजी ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत मा. डॉ. कुमार शास्त्री यांच्या हस्ते संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नागपूरचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी होते.

३.३ **काश्मीर प्रश्न, चीन व नेहरु एक माणूस :-** आपल्या देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातील ज्येष्ठ स्वातंत्र्य संग्राम सैनिक,"The Discovery of India"या जागतिक कीर्तीच्या ग्रंथाचे लेखक व भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या जीवनावर; महाराष्ट्रातील प्रसिद्ध लेखक, विचारवंत व ज्येष्ठ संपादक प्रा. सुरेश द्वादशीवा यांच्या 'साधना' या साप्ताहिकातील लेखमालेवर ग्रंथ तयार होणार आहे.

यानिमित्ताने पं. जवाहरलाल नेहरुच्या जीवनावरील 'काश्मीर प्रश्न, चीन व नेहरु : एक माणूस' म्हणून लेखकाचे निष्कर्ष काय आहेत.यासंदर्भात प्रा.द्वादशीवर यांच्या व्याख्यानाचे आयोजन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने बुधवार दि. ८मे,२०१९ रोजी सायं. ५.३० वाजता करण्यात आले होते.

३.४ **'रवि रश्मियाँ' पुस्तक प्रकाशन :-** 'नागपूरच्या राजनैतिक व सामाजिक विकासात महिलांचे योगदान १९२० ते १९६०' वर आधारित डॉ. प्रभा मेहता यांच्या 'रवि रश्मियाँ' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, नागपूरच्या वतीने शनिवार दि. ११ मे, २०१९रोजी आयोजित करण्यात आला.

या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, कराडचे कुलपती मा. डॉ. वेदप्रकाश मिश्र यांच्या शुभहस्ते तसेच वरिष्ठ पत्रकार मा.श्री.एस.एन.विनोद यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी होते.

३.५ **पुस्तक प्रकाशन समारंभ :-** नाट्यशास्त्राचा प्रगाढ अभ्यास असलेले आणि वैदर्भीय रंगभूमीची निरीक्षणे नोंदविणारे नाट्यलेखक व दिग्दर्शक म्हणून स्वतंत्र ओळख असलेले मा. डॉ. सतीश पावडे यांनी लिहिलेल्या 'द थिएटर ऑफ द ॲब्सर्ड' व 'नाट्य-प्रसंग' या दोन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने रविवार दि. १२ मे, २०१९ रोजी आयोजित करण्यात आला.

हा प्रकाशन सोहळा महात्मा गांधी आंताराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा येथील कुलगुरु मा. डॉ. रजनीश कुमार शुक्ल यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. सुप्रसिद्ध साहित्यिक व मराठीचे गाढे अभ्यासक आचार्य मा.श्री. अरुण वेलणकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. दै.सकाळचे संपादक ,मा. श्री.शैलेश पांडे, दै. महाराष्ट्र टाईम्सचे संपादक मा.श्री.श्रीपाद अपराजित यांनी या पुस्तकांवर भाष्य केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी होते.

३.६ **मातृदिनाच्या निमित्ताने 'मेरी माँ' संगीतमय कार्यक्रम** :- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, नागपूर व मोहम्मद रफी फॅन्स कल्चरल ऑर्गनायझेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि.१८मे २०१९ रोजी सायं. ६.३० वाजता राष्ट्रभाषा संकुल, महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेच्या श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृहात मातृदिनाच्या निमित्ताने 'मेरी माँ' या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी बाल कलावंतांनी गीते सादर केली. तसेच कष्ट व संघर्ष करून आपला संसार मांडणाऱ्या मातांचा सन्मान प्रमुख पाहुणे मा.डॉ.गिरीश गांधी, मा. शरद बागडी (समाजसेवक) प्रगती पाटील (महिला व बालकल्याण समिती सभापती मनपा) व मा. सुकेशिनी तेलगोटे (समाज कल्याण अधिकारी, जि.प.नागपूर) यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाची संकल्पना मोहम्मद सलीम यांची होती तर संगीत संयोजन स्वप्निल बैतुले यांचे होते. संचालन सौ. रेखा दंडिगे-घिया यांनी केले.

३.७ **ग्रंथ प्रकाशन समारंभ :'अमृत विचारमंथन'** :- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे चरित्रात्मक कार्य आणि 'ग्रामगीता' या ग्रंथावर समीक्षात्मक लेखन करणारे डॉ. गणेश चव्हाण यांच्या 'अमृत विचारमंथन' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने करण्यात आला.

या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा मंगळवार दि. २८ मे,२०१९ रोजी महाराष्ट्रातील विचारवंत व प्रसिद्ध वक्ते माजी आमदार मा. श्री.उल्हासदादा पवार यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.या प्रसंगी शेतकरी संघटनेचे मा.प्रा.शरद पाटील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.विद्यापीठाच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासनाचे प्रमुख मा. डॉ. प्रदीप विटाळकर यांनी ग्रंथावर भाष्य केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नागपूरचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी होते.

३.८ **'तिमिर से उदय की ओर' प्रकाशन समारंभ** :- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान-विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने नागपूरचे प्रख्यात डॉ.उदय बोधनकर यांच्या आत्मचरित्रपर पुस्तकाचा प्रकाशन समारंभ मंगळवार दि.४जून, २०१९ रोजी सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे समागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजित करण्यात आला.

या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ कृष्णा इन्सिटट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, कराडचे कुलपती मा. डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांच्या शुभहस्ते व ज्येष्ठ पत्रकार मा.श्री एस.एन, विनोद यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.या प्रसंगी हिंदीच्या प्रसिद्ध साहित्यिक व कवयित्री सुश्री हेमलता मिश्र 'मानवी' व मराठी भाषेच्या प्रसिद्ध साहित्यिक सुश्री सुप्रिया अय्यर विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे विभागीय अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी उपस्थित होते.

३.९ **'दारिद्र्याची शोधयात्रा : अहवालावर चर्चा'**:- श्री.हेरंब कुलकर्णी हे शिक्षणाच्या क्षेत्रातील धडपड करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून प्रसिद्ध आहेत. शिक्षणाच्या संदर्भातील निष्ठा व प्रामाणिकता कायम ठेवून हेरंब आयुष्यभर कार्यरत आहेत. अहमदनगर जिल्ह्यात शिक्षकाची नोकरी करीत असताना सुद्धा केवळ शालेय पुस्तकांचे अध्ययन न करता समाजाचे प्रबोधन, अध्ययन व त्या संदर्भात चिंतन, मनन करण्यात हा शिक्षक खऱ्या अर्थाने समाजशिक्षक ठरला. त्यांनी 'दारिद्र्याची शोधयात्रा" हे पुस्तक प्रकाशित केले. महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये प्रत्यक्ष जाऊन व या सर्व लोकांना भेटून त्यांनी हे पुस्तक तयार केले. या पुस्तकावर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व संघर्ष वाहिनीच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. ७जून, २०१९ रोजी सायं.५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल शंकरनगर चौक, नागपूर येथे चर्चासत्र आयोजित करण्यात आले.

याप्रसंगी मा. डॉ. सुखदेव थोरात (आदिवासी व भटके विमुक्तांतील दारिद्र्य), मा.डॉ.श्रीनिवास खांदेवाले (बजेट, प्रशासन योजना व अंमलबजावणी), मा.श्री. विजय जावंधिया (शेती आणि दारिद्र्य समानार्थी शब्द झालेल काय ?) व मा.श्री.जयदीप हर्डीकर, (ग्रामीण रोजगाराच्या शक्यता कोणत्या ?) या विषयावर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे विभागीय अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी उपस्थित होते.

३.१० **नृत्य, नाट्य व संगीत कार्यशाळेचा समारोप**:- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान-विभागीय केंद्र नागपूर व मोहम्मद रफी फॅन्स कल्चरल ऑर्गनायझेशनच्या संयुक्त विद्यमाने व देवरंजन रंगभूमी तर्फे प्रस्तुत दि. १० ते १५ जून, २०१९ पर्यंत नृत्य, नाट्य व संगीत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यात ३५ कलाकारांचा सहभाग होता. या शिबिराचा समारोप समारंभ बुधवार दि. २६जून, २०१९रोजी सायं. ६.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजित करण्यात आला.

या कार्यशाळेच्या समारोपाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष मा.डॉ. गिरीश गांधी तसेच प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री.शरद बागडी उपस्थित होते. या शिबिरात बालकांपासून पालकांपर्यंत ज्यांनी सहभाग घेतला त्या सर्वांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

३.११ **काव्यक्रांती एकतेची (कविता आणि चर्चा)**:- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान-विभागीय केंद्र नागपूर व सम्यक विचार मंच नागपूरच्या संयुक्त विद्यामाने शुक्रवार दि.१६ ऑगस्ट, २०१९ रोजी सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे'काव्यक्रांती एकतेची" (कविता व चर्चा) या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटक यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नागपूरचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी होते. ज्येष्ठ कथाकार मा. डॉ. प्रकाश खरात व रा.तु.म. नागपूर विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख मा. डॉ. शैलेन्द्र लेंडे हे भाष्यकार म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत मा. डॉ. यशवंत मनोहर होते.

३.१२ **जन्मशताब्दी तीन सुपुत्रांची**:- संयुक्त महाराष्ट्रांच्या निर्मितीत व नंतर संयुक्त महाराष्ट्राच्या समाजकारण, राजकारण व विकासाच्या क्षेत्रात ज्यांचे मोठे योगदान आहे अशा माजी मुख्यमंत्री स्व. शंकरराव चव्हाण, लोकनेते व माजी मंत्री स्व.राजारामबापू पाटील व संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी ज्यांचे मोठे योगदान आहे ते महाराष्ट्रातील ज्येष्ठ साहित्यिक व शाहीर स्व.अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दीचे वर्षानिमित्त या तिन्ही महापुरुषांना आदरांजली अर्पण करण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने रविवार दि.१८ ऑगस्ट, २०१९रोजी सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे ज्येष्ठ पत्रकार व विचारवंत मा.श्री मधुकरराव भावे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नागपूर अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी होते.

३.१३ **'डॉ. सुलभा हेर्लेकर स्मृती पुरस्कार वितरण सोहळा'**:- विदर्भातील ज्येष्ठ कवयित्री डॉ. सुलभा हेर्लेकर यांच्या कविता मराठी काव्यक्षेत्रात स्वत:चे अढळ स्थान राखून आहेत. त्यांनी नव्या दमाच्या अनेक कवींना प्रोत्साहन देऊन घडविले म्हणूनच त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने एका नवोदित कवीला दरवर्षी डॉ. सुलभा हेर्लेकर स्मृती पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. या वर्षीचा पुरस्कार अमरावती जिल्ह्यातील गव्हाणकुंड येथील नवोदित कवयित्री, लेखिका सौ. शीमा सलीमखाँ पठाण यांना देऊन गौरविण्यात आले.

हा पुरस्कार वितरण समारंभ सोमवार दि. २ सप्टेंबर, २०१९ रोजी सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे मा. डॉ. जुल्फी शेख, प्रसिद्ध साहित्यिक व लेखिका यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी मा. श्रीमती सुप्रिया अय्यर , प्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत ह्या प्रमुख अतिथी म्हणून

उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी होते.

३.१४ **लोकार्पण सोहळा**:- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व आकांक्षा प्रकाशन, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आकांक्षा प्रकाशन द्वारा प्रकाशित केलेले 'देशाला काय हवे" या लोकमतचे संपादक, ज्येष्ठ विचारवंत आणि नामवंत साहित्यिक मा. श्री.सुरेश द्वादशीवार यांच्या पुस्तिकेचा लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला.

हा लोकार्पण सोहळा माजी आमदार मा. श्री उल्हासदादा पवार यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.याप्रसंगी मा.श्री. प्रफुल्ल गुडधे, सामाजिक कार्यकर्ते, मा. श्री.शैलेश पांडे संपादक दै. सकाळ, मा.श्री.देवेंद्र गावंडे संपादक दै लोकसत्ता व मा. श्री.श्रीपाद अपराजित संपादक दै.महाराष्ट्र टाईम्स यांनी पुस्तकावर भाष्य केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष मा.डॉ. गिरीश गांधी होते.

हा लोकर्पण सोहळा शनिवार दि. १४ सप्टेंबर, २०१९ रोजी सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे संपन्न झाला.

३.१५ **उर्दू साहित्यिकांचा सत्कार सोहळा**:- महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई द्वारा २०१७-२०१८ च्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेल्या नागपूर आणि कामठीच्या उर्दू साहित्यिकांचा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने सत्कार करण्यात आला. हा सत्कार समारंभ शनिवार दि. २८ सप्टेंबर, २०१९ रोजी सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे संपन्न झाला.

हा सत्कार सोहळा विधान सभेचे माजी अध्यक्ष मा. श्री. अरुणभाई गुजराथी यांच्या शुभहस्ते व कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडीकल सायन्सेस, कराडचे कुलपती मा. डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.याप्रसंगी लेखक व संशोधक मा. डॉ. शरफुद्दीन साहिल, विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान-विभागीय केंद्र नागपूरचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी होते.

३.१६ **सौ. बबिता सुभाष ताडे, करोडपती महिला सत्कार**:- क्रांतीज्योत सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांना खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य देण्याचे काम केले. ज्या महिला सर्वच क्षेत्रात जणूकाही बंदिस्त म्हणून राहात होत्या त्यांच्यासाठी विचारांची दालनं उघडी केली. त्याचे फलित म्हणून २१ व्या शतकातील महिला विविध क्षेत्रात स्वत:ला सिद्ध करीत आहेत. ही अतिशय अभिमानाची बाब आहे. विदर्भातील अशीच एक खेड्यात राहणारी 'सावित्रीची लेक' करोडपती झाली, तिचे नाव सौ. बबिता सुभाष ताडे! चिखलदऱ्याला जन्मलेली व अंजनगाव सूर्जीत स्वत:चे व्यक्तिमत्व विकसीत करणारी बबिता ही अमिताभ बच्चनच्या कार्यक्रमात करोडपती झाली. त्यानिमित्ताने सौ. बबिता सुभाष ताडे यांचा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने सोमवार दि. ६ ऑक्टोबर, २०१९ रोजी सत्कार करण्यात आला.

हा सत्कार सोहळा लेखक विचारवंत व ज्येष्ठ संपादक मा. श्री. सुरेश द्वादशीवार यांच्या शुभहस्ते व मेघे ग्रुप ऑफ स्कूलच्या संचालिका मा. सौ. आभा मेघे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, कराडचे कुलपती मा. डॉ. वेदप्रकाश मिश्रा होते.

३.१७ **स्व. यशवंतराव चव्हाण यांची पुण्यतिथी**:- आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या ३५ व्या पुण्यतिथीनिमित्त सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्तिला रोख रक्कम पंधरा हजार, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे स्वरूप असलेला ''यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार'' देऊन गौरविण्यात येते.

२०१९ चा पुरस्कार श्री. सुधाकर गायधनी यांना देण्यात आला. हा पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार श्री. मधुकरराव भावे यांच्या शुभहस्ते देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक मा. प्रा.डॉ. कोमल ठाकरे होते.

हा पुरस्कार वितरण सोहळा स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीदिनी दि. २५ नोव्हेंबर २०१९ रोजी सायं. ५:३० वायजा आयोजित करण्यात आला.

३.१८ **कार्यकारिणीची सभा :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने शनिवार दि. १२ डिसेंबर, २०१९ रोजी दु. ४:०० वाजता वनराई फाऊंडेशन कार्यालय, यश कॉम्प्लेक्स, दुसरा मजला, भरतनगर चौक, अमरावती रोड, नागपूर - येथे सभा आयोजित करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी होते.

३.१९ **मा. प्रतिभाताई पाटील यांना नागरी सत्कार समारंभ :-** देशाच्या माजी राष्ट्रपती माननीय प्रतिभाताई पाटील नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात विदर्भातील जनतेच्या आणि विधान मंडळाच्या आमदारांच्या भेटीसाठी आवर्जून होत्या व योगायोगाने १९ डिसेंबर हा त्यांचा वाढदिवस! त्यांच्या यशस्वी आयुष्याची ८५ वर्षे पूर्ण केल्यानिमित्ताने त्यांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

हा कार्यक्रम देशाचे ज्येष्ठ नेते आदरणीय शरदचंद्र पवार साहेब यांच्या शुभहस्ते व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय उद्धवजी ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला. या समारंभाचे अध्यक्षस्थान विधान सभेचे अध्यक्ष श्री. नाना पटोले यांनी भूषविले. याप्रसंगी मंत्रीमंडळातील मंत्री सर्वश्री छगनराव भुजबळ, बाळासाहेब थोरात, सुभाषजी देसाई, जयंतराव पाटील, एकनाथराव शिंदे व डॉ. नितीन राऊत कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. बुधवार, दि. १८ डिसेंबर रोजी २०१९ रोजी सायं. ५:३० वाजता हा सोहळा संपन्न झाला.

३.२० **युगांतर व्याख्यानमाला :-** महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध विचारवंत कादंबरीकार व ज्येष्ठ संपादक प्रा. सुरेश द्वादशीवार यांचे आजच्या संदर्भातील महत्त्वपूर्ण विषयावर ''युगांतर व्याख्यानमालेअंतर्गत'' ''धर्म'', 'नीती', 'न्याय', 'स्वातंत्र्य', 'समता', 'बंधुता', 'राजकारण', 'सेक्युलॅरिझम' 'लोकशाही' व 'गांधीच्या मनातील जागतिक एकात्मता' या दहा विषयांवर व्याख्यानमाला दि. २१ ते ३० डिसेंबर, २०१९ पर्यंत आयोजित करण्यात आली.

समाजातील आजची परिस्थिती या सर्व प्रश्नांच्या संदर्भात अतिशय चिंताजनक असून या संदर्भातील मूलभूत चिंतनाची आज प्रकर्षाने गरज आहे. हे सर्व विषय मानवी जीवनाच्या संदर्भात व एकात्मतेच्या संदर्भात देखील महत्वाचे आहेत. या सर्व विषयांचा सकारात्मक परिणाम समाजावर व्हावा या उद्देशाने या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले.

३.२१ **राष्ट्र व धर्म : विचारमंथन :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने शनिवार दि. २५ जानेवारी, २०२० रोजी ''राष्ट्र व धर्म : विचारमंथन'' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत, मा.डॉ. यशवंत मनोहर, मा.डॉ. वेदप्रकाश मिश्रा, कुलपती, कृष्णा इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस, कराड, मा. पंडित विपिन जैन शास्त्री, जैन दर्शनाचार्य, मा.श्री. सरदार जगजीत सिंग, वरिष्ट समाजसेवी, मा.डॉ. ख्वाजा रब्बानी, माजी निदेशक पुरातत्त्व विभाग, भारत सरकार, मा. रेवरन्ट जॉन जॉर्ज, प्रमुख पादरी यांनी ''राष्ट्र व धर्म : विचारमंथन'' या विषयावर आपले अनुभव व विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी होते.

## १०.४ विभागीय केंद्र नाशिक

४.१ **चित्रपट चावडी : 'एट अँड हाफ' :-** सुप्रसिध्द इटालियन दिग्दर्शक फेडरीको फेलीनी यांचा 'एट अँड हाफ' हा चित्रपट ५ एप्रिल २०१९ दाखविण्यात आला. एकोणीसशे त्रेसष्टमधील फेलीनीचा हा चित्रपट त्याच्या चित्रपट दिग्दर्शकाच्या भूमिकेच्या शोधांचा आलेख आहे.गुईडो हा इटालीयन चित्रपट दिग्दर्शक. यशस्वी चित्रपट प्रदर्शनानंतर एका निवांत स्थळी

विश्रांतीसाठी तो जातो. त्याला तिथे खरोखरच शांतता आणि विश्रांती मिळते का ? त्याला त्याच्या गत आयुष्यातील प्रसंग आणि व्यक्ती त्याच्या स्मरणकोषातून बाहेर येऊन का छळतात ? एकंदर हा चित्रपट म्हणजे सर्जनशील दिग्दर्शकाचा आत्मशोधाचा, त्याच्या कलाकृतीच्या मागील प्रेरणांचा व त्याच्या सहकाऱ्यांसह होणाऱ्या वैचारिक आदान प्रदानाचा धांडोळा आहे. ही फेलिमीची सर्वश्रेष्ठ कलाकृती मानली जाते. सन १९६३ मध्ये प्रदर्शित झालेल्या या इटालियन चित्रपटाचा कालावधी १२८ मिनिटांचा आहे.

४.२ **'सूरविश्वास' : आनंद अत्रे यांचे गायन**:- सूर-तालाची मधुर बरसात घेऊन २० एप्रिल २०१९ची रम्य सकाळ, ख्याल गायकी, बंदिश, गजल अशा विविध रूपांनी बरसत होती व रसिकांना अवीट, अभिजात आनंद देत होती. स्वरांतून निथळणारा आशय, शब्दसाज लेऊन स्वराभिषेकच करत होता. 'सूर विश्वास' उपक्रमाचे तृतीय पुष्प आनंद अत्रे यांनी गुंफले. विश्वास ग्रुपचे कुटुंबप्रमुख विश्वास ठाकूर हे या उपक्रमाचे आयोजक होते. संकल्पना विनायक रानडे यांची आहे. आनंद अत्रे यांनी आपल्या दमदार सादरीकरणाने मैफलीत उत्साह निर्माण केला.मैफलीची सुरुवात अहिर भैरव रागातील बडा ख्यालाने केली. शब्द होते 'हो करतार.' त्यानंतर छोटा ख्यालात 'अलबेला साजन आयो री' या शास्त्रीय गायनानंतर नाट्यगीताने रंग भरला. शब्द होते, 'या भवनातील गीत पुराने' नाट्यसंगीत पर्वातील एका युगाचीच त्यांनी आठवण करून दिली. उर्दू-हिंदी भाषेतील गझलेचा अनोखा नजराणा रसिकांसाठी होता. 'रंजीश ही सही, दिल ही दुखाने के लिए आ,' त्यानंतर 'काश ऐसा कोई मंजर होता मेरे काँधे पे तेरा सर होता' अशा गझलांतून भाषेची नजाकत आणि गायकीची प्रचिती दिली. मैफिलीला साथसंगत हर्षद वडजे (हार्मोनियम), रोहित नागरे (तबला) यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. स्मिता मालपुरे यांनी केले.ध्वनीव्यवस्था पराग जोशी यांची होती.

४.३ **तकरार भी.. इकरार भी.. सादरकर्ते- प्रदीप वेलणकर**:- गाणे ऐकतांना मनातील भाव तितक्याच तीव्रपणे रसिकांच्या ओठांवर येत होते आणि गीतांमधील अवीट गोडी काळाच्याही पलीकडे जाणवणारे शब्दांचे वेगळेपण आजच्या प्रश्नांशी निगडीत आहे, याचीच प्रचिती 'तकरार भी.. इकरार भी...' या कार्यक्रमांतून रसिकांनी घेतली आणि २० एप्रिल २०१९ रोजी एका वेगळ्या अनुभूतीचा आविष्कार अनुभवला. निमित्त होते, श्रवणीय जुन्या हिंदी गीतांवर आधारित 'तकरार भी-इकरार भी' या कार्यक्रमाचे. सुप्रसिद्ध अभिनेते प्रदीप वेलणकर यांनी कार्यक्रम सादर केला. कुठलेही गाणे हे स्वत:चा विचार घेऊन येते आणि प्रश्नांचा वेधही घेत असते. अनेक गीतकारांनी यात प्रयोग केले आणि गाणी अजरामर झाली.रसिकांनी ती गाणी काळजात जपून ठेवली आहेत.

कभी खुदपे कभी हालात पे (हम दोनो), कैसे कोई जिए (बागबान), जीवन डोर तुम्ही संग बांधी (सतीसावित्री) अशा अनेक गीतांमधून प्रदीप वेलणकर यांनी गीताचे वेगळेपण मांडले. प्रदीप वेलणकरांचा चित्रपट क्षेत्राचा व्यासंग आणि अभिरुची याचे हे अप्रतिम सादरीकरण होते.

४.४ **मतदानाविषयी जनजागृती**:- देशभरात होऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये मतदानाविषयी जनजागृती व्हावी, या उद्देशाने देशाच्या निवडणुक आयोगाने यंदा पहिल्यांदाच देशातील कम्युनिटी रेडिओ स्टेशनचा उपयोग करण्याचे ठरविले होत. त्याचाच भाग म्हणून देशभरातील सुमारे १५० कम्युनिटी रेडिओला आयोगाने या उपक्रमात सामावून घेतले. या उपक्रमासाठी आयोगातर्फे दिल्ली येथे 'इंडिया इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर डेमोक्रसी व इलेक्टोरल मॅनेजमेंट' या संस्थेत बैठक झाली. मतदारांत जनजागृती कशी करावी, याबाबत कम्युनिटी रेडिओच्या प्रतिनिधींना एका कार्यशाळेतून प्रशिक्षण देण्यात आले. रेडिओ हे लोकप्रबोधनाचे माध्यम असून त्यातून साध्या सोप्या भाषेत जनसामान्यांना माहिती प्रभावीपणे देण्यात येते हा विचार यामागे आहे.

विश्वास को-ऑप बँक लि. नाशिक, रेडिओ विश्वास ९०.८कम्युनिटी रेडिओ, यशस्विनी सामाजिक अभियान, विश्वास ज्ञानप्रबोधिनी अ‍ॅण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट नाशिक आणि सारस्वत बँक यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वास आर्थिक

साक्षरता अभियानाअंतर्गत मतदार जनजागृती अभियान शहरातील विविध भागातील झोपडपट्ट्यांमध्ये राबविण्यात आले. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला.

४.५ **निरोगी आहार, निसर्ग व जीवनशैली व्याख्यान :-** निसर्गाशी मैत्री म्हणजे उत्तम आरोग्य व सकारात्मक जगण्यासाठी भरपूर ऊर्जा असलेला मार्ग आहे. त्याचा अंगीकार केल्यास जीवन आनंदी व सुदृढ होऊ शकते. त्यासाठी निसर्गाच्या सोबतीने रोजच्या दिवसाचे नियोजन करा. आहारात भाजीपाला व फळे तसेच विविध आजारांवर उपचार म्हणून नैसर्गिक वनस्पतींचा वापर करावा, असे प्रतिपादन सेंद्रीयशेती, आयुर्वेद तज्ज्ञ व उद्योजक नितूबेन पटेल यांनी केले. समाजात आरोग्य, कृषी क्षेत्राच्या आधुनिकतेविषयी जनजागृती व्हावी या उद्देशाने या जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी त्या बोलत होत्या.

व्याख्यानात त्यांनी स्वयंपाकघरातूनच आहाराचे नियोजन, घरगुती आयुर्वेदिक औषधे आजारांपासून मुक्ती, मायग्रेन, थायरॉईड, सर्व्हायकल स्पॉंडीलाईटीस, त्वचेचे विकार, निद्रानाश तसेच तणावावर नियंत्रण, त्याशिवाय कान, नाक, डोळे अशा अनेक आजारांपासून सुटका आदी विषयावर मार्गदर्शन केले. जीवन व्यवहारात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या वनस्पती औषधांची माहिती यावेळी त्यांनी दिली. केसांवरील आजारांसाठी भृंगराज, नाकाच्या विकारांसाठी देशी गायीचे तूप, सर्व्हायकल स्पॉंडीलिसीस साठी एरंडेल तेल, मातीच्या लेपाची उपचार पद्धती तसेच किडनीवरील आजारांसाठी राजमा, बी १२साठी शेवगा उपयुक्त असल्याचे त्यांनी नमूद केले. ॲसिडीटी व अल्कलाईनचा जीवनशैलीवर परिणाम, अग्निहोत्राचा उपयोग आदी, विषयांवर सोप्या भाषेत विचार मांडले व उपस्थितांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. यावेळी जितूभाई कुदुमुटीया, शबरी बेन यांनी उपचार पद्धती, आहारनियोजन यावर विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक 'मेक वर्ल्ड बेटर'च्या मंजू राठी यांनी केले व संस्थेच्या माध्यमातून राबवलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

४.६ **महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिर :-** जागतिक आरोग्यदिनाच्या पार्श्वभूमीवर दिनांक २५ एप्रिल २०१९ रोजी गंजमाळ येथे रोटरी क्लबच्या सभागृहात ५५ वसाहतींमधील महिलांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. वसाहतीमधील महिलांना युरीन इन्फेक्शन व फंगल इन्फेक्शन तसेच मासिक पाळीदरम्यान होणारा त्रास, रक्ताचे प्रमाण कमी आदी समस्या सर्व ठिकाणी सारख्या प्रमाणात आढळून आल्या. त्यावर उपाय करणे आणि त्यासाठी महिलांमध्ये स्वजागृती करणे या उद्देशाने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराला प्रमुख पाहुणे म्हणून स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. चंद्रकांत संकलेचा, डॉ. सुनीता संकलेचा यांचे मार्गदर्शन लाभले.

४.७ **'जागतिक वसुंधरा दिन' नांदूरमध्यमेश्वर : एक परीक्षण :-** ग्लोबल वॉर्मिंगची समस्या आज जगासमोर उभी ठाकली असून त्यासाठी सावध होणे गरजेचे आहे.त्यासाठी पाणथळ जमिनीचे संरक्षण करणे गरजेचे आहे. आज जगातल्या महत्त्वाच्या पाणथळी जमीन वाचवण्यासाठी जनजागृती आवश्यक आहे. जैव विविधतेकडे लक्ष वेधणे प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन जागतिक वसुंधरा दिनानिमित्ताने आयोजित व्याख्यानात सुप्रसिध्द पक्षीतज्ज्ञ व छायाचित्रकार सतीश गोगटे यांनी केले. 'नांदूरमध्यमेश्वर : एक परीक्षण' या विषयावर २७ एप्रिल २०१९ रोजी स्लाईड शो व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. गोगटे यांनी याप्रसंगी ग्लोबल वॉर्मिंग, रामसर कन्व्हेंशन, नांदूरमध्यमेश्वर परिसर, नांदूरमध्यमेश्वर अभयारण्य, पक्षी वैविध्य आदी विषयांवर मार्गदर्शन केले.

ते म्हणाले, आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ, शासकीय यंत्रणा, शासन, सामाजिक संस्था यांच्या सहभागातून संरक्षण व संवर्धन होऊ शकते. त्यासाठी लोकसहभागही तितकाच महत्त्वाचा आहे. त्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकार्य घेण्याची गरज आहे. आजकाल पाणी, जलसंवर्धन, पावसाच्या पाण्याचे नियोजन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.पक्षी संरक्षणासाठी नुसतेच पर्यटन करून उपयोग नसून त्यासाठी अभ्यास करणेही महत्त्वाचे आहे. कार्यक्रमाचे स्वागत व

प्रास्ताविक करताना विश्वास ठाकूर म्हणाले, पक्षी मित्रमंडळाच्या विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यासाठी प्रतिष्ठान सहकार्य करेल. निसर्गाचे संवर्धन व पक्षांचे संरक्षण करण्यासाठी जनतेने पुढाकार घ्यावा.

४.८ 'जागर कवितांचा':- जीवनातील विविध भावभावनांचे आविष्कार, सामाजिक प्रश्न, जीवन जाणिवा, निवडणूक यावर कवींनी कवितांतून भाष्य केले. कविता हे माध्यम जगण्याच्या सर्व शक्यता अशक्यतांना स्पर्श करत आणि अनुभवाचा आविष्कार प्रखरपणे सामोर आणते, याचीच ही प्रचिती होती. महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त १ मे २०१९ रोजी 'जागर कवितेचा; खुले कवी संमेलना'चे आयोजन डिझास्टर मॅनेजमेंट अ‍ॅण्ड ट्रेनिंग हब, ठाकूर रेसिडेन्सी, विश्वास को-ऑप. बँकेसमोर, सावरकरनगर, गंगापूर रोड, नाशिक येथे करण्यात आले होते. कवी हा वर्तमानकाळाचा व समाज परिवर्तनाचा भाष्यकार असतो. तो आपल्या कवितेच्या माध्यमातून समकालाचे प्रश्न मांडतो. कविता लेखन ही साधना असून त्यातून वेगळा आशय व विचार मांडण्याची गरज आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कवी भीमराव कोते, विलास पगार, सदाशिव खांदवे व रामचंद्र काकड यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. कवी संमेलनाचे सूत्रसंचालन रवींद्र मालुंजकर यांनी केले. कवी संमेलनाची सुरुवात अरुण सोनवणे यांच्या गझलने झाली. 'भंगूर जीवनाची नाही कुणास खात्री, सारे इथे उतारु, सारेच तीर्थयात्री....' त्यानंतर रवींद्र मालुंजकर यांनी 'लेक लाडकी सर्वांची, लेक सावली विश्वाची, तिच्या आगमने वाजे, रोज तुतारी सुखाची...' या कवितेतून लेकीचे महत्त्व विशद केले. राज शेळके यांनी 'तिच्या डोक्यावर हात, तुझी लाखाची कमाई, सारं आयुष्य सरून पुन्हा उरते रे आई...' या कवितेतून आईचे थोरपण मांडले, नंदकिशोर ठोंबरे यांनी 'होय मी ब्ल्यु कॉलर, मला लाज नाही वाटत त्याची, माझी कॉलर ब्ल्यु असली तरी ...'यातून विदारक वास्तव मांडले. कवी संमेलनात अमोल चिने, डॉ. गणेश मोगल, डॉ. एच.एस.मोरे, सुभाष सबनीस, अजय बिरारी, राधाकृष्ण साळुंके, नितीन कोकणे, गणेश पवार, भारती देव, लक्ष्मीकांत कोतकर, माणिकराव गोडसे आदी कवींनी कविता सादर केल्या. कार्यक्रमास सुदाम सातभाई. भाऊसाहेब काकडे, रमेश निकम, प्रभाकर निकम, मेधा निकुंभ, प्रकाश ब्राह्मणकर, दिलीप खैरनार आदी उपस्थित होते.

४.९ **चित्रपट चावडी : 'जाकू'**:- सुप्रसिद्ध फ्रेंच दिग्दर्शक अ‍ॅग्नेस वरदा यांचा 'जाकू' हा चित्रपट ४ मे २०१९ रोजी दाखविण्यात आला. लहानग्या जाकूला नाटक, सिनेमा, पपेट्सचे आकर्षक आहे. फ्रान्समधील एका गावात त्याच्या वडिलांचे मोटार दुरुस्तीचे गॅरेज आहे. त्याने लहानपणीच ठरविले, की आपण चित्रपट दिग्दर्शक व्हायचे. इकडे दुसऱ्या महायुद्धाचे पडघम वाजू लागतात. जाकू कॅमेरा मिळवतो आणि त्याचा स्वप्नवत प्रवास सुरू होतो. अशा विलक्षण प्रवासाची ही गोष्ट आहे.सन १९९१ मध्ये प्रदर्शित झालेल्या या फ्रेंच चित्रपटाचा कालावधी १२० मिनिटांचा आहे.

४.१० **श्रीकृष्णाचा सांगीतिक जीवनपट: गीत गोपाल**:- भगवान श्रीकृष्णाची विविध रूपे. त्यांचे देवत्व, भावभक्ती यांचा अनोखा मिलाप श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून गेला. कवी ग.दि.माडगूळकरांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेले गीत गोपाल काव्य कृष्णाच्या जन्मापासून ते मथुरा गमनपर्यंतच्या प्रवासाची मधुर अनुभूती होती... मैफिलीची सुरुवात 'वनी राधिका गीत गोपाल गाते' या गीताने झाली. त्यानंतर 'कृष्ण जन्म झाला' या गीतांतून कृष्णपर्व सुरु झाल्याची वार्ता आनंददायी करून गेली. 'बाळ हा नंदघरी न्यावा, वसुदेव निघाले नंदघरी, पिता पुत्र काजळ रात्री, नकोरे मारू नजाता'अशा काव्यातून कृष्णाच्या जन्माची कथा, त्यांच्या परमेश्वर रूपाची जाणीव करून देणारी होती. नंदास पुत्र झाला, बाळकृष्ण वाढतो, चलावे नंदा वृन्दावनी, कृष्ण हा देवाहून दांडगा अशा संगीत आणि कथाकाव्याची अनुभूती रसिकांनी ५ मे २०१९ रोजी घेतली.जगाच्या कल्याणासाठी प्रेमाचा सागर असलेल्या भगवान श्रीकृष्णांची अनेक रूपे 'गीत गोपाल' मधून रसिकांनी अनुभवली आणि स्वर संगीताचा अनोखा आविष्कार जपून ठेवला.. कार्यक्रमाची सुरुवात पुष्पा केळकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली. कमलाकर वारे, शशिकांत बावरेकर, नवीन तांबट यांचा सत्कार डॉ. भरत केळकर, विश्वास ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला.विश्वास गार्डन येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. कै. अनंत केळकर सर यांच्या प्रथम

स्मृतिदिनानिमित्त 'गीत गोपाल'चे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे संगीतकार कै. अनंत केळकर हे होते. यातील गीतांचे गायन विवेक केळकर, शुभदा तांबट, विद्या कुलकर्णी, सुवर्णा क्षीरसागर, सावनी केळकर, आसावरी केळकर, अक्षिता कोठावदे व गीता मराठे यांनी केले. साथसंगत तबला-नवीन तांबट, अमोल पाळेकर, बासरी-रवि जोशी, व्हायोलिन-सुवर्णा क्षीरसागर, साईड रिदम-प्रसाद भालेराव, सिंथेसायझर-दिपक तरवडे, हार्मोनिअम-ॲड. प्रमोद पवार निवेदन-शाम पाडेकर यांनी तर ध्वनी व्यवस्था-पराग जोशी यांची होती.

४.११ **शाहीर अनंत फंदी : चरित्र व कार्य व्याख्यान**:- महाराष्ट्रातील शाहिरांनी धीटपणाने सामाजिक वास्तव मांडले. विलक्षण भाषावैभव, संवेदनशीलता यांचा अनोखा संगम त्यांच्या शाहिरीत दिसून येतो. अनंत फंदी यांची शाहिरी काळाचे नेमके चित्रण करणारी होती. ते द्रष्टे कलावंत होते. त्यातूनच समाजाबरोबरच सामान्य माणसाचे दु:ख, त्यांची हतबलता त्यांच्या काव्यात सहजपणे येते. दागिन्यांचे वर्णन करणारी 'चंद्रावळ' सारखी लावणी असो किंवा दुसऱ्या बाजीरावाला उद्देशून 'दोन दिसाची जाईल सत्ता, अपयश माथा घेऊ नको' त्यांच्यातील रोखठोक शाहिरीचे दर्शन घडवते असे प्रतिपादन प्रा. शिरीष गंधे यांनी केले. प्रख्यात शाहीर अनंत फंदी यांच्या द्विशताब्दी स्मृतिवर्षानिमित्त 'अनंत फंदी-चरित्र व कार्य' या विषयावर सुप्रसिद्ध लेखक प्रा. शिरीष गंधे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते.

शाहिरी लोककला ही समाजाचा आरसा आहे. त्याचे जतन तसेच संवर्धन करणे म्हणजे अनंत फंदी यांचे खरे स्मरण होईल, असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रसाद विजय पाटील यांनी केले. प्रा. गंधे यांचा सन्मान विनायक रानडे यांनी केला. अनिता गंधे यांचा सन्मान अनिता नेवे यांनी केला.

४.१२ **वारली चित्रसृष्टी कार्यशाळा**:- ११०० वर्षापासून पाड्यांवर झोपड्यांच्या भिंती सजविणाऱ्या वारली चित्रकलेला प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. आता आलिशान बंगले, हॉटेल्स यांच्या भिंती वारली चित्रांनी सुशोभित होतात. जागतिक स्तरावर ही कला लोकप्रिय झाली असून त्याचे श्रेय पद्मश्री जिव्या सोमा मशे व अज्ञात वारली कलाकारांचे आहे. ज्या वारली जमातीने या कलेला उच्च दर्जा मिळवून दिला त्याच कलेने आदिवासींना आत्मसन्मान मिळवून दिला आहे. ११ ते १४ मे २०१९ दरम्यान याच विषयावरील कार्यशाळेची सुरुवात अभिनव पद्धतीने करण्यात आली. कलाशिक्षिका प्रेमदा दांडेकर यांनी वारली चित्रशैलीची वैशिष्ट्ये स्पष्ट करणारी रांगोळी चित्रित केली. पद्मश्री जिव्या सोमा मशे यांच्या प्रथम पुण्यतिथी निमित्त ही रांगोळी रसिकांना पाहता आली.

बेसिक कोर्समध्ये यावेळी ५ ते ७५ वयोगटातील सहभागी शिबिरार्थींनी सुरेख वारली चित्रे रंगवली. दुपारच्या सत्रात कापडावर व मातीच्या पॉटवर वारली चित्रे कशी रंगवायची याचे प्रशिक्षण संजय देवधर यांनी दिले. कार्यशाळेमध्ये दुसऱ्या दिवशी निसर्ग, सण-उत्सव, तारपानृत्य यांची चित्रे रंगविण्यात सगळेजण रंगून गेले. ॲडव्हान्स कोर्समध्ये मातीचे पॉट वारली चित्रांनी सजले. सर्व सहभागी शिबिरार्थींना आकर्षक प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. अनेक जणांनी समारोपप्रसंगी मनोगत व्यक्त केले. सातत्याने सराव करून वारली चित्रकलेत प्रावीण्य मिळविण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार त्यांनी केला.

४.१३ **सृजन: बालनाट्य शिबीर**:- आजच्या व्हॉट्सॲप, फेसबुकच्या जगात मुलांच्या उपजत गुणांना मुक्त अवकाश देण्यासाठी विविध प्रकारची शिबिरे व्यक्तिमत्त्वाला समृद्ध करतात व त्यांच्या जाणीवा विस्तारण्यासाठी मदत करतात, आत्मविश्वास देतात. शालेय शिक्षणाबरोबरच अशी शिबिरे जीवनाला नवे भान देतात. त्यासाठी पालकांनी मुलांना स्वातंत्र्य द्यावे असे प्रतिपादन विश्वास ठाकूर यांनी केले. सुप्रसिद्ध नाट्यकलावंत लक्ष्मी पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'बालनाट्य शिबिराचे' आयोजन करण्यात आले होते. त्याच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. श्री. ठाकूर म्हणाले, आज व्यक्तीव्यक्तींमध्ये संवाद हरवत चालला आहे. अशा शिबिरातून संवादाची व समूहातून नवे काही विधायक घडविण्याची मानसिकता तयार होईल. शिबिरासाठी पन्नासहून अधिक मुलामुलींनी सहभाग घेतला आहे. उद्घाटन समारंभाचे स्वागत,



१० वा यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२० च्या उद्धाटनावेळी ज्येष्ठ सिने अभिनेत्री श्रीमती शर्मिला टागोर यांना स्मृतीचिन्ह देताना प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्ष सौ. सुप्रिया सुळे, प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. श.गं.काळे सोबत महोत्सवाचे संचालक डॉ. जब्बार पटेल, महोत्सवाचे समन्वयक श्री. महेंद्र तेरेदेसाई




१० वा यशवंतराव आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा दरम्यान 'स्मिता पाटील मेमोरीयल लेक्चर' साठी व्याख्यान देताना प्रसिद्ध सिने अभिनेत्री श्रीमती विद्या बालन.



नवमहाराष्ट्र युवा अभियान आयोजित युवा स्वातंत्र्य ज्योत रॅली १४ ऑगस्ट २०१९




नवमहाराष्ट्र युवा अभियान आयोजित यशवंत शब्द गौरव महाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा अंतिम फेरी मुंबई

शिक्षण विकास मंच आयोजित 'नवीन शैक्षणिक धोरण मसुदा - २०१९' या विषयावरील शिक्षण कट्टा. उपस्थित डॉ. वसंत काळपाडे, श्रीमती बसंती रॉय, श्री. दत्ता बाळसराफ, डॉ. मिलिंद आवाड व इतर



शिक्षण विकास मंच चे प्रमुख संयोजक आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. वसंत काळपांडे यांच्या वयाच्या सत्तरीनिमित्त मा. दिनकर गांगल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.




विभागीय केंद्र कराडच्या वतीने आयोजित मा.यशवंतराव चव्हाण यांचा ३५ वा पुण्यतिथी कार्यक्रम.



विभागीय केंद्र कराडच्या वतीने आयोजित मा.यशवंतराव चव्हाण यांचा ३५ वा पुण्यतिथी कार्यक्रम. यावेळी उपस्थित मा. कल्लाप्पाण्णा आवाडे व इतर मान्यवर






रवि रश्मियाँ या पुस्तक प्रकाशन समारंभाप्रसंगी मनोगत व्यक्त करताना प्रतिष्ठानचे विभागीय अध्यक्ष मा.डॉ. गिरीष गांधी, व्यासपीठावर उपस्थित डावीकडून रीमा चड्डा, प्रभा मेहता, डॉ. बिन्दु चिमोटे, डॉ. प्रमोद शर्मा, श्री.एस.एन. विनोद व श्री. प्रेमकुमार लुनावत



यषवंतराव चव्हाण यांच्या ३५ व्या पुण्यतिथीनिमित्त यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार समारंभाप्रसंगी मनोगत व्यक्त करताना ज्येष्ठ संपादक मा.श्री. मधुकरराव भावे व्यासपीठावर उपस्थित डावीकडून सौ. रेखा दंडिगे-घिया, डॉ. प्रदीप विटाळकर, डॉ. कोमल ठाकरे, डॉ. गिरीष गांधी, श्री. सुधाकर गायधनी, श्री. समीर सराफ, डॉ. मंजुशा सावरकर, श्री. प्रेमकुमार लुनावत, डॉ. गणेश चव्हाण.







व्याख्यान (२५ नोव्हेंबर २०१९) विभागीय केंद्र ,लातूर द्वारा स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या ३५ व्या पुण्यतिथी निमित्ताने जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते .याप्रसंगी "महाराजा सयाजीराव गायकवाड: विचार आणि कार्य " या विषयावर व्याख्यान देताना महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे माजी अध्यक्ष मा.बाबा भांड. याप्रसंगी मंचावर अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ.जनार्दन वाघमारे , सचिव प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार,सदस्या डॉ.कुसुमताई मोरे हे उपस्थित होते.

विभागीय केंद्र रत्नागिरी यांच्या वतीने ऐडिप योजनेअंतर्गत दिव्यांग व्यक्तींसाठी मोफत कृत्रीम अवयव आणि साहित्य वाटप शिबिर कार्यक्रमात उपस्थित मान्यवर



सौ. पूजा निकम, मा. सुयश अण्णा रेडीग, प्रा. सौ. नलावडे, अभिजीत खानविलकर व इतर मान्यवर



दि. १८ फेब्रुवारी, २०२० विज्ञानगंगा अंतर्गत 'महाराष्ट्रातील दुष्काळ' या विषयावरील व्याख्यान प्रसंगी व्याख्याते श्री. अतुल देऊळगावकर यांना पुस्तक देऊन स्वागत करताना प्रतिष्ठानचे सरचिटणीस मा. श्री. श. गं. काळे.




दि. १९ सप्टेंबर, २०१९ विज्ञानगंगा अंतर्गत 'आय.ओ.टी.चे तंत्रज्ञान' या विषयावरील व्याख्यान प्रसंगी व्याख्याते डॉ. रामचंद्र सत्यदेव तिवारी यांना पुस्तक देऊन स्वागत करताना प्रतिष्ठानचे सरचिटणीस मा. श्री. श. गं. काळे.





विभागीय केंद्र सोलापूर आयोजित कायदेविषयक व्याख्यानमालेच्या वेळी दीपप्रज्वलन करताना ॲड. सुधाकर आव्हाड व इतर




विभागीय केंद्र सोलापूर आयोजित राजकीय अर्थकारणाचे परिणाम या विषयावर बोलताना डॉ. अजित जोशी



'दिव्यांग हक्क पुनर्वसन प्रणाली सक्षमीकरण कार्यशाळे' चे आयोजन दिनांक ८, ९ व १० नोव्हेंबर २०१९ रोजी करण्यात आले होते.



'दिव्यांग विभाग' सचिवालय पातळीवर वेगळा करण्यात यावा यासाठीचे निवेदन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या वतीने मा. मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांना देण्यात आले. यावेळी मा. सुप्रियाताई सुळे, मा.विजय कान्हेकर, मा. नीलम गोऱ्हे

सृजन या उपक्रमांतर्गत शालेय मुलांसाठी 'प्राण्यांशी मैत्री' हा कार्यक्रम घेण्यात आला होता. मा. सुनील कदम यांनी यावेळी मुलांना मार्गदर्शन केले.




यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, सृजन, न्यु होरायझन आणि हेल्थ फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित आरोग्य शिबिर. यावेळी उपस्थित मा. सुप्रियाताई सुळे व इतर



विभागीय केंद्र, अहमदनगर कापूस पिकावरील किडीचे व्यवस्थापन मार्गदर्शक : प्रा. सोमनाथ दरंदले, किटकशास्त्र विभाग, कृषी महाविद्यालय, सोनई व उपस्थित शेतकरी वर्ग



शेतीकट्टा विषय: कांदा उत्पादन तंत्रज्ञान, प्रास्ताविक: प्रा. राजेंद्र लिपने, वनस्पतीशास्त्र विभाग, कृषी महाविद्यालय सोनई ता. नेवासा जी. अहमदनगर



ज्येष्ठ नागरिक आनंद मेळावा-२०१९ अंतर्गत "सोबती" ज्येष्ठ नागरिक संघ - विलेपार्ले (पूर्व) यांचा सत्कार करताना प्रमुख पाहुणे डॉ. आनंद नाडकर्णी सोबत प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. श. गं .काळे.




ज्येष्ठ नागरिक आनंद मेळाव्यात व्यासपीठावर कर्तबगार ज्येष्ठ नागरिक म्हणून सन्मान केलेल्या सन्मानार्थी बरोबर प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. श. गं .काळे व प्रमुख पाहुणे डॉ. आनंद नाडकर्णी.



विभागीय केंद्र, ठाणे यांच्या वतीने श्री. हरिश जाधव यांचे 'ताणतणाव व्यवस्थापन' शिबिराचे आयोजन करण्यात आले.



विभागीय केंद्र, ठाणे यांच्या वतीने सोमय्या आर्ट्स आणि कॉमर्सच्या विद्यार्थ्यांसाठी 'चला करियरवर काहीतरी बोलू' या विषयावर मा. सजुर्वेद्र महाजन यांचे मार्गदर्शन शिबिर आयोजन करण्यात आले.



महाराष्ट्र महिला व्यासपीठ आयोजित ज्येष्ठ साहित्यिक वीणाताई गवाणकर मुलाखत




महाराष्ट्र महिला व्यासपीठ आयोजित फर्स्ट एड, सी. पी. आर ट्रेनिंग प्रोग्राम



पीजी डॅक ऑगस्ट २०१९ च्या तुकडीतील विद्यार्थी



विभागीय केंद्र औरंगाबाद एमजीएमतर्फे पुरग्रस्तांच्या मदतीसाठी पाठविलेल्या ट्रकसह अंकुशराव कदम, सुहास तेंडुलकर, रेखा शेळके, निलेश राऊत आणि कार्यकर्ते.



विभागीय केंद्र औरंगाबाद, महात्मा गांधी मिशन विकास मंचच्या संयुक्त विद्यमाने 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१९' या विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.



विभागीय केंद्र, पुणेच्या वतीने आयोजित कार्यक्रम



विभागीय केंद्र, पुणेच्या वतीने आयोजित कार्यक्रम



विभागीय केंद्र, नाशिकच्या वतीने दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने वाटप प्रसंगी विश्वास ठाकूर, विजय पाटील, के.एस. उईके व दिव्यांग बंधू-भगिनी





विभागीय केंद्र, नाशिकच्या वतीने यशवंत शब्दगौरव महाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा विभागीय फेरी नाशिक.



केंद्र नवी मुंबईच्या वतीने 'युथ कौन्सिल, नेरळ' या संस्थेस सन २०१९ चा यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला.



केंद्र नवी मुंबई तर्फे अनाथाश्रमातील शालेय मुलांची चित्रकला स्पर्धा आयोजित केली




विभागीय केंद्र, अंबाजोगाई स्वा. रा. ती. महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण स्मृती आयोजित 'अपरिचित पुल' या कार्यक्रमाचे सादरीकरण करताना चंद्रकांत काळे व इतर

विभागीय केंद्र अंबाजोगाईच्या वतीने मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'परिवर्तनाचे पाईक – शरदचंद्र पवार साहेब' या विषयावर ज्येष्ठ पत्रकार मा.विजय चोरमारे यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम. यावेळी उपस्थित मा. पंडितरावजी दौंड, मा. राजकिशोर मोदी, डॉ.नरेंद्र काळे व इतर



विभागीय केंद्र जळगावच्या वतीने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रथम कुलगुरु डॉ.एन.के.ठाकरे याना सन २०१९ चा यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार मा.अरुण गुजराथी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी मा. रविंद्र पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.



विभागीय केंद्र परभणीच्यावतीने आयोजित यशवंत व्याख्यानमाले प्रसंगी दीप प्रज्वलन करताना प्राचार्य बाळासाहेब जाधव, प्रा. वामनराव जाधव, अरविंदराव जगताप व इतर



वसुंधरा पर्यावरण संवर्धन विभागाच्या वतीने आयोजित 'सोलर चार्जर कार्यशाळा' मधील सहभागी विद्यार्थी



पर्यावरण संवर्धन अभियान या कक्षाच्या वतीने मा. अतुल देऊळगावकर यांचे 'पृथ्वीचे वाढते तापमान हवामान आणि आपण' या विषयावरील व्याख्यान व त्यांच्या समवेत उपस्थित शालेय विद्यार्थी



कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरमच्या वतीने जीवनदीप महाविद्यालय, खर्डी आयोजित विधिसाक्षरता कार्यशाळा



मा. यशवंतराव चव्हाण यांचे देवराष्ट्रे येथील जन्मघर स्मारकास भेट देणारे पाहुणे तसेच अभ्यासक



विभागीय केंद्र नांदेडच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या 150 व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात मा. तुषार गांधी तसेच विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. श्री. कमलकिशोर कदम, इतर मान्यवर व उपस्थित जनसमुदाय.



प्रास्ताविक व परिचय विनायक रानडे यांनी केले. कार्यक्रमास दिशा स्कूलच्या सुधा मेहता उपस्थित होत्या. लक्ष्मी पिंपळे व सुधा मेहता यांचा सन्मान विश्वास ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला.

४.१४ **'सूरविश्वास' : ईश्वरी दसककर यांचे गायन :-** शब्द आणि सूर यांच्या विलक्षण नात्यातून सुमधुर आणि तितकीच अंतरात्म्याशी नाते सांगणारी स्वरांची कोवळी रिमझिम रसिकांना अनोखी अनुभूती देऊन गेली.नव्या कोवळ्या पिढीचा अस्सल स्वर शास्त्रीय संगीतातल्या एका नव्या प्रदेशाची ओळख करून देऊन केला. निमित्त होते 'सूर विश्वास' या नव्या पिढीतील कलाकारांचे व्यासपीठ. सूर विश्वासचे चौथे पुष्प ईश्वरी दसककरने गुंफले.स्वरांची उपजत जाण आणि नाद माधुर्य यांची अनोखी पेशकश ईश्वरीने केली. मैफलीची सुरुवात 'आतम रूप' या विलंबित बंदिशीने झाली. 'निराकार सोहे तुमरो सगुण रूप' हे शब्द निराकार आणि सगुण-निर्गुणाचा आवेग त्यातून समोर आले. त्यानंतर 'जा रे कागा जा' हे शब्द घेऊन 'देसी राग' सादर केला.चैती गान प्रकारातील सोबत 'निंदीया जगा ये' यामधून हळवी लकेर या रागाचे वेगळेपण सांगून केली.मैफिलीचा समारोप भैरवीने झाला. 'सजनवा सावन बितो जाये' हे शब्द नव्या मैफिलीसाठी आस जागवणारे होते.

४.१५ **नर्मदा परिक्रमा अनुभव कथन :-** नर्मदा परिक्रमा म्हणजे आत्मशोधाचा प्रवास असून जीवन जाणीवांना बळकटी देणारा नव्या जगण्याचा शोध आहे. एकाच जीवनातून नव्या जीवनाचा प्रत्यय देणारी ही यात्रा आतल्या अनेक शक्यतांना विस्तारणारी आहे.राग, लोभ, अहंकार, भौतिक सुख, याच्या पलीकडे खरा माणूस शोधण्याची ही खडतर प्रयोगशाळा आहे, असे प्रतिपादन विशाल मित्रा यांनी केले. श्री.मित्रा म्हणाले, प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगण्याची कला नर्मदा परिक्रमेचा प्रवास आपल्याला शिकवतो. नव्या संस्कृतीचा हा प्रवास आहे. आयुष्य बदलवून टाकणारा हा अनुभव आहे.सुखाचा शोध, आसक्ती, मोह, माया, क्रोध यांवर विजय मिळवण्याचा यातून मार्ग सापडतो, असेही श्री. मित्रा म्हणले. तीन हजार नऊशे साठ किलो मीटर, एकशे साठ दिवसांच्या नव्या जगाची ही सफर अचंबित करणारी होती. १९ मे २०१९ रोजी झालेल्या या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक 'मेक वर्ल्ड बेटर' च्या मंजू बेळे-राठी यांनी केले. यावेळी मंजू बेळे-राठी यांनीही नर्मदा परिक्रमेचे अनुभव कथन केले. मित्रा यांचे स्वागत 'अशोका ग्रुप'चे अध्यक्ष अशोक कटारिया यांनी केले.

४.१६ **बालनाट्य शिबिराचा समारोप :-** आजच्या इंटरनेटच्या जगात मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी शिबिरे मोलाची भूमिका बजावत असतात.त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करत असतात.संवाद हरवलेल्या या काळात नाट्य शिबिरातून सुसंवादाची, स्वत:ला शोधण्याची प्रक्रीया नव्याने सुरू होते.तेच अशा शिबिरांचे यश आहे, असे प्रतिपादन 'विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट'चे अध्यक्ष डॉ.मनोज शिंपी यांनी केले. सुप्रसिद्ध नाट्यकलावंत लक्ष्मी पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'बालनाट्य शिबिरा'चे आयोजन क्लब हाऊस येथे करण्यात आले होते. त्याच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. शिबिराची संकल्पना विश्वास जयदेव ठाकूर यांची होती. डॉ. शिंपी पुढे म्हणाले, मुलांच्या जडणघडणीत पालकांची भूमिका महत्त्वाची असते. मुलांची मानसिकता निरोगी राहावी, याकरिता त्यांना आवडत्या क्षेत्रात करियर करण्याची संधी द्यावी. त्यातून त्यांना जीवनाचा खऱ्या अर्थाने आनंद मिळेल. शिबिर मार्गदर्शक लक्ष्मी पिंपळे म्हणाल्या, मुलांमधील उपजत गुणांना नाट्यशिबिराच्या माध्यमातून व्यासपीठ मिळत असते व सादरीकरण करण्याचा आत्मविश्वास निर्माण होतो. शिबिरार्थीनी यावेळी विविध नाटिका व कविता सादर केल्या. त्या माकड व टोपीवाला, लाकुडतोड्या व कुऱ्हाड, तसेच पाऊस, परीची शाळा, फुलपाखरू, सूर्य, चित्ता, पुस्तक हाती घेऊया आदि कवितांचा समावेश होता. त्यानंतर शिबिरार्थींना डॉ. मनोज शिंपी यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

४.१७ **'चार सख्य चोवीस' - अभिवाचन :-** मानवी नातेसंबंध, जगण्याची उत्कटता, जगण्यातले वैविध्य, माणूस म्हणून

जगण्याची नेमकी गरज, काळाला पुरून उरणाऱ्या नात्यांची उपयुक्तता, काळाचा वेग आणि कौटुंबिक अस्वस्थता यांचा अनोखा वेध 'चार सख्य चोवीस' कथांच्या अभिवाचनातून रसिक घेत होते. संपदा जोगळेकर-कुलकर्णी यांच्या 'ध्यानस्थ' कथेने अभिवाचनाची सुरूवात झाली. त्यानंतर सोनाली लोहार यांनी 'कालाय तस्मै नम:' या कथेतून जगण्यातील गुंतवळ, अपुरेपण, आतली धुसफूस प्रभावीपणे मांडली. कथेतून आजूबाजूचे चित्र जसेच्या तसे उभे राहत होते. संवादातील तरलता, भाषेचा स्वाभाविक वापर कथांची परिणामकारकता वाढवत होता. सुप्रसिद्ध अभिनेत्री संपदा जोगळेकर-कुलकर्णी, हर्षदा बोरकर, निर्मोही फडके, सोनाली लोहार या चौघी जणींनी हा कथाविष्कार सादर केला. 'विश्वास ग्रुप'चे कुटुंबप्रमुख विश्वास ठाकूर हे या कार्यक्रमाचे आयोजक होते. संयोजक विनायक रानडे होते. 'विश्वास हब' येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. चार समविचारी, सहसंवेदना असणाऱ्या मैत्रिणींनी कथामधून आजचे जगण्याचे नेमके विश्व उभे केले. स्त्री लेखिकांच्या अभिव्यक्तीचा नवा आविष्कार, भाषेचे वेगळेपण घेऊन समोर आला. बदलत्या वास्तवाचे नेमकं चित्रण रसिकांना अनुत्तरीत करत होते. आ. हेमंत टकले यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, स्त्रियांनी केलेले लेखन हे नवी उर्मी आणि गरज घेऊन निर्माण होत आहे. त्यातून समाजाचं नेमकं प्रतिबिंब पडत आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. हरी विनायक कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजश्री शिंपी यांनी केले. संपदा जोगळेकर-कुलकर्णी यांचा सन्मान आ. हेमंत टकले यांनी, हर्षदा बोरकर यांचा सन्मान सारिका देशपांडे, निर्मोही फडके यांचा सन्मान विनायक रानडे, सोनाली लोहार यांचा सन्मान डॉ. मनोज शिंपी यांनी केला. आभार प्रदर्शन विनायक रानडे यानी केले.

४.१८ **चित्रपट चावडी : 'वॅगॅबॉण्ड'**:- सुप्रसिद्ध फ्रान्स दिग्दर्शक ॲग्नेस वरदा यांचा 'वॅगॅबॉण्ड'हा चित्रपट ग्रामीण भागात एक तरुण मुलीचे प्रेत बर्फात गोठलेल्या अवस्थेत सापडते. तिच्या ओळखीबद्दल पोलीस अनभिज्ञ असतात. मग प्रवास सुरू होतो, तिच्या अनिर्बंध वागण्याचा, फिरण्याचा, बेफिकीरीचा व प्रवासाचा! दारिद्र्य, गोठवून टाकणारी थंडी, भूक, असुरक्षितता यांच्याशी सामना करणारी कोण होती ती तरुणी ? गूढ तसेच आकर्षून घेणारे, अवहेलनाव गैरवर्तनांना बळी पडणारे तिचे व्यक्तिमत्त्व चित्रपट संपल्यावरही तुमचा पाठलाग करत राहते. सन १९८५ मध्ये प्रदर्शित झालेल्या या फ्रेंच चित्रपटाचा कालावधी १०५ मिनिटांचा आहे.

४.१९ **कृत्रिम अवयव व साधने वाटप करण्यासाठी मोफत नाव नोंदणी व मोजमाप / तपासणी शिबिर**:- दिव्यांग बांधवांचे पुनर्वसन हा समाजासाठी मूलभूत जाणिवेचा भाग असून यासाठी प्रत्येकाने जबाबदारी घेणे गरजेचे आहे. तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकत्त्वाचा दृष्टिकोन जोपासण्याचीही गरज आहे त्यांच्यात आत्मविश्वास व बळ निर्माण करण्याबरोबरच त्यांना हक्क मिळवून देण्यासाठी एकत्रित प्रयत्नाची गरज आहे, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र नाशिकचे कार्याध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी केले.

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद नाशिक आणि विश्वास ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक जिल्ह्यातील सर्व प्रवर्गातील गरजू दिव्यांग बंधु-भगिनींना आवश्यकतेनुसार लागणारे कृत्रिम अवयव व साधने वाटप करण्यासाठी मोफत नांव नोंदणी व मोजमाप/ तपासणी शिबिराचे आयोजन ३ जून २०१९ रोजी कुसुमाग्रज स्मारक येथे करण्यात आले. या तपासणी शिबिरामध्ये व्हील चेअर, श्रवणयंत्र, कुबडी, एम.आर. किट, कॅलिपर, स्प्लिंट, जयपुर फुट, कमोड चेअर, वॉकर, चष्मा, एल्बोक्रचेस, वॉकिंग स्टीक, अंधचष्मा, अंधकाठी, ब्रेलकिट इत्यादी साहित्याचे वाटप करण्यात येणार होते.

शिबिरात तपासणी प्रकल्प समन्वयक जितेंद्र दाभाडे. तंत्रज्ञ वसीम खान व सहाय्यक तंत्रज्ञ कलीम शेख यांनी काम पाहिले.

४.२० **चित्रपट चावडी 'फेसेस प्लेसेस'**:- सुप्रसिद्ध फेंच दिग्दर्शक ॲग्नेस वरदा यांचा 'फेसेस प्लेसेस' हा चित्रपट १४ जून

२०१९ रोजी दाखविण्यात आला. ॲग्नेस वरदा यांनी वयाच्या ९० व्या वर्षापर्यंत चित्रपट निर्मिती केली. त्यांनी आपल्या चित्रपटातून सर्वसामान्यांचे जगणे व त्यांचा जीवन व्यवहार मांडला.सिनेमा या माध्यमाचा उपयोग त्यांनी लोकसमूहाचं प्रतिबिंब म्हणून केला. कष्टकरी जनता, त्यांच्या मूलभूत प्रश्नांचा वेध घेणे ही त्यांची कलाविषयक भूमिका होती त्यांनी ती आयुष्यभर जपली. त्याचीच प्रचिती म्हणजे हा सिनेमा आहे. सन २०१७ मध्ये प्रदर्शित झालेल्या या सिनेमाचा कालावधी ९४मिनिटांचा होता.

४.२१ **सूरविश्वास**:- पं. कुमार गंधर्व यांच्या सुरांचे स्मरण आणि पं. वसंतराव देशपांडे यांची विलक्षण गायकी यांची आठवण करून देणाऱ्या आपल्या स्वतंत्र शैलीचा गायनाविष्कार सादर करून सुखदा बेहेरे-दीक्षित यांनी 'सूर विश्वास'ची कोवळ्या स्वरांची सोनेरी रिमझिम १५ जून २०१९ रोजी आनंददायी केली. नव्या पिढीतील गायिका सुखदा बेहेरे-दीक्षित यांच्या गायनाचे पाचवे पुष्प गुंफले गेले. हर्षद वडजे (हार्मोनियम), गौरव तांबे (तबला) यांनी साथसंगत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. स्मिता मालपुरे यांनी केले.

सुखदा बेहेरे यांनी मैफलीची सुरुवात 'नटभैरव' रागाने केली. बडा ख्यालचे शब्द होते; 'गुंज रही सब की रत' यातून एक आल्हाददायकता आणि स्वरांची हळूवार जाणीव वातावरणात घुमत राहिली. त्यानंतर छोटा ख्याल सादर केला. त्याचे शब्द होते. 'सुरत चंदा जब तक फिरे' यातून स्वर, शब्द यांचा अनोखा आविष्कार समोर आला. ललत रागातील झपतालातील बंदीश त्यानंतर द्रुत बंदीश 'जारे बलमवा' सादर केली. नाट्यसंगीतातील गाजलेले पं. वसंतराव देशपांडे यांचे 'या भवनातील गीत पुराने' नाट्य परंपरेची आठवण करून देणारे होते. पं. कुमार गंधर्व यांचे 'एक सर चराचर छाये' तून निर्गुण भक्तीचा अनुभव भक्तीमय करून गेला. याप्रसंगी पं. मकरंद हिंगणे, विराज रानडे, विश्वास ठाकूर यांचा विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सन्मान करण्यात आला.

४.२२ **लेखनाच्या निर्मिती क्षमतेचे व्यवस्थापन**:- प्रतिभावंत लेखक जीवनाकडे तटस्थपणे आणि नव्या दृष्टीने बघत असतो. त्यामुळे, लेखनात येणारे वास्तव वाचकाला आपलेसे वाटते. लेखक समाजाच्या मनोव्यापाराचा अभ्यास करत असतो व शोध घेत असतो. जीवनाच्या प्रवाहाच्या बदलत्या रंगाकडे खऱ्या लेखकाचे लक्ष असते म्हणून त्याची निर्मिती अभिजात व काळाला पुरून उरते, असे प्रतिपादन लेखक व कॉर्पोरेट व्यवस्थापन तज्ज्ञ डॉ. गिरीश वालावलकर यांनी केले. गिरीश वालावलकर यांच्या 'लेखनाच्या निर्मिती क्षमतेचे व्यवस्थापन' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन १५ जून २०१९रोजी करण्यात आले होते. विश्वास ठाकूर हे या कार्यक्रमाचे आयोजक होते. संयोजक विनायक रानडे आहेत.

४.२३ **चित्रपट चावडी 'संस्कार'**:- सुप्रसिद्ध दिग्दर्शक पट्टभिराम रेड्डी यांचा 'संस्कार' हा चित्रपट २१ जून २०१९ रोजी दाखविण्यात आला. दिवंगत अभिनेते, नाटककार व दिग्दर्शक गिरीश कर्नाड यांची यात प्रमुख भूमिका आहे. सुप्रसिद्ध लेखक यू.आर.अनतंमूर्ती यांच्या संस्कार कादंबरीवर आधारित हा चित्रपट असून 'संस्कार' या कादंबरीत ग्रामीण जीवनाचं चित्रण आहे. एक व्यसनी आणि समाजाच्या मते अनैतिक वर्तन करणाऱ्या इसमाच्या मृत्यूनंतर तो ब्राह्मण होता म्हणून त्याच्यावर ब्राह्मणांच्या पद्धतींप्रमाणे अंत्यसंस्कार करावेत की नाही या प्रश्नावरून संपूर्ण गांव दुभंगलं जातं असं हे कथन या चित्रपटात आहे. संस्कार चित्रपटातील अभिनय श्याम बेनेगल यांनी पाहिला होता आणि त्यानंतर बेनेगल यांनी 'निशांत' सिनेमात कर्नाड यांना भूमिका दिली. म्हणूनच कर्नाड यांच्या हिंदी चित्रपटातील अभिनयाचं करियर सुरू झालं.

४.२४ **योगदिन**:- योगसाधना ही उत्तम जीवनप्रणाली असून त्याचा जीवनात समावेश करून जीवन चैतन्यमय करावे. योगामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढ होते. मनाला बळ मिळते व सकारात्मक विचारप्रवाह होण्यास मदत होते. शरीर, मन व श्वासोच्छवास यांचा संयोग योगसाधनेत होतो. तो आंनदी जीवनशैलीचा भाग आहे. निरामय व निरोगी जीवनाचा योगा हा प्रभावी मंत्र आहे. योगसाधना ही शारीरिक, मानसिक स्थैर्य देणारी शक्ती आहे. प्राणायामातून श्वासावर नियंत्रण तर होतेच त्याचबरोबर एकाग्रता, चिंतनाची शक्ती विकसित होते असे प्रतिपादन योगशिक्षक रेवती नरवाडे यांनी केले. नरवाडे

यांनी मकरासन, सेतूबंधासन, कपालभाती, अनुलोम, विलोम,ताडासन, वज्रासन, भुजंगासन अशी विविध आसने २१ जून २०१९ रोजी उपस्थितांकडून करून घेतली आणि आसनांची अभ्यासपूर्ण माहिती दिली. या सामूहिक योग साधनेसाठी मोठ्या प्रमाणावर साधक उपस्थित होते.

४.२५ **चित्रपट चावडी : 'आयवानस् चाईल्डहूड'**:- सुप्रसिद्ध रशियन दिग्दर्शक आंद्रे तारकोवस्की यांचा 'आयवानस् चाईल्डहूड' हा चित्रपट ५ जुलै २०१९ रोजी दाखविण्यात आला. रशियन चित्रपट दिग्दर्शक आंद्रे तारकोवस्की यांचा 'आयवानस् चाईल्डहूड' (१९३२-१९८६) हा सर्वश्रेष्ठ चित्रपट आहे. त्यांच्या प्रदीर्घ चित्रपट कारकिर्दीत त्यांनी फक्त सात चित्रपट बनविले व ते सर्व जागतिक चित्रपटाच्या इतिहासात सर्वोत्कृष्ट समजले जातात.त्यांचे सर्वच चित्रपट काव्यात्म, आध्यात्मिक व सत्याचा शोध घेणारे आहेत. त्यांचा सर्वात पहिला चित्रपट आयवानस चाईल्डहूड (१९६२) ही बारा वर्षाच्या अबोध आयवानची गोष्ट आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या धामधुमीत हिटलरचे सैन्य रशियात वेगाने मुसंडी मारत असताना आयवान रशियन सैन्यात एक सामान्य मदतनीस असतो. हा चित्रपट रशियन अधिकारी व आयवान मधील संबंध हळूवारपणे उलगडतो. १९६२ साली प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचा कालावधी ८४ मिनिटांचा होता.

४.२६ **दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधनांचे मोफत वाटप**:- सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय भारत सरकार, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान-अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ परभणी, समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद, नाशिक व विश्वास ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने विविध प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींना आवश्यक कृत्रिम अवयव व साधनांचे मोफत वाटत करण्यासाठी १६ जुलै २०१९ रोजी शिबिराचे आयोजन करण्यात आले त्याप्रसंगी श्री. ठाकूर बोलत होते. ते म्हणाले दिव्यांग व्यक्तींनी अनेक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने वेगळेपण निर्माण केले आहे. ते समाजासाठी आदर्शवत आहेत.

शिबिरात १५०हून अधिक दिव्यांग व्यक्तींना व्हील चेअर, श्रवण यंत्र, कुबडी, एमआर किट, कॅलिपर स्प्लिट, जयपूर फूट, कमोड चेअर, वॉकर एल्बो, क्रचेस इ. साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी बोलताना जिल्हा परिषदेचे वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते विजय पाटील यांनी शासनाच्या दिव्यांग व्यक्तींसाठी विविध योजनांची व अशा शिबिरांच्या माध्यमातून होणाऱ्या फायद्यांची माहिती दिली. याप्रसंगी प्रकल्प संयोजक के. एस. उईके उपस्थित होते. तसेच जितेंद्र दाभाडे, ज्ञानेश्वर जाधव, शेख कलिम, नसिम खान यांनी शिबीरार्थींची तपासणी करून साहित्यांचे वाटप केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा पगारे यांनी केले.

४.२७ **अबॅकस प्रशिक्षण कार्यशाळा**:- गणिताची आवड असणाऱ्या १०वी, १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी तसेच डी.एड., बी.एड., पदवीधर, तसेच यांना प्रशिक्षण घेऊन शिक्षणक्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्यांसाठी विश्वास ग्रुपतर्फे अबॅकस शिक्षक, प्रशिक्षक कार्यशाळा शुक्रवार १९ ते रविवार २१जुले २०१९ सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत विश्वास क्लब हाऊस, ठाकूर रेसिडेन्सी, गंगापूररोड, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत नरेंद्र निकुंभ यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत अबॅकस गणिती तंत्राद्वारे बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार करणे, पाढे बनविणे ह्या प्रक्रिया जलद गतीने करता येतात. याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. या तंत्राद्वारे विद्यार्थ्यांसाठी एकाग्रता, क्रिएटिव्हीटी, स्मरणशक्ती या गुणात वाढ होते व गणिताची भीती न राहता गणित विषय सोपा होतो या विषयी टिप्स देण्यात आल्या. तसेच कार्यशाळेत प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक स्वरूपात शिकण्याची सुवर्ण संधी मिळाली. सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

४.२८ **चित्रपट चावडी : 'आंद्रे रूबलेव'**:- सुप्रसिद्ध रशियन दिग्दर्शक आंद्रे तारकोवस्की यांचा 'आंद्रे रूबलेव' हा चित्रपट डिझास्टर मॅनेजमेंट अॅण्ड ट्रेनिंग हब, ठाकूर रेसिडेन्सी, नाशिक येथे दाखविण्यात आला. आंद्रे रूबलेव १४व्या शतकाच्या अखेर व १५व्या शतकाच्या सुरुवातीला रशियात होऊन गेला.हा त्याचा रूढ अर्थाने चरित्रपट आहे.

तारकोवस्की हा अत्यंत संयत व तणावरहित गतीने चित्रप्रतिमांची व दृश्यांची एक सुंदर इमारत रचतो. ऑगस्टमधील वादळ, हिवाळ्यातील बर्फाच्छादित शेते, शेतकरी व धर्मगुरूंचा खडतर निसर्गाशी चाललेला संघर्ष, उच्च वर्णियांची घोड्यावरून रपेट अशा अनेक दृश्यांमधून आंद्रे रूबलेव हा चित्रपट उलगडत जातो. या पार्श्वभूमीवर कलाकार व धर्मगुरू असलेला रुबलेवचा आंत:संघर्षही चितारला आहे.

५.२९ **सूरविश्वास :-** शास्त्रीय संगीत ते भक्ती संगीत अशा सुमधुर आणि प्रयोगशील स्वरांची मेजवानी रसिकांना अनुभवण्यास मिळाली. निमित्त होते सूरविश्वास मैफिलीत सुप्रसिद्ध गायक पं.मकरंद हिंगणे यांचे गायन. सूरविश्वासचे सहावे पुष्प त्यांनी गुंफले. मैफलीची सुरुवात आज बधाई बाजे... घनश्याम कृष्णाच्या जन्मानंतर गोकुळात श्रावण मेघांनी आच्छादित वातावरणात जणू सूर्योदय झाला.नंद यशोदेचे सगळे अभिनंदन करू लागले. हा हर्षोल्लास सालगवराली रागाच्या स्वरांनी श्रोत्यांसमोर साकारला. काहीशा अनवट अशा, दक्षिण भारतीय संगीतातील या रागानंतर 'दरस बिन सूनो' ही बंदिश सादर केली आणि वातावरणात स्वरांची रिमझिमच जणू सुरू झाली.

त्यानंतर आषाढाच्या घनगर्द वातावरणात कवी शंकर रामाणि यांचे 'रंध्रात पेरिली मी आषाढ दर्द गाणी' ही पं. जितेंद्र अभिषेकी यांनी गायलेली प्रसिद्ध स्वररचना सादर केली. विराणीची हुरहूर अस्वस्थ करीत असताना नंतरच्या 'आम्हा न कळे ज्ञान' या चोखाबांच्या रचनेने आणि 'अवघे गरजे पंढरपूर' या भक्तीगीताने सभागृह भक्तीमय झाले. २०जुलै २०१९ रोजी झालेल्या या कार्यक्रमात आनंद अत्रे (हार्मोनियम) नितीन पवार (तबला) व सुखदा बेहेरे, केतन इनामदार, अजिंक्य जोशी, शुभंकर हिंगणे, अमोल पाळेकर यांनी साथसंगत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. स्मिता मालपुरे यांनी केले.

४.३० **चित्रपट चावडी: 'नॉस्टॅलजिया' :-** 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध रशियन दिग्दर्शक आंद्रे तारकोवस्की यांचा 'नॉस्टॅलजिया' हा चित्रपट ३ ऑगस्ट, २०१९ रोजी दाखविण्यात आला.

हा चित्रपट म्हणजे रशियन कवी आंद्रे गोर्शकोव्ह व त्याची दुभाषी युजेनिया यांचा अठराव्या शतकातील इटली मधील एका छोट्या स्पा असलेल्या शहरातील रशियन संगीतकाराचा शोधाचा प्रवास आहे. शांततेचा अतिशय प्रभावीपणे केलेला वापर, अप्रतिम छायाचित्रण व अतीताची ओढ ह्यामुळे नॉस्टॅलजिया एक अविस्मरणीय अनुभव देऊन गेला. १९८३ साली प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचा कालावधी १२५ मिनिटांचा होता.

४.३१ **सूर विश्वास :-** सूर विश्वासचे सातवे पुष्प गायिका कल्याणी दसककर-तत्त्ववादी यांच्या गायनाने १०ऑगस्ट, २०१९ रोजी गुंफले गेले. ईश्वरी दसककर (हार्मोनियम), सारंग तत्त्ववादी (तबला), गंधाली आफळे (तानपुरा) यांनी साथसंगत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनायक रानडे यांनी केले. 'विश्वास ग्रुप'चे कुटुंबप्रमुख विश्वास ठाकूर हे या उपक्रमाचे आयोजक होते. संकल्पना विनायक रानडे यांची होती.

विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल काही मान्यवरांना यावेळी सन्मानित करण्यात आले. त्यात 'पं. भीमसेन जोशी पुरस्कारा' बद्दल पं. अविराज तायडे यांना तर कवी किशोर पाठक यांना 'बेचकीत जन्मतो जीव' या काव्य संग्रहाच्या पुरस्कारांबद्दल व चित्रकार रविंद्र दंडगव्हाळ यांना भारतीय डाक सेवेच्या राष्ट्रीय चित्र स्पर्धेत पुरस्काराबद्दल ॲड. नंदकिशोर भुतडा, कॅप्टन आनंद बोडस व विश्वास ठाकूर यांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले. कलाकारांचा सत्कार डॉ. विकास गोगटे, देवेंद्र बापट, आर्कि संजय पाटील व विश्वास ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला.

४.३२ **युवा स्वतंत्रता ज्योत रॅली :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागातील केंद्र नाशिक, नवमहाराष्ट्र युवा अभियान, विश्वास को. - ऑप. बँक लि., नाशिक विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ विश्वास गार्डन यांच्या संयुक्त विद्यमाने ७३व्या स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला, १४ ऑगस्ट २०१९ रोजी युवा स्वतंत्रता ज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आले. सायंकाळी ७ वाजता हुतात्मा चौक,

गंगापूर रोड येथून रॅलीला प्रारंभ झाला. गंगापूरनाका, के.टी.एच.एम. महाविद्यालय, अशोकस्तंभ, मेहेर सिग्नल, हुतात्मा स्मारक सीबीएस येथे रॅलीचा समारोप झाला. त्यावेळी राज्यघटनेच्या सरनाम्याचे वाचन. डॉ. मनोज शिंपी, विनायक रानडे यांच्या बरोबर उपस्थितांनी केले, भारतमातेच्या वेशातील मुलगी सजविलेल्या रथात विराजमान झालेली होती. यावेळी उपस्थित युवकांनी देशभक्तीपर गीतांनी व घोषणांनी वातावरणात चैतन्य निर्माण केले. रॅलीत अनेक सामाजिक संस्था उत्स्फूर्तपणे सहभागी झाल्या होत्या. रॅलीमध्ये प्रसाद पाटील, कैलास पाटील, विनय अंधारे, जयंत जोगळेकर, भूषण काळे, मिलिंद धटिंगण, विक्रम उगले, सारिका देशपांडे, गोरख चव्हाण, वसंत ठाकरे, विवेकराज ठाकूर, मंदार ठाकूर, कैलास सूर्यवंशी, किशोर त्रिभुवन, रमेश बागुल, सुरेश वाघ, भूषण भोसले, महेंद्र पवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले होते.

४.३३ **स्वातंत्र्य दिन :-** देशासाठी लढणाऱ्या वीरांचं स्मरण करून देशभक्तीचा, क्रांतीचा आविष्कार कवींनी प्रभावीपणे सादर करून वातावरण जल्लोष निर्माण केला. 'स्वातंत्र्य' जपण्यासाठी देश रक्षणासाठी सर्वांनी सज्ज राहायला हवे असा निर्धारच कवितांमधून कवी मांडत होते. मातृभूमीला स्वतंत्र करण्यासाठी जीवाचे रान करणाऱ्या सैनिकांचे स्मरणही कवितांतून येत होते, 'स्वातंत्र्याचे गीत नव्याने गाऊ' या विषयावरील कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात हा आविष्कार रसिकांना अनुभवण्यास मिळाला.

कवी संमेलनाचे अध्यक्ष म्हणून सुप्रसिद्ध कवी अशोक निलकंठ सोनवणे उपस्थित होते. संमेलनाचे सूत्रसंचालन कवी रविंद्र मालुंजकर यांनी केले. कार्यक्रमाची संकल्पना प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष विश्वास जयदेव ठाकूर यांची होती.

कवींनी 'स्वातंत्र्य' या विषयावरील कवितांचे सादरीकरण केले. त्यात पोवाडा, गझल, गेय कविता अशा विविध प्रकारातून देशाविषयी, आपल्या भावना व्यक्त केल्या. यामध्ये शालेय विद्यार्थी ते ज्येष्ठ कवी नाशिकबरोबरच निफाड, सिन्नर, पिंपळगाव, घोटी येथून सहभागी झाले होते. दर्जेदार कविता व कवींची उत्स्फूर्त उपस्थिती नाशिकच्या काव्य क्षेत्रासाठी निश्चितच अभिमानास्पद आहे.

कवी राज शेळके यानी 'स्वातंत्र्याचे प्रतीक आमच्या अभिमानाची भाषा, एकजुटीने निशाण, आमच्या जगण्याची अभिलाषा, भारतभूच्या जयकाराला गर्वाने गर्जतो एक तिरंगा, अखंड हिंदुस्थानाला पोसतो,' या ओळीतून देशाची अखंडता, अभिमान व्यक्त केला.

कवी अरुण सोनवणे यांनी 'उज्ज्वल माझा देश तयाची उर्जस्वल ही माती, या मातीशी इमान अमुचे, या मातीशी नाती' या ओळीतून ,मातीशी इमान राखण्याचे आश्वासन दिले व देशाच्या समृद्धीची लौकिकाची जाणीव करून दिली. कवी प्रशांत केंदळे यांनी 'या मातीचा वास मिळाला, आभाळाचा श्वास मिळाला, स्वातंत्र्याचा अर्थ कळाया, मोठ्ठा कारावास मिळाला' यातून प्राणपणाने लढणाऱ्या वीरांचे स्मरण केले व स्वातंत्र्याचा अर्थ कष्टातून मिळाल्याची जाणीव व्यक्त केली. विविध कवींनी आपल्या दर्जेदार कविता सादर केल्या. त्यात रमेश हरी संवत्सरकर, चंद्रकांत वासुदेव गोडबोले, पांडुरंग यादव पानसरे, शुभम दिगंबर मोरे, अमोल नामदेव चिने, राधाकृष्ण साळुंके, गणेश पवार, नामदेव जाधव, विलास पंचभाई, अजय बिरारी, वृषाली साटम-पोहरे, सचिन मोहिते, विलास गोडसे, प्रशांत कापसे, शिवाजी क्षीरसागर या कवींचा समावेश होता.

४.३४ **शिक्षण कट्टा : शाडू माती गणेश मूर्ती कार्यशाळा :-** पर्यावरणाचे जतन व संवर्धन ही आपली सर्वांची जबाबदारी असून त्यासाठी 'ईको फ्रेंडली' ही संकल्पना प्रत्येकाने आपल्यात रुजवणे म्हणजे निसर्गाशी मैत्री होय. त्यासाठी शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करून प्रत्येकाने आदर्श निर्माण करावा असे प्रतिपादन सौ. राजश्री शिंपी यांनी केले.

कार्यक्रमाचे आयोजन २० ऑगस्ट २०१९ रोजी महानगरपालिका शाळा क्र. ४३, अटल बिहारी वाजपेयी प्राथमिक विद्यामंदिर, काठे गल्ली येथे करण्यात आले होते. संकल्पना विश्वास ग्रुपचे कुटुंबप्रमुख विश्वास जयदेव ठाकूर

यांची होती. पर्यावरण जागृतीचा, रक्षणाचा अनोखा संदेश देणारी 'शाडू माती पासून गणेश मूर्ती कार्यशाळा' विद्यार्थ्यांमध्ये नवी जाणीव निर्माण करणारी ठरली. यात १००हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभग घेतला. सौ. शिंपी यांनी शाडू मातीचे फायदे विशद केले व विद्यार्थ्यांकडून गणेश मूर्ती बनवून घेतल्या. गणेशोत्सवात ध्वनी व जलप्रदूषण होत असल्याने ते रोखण्याचे आवाहन केले. कार्यशाळेचे स्वागत व प्रास्ताविक मुख्याध्यापक प्रशांत पाटील यांनी केले. ते म्हणाले, पर्यावरणाविषयी लोकजागृती करण्यासाठी शाळा-महाविद्यालयांमधून असे उपक्रम राबवण्याची गरज आहे. त्याच प्रयत्नांचा हा भाग आहे. यावेळी शाळेचे शिक्षक धनंजय शुक्ला, नामदेव बागूल, रोहिदास कोकणी, अंकुश तळपे, निता आमले यांनी मेहनत घेतली. या प्रसंगी मनिषा पगारे, ममता जाधव, ज्ञानेश्वर शिरसाठ उपस्थित होते.

शाडू मातीपासून गणेश मूर्ती कार्यशाळेचे आयोजन राजश्री शिंपी यांच्या मार्गदर्शनाखाली पंचवटी माध्यमिक विद्यालय, क्रांती नगर, पंचवटी येथे २१ ऑगस्ट २०१९ रोजी करण्यात आले होते. यात ११०हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्वागत व प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक व्ही.के.आहिरे यांनी केले. दीपांजली महाजन यांनीही मार्गदर्शन केले. शाळेचे शिक्षक एस.एस.आव्हाड. सौ.एन.सी.कारे, व्ही.एन.सोमवंशी., एम.डी.चव्हाण, जी.व्ही.लहामगे, ए.के.निकुळे, पूनम सोनवणे व सेवक एस.एस.आहिरे यांनी बरीच मेहनत घेतली. या प्रसंगी मनिषा पगार, ज्ञानेश्वर शिरसाठ उपस्थित होते.

४.३५ **'यशवंत शब्द गौरव महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा'**:- समाज संकेतांना धक्का देणारी माध्यमक्रांती झाल्याने लोकशाहीची प्रक्रिया तीव्र होईल अशी जाणीव निर्माण होण्याऐवजी आज आपण जास्तीत जास्त व्यक्तिवादी होत चाललो आहोत. त्यातूनच माणसांसामाणसांत हिंसा उफाळून येत आहे. ते रोखण्यासाठी उत्तम वाचन आणि सभोवतालाकडे सजगपणे पाहणे गरजेचे आहे व त्यासाठी माध्यमांचा अनावश्यक वापर टाळावा, असे प्रतिपादन प्रा. मिलिंद मुरूगकर यांनी केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियान व एच.टी.पी. कला, आर.वाय.के. विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने २२ऑगस्ट २०१९ रोजी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता विभागीय यशवंत शब्दगौरव महाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. एच.पी.टी. महाविद्यालयात ही स्पर्धा झाली. स्पर्धेत नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगांव येथील महाविद्यालयातून शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेतील विजेते खालीलप्रमाणे :

**प्रथम क्रमांक :** श्रुती बोरस्ते (एच.पी.टी.कला व आर.वाय.के विज्ञान महाविद्यालय, नाशिक)

**द्वितीय क्रमांक :** सौरभ सोनार (डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेज, धुळे)

**तृतीय क्रमांक :** शुभांगी ढोमसे (के.के.वाघ महाविद्यालय, पिंपळवाग (ब))

उत्तेजनार्थ गायत्री वडघुले (के.टी.एच.एम.महाविद्यालय, नाशिक)

उत्तेजनार्थ: महिमा ठोंबरे (एच.पी.टी. कला व आर.वाय. के.) 'विज्ञान महाविद्यालय, नाशिक

परीक्षक म्हणून प्रा. अनंत येवलेकर, डॉ. शंकर बोऱ्हाडे, डॉ. राजेंद्र सांगळे, डॉ. संजय चपळगावकर यांनी काम पाहिले.

पारितोषिक वितरण सोहळ्याचे स्वागत व प्रास्ताविक करतांना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र, नाशिकचे कार्याध्यक्ष विश्वास ठाकूर म्हणाले, विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्यात आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी, व्यक्तिमत्त्व विकासासाठी वक्तृत्व कला आवश्यक आहे. त्यासाठीच अधिकाधिक वक्ते निर्माण होऊन, विविध विषयांवर सखोल वाचन आणि विचार मंथन होऊन सदविचारांचा ओघ अखंड रहावा या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. परीक्षकांच्या वतीने मनोगत व्यक्त करतांना प्रा. अनंत येवलेकर म्हणाले, वक्तृत्व स्पर्धेत विषयाचे नेमके आकलन, अभ्यास, आवाजातील चढउतार यांचा संगम असणे महत्त्वाचे असते. अनेक विद्यार्थ्यांना यात उत्तम सादरीकरण केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही.एन.सूर्यवंशी म्हणाले की, नवनवीन वक्ते निर्माण होण्याची गरज असून अशा स्पर्धांमधून तो शोध घेता येतो.त्यासाठी हे व्यासपीठ आहे. ते निर्माण करण्यासाठी आम्ही प्रयत्न केला आहे. याप्रसंगी नवमहाराष्ट्र युवा अभियानचे संघटक निलेश राऊत, उपप्राचार्या डॉ. वृंदा भार्गवे, डॉ.लीना हुन्नरगीरकर, प्रा.बी.यु.पाटील, विश्वजीत कदम, डॉ. उदया बासरकर, भूषण काळे आदिंनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश अचिंतलवार, बागेश्री पारनेरकर, प्राजक्ता नागपुरे यांनी केले.

४.३६ **चित्रपट चावडी : 'द मिरर'** :- चित्रपट चावडी उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध रशियन दिग्दर्शक आंद्रे तारकोवस्की यांचा 'द मिरर' हा चित्रपट २४ ऑगस्ट २०१९ रोजी दाखविण्यात आला.

रशियन दिग्दर्शक कवी आंद्रे तारकोवस्कीचा हा आत्मचरित्रात्मक चित्रपट आहे. हा चित्रपट प्रवास, त्याची स्मृती व स्वप्न यांच्या सीमारेषांवर खेळतो. त्याचप्रमाणे त्यांच्या स्वदेशाची रशियाची ही कहाणी आहे.१९३०चे दशक, दुसरे महायुद्ध व १९७०चे दशक अशा कालखंडामध्ये विभागलेला हा चित्रपट इतिहास व एका प्रतिभावान चित्रपट दिग्दर्शकाची कहाणी यांचा अत्यंत काव्यात्मक मिलाफ आहे. १९७५साली प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचा कालावधी १०७ मिनिटांचा होता.

४.३७ **शिक्षक दिन** :- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र नाशिक, विश्वास ग्रुप व मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने मॉडर्न एज्युकेशन सोसायटीमधील सेवानिवृत्त व उपक्रमशील शिक्षकांचा सत्कार शिक्षक दिननिमित्त ५ सप्टेंबर रोजी आयोजित केला होता. त्याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून शिक्षणतज्ज्ञ सचिन उषा विलास जोशी होते.

विश्वास ठाकूर म्हणाले, शिक्षण ही जगण्याशी निगडित गोष्ट आहे. त्यातून नव्या जाणिवांना आकाश मिळायला हवे. गुरू हा जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर नवे शिकवत असतो. त्याचा आदर करावा. कार्यक्रमांत उपक्रमात उपक्रमशील शिक्षक-श्रीमती सुरेखा राजेश पालवे, श्रीमती जया दगडू पाटील, सौ. निलांबरी आनंद क्षीरसागर, कु. सिमिता अशोक रामराजे, सौ. वीणा दिपक वाणी, श्रीमती नूतन मोठाभाऊ देवरे, सौ. वैशाली संजय जवादे, सौ. रोहिणी रमाकांत देशपांडे, श्रीमती सीमा बाबुराव रुद्रवंशी, सौ. मेघा राहूल जोशी, सौ. धनश्री प्रविण देशमुख, सौ. दिपिका विलास पाटील, निलेश तिवारी तसेच सेवानिवृत्त शिक्षक सौ. अपर्णा अनिल जोशी, श्रीमती मंगला गणपत वनमाळी, श्री दिलीप दौलत पवार, श्रीमती सुनंदा वसंत सोनार, सौ.स्मिता सतिश गायधनी, सौ.निर्मला विकास शेलार, सौ. रत्नमाला श्यामकांत भदाणे, सौ. मंदाकिनी सुभाष कुलकर्णी, सौ. स्मिता हेमंत मुजुमदार, सौ. आशा मंगेश मिशाळ, सौ. उषा वसंत शुक्ल आदींचा समावेश होता. प्रातिनिधीक मनोगत स्मिता मुजुमदार, बाजीराव जोर्वेकर, सुरेखा पालवे यांनी मांडले, सचिन जोशी यांचा सन्मान प्रतिष्ठानचे सचिव डॉ. कैलाश कमोद यांनी केला. परिचय निलेश तिवारी यांनी केला.

सदस्य कविता कर्डक, मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष विलास हावरे, कार्याध्यक्ष रंगनाथ शिरसाठ, कोषाध्यक्ष मधुकर बनकर, सहसेक्रेटरी डॉ. जयराम खोडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन निलांबरी क्षीरसागर यांनी केले. आभार प्रदर्शन रंगनाथ शिरसाठ यांनी केले.

४.३८ **चित्रपट चावडी : 'वुमन अॅट वॉर'** :- सुप्रसिद्ध आईसलँड दिग्दर्शक बेनेडीक्ट एरलींगसन यांचा 'वुमन अॅट वॉर' हा चित्रपट ६ सप्टेंबर २०१९ रोजी दाखविण्यात आला. हाला ही साधारण पन्नाशीतील बाई कॉयर कंडक्टर व पर्यावरण अॅक्टीव्हीस्ट आहे. तिचे पर्यावरण प्रेम तिला भलतेच आव्हानात्मक आणि जोखमीची कामे करण्यात प्रवृत्त करते. तिच्या ह्या घातक कृत्यांमुळे आईसलँडचे सरकार व बहुराष्ट्रीय धातू कंपन्या चक्रावून जातात. त्यात हाला एका युक्रेनीयन मुलीला दत्तक घेऊ इच्छिते. पर्यावरणातील बदलामुळे होणारे दुष्परिणाम व ते थांबविण्यासाठी सज्ज झालेली हाला व तिचे वैयक्तिक आयुष्य, अशी थरारक व विनोदी कथा नक्कीच बोधक व रंजक आहे. २०१८ साली प्रदर्शित झालेल्या या

चित्रपटाचा कालावधी १०१ मिनिटांचा होता.

४.३९ **चित्रपट चावडी : 'वॉल्टज् विथ बशीर' :-** सुप्रसिद्ध इस्त्राईली दिग्दर्शक अरी फोलमन यांचा 'वॉल्टज् विथ बशीर' हा चित्रपट २१ सप्टेंबर २०१९ रोजी दाखविण्यात आला. 'वॉल्टस् विथ बशीर' हा चित्रपट पहिल्या इस्त्राईल व लेबॅनॉन युद्धावर, जे १९८० च्या दशकात घडले, त्यावर आधारित आहे. ही दिग्दर्शक अरी फोलमनचीच गोष्ट आहे. अरीने ह्या युद्धात भाग घेतला होता. पण त्याला त्याचे विस्मरण झाले आहे. ह्या विस्मरणातून तो अनेक गोष्टी ज्या भूतकाळात घडल्या त्याचा शोध घेतो आहे. स्वप्न व सत्य यांच्या सीमारेषेवरील त्याचा प्रवास तसेच युद्ध व त्याचे संहारक परिणाम असा हा विस्मयकारक प्रवास अद्भुत असाच होता. २००८ साली प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचा कालावधी ९० मिनिटांचा होता.

४.४० **सूर विश्वास:-** शब्द आणि शब्दातील आशय स्वरांतून निथळताना होणारी रुणझुण रसिकांना आनंद देत होती आणि गाण्यातील गोडवा अनोखी स्वरानुभूती देत होता. शब्दसुरांतून ओठांवर रेंगाळणारी जाणीव रसिकांनी अलगद आणि नकळतपणे जपूनही ठेवली. निमित्त होते, 'सूरविश्वास'चे आठवे पुष्प ते २८ सप्टेंबर २०१९ रोजी गायक ज्ञानेश्वर कासार यांनी गुंफले. डॉ. आशिष रानडे (हार्मोनियम), रसिक कुलकर्णी (तबला), श्रीपाद घोलप (तानपुरा), जागृती नागरे (तानपुरा), यांनी साथसंगत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनायक रानडे व डॉ. स्मिता मालपुरे यांनी केले. 'विश्वास ग्रुप'चे कुटुंबप्रमुख विश्वास ठाकूर हे या उपक्रमाचे आयोजक होते. संकल्पना विनायक रानडे यांची होती.

मैफलीची सुरुवात 'राग मियांकी तोडी' या रागाने झाली. शब्द होते 'अब तो मोरे राम' यातून आल्हाददायक वातावरण निर्माण झाले. शब्दांची, लयीची नजाकत यातून समोर आली. त्यानंतर बंदिश सादर केली. 'मै सन लागी,' आर्तता आणि आठवणींचा माहौल याची वीण अलगद उसवली गेली. या बंदिशीनंतर ज्ञानेश्वर कासार यांनी आपली रचना सादर केली. 'कासे कहु मन की बिचरा' तून मनाची खोलन अवस्था व्यक्त झाली. सुरांची ही मैफल राग अहिर भैरव रागापर्यंत येऊन ठेपली. पं. अविराज तायडे यांची रचना सादर झाली. शब्द होते 'आवरे अव शाम'. मैफिलीचा समारोप पं. जितेंद्र अभिषेकी यांनी गायलेल्या अभंगांनी केला. अभंग होते, 'सुखाचे जे सुख, चंद्रभागे तटी, पुंडलीका पाठी उभे ठाके' व 'अनंता तुला कोण पाहू शके, तुला गातसा वेद झाले मुके.' कार्यक्रमात विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. त्यात संगीत विषयात डॉक्टरेट पदवी प्राप्त केल्याबद्दल डॉ. आशिष रानडे, नृत्य विषयात डॉक्टरेट मिळाल्याबद्दल डॉ. सुमुखी अथनी, नवी दिल्ली येथील स्वर्ण भारत ट्रस्ट तर्फे शैक्षणिक क्षेत्रातील कार्याबद्दल 'नेक्स्ट जनरेशन अवॉर्ड' मिळाल्याबद्दल विजया लक्ष्मी मणेरीकर यांचा सन्मान अनुक्रमे सी. एल. कुलकर्णी, डॉ. मनोज शिंपी, पं. अविराज तायडे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. कलाकारांचा सन्मान पं. जयंत नाईक, श्रीराम तत्त्ववादी, एन.सी. देशपांडे, मोहन उपासनी, माधुरी कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला.

४.४१ **चित्रपट चावडी : 'पर्सेपोलीस' शनिवार ५ ऑक्टोबर २०१९ :-** 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध इराणी ॲनिमेशन दिग्दर्शक मार्जेन सत्रापी हिचा 'पर्सेपोलीस' हा चित्रपट दाखविण्यात आला. चार ॲनिमेशन पटांच्या मालिकेतील हा दूसरा चित्रपट हाही 'वॉल्टझ विथ बशीर' प्रमाणे आत्मचरित्रात्मक आहे. १९७९ च्या इराणमधील इस्लामिक क्रांतीच्या पार्श्वभूमीवर एका छोट्या, संवेदनशील, खेळकर मुलीची धीट आणि ध्येयवेडी कहाणी आहे. ही मुलगी अर्थातच मार्जेन सत्रापी स्वत:च आहे. क्रांतीपूर्व इराण हा प्रागतिक होता व एका उचभ्रू घरात रहाणारी मार्जेन अचानकपणे आलेल्या इस्लामिक क्रांतीच्या इंझावाताने हादरून गेली. त्यानंतर ती शिक्षणासाठी फ्रान्समध्ये आली. युरोपमधील मुक्त वातावरण तिला फारसे रूचले नाही. तिला मातृभूमीकडे परतण्याचे वेध लागले. हा तिचा प्रवास वैचारिक आंदोलनाने व भूराजकीय बदलांनी अत्यंत संस्मरणीय होतो. २००८ मध्ये प्रदर्शित झालेल्या या इराणी चित्रपटाचा कालावधी ९६ मिनिटांचा होता.

४.४२ **सूर विश्वास: पं. शंकरराव वैरागकर (गायक) शनिवार २६ ऑक्टोबर २०१९ :-** विश्वास ग्रूपतर्फे

'सूरविश्वास'चे नववे पुष्प पं. शंकरराव वैरागकर यांनी गुंफले. ओंकार वैरागकर (तबला), सागर कुलकर्णी (संवादिनी), अथर्व वैरागकर, ईश्वरी वैरागकर (स्वरसाथ), प्रसाद शेळके (पखवाज), अन्नपूर्णा सौन्दाणे (टाळ) यांनी साथसंगत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. स्मिता मालपुरे यांनी केले. मैफिलीची सुरूवात 'भैरव' रागाने केली. विलंबित बडा ख्यालचे शब्द होते 'बलमवा मोरे सैय्या'. मैत्रीपूर्ण नात्याती वीण उसवतानाच, आतला प्रेमाचा झरा, कितीही संकटे येऊ दे. तुझे माझे नाते चिरंतर आहे. हाच सूर यात होता. त्यानंतर छोटा ख्याल सादर केला. एकतालात 'हर हर महादेव' मधून परमेश्वराची आराधना करत भावभक्तिचे दर्शन समोर आले. यानंतर ठुमरी सादर केली. 'याद पिया की आये' या शब्दांतून आर्त जाणीव व्यक्त केली. या आर्तपूर्ण स्वरांनंतर 'किरवाणी' रागातील भजन सादर केले. 'जगत में झूठी देखी प्रीत' प्रीतीचं इतकं परखड दर्शन स्वरांतून नवा विचार देऊन गेले. मैफिलीचा समारोप 'वैकुंठीचा राया' या भैरवीने झाला. त्यात रसिक चिंब भिजले नसते तर नवलच. कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्याबद्दल मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. त्यात महाराष्ट्र गोवा बार अॅड. कौन्सिल अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अविनाश भिडे यांचा, 'कविताच माझी कबर' या संग्रहाला मिळालेल्या २१ पुरस्कारांबद्दल कवी संजय चौधरी यांचा आणि 'चित्रवेध' काव्य पुरस्काराबद्दल तन्वी अमित यांचा सन्मान शंकरराव वैरागकर यांच्या हस्ते करण्यात आला. कलावंतांचा सन्मान रमेश देशमुख, डॉ. मनोज शिंपी, सतीश गायधनी, शिल्पा कवीश्वर, विनायक देवधर, मिलिंद धटिंगण, माधुरी कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला.

४.४३ **चित्रपट चावडी : 'स्पिरीटेड अवे' शुक्रवार ८ नोव्हेंबर २०१९ :-** सुप्रसिद्ध जपानी दिग्दर्शक 'हयाओ मियाझाकी' यांचा 'स्पिरीटेड अवे' हा चित्रपट दाखविण्यात आला. आधुनिक संपन्न जपानमधील बिहीरो आणि तिच्या आईवडिलांची ही साधी सोपी गोष्ट आहे.

एका जुन्या मोडकळीला आलेल्या मनोरंजन उद्यानात हे तिघेजण अपघाताने येतात. तिथून मियाझाकी आपल्या पात्रांना एका वेगळ्याच परिकथेचा स्पर्श असलेल्या जगात घेऊन जातो. 'स्पिरीटेड अवे' ही एका अर्थाने आधुनिक परिकथाच आहे. 'चिहीरो' ही जपानच्या तरूण पिढीची प्रतिनिधी आहे. तिच्या पुढील पर्यायाने जपानी समाजापुढील अनेक आव्हाने व प्रश्न यांचा उहापोह चित्रपटात येतो.

मियाझाकी हे जपानचे अत्यंत नावाजलेले चित्रपट दिग्दर्शक आहेत. तसेच ते तत्त्वज्ञानी आहेत. २००१ मध्ये प्रदर्शित झालेल्या या जपानी चित्रपटाचा कालावधी १२५ मिनिटांचा होता.

४.४४ **सूर विश्वास : अमृता जोशी (गायिका) शनिवार दि. १६ नोव्हेंबर २०१९ :-** विश्वास ग्रूपतर्फे 'सूरविश्वास' चे दहावे पुष्प अमृता जोशी यांनी गुंफले, रसिक कुलकर्णी (तबला), कृपा परदेशी (संवादिनी), जास्वंदी जोशी (तानपुरा), केतकी गोरे (तानपुरा) यांनी साथसंगत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. स्मिता मालपुरे यांनी केले. मैफलीची सुरूवात बिलासखानी रागाने केली. बंदिश होती 'बिसरावे काहे बलमा'. या बंदिशीतून स्वरांचा धारदारपणा आणि माधुर्य एकाच वेळी समोर आले. त्यानंतर छोटा ख्याल सादर केला. 'दिन कटत रैन' मनाचं रितेपण आणि हळवेपण याचं प्रखरदर्शन यातून तिने घडवले. लोकगीत आणि शास्त्रीय संगीत यांचा अनोखा मिलाफ संगीतात आला आहे. त्याचीच अनुभूती 'राजस्थानी मांड' या गीत प्रकारातून दिली.

'सवारीया' या शब्दातून राजस्थानी जीवन व्यवहारांच्या परंपरांची जाणीव व्यक्त झाली. भावभक्ती व नामस्मरणातून वातावरणात चैतन्य निर्माण झाले. भजन होते 'गिरीधर के घर जाऊ'. यानंतर मैफलीत परमोच्च बिंदू गाठला तो भैरवीने. शब्द होते 'जीवन के दिन चार'. साथसंगत करणाऱ्या कलावंतांचा सन्मान मॉडर्न एज्युकेशन सोसायटीच्या विश्वस्त स्मिता गायधनी, राजश्री शिंपी, नाट्य समीक्षक एन.सी. देशपांडे, अॅड. प्रेरणा देशपांडे, सुवर्णा महाबळ यांच्या हस्ते करण्यात आला.

४.४५ **'सर्वसामान्य माणूस आणि भारतीय अर्थव्यवस्था' या विषयावर व्याख्यान रविवार २४ नोव्हेंबर २०१९ :-**

जागतिकीरणाचा वेग प्रचंड वाढला होता. त्यासोबत भारताचा आर्थिक विकासाचा दर कमी होता. यांची सांगड घालणे आपल्याला अवघड गेले. त्याचा परिणाम कृषी क्षेत्रावर झाला आणि त्यातूनच कृषी मालाला कमी भाव, शेतकरी आत्महत्या यांचे प्रमाण वाढलेय परकीय चलन आवक कमी झाली. लोकसंख्य अनियमित वाढ झाली आणि त्याचा स्वाभाविक परिणाम अर्थव्यवस्थेवर झाला आहे. सरकारी धोरणे आणि आर्थिक व्यवस्थापन यांचा समन्वय साधणे हे आज देशापुढे मोठे आव्हान आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार यमाजी मालकर यांनी केले. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व थोर नेते स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या ३५व्या पुण्यतिथीच्या पूर्वसंध्येला ज्येष्ठ पत्रकार यमाजी मालकर यांचे 'सर्वसामान्य माणूस आणि भारतीय अर्थव्यवस्था' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. मालकर पुढे म्हणाले, की शेतकरी, शेतमजूर हा फार मोठा वर्ग आपल्या देशात आहे. त्याचबरोबर मध्यमवर्गीय हा वर्ग आर्थिक विकासात महत्त्वाचा घटक आहे. सर्वसामान्य माणसाची या अर्थव्यवस्थेत दखल घेणे व त्याला आर्थिक पत मिळवून देणे, त्याला सामाजिक सुरक्षितता देणे गरजेचे आहे. सर्वसामान्यांची विविध पातळ्यांवर आर्थिक कोंडी होऊ न देणे हे महत्त्वाचे आहे. रोजगाराच्या संधी निर्माण होणे ही काळाची गरज आहे. शेअर बाजार, म्युच्युअल फंड याविषयी समाजात आर्थिक सुरक्षितता म्हणून एक नवा दृष्टिकोन येत आहे, तो महानगरांबरोबरच गावपातळीवर येत आहे. हा एक बदल दिलासा देणारा आहे. ऑनलाईन मार्केटिंगकडेही लोक आकर्षित होत आहेत. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोषाध्यक्ष डॉ. सुधीर संकलेचा यांनी केले. तर सचिव डॉ. कैलास कमोद यांनी केले. यमाजी मालकर यांचा सत्कार डॉ. कैलास कमोद यांनी केला. तर अंजली यमाजी मालकर यांचा सन्मान प्रतिष्ठानचे सदस्य ॲड. नितीन ठाकरे यांनी केला. डॉ. सुधीर संकलेचा यांनी यमाजी मालकर यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमास संजय करंजकर, डॉ. शंकर बोऱ्हाडे, ॲड. संजय मुंदडा, सतीश गायधनी, बीएसएनएलचे महाव्यवस्थापक नितीन महाजन, धावा मालुंजकर, डॉ. हेमंत कोतवाल, सुधीर पगार, मंगेश जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

४.४६ **चित्रपट चावडी: 'रूबेन ब्रँड' शनिवार, ३० नोव्हेंबर २०१९:-** 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध हंगेरीयन दिग्दर्शक मिलोरॅड क्रस्टीक यांचा 'रूबेन ब्रँड' हा चित्रपट दाखविण्यात आला. रूबेन ब्रँड कलेक्टर हा मानसोपचार तज्ञ असून स्वत:च भयंकर स्वप्नांनी पछाडलेला आहे. जगप्रसिद्ध चित्रपटांतील पात्रे त्याला त्याच्या स्वप्नात येऊन छेडतात. ह्या दु:स्वप्नातून बाहेर पडण्यासाठी ती १३ जगप्रसिद्ध चित्रे तो वेगवेगळ्या संग्रहालयातून चोरून आणतो. त्याकरिता तो काही तज्ज्ञ चोरांची मदत घेतो. प्रत्यक्षात काय घडते यांची रोमांचकारी सफर अनुभवण्यासाठी हा चित्रपटच पहायला हवा. २०१८ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटात कालावधी ९६ मिनिटांचा होता.

४.४७ **चित्रपट चावडी : 'स्ल्युथ' शुक्रवार, १३ डिसेंबर २०१९:-** 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध इंग्रजी दिग्दर्शक जोसेफ मॅकीवाईज यांचा 'स्ल्युथ' हा चित्रपट दाखविण्यात आला. 'स्ल्युथ' हा अँथनी शॅफर यांचा चित्रपट त्याच नावाच्या नाटकावर आधारित होता. अँड्र्यू वाईक हा यशस्वी हेरकथा लेखक आहे. मिलो टिंडेल त्याच्या बायकोचा प्रियकर व केशभूषाकार त्याला भेटायला येतो. लेखकाच्या आलिशान घरात एक खेळ सुरू होतो व रंगतच जातो. चित्रपटाचा शेवट अत्यंत विलक्षण होता व रसिकांसाठी एक वेगळा अनुभव होता. १९७२ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचा कालावधी १३८ मिनिटांचा होता.

४.४८ **सूर विश्वास शनिवार १४ डिसेंबर २०१९:-** विश्वास ग्रुपतर्फे 'सूरविश्वास' चे अकरावे पुष्प अनिता माजगांवकर-कुलकर्णी यांनी गुंफले. नितीन वारे (तबला), ईश्वरी दसककर (संवादिनी) यांनी साथसंगत केली. मैफिलीची सुरूवात भैरव रागातील 'बडा ख्याल'ने झाली. विलंबित एकतालाचे शब्द होते 'बलमवा मोरे सैय्या'. प्रेमाच्या नात्याची आर्त धून आणि त्यातून येणाऱ्या स्वराची आस त्यातून प्रभावीपणे मांडली गेली. त्यानंतर तीनतालातील छोटा ख्याल सादर केला गेला. 'जागो मोहन प्यारे' तून स्वरांचे अलवारपण आणि ईश्वर भक्तीची आस प्रतीत झाली. या भक्तिमय वातावरणानंतर

'वंदू गणपती विघ्न विनाशन्' या रागावर आधारित गीताने मनातील इच्छा, आकांक्षा पूर्ण होवोत ही मागणी केली. मैफलीचा समारोप 'शंकरी चरण मे' या अहिर भैरव रागातील गीताने झाला. जीवन जगण्याचे नवे भान आणि अध्यात्मची सांगड हे मैफलीचे प्रमुख सूत्र होते. उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींचा सन्मान सूरविश्वास मैफिलीत करण्यात येतो. इगतपूरी तालुका ग्रामीण साहित्य संमेलनाध्यपदी निवडीबद्दल लेखक विवेक उगलमुगले यांचा सन्मान करण्यात आला. कलावंतांचा सन्मान संजीवनी कुलकर्णी, अनुराग केंगे, राजा पाटेकर, प्रियांगी गोसावी यांचे हस्ते करण्यात आला. आभार प्रदर्शन विश्वास ज्ञानप्रबोधिनी अॅण्ड रिसर्च इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष डॉ. मनोज शिंपी यांनी केले.

४.४९ **चित्रपट चावडी : 'ग्लेनगरी ग्लेन रॉस' शुक्रवार, २० डिसेंबर २०१९ :-** 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध दिग्दर्शक जेम्स फोले यांचा 'ग्लेनगरी ग्लेन रॉस' हा चित्रपट दाखविण्यात आला. चित्रपट चावडीत विविध नाटकांवर आधारित चित्रपट दाखविण्यात आले. त्यातला हा दुसरा चित्रपट, त्यातील हा चित्रपट नाटककार डेव्हिड मॅमेट यांच्या 'पुलित्झर' पारितोषिक सन्मानित 'ग्लेननरी ग्लेन रॉस' या नाटकावर आधारित होता. एका रिअल इस्टेटमध्ये नोकरीस असलेल्या विक्रेत्यांना येणाऱ्या संकटांचा सामना या चित्रपटात दाखविण्यात आलेला आहे. अस्थिर जगण्यातून येणारी हतबलता आणि त्यातून लढण्यासाठी येणारे बळ हे या चित्रपटाचे सूत्र आहे. ४९व्या व्हेनिस फिल्म फेस्टिव्हलमध्ये या सिनेमाचा जागतिक प्रिमियर आयोजित करण्यात आलेला होता. १९९२ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचा कालावधी १०० मिनिटांचा होता.

४.५० **फ्यूजन-२०१९ संगम सप्तकलांचा... मंगळवार, ३१ डिसेंबर २०१९ :-** सरत्या वर्षाची सायंकाळ आणि सुरांची बरसात यांचा अनोखा मेळ होऊन जीवन जगण्याचे बळ व सकारात्मक जाणिवा यांचे आनंदी चांदणे बरसून गेले. प्रत्येक रसिकाने मनात सुरांची आठवन काळीजकुपीत आणि हृदयात निश्चित जपून ठेवली असेल. निमित्त होते नववर्षाच्या पूर्वसंध्ये नव्या संकल्पांची नवी मैत्री, नवी ओळख, आनंदाची जाणीव असलेल्या नवीन वर्षाची सुरूवात ही थोड्या आगळ्यावेगळ्या पद्धतीने व्हावी, यासाठी नावर्षाच्या पूर्वसंध्येला काही चांगले संकल्प घेऊन नवीन वर्ष आपण सर्वच एका वेगळ्या प्रकारे साजरा करावे या संकल्पनेतून विश्वास ग्रूप तर्फे विश्वास संकल्प आनंदाचा उपक्रमांतर्गत 'फ्यूजन-२०१९ : संगम सप्तकलांचा...' या अनोख्या मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. सांज सुरांची आठवण, सांज ये गोकुळी या गीतातून अलगद चालत आली आणि त्यानंतर सूर संगीत, ताल यांची अनोखी अनुभूती रसिकांना अमृतानुभव देऊन गेली. नृत्य, लावणी, भावगीत, समूहगीत, त्याचबरोबर शिल्पकला, चित्रकला यांचा अनोखा मिलाप जीवनाचे फ्युजन कसे सुंदर आकाराला येते याचे दर्शन घडविणारा होता. लखलख चंदेरी तेजाची न्यारी दुनिया, अधिर मन झाले, चांदणं-चांदणं झाली रात, वेडात मराठे वीर दौडले सात, पाहिले न मी तुला... तू मला..., वाऱ्यावरती गंध पसरला नाते मनाचे आम्ही ठाकरं ठाकरं, लिंगोबाचा डोंगर, श्रावणाचं ऊन मला झेपेना, उगवली शुक्राची चांदणी अशा एकाहून एक सरस गीतांतून मैफिलीला रंग चढत गेला. हिंदी, मराठी गीतांमधला आशय आणि त्यातून मिळणारा संगीतानुभव भारतीय चित्रपट संगीताचा सुरमयी प्रवासच होता. याद किया दिल ने कहां हो तुम, अजि रूठ कर अब कहाँ जाइयेगा, अभी ना जाओ छोडकर अशा गीतांमधली नजाकत जीवनावरचं प्रेम आणि आशयाचं दर्शन घडविणारी होती. सचिन शिंदे दिग्दर्शित विनोदी नाट्यप्रवेशाने रसिकांना नाट्यानुभवाची अनोखी हास्यानुभूती दिली. आयुष्यातल्या रोजच्या विसंगतीवर यात नेमके बोट ठेवले. विश्वास गार्डन, ठाकूर रेसिडेन्सी, सावरकरनगर, गंगापूर रोड येथे सदर मैफल संपन्न झाली.

कार्यक्रमाची संकल्पना विश्वास ग्रूपचे कुटुंबप्रमुख विश्वास जयदेव ठाकूर यांची होती तर संयोजक मिलंद धटिंगण हे होते. सदर उपक्रमाचे हे ५ वे वर्ष असून नववर्षाच्या पूर्वसंध्येला वेगळे आणि अभिरूचीसंपन्न कार्यक्रम करण्याची परंपरा विश्वास ग्रूपने राखली आहे. शब्द-सूर-ताल-रंगरेषा या समन्वयातून रसिकांना वैशिष्ट्यपूर्ण आविष्कार अनुभवण्यास

मिळालाय. चित्र, शिल्प, गायन, नृत्य यांची ही विविधरंगी मैफल आनंदानुभव देणारी ठरली, संयोजक-मिलिंद धटिंगण, गायन-मकरंद हिंगणे, मिलिंद धटिंगण, विवेक केळकर, मीना परूळकर-निकम, शुंभकर हिंगणे यांनी केले. सहगायन तन्मयी घाडगे, दिशा दाते, जुई आंबेकर यांनी केले. नृत्यविष्कार डॉ. सुमुखी अथणी व सहकारी कलावंतांनी सादर केला. तसेच नाट्यविष्कार दत्ता पाटील, सचिन शिंदे, शुभम लांडगे, निलेश सूर्यवंशी, रोहित सरोदे व लक्ष्मण कोकणे यांनी सादर केले. चित्र-भारती हिंगणे, शिल्पकला- यतीन पंडीत, तबला-नितीन वारे हे कलाकार असून वाद्यवृंद कलाकार - अमोल पाळेकर, रागेश्री धुमाळ, शुभम जाधव, जय शेजवळ, अनिल धुमाळ, दिंगबर सोनवणे, दिनेश पडाया यांनी त्यांना साथ दिली. संहिता व निवेदन किशोर पाठक यांचे होते, तर ध्वनी व्यवस्था व प्रकाश व्यवस्था सचिन तिडके यांची होती. कार्यक्रमाच्या वेळी नाशिकचे पोलीस आयुक्त विश्वास नांगरे-पाटील यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, की समाजाला आनंद देण्यासाठी विश्वास संकल्प आनंदाचा ही जनमानसाची चळवळ बनली असून समाजाला विधायक कार्याची प्रेरणा देणारी आहे. यातून नव्या पिढीलाही दिशा मिळेल. कार्यक्रमास महसूल उपायुक्त रघुनाथ गावेड, डॉ. कैलास कमोद, विलास हावरे, दिपक करंजीकर, डॉ. प्रदीप पवार, विलास हावरे, अजित मोडक, जयंत भातंबरेकर, जालींदर ताडगे, रमेश देशमुख, प्रतापदाद सोनवणे, ॲड. नितीन ठाकरे, विद्या करंजीकर व रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. स्मिता मालपुरे यांनी केले. स्वागत व प्रास्ताविक विश्वास ग्रूपचे कुटुंब प्रमुख विश्वास ठाकूर यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. मनोज शिंपी यांनी केले. विनायक रानडे, डॉ. मनोज शिंपी हे समन्वयक होते.

४.५१ **विश्वास आर्थिक साक्षरता अभियान मंगळवार, ३१ डिसेंबर २०१९ :-** महिलांसाठी पौष्टिक आहार आणि स्वच्छता आणि महिलांच्या सुरक्षिततेसाठी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. बहुसंख्य महिलांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. मुंबई नाका पोलीस स्टेशनमधील पोलीस उप निरीक्षक रेश्मा अवतारे, नाशिक पोलीस आयुक्तालय संचालित निर्भया पथकामधील पोलीस उप निरीक्षक नेहा सूर्यवंशी, 'चाईल्ड, नाशिक' च्या समुपदेशक विजया शिंदे, रेडिओ विश्वास ९०.८ सामुदायिक रेडिओचे स्टेशन डायरेक्टर हरी कुलकर्णी आदी मान्यवर या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. पोलीस उप निरीक्षक रेश्मा अवतारे यांनी उपस्थित महिलांशी संवाद साधताना मुलींचे शिक्षण व त्याचे महत्त्व पटवून दिले. आजच्या युगात. महिलांनीच महिलांसाठी खंबीरपणे खंबीरपणे उभे राहणे आवश्यक असून त्यांच्या सुरक्षिततेसाठी त्यांनी एकत्र येणे गरजेचे आहे, महिला एकजुटीने कोणत्याही समस्येला सामोरे जाऊ शकतात. तसेच मुंबई नाका पोलीस स्टेशन सदैव तुमच्या मदतीसाठी तत्पर असेल अशी ग्वाही दिली. निर्भया पथकामधील पोलीस उपनिरीक्षक नेहा सूर्यवंशी यांनी उपस्थित महिलांसोबत हितगुज साधताना नागसेन नगर येथील महिलांना येणाऱ्या वैयक्तिक समस्यांपासून ते सामाजिक समस्यांपर्यंत तसेच घरगुती हिंसाचार होणाऱ्या महिलेस 'आम्ही आपणास मदत करू' असे आश्वासन दिले. या कार्यक्रमामध्ये पौष्टिक आहाराबाबत महिलांना माहिती मिळावी यासाठी पौष्टिक आहार पाककला स्पर्धा घेण्यात आली. १५ महिलांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. त्यांनी उपस्थित महिलांना पौष्टिक आहार म्हणजे काय आणि पौष्टिक आहार रोजच्या जेवणातून कसा घेतला जाऊन शकतो याची माहिती दिली. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून पोलीस नाईक अनिता पाटील, पोलीस कॉन्स्टेबल शुभांगी आवारे, आणि व्यवस्थापिका मनीषा पगारे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नागसेन नगर येथील विश्वास समितीच्या समिती प्रमुख सोनाली गांगुर्डे, नसरीन शेख, पुष्पा मोरे, लतिका साळवे, शकीला कुरेशी, सरला मोरे, तसेच विश्वास आर्थिक साक्षरता अभियानाच्या समन्वयिका निलोफर शेख, अलका शेळके, धनश्री मुळे, छाया साबळे, ममता जाधव आदींनी परिश्रम घेतले.

४.५२ **चित्रपट चावडी : 'डाऊट' शुक्रवार, ३ जानेवार २०२० :-** 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध अमेरिकन दिग्दर्शक जॉन पॅट्रीक शॅनले यांचा 'डाऊट' हा चित्रपट दाखविण्यात आला. नाटकावर आधारित चित्रपटांच्या मालिकेतील

हा तिसरा चित्रपट जॉन पॅट्रीक शॅनलेच्या नाटकावर आधारित होता. साठच्या दशकातील अमेरिकेत ब्राँकसमधील सेंट निकोलस.

चर्चमध्ये डाऊटचे कथानक पडते, मुख्याध्यापिका सिस्टर अलॉयसिस या कठोर स्वभावाच्या व कडक शिस्तीच्या भोक्त्या आहेत. डोरॉल्ड मिलर हा कृष्णवर्णीय विद्यार्थी शाळेत नव्याने दाखल होतो. फादर क्लीन आणि मुख्याध्यापिका सिस्टर अलॉयसिस या दोघांची शाळेच्या प्रशासनावर जबरदस्त पकड आहे.फादर क्लीन, सिस्टिर अॅलॉयसिस व डोनाल्ड मिलर यांच्यात नक्की काय नाट्य घडते ? कोणाला कुठल्या शंका सतावत असतात व त्यातून कुठले प्रश्न उभे ठाकतात ? याची उत्तरे या चित्रपटामध्ये पहावयास मिळाली. २००८ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचा कालावधी १०४ मिनिटांचा होता.

४.५३ **'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त व्याख्यान संपन्न शनिवार ११ जानेवारी २०२० :-** आज मराठी भाषेच्या वापराबाबत समाज पुरेशा प्रमाणात संवेदनशील नसून व्हॉट्सअॅप, फेसबुकमुळे भाषेचा नेमका आणि अर्थवाही वापर करणे लोक विसरत आहेत आणि त्यातून संवाद, आत्मीयता, आपलेपणा हरवून जात आहे. चिन्हांची भाषा उदयास येत असून व्यक्त होण्यासाठी अशा प्रकारची.

माध्यमे तोकडी ठरत आहेत. त्यासाठी मराठी भाषेच्या परंपरेकडे, साहित्याकडे, पुन्हा जाणे ही काळाजी गरज आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक स्वानंद बेदरकर यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक व विश्वास को-ऑप. बँक लि. नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त स्वानंद बेदकर यांचे 'वैभव मराठीचे' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. श्री. बेदरकर म्हणाले, की संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत सावता माळी, रामदास स्वामी या थोर संतांनी लिहिलेले अभंगाच्या रूपातले अक्षरसाहित्य सर्वांच्या जीवनास मार्गदर्शक आहे. संत नामदेवांनी 'नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी' तून भाषेचा वापर जनप्रबोधनासाठी केला. ती शिदोरी आपले संचित आहे. शाहिरी कवितेने भाषेच्या नाद आणि सौंदर्यात भर घातली. कवी केशवसुत, मर्ढेकर, नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ यांनी आपल्या कवितांतून काळावर भाष्य केले. भाषिक संक्रमण, घुसळण होऊन नवी भाषा नवा विचार देणारी ठरली. लोकसाहित्यातून आलेली भाषा आणि नवा विचार देणारी ठरली. लोकसाहित्यातून आलेली भाषा आणि आजची भाषा यांचा संयोग होऊन एक समृद्ध मराठी भाषा समोर आली आहे. आजच्या पिढीने, तरूणांनी सकस साहित्याचे वाचन करावे, भाषेचा अभिमान ठेवावा व मराठी भाषा जगवण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहनही केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक करताना बँकेचे संस्थापक अध्यक्ष विश्वास ठाकूर म्हणाले, की भाषा हे संवादाचे प्रभावी माध्यम आहे. मराठी ही बोलीभाषेतून समृद्ध झालेली भाषा आहे. लहानपणापासून प्रत्येक मूल अभिव्यक्तीसाठी शब्दांशी जवळीक साधते आणि त्यातून त्याचा व्यक्तिमत्व विकास होतो. आजच्या काळात स्वत:ची हरवलेली भाषा जोपासण्याची गरज आहे. त्यासाठी अशा उपक्रमांची मदतच होईल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुधीर संकलेचा यांनी केले. विश्वास को-ऑप. बँकच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सारिका देशपांडे यांनी स्वानंद बेदरकर यांचा परिचय करून दिला, तर विश्वास ठाकूर यांनी त्यांचा सन्मान केला. कवी नरेश महाजन यांच्या सन्मान बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रसाद पाटील यांनी, तर किरण निकम यांचा सन्मान महाप्रबंधक रमेश बागुल यांनी केला.

प्रशांत वाखारे यांचा सन्मान सारिका देशपांडे यांनी केला. वेदांशू पाटील यांचा सत्कार व्यवस्थापक कैलास आव्हाड यांनी केला. सदर कार्यक्रमास मोठ्या संख्येने साहित्य रसिक उपस्थित होते.

४.५४ **विश्वास आर्थिक साक्षरता अभियान शनिवार ११ जानेवारी २०२० :-** विश्वास आर्थिक साक्षरता अभियान वडाळा गांव येथील मारूती मंदिर येथे राजवाडा, रामोशी वाडा, माळी गल्ली येथे झाले विश्वास समितीच्या माध्यमातून महिलांसाठी पौष्टिक आहार आणि स्वच्छता आणि महिलांच्या सुरक्षितता यांवरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. बहुसंख्य

महिलांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. इंदिरानगर पोलीस स्टेशनमधील पोलीस उपनिरीक्षक सतीश जगदाळे, पोलीस उपनिरीक्षक सुहासिनी बारेला व दिनेश पाटील, चाईल्ड लाईन नाशिकच्या शहर समन्वयक प्रणिता तापकिरे, रेडिओ विश्वास ९०.८ सामुदायिक रेडिओचे स्टेशन डायरेक्टर डॉ. हरी कुलकर्णी, व्यवस्थापिका मनीषा पगारे आदी मान्यवर या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. पोलीस उप निरीक्षक सतीश जगदाळे यांनी उपस्थित महिलांशी संवाद साधताना आजच्या युगात महिलांनीच महिलांसाठी खंबीर राहणे महत्वाचे असून तुमच्या सुरक्षिततेची जबाबदारी प्रथम तुमची स्वत:ची आहे. त्यानंतरही काही घडल्यास आम्ही सदैव तत्पर आहोत अशी ग्वाही दिली. पोलीस उप निरीक्षक सुहासिनी बारेला यांनीही यावेळी उपस्थित महिलांसोबत संवाद साधला, यावेळी महिलांसोबत घडणाऱ्या गुन्ह्याबाबत तुम्ही नि:संकोचपणे आम्हाला कळवू शकता; तुम्हाला तक्रारदार म्हणून नाव समोर येण्याची भीती असल्यास तुमचे नाव गुप्त ठेवण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले. तसेच महिलांना कोणत्याही प्रकारची अडचण असल्यास त्या समक्ष इंदिरानगर पोलीस स्टेशनमध्ये येऊन भेटू शकतात, असेही त्या यावेळी म्हणाल्या. चाईल्डलाईन, नाशिकच्या शहर समन्वयक प्रणिता तापकिरे यांनी उपस्थित महिलांना चाईल्डलाईन, नाशिकच्या कार्याबाबत माहिती दिली. संरक्षणाची गरज असलेल्या मुलांना चाईल्डलाईन, नाशिक मार्फत कशा पद्धतीने मदत होऊ शकते याबद्दल आणि मुलांच्या बदलल्या मानसिकतेविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच रेडिओ विश्वास ९०.८ सामुदायिक रेडिओचे स्टेशन डायरेक्टर डॉ. हरी विनायक कुलकर्णी यांनी उपस्थित महिलांना पौष्टिक आहार म्हणजे काय आणि पौष्टिक आहार रोजच्या जेवणातून कसा घेतला जाऊ शकतो याची माहिती दिली. 'पोषक आहार' विषयी मार्गदर्शन केले. अन्न हे ॲल्युमिनियमच्या भांड्यांमध्ये न शिजविता लोखंडी भांड्यामध्ये शिजविणे, तसेच हिरव्या पालेभाज्या व फळभाज्या यांचा रोजच्या आहारात समावेश करणे हे कुटुंबाच्या आरोग्याच्या दृष्टीने कसे महत्त्वाचे आहे हे समजावून सांगितले. या कार्यक्रमामध्ये पौष्टिक आहाराबाबत महिलांना माहिती मिळावी यासाठी पौष्टिक आहार पाककला स्पर्धा घेण्यात आली. २५ महिलांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला. या पाककला स्पर्धेमध्ये वृषाली योगेश विधाते (भाजलेल्या डाळ्यापासून पौष्टिक लाडू) यांना प्रथम, साधना देविदास विधाते (पालक वडी) यांना द्वितीय, तर उज्वला चेतन धनेधर (बाजरीच्या पिठाची शंकरपाळी) यांना तृतीय पारितोषिक देण्यात आले. उत्तेजनार्थ पारितोषिक भारती बाळासाहेब काजळे (कोथिंबीर वडी), संजीवनी शरद काजळे (गाजर हलवा) यांना देण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रामोशी वाडा, राजवाडा माळी गल्ली विश्वास समितीच्या पदाधिकारी अनिता वाघुळे, अलका खरात, दिपाली पवार, मीना खाडम, निशा सोनवणे, वैशाली शिरतार, आशा गुरूकुले, तसेच विश्वास आर्थिक साक्षरता अभियानाच्या समन्वयिका निलोफर शेख, अलका शेळके, धनश्री मुळे, छाया साबळे, ममता जाधव आदींनी परिश्रम घेतले.

४.५५ **चित्रपट चावडी : 'एक्स्ट्रीमिटीज्' शुक्रवार, १७ जानेवारी २०२० :-** 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध दिग्दर्शक रॉबर्ट यंग यांचा 'एक्स्ट्रीमिटीज्' हा चित्रपट दाखविण्यात आला. नाटकावर आधारित चित्रपटांच्या मालिकेतील हा चौथा चित्रपट 'विल्यम मॅस्ट्रोसिमॉन' यांच्या नाटकावर आधारित होता. बलात्कार करण्याच्या उद्देशाने व तशी पूर्वतयारी करून आलेला ज्यो आणि मार्जरी यांची ही कथा आहे. मार्जरी तिच्या दोन मैत्रिणींसह एक बंगल्यात राहत असते. बलात्कार होतो का ? तिच्या मैत्रिणींची नेमकी प्रतिक्रिया काय असते ? आज बलात्काराच्या अनेक घटना व त्यानिमित्ताने जे विचारमंथन होत आहे. त्या पार्श्वभूमीवर एक विचार करायला लावणारा हा चित्रपट होता. १९८६ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचा कालावधी ९० मिनिटांचा होता.

४.५६ **सूर विश्वास शनिवार, १८ जानेवारी २०२० :-** विश्वास ग्रूपतर्फे 'सूरविश्वास'चे बारावे पुष्प रजिंदर कौर यांच्या स्वरांनी गुंफले. सुजीत काळ (तबला), कृपा परदेशी (संवादिनी) यांनी साथसंगत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. स्मिता मालपुरे यांनी केले. नटभैरव रागाने त्यांनी मैफिलीची सुरूवात केली. शब्द होते 'लालन तुसे भली न हो' एक

अनाहत नाद आणि शब्दाशब्दांतून निथळणारा आशय यातून मैफल रंगत गेली. त्यानंतर 'दादरा' सादर केला. 'सैय्या मोरे तोरी बाकी नजरीया' या स्वरांतून आर्तता, प्रेम, आपुलकी ओसंडत होती. यानंतर पंजाबी भावभक्तीचा स्व शब्दमधून सादर केला. भक्ती आणि जीवन जगण्यातला आनंद यातून निनादत होता. 'सुन यार हमारे सजन' ही विनवणी होती. भैरवीने कार्यक्रमाची सांगता झाली. 'आयी शरण निहारी' तून परमेश्वर भक्तीची आस व्यक्त केली.महाराष्ट्र फाऊंडेशनतर्फे दिला जाणारा रा.शं. दातार नाटयगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल दत्ता पाटील यांना रमेश देशमुख यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कलावंतांचे सन्मान रागिणी कामतीकर, डॉ. मनोज शिंपी, अमर भागवत यांच्या हस्ते करण्यात आले. आभार प्रदर्शन विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूटटे अध्यक्ष डॉ. मनोज शिंपी यांनी केले.

४.५७ **आजच्या चित्रपटांचे विषय आशयप्रधान व नवा विचार देणारे - अशोक राणे (चित्रपट समीक्षक) शनिवार, १८ जानेवारी २०२० :-** 'सिनेमा हा सर्व कलांचा संगम असून आविष्कारांची अनेक रूपे त्यात असतात. सादरीकरणाच्या शक्यता सामावलेल्या असतात. सिनेमाच्या कुतुहलामुळे मी या माध्यमाकडे वळलो आणि तो जगण्याचा भाग झाला. फिल्म सोसायटीची चळवळ माझ्यासाठी जगण्याचं, सिनेमाचे विद्यापीठच होय. त्यातून मी घडत गेलो. आजचा सिनेमा बदलला असून आजच्या पिढीचे दृश्याविषयीचे आकलन बदलले आहे. त्यामुळे दृश्यभाषा बदलली आहे. वाढती चॅनेल्स, सिनेमांची निर्मिती वाढली आहे. त्यातून सिनेमाविषयीची व्याख्याच बदलली आहे. नव प्रश्न, काळाचे प्रश्न घेऊन येणाऱ्या सिनेमांना मागणी आहे,' असे प्रतिपादन ख्यातनाम चित्रपट समीक्षक अशोक राणे यांनी केले. अशोक राणे यांच्या 'सिनेमा पाहिलेला माणूस' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी त्यांची मुलाखत डॉ. कैलास कमोद यांनी घेतली. यावेळी त्यांनी आपला जीवनप्रवास कथन केला.

''१९९० पासून सिनेमा बदलत असून ॲक्टीव्ह ऑडियन्स तयार झाला आहे. आजच्या तरूण दिग्दर्शकांनी जुने मराठी-हिंदी सिनेमे आवर्जून बघावेत, परंपरा समजून घ्यावी व आपले वेगळेपण दिग्दर्शनातून सिद्ध करावे. मेहनत व अभ्यास करावा. मल्याळी चित्रपट क्षेत्र आधुनिक असून त्यात नवनवीन व आशयप्रधान सिनेमे तयार होत आहेत. प्रादेशिक सिनेमे बघावेत व आपली जाण समृद्ध करावी.''

दादासाहेब फाळके या चित्रमहर्षींनी आपल्याला सिनेमाचे नवे जग दाखवले व जगण्याला नवा विचार, आनंद दिला असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व अशोक राणे यांचा परिचय डॉ. सुधीर संकलेचा यांनी केले. डॉ. कैलास कमोद यांनी अशोक राणे व विवेक गरूड यांचा सन्मान केला. कार्यक्रमास विश्वास ज्ञान प्रबोधिनी व रिसर्च इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष डॉ. मनोज शिंपी, मिलींद धटिंगण, रघुनाथ फडणीस, श्रीकांत वाबळे, गजानन ढवळे, रणजित गाडगीळ, आशिष चव्हाण, विश्वास को-ऑप. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रसाद पाटील, चित्रपट रसिक मोठ्या संस्थेने उपस्थित होते.

४.५८ **'विश्वास आर्थिक साक्षरता अभियान' तर्फे हळदीकुंकू संपन्न सोमवार, २० ते शनिवार, २५ जानेवारी २०२० :-** 'विश्वास ग्रूप' मार्फत 'विश्वास आर्थिक साक्षरता अभियान' अंतर्गत मकरसंक्रांतीच्या निमित्ताने हळदी कुंकू उत्सव आनंदाने साजरा करण्यात आला. हळदी कुंकुवाच्या निमित्ताने पूर्वीच्या स्त्रिया घराबाहेर पडायच्या, आनंदाने जगायच्या, नेहमीच्या व्यापातून सुटून संधीच सोनं करू हळदी कुंकूवाच्या निमित्ताने जगून घेत होत्या. ही परंपरा आजही थाटामाटात सुरू आहे. वसाहतीमधील महिलांना रोजच्या कामाच्या व्यापातून थोडा विरंगुळा, धमाल त्याचबरोबर स्वत:ची काळजी घेण्याचा मंत्र पोषण आहाराच्या माध्यमातून देऊन हा मकरसंक्रांतीचा उत्सव साजरा करण्यात आला. नाशिकमधील इंदिरा गांधी वसाहत टाकळी, वडाळा म्हाडा, पंचशील नगर व श्रमिक नगर, भगवती नगर, कोळीवाडा जुनं नाशिक, सिद्धार्थ नगर नाशिक पुना रोड, सहजीवन नगर व कोळीवाडा गणेशवाडी, राजवाडा व कोळीवाडा मखमलाबाद गांव, जलालपूर, गांव, कालिका नगर, सहवास नगर, रामवाडी, चांदशी गांव, नंदिनी नगर अश्या १६ वसाहतींमधील विश्वास समितीच्या माध्यमातून हळदी कुंकु, तीळ गूळ, हलवा, वाण आणि त्याचबरोबर उखाणे घेऊन महिलांनी हळदी

कुंकूचा सण साजरा केला. ह्या कार्यक्रमाच्या माध्यमातून ताण तणाव, दडपण, कौटुंबिक कलह विसरून साऱ्याच महिला एकत्र आल्या. महिलांना आर्थिक साक्षरतेबरोबर आत्मविश्वास निर्माण व्हावा, संघभावना निर्माण व्हावी या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

हळदी कुंकवाच्या कार्यक्रमासाठी उपस्थित महिलांना वाईल्ड लाईन नाशिकच्या टीम मेम्बर प्राजक्ता शोभावत. समुपदेशक विजया शिंदे, शीतल वडनेरे यांनी १६ वसाहतींमध्ये चाईल्ड लाईनच्या कार्याबाबत माहिती दिली, काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांना चाईल्ड लाईनमार्फत कशा पद्धतीने मदत होऊ शकते याबाबत माहिती दिली. चांगल्या आणि वाईट स्पर्शाबाबत मुलांना समजून सांगणे किती गरचेचे आहे, याचीही माहिती देण्यात आली. रेडिओ विश्वास ९०.८ सामुदायिक रेडिओ चे स्टेशन डायरेक्टर डॉ. हरि विनायक कुलकर्णी यांनी उपस्थित महिलांना पौष्टिक आहार म्हणजे काय आणि पौष्टिक आहार रोजच्या जेवणातून कसा घेतला जावू शकतो याची माहिती दिली. पोषक आहार विषयी मार्गदर्शन केले अन्न हे ॲल्युमिनियम भांड्यांमध्ये न शिजविता लोखंडी भांड्यामध्ये शिजविणे तसेच हिरव्या पालेभाज्या व फळभाज्या यांचा रोजच्या आहारात समावेश करणे हे कुटुंबाच्या आरोग्याच्या दृष्टीने कसे महत्त्वाचे आहे हे समजावून सांगितले. तसेच रेडिओ विश्वास ९०.८ सामुदायिक रेडिओच्या व्यवस्थापिका सौ. मनीषा पगारे यांनी उपस्थित महिलांना पोषक आहाराबरोबरच राज्य शासनाच्या 'सुकन्या अटल पेन्शन योजना' बाबत मार्गदर्शन केले. यावेळी प्रत्येक वसाहतीमध्ये चाईल्ड लाईन नाशिकच्या टीम मेम्बर प्राजक्ता शोभावत, रेडिओ विश्वास ९०.८ सामुदायिक रेडिओचे स्टेशन डायरेक्टर डॉ. हरि कुलकर्णी, व्यवस्थापिका मनीशा पगारे आदी मान्यवर या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व वसाहतीमधील विश्वास समितीच्या पदाधिकारी व सदस्य तसेच विश्वास आर्थिक साक्षरता अभियानाच्या समन्वयिक निलोफर शेख, अलका शेळके, धनश्री मुळे, छाया साबळे, ममता जाधव आदींनी परिश्रम घेतले.

४.५९ **कविसंमेलनात 'जगण्याचे विविध आविष्कार' सादर**:- शनिवार, २५ जानेवारी २०२० बदलतं वास्तव आणि जगण्याचा संघर्ष देशप्रेम, गझल, लावणी अशा विविध विषयांवर दर्जेदार कवितांनी कविसंमेलनात रंग भरला. जीवन किती वैशिष्ट्यपूर्ण घटनांनी, क्षणांनी भरलेले असते. त्याची अनोखी अभिव्यक्ती कवितांमधून कवींनी पेश केली. बालकवी ते ज्येष्ठ कवी असे ७० हून अधिक कवी यात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते ७०व्या भारतील प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला खुल्या कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. यात नाशिक जिल्ह्यातील कवी तसेच कवीवर्य नारायला सुर्वे कवी कट्टा, नाशिक कवी, काव्य मंच, नाशिक, माझी कविता परिवार, संवाद नाशिक व डेला आर्टेस्टा, नाशिक साहित्य कणा फाऊंडेशन या संस्था सहभागी झाल्या होत्या. कविसंमेलनाचे उद्घाटन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान नाशिकचे विश्वस्त ॲड. नितीन ठाकरे यांनी केले. कवी सुभाष सबनीस यांनी लावणी आणि अभंगांचे वेगळेपण मांडले. 'लावणीला भुलुन अभंग झुराया लागला दिवे लागणीला पेले रिचवायला लागला. कवी अजय जाधवने प्रेम आणि आसक्ती याची जाणीव अलवारपणे व्यक्त केली. तिच्या आठवणींना तुझ्या कवितांचा आधार परत जाताना तुला आठवण्याचा आधार दे. कवी राजेंद्र उगले यांच्या बहारदार सूत्रसंचालनाने संमेलनात चांगलीच रंगत आणली नितीन ठाकरे व राजेंद्र उगले यांचा सन्मान विश्वास बँकेचे महाप्रबंधक रमेश बागुल यांनी वेदांशू पाटील यांनी प्रास्ताविक केले.

कविसंमेलनात संजय चौधरी यांच्या गोपाळकाला कवितेने दाद मिळवली दयाराम गीलानकर राज शेळके, विजय जोर्वेकर, रूपं बिरारी, राधाकृष्ण साळुंके नंदकिशोर ठोंबरे, अजय बिरारी वैशाली शिंदे, संजय गोरडे, अमित भामरे आदींनी कविता सादर केल्या.

४.६० **विश्वास आर्थिक साक्षरता अभियान सोमवार, २७ जानेवारी २०२०** :- प्रत्येक महिलेत एक महिला पोलीस असते, ती खंबीरपणे उभी राहिल्यास तिला कोणाच्याही सहकार्याची गरज उरणार नाही, तसेच महिलांनी घरगुती वाद घालण्यापेक्षा

आजच्या युगात महिलांनीच महिलांसाठी खंबीर राहणे महत्त्वाचे असून तुमच्या सुरक्षिततेची जबाबदारी हि प्रथम तुमची स्वत:ची आहे, त्यानंतरही काही घडल्यास आम्ही सदैव तत्पर असल्याची ग्वाही पंचवटी पोलीस स्टेशनच्या पोलीस उपनिरीक्षक गायत्री जाधव यांनी केले. रेडिओ विश्वास ९०.८ सामुदायिक रेडिओ आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वास ग्रूप मार्फत संचालित विश्वास आर्थिक साक्षरता अभियान अंतर्गत क्रांतीनगर मखमलाबाद नाका येथील विश्वास समितीच्या माध्यमातून महिलांसाठी पौष्टिक आहार आणि स्वच्छता आणि महिलांच्या सुरक्षिततेसाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. वेळोवेळी महिलांसोबत घडणाऱ्या गुन्हांबाबत तुम्ही नि:संकोचपणे आम्हाला कळवू शकतात, तुम्हाला तक्रारदार म्हणून नाव समोर येण्याची भीती असल्यास तुमचे नाव गुपित ठेवण्यात येईल असे ओशासन गायत्री जाधव यांनी दिले. चाईल्ड लाईन नाशिकच्या टीम मेम्बर शीतल वडनेरे यांनी उपस्थित महिलांना चाईल्ड लाईन नाशिकच्या कार्याबाबत व काळजी व संरक्षमाची गरज असलेल्या मुलांना चाईल्ड नाशिक मार्फत कशा पद्धतीने मदत होऊ शकते याबाबत माहिती दिली. पोलीस कॉन्स्टेबल छाया भोईर यांनी महिलांनी स्वसरंक्षणासाठी आत्मविश्वासाने सामोर जावे व स्वत:तील कौशल्याला वाव द्यावा.

## १०.५ विभागीय केंद्र औरंगाबाद

५.१ **चित्रपट चावडी : 'शिकागो'** :- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबाद व एमजीएम पत्रकारिता महाविद्यालय संचालित एमजीएम फिल्म आर्ट्स विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चित्रपट चावडी उपक्रमाअंतर्गत,शनिवार, दि. २० एप्रिल २०१९ रोजी सायं. ६वा. 'शिकागो'हा अमेरिकन चित्रपट चित्रपती व्ही. शांताराम प्रेक्षागृह, एमजीएम फिल्म आर्ट विभाग, एमजीएम पत्रकारिता महाविद्यालय, औरंगाबाद येथे दाखविण्यात आला.

'शिकागो' हा चित्रपट स्टेज वाद्यावर आधारित शिकागोमधील सेलिब्रिटी, घोटाळा आणि भ्रष्टाचार यावर विनोदी माध्यमातून गुन्हेगारीवर भाष्य करणारा आहे. रेनी झेलवेगर, कॅथरीन झेटा-जोन्स व रिचर्ड गेरे यांच्या चित्रपटात प्रमुख भूमिका आहेत. 'शिकागो' चित्रपटाने २००३ साली सहा अॅकॅडमीक पुरस्कार जिंकले असून त्यात सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा देखील समावेश आहे.

चित्रपटास विद्यार्थी, रसिक, ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी डॉ. रेखा शेळके, सुहास तेंडूलकर, एमजीएम फिल्म आर्ट विभाग प्रमुख शिव कदम, सुबोध जाधव, प्रतिक राऊत आदींची उपस्थिती होती.

५.२ **छायाचित्र प्रदर्शन : 'अमेझिंग औरंगाबाद-दी फोटोथॉन'** :- प्रत्येक गोष्टीत सौंदर्य असते, ते फक्त बघणाऱ्याच्या नजरेला दिसले पाहिजे, असे म्हणतात. या ओळी सार्थ ठरतील, असे साध्यासुध्या गोष्टीतील सौंदर्य औरंगाबादकर छायाचित्रकारांनी मोठ्या नजाकतीने आपल्या कॅमेऱ्यात कैद केले आणि छायाचित्रांच्या सौंदर्याचा हा नजराणा रविवारी सामान्य रसिकांसाठी खुला झाला. 'अमेझिंग औरंगाबाद-दी फोटोथॉन' या प्रदर्शनाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि औरंगाबादचे सौंदर्य नव्या दृष्टिकोनातून रसिकांना पाहायला मिळाले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-विभागीय केंद्र औरंगाबाद व कलर्स ऑफ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील हौशी छायाचित्रकारांसाठी 'अमेझिंग औरंगाबाद-दी फोटोथॉन' या उपक्रमाचे आयोजन केले होते. औरंगाबाद शहराचे ऐतिहासिक सौंदर्य, खाद्यसंस्कृती, वैविध्य, इमारती, धार्मिक कार्यक्रम या सारखे विषय उपक्रमासाठी देण्यात आले होते. ५५० छायाचित्रकारांनी या स्पर्धेसाठी त्यांनी काढलेले छायाचित्र पाठविले. यापैकी निवडक १०६ छायाचित्रे या प्रदर्शनात लावण्यात आली असून, रविवारी (दि. १२) मनपा आयुक्त डॉ. निपुण विनायक यांच्या हस्ते सिद्धार्थ उद्यान येथे सकाळी ६.३० वा. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले. यावेळी महापौर नंदकुमार घोडेले यांची प्रमुख

उपस्थिती होती. प्रदर्शनाला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

स्ट्रीट, लॅण्डस्केप, वाईल्डलाईफ, पीपल अ‍ॅण्ड पोर्ट्रेट यासारखी विविध प्रकारची छायाचित्रे लक्षवेधी ठरली. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्राचे सचिव निलेश राऊत, विजय कान्हेकर, अ‍ॅड. स्वप्नील जोशी, प्रदर्शनाचे संयोजक ज्ञानेस्व पाटील, आदित्य दिवाण, किशोर निकम, सुबोध जाधव, निखिल भालेराव आदींनी उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

५.३ चित्रपट चावडी : 'डंकीर्क':- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-विभागीय केंद्र औरंगाबाद व एमजीएम पत्रकारिता महाविद्यालय संचालित एमजीएम फिल्म आर्ट्स विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चित्रपट चावडी उपक्रमाअंतर्गत शनिवार, दि. १८ मे २०१९ रोजी सायं. ६वा. क्रिस्तोफर नोलन यांचा 'डंकीर्क' हा चित्रपट चित्रपती व्ही. शांताराम प्रेक्षागृह, एमजीएम फिल्म आर्ट विभाग, एमजीएम पत्रकारिता महाविद्यालय, औरंगाबाद येथे दाखविण्यात आला.

ब्रिटिश-अमेरिकन-फ्रेंच-डच यांची सहनिर्मिती असलेला 'डंकीर्क' हा चित्रपट असून यामध्ये जॅक लोडेन, हॅरी स्टिल्स, एन्युरीन बर्नार्ड, जेम्स डी आर्सी, बॅरी किओहान, केनेथ ब्रानाघ,सिल्लियन मर्फी, मार्क रिलान्स आणि टॉम हार्डी यांच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटासाठी क्रिस्तोफर नोलन यांना दिग्दर्शन करण्यासाठी प्रथम ऑस्कर नामांकन मिळाले आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या पोर्शभूमीवर 'आयमॅक्स फॉरमॅट'मध्ये चित्रित झालेला 'डंकीर्क' हा चित्रपट बघण्यासाठी त्याच दर्जाचे थिएटर असणे गरजेचे असते. एमजीएमच्या फिल्म आर्टच्या चित्रपती व्ही. शांताराम थिएटरमध्ये या सर्व सुविधा आहेत. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धात डंकीर्क या ठिकाणी घडलेला थरार प्रेक्षकांना अनुभवता आला. यावेळी प्रेक्षक, रसिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'डंकीर्क' यासारखा उत्कृष्ट चित्रपट पहावयास मिळाल्याबद्दल उपस्थित रसिकांनी यावेळी आयोजकांचे आभार मानले.

५.४ **'अमेझिंग औरंगाबाद : दी फोटोथॉन'चा दुसरा टप्पा:-** 'अमेझिंग औरंगाबाद : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-विभागीय केंद्र, औरंगाबाद, इंस्टाग्रामवरील ग्रुप कलर्स ऑफ औरंगाबाद व महात्मा गांधी मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने हौशी छायाचित्रकारांच्या कलाकृतीला वाव देण्यासाठी 'अमेझिंग औरंगबाद : दी फोटोथॉन' हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. दि. १९ मे रोजी छायाचित्र प्रदर्शनाच्या दुसऱ्या सत्राचा समारोप प्रोझोन मॉल येथे संपन्न झाला.

शनिवार, दि. १८ मे रोजी सायंकाळी या छायाचित्र प्रदर्शनाचा दुसरा टप्पा आयोजित केला होता. त्यानुसार प्रसिद्ध छायाचित्रकार मा. बैजू पाटील यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्‌घाटन करण्यात आले. शनिवारी व रविवारी सर्वांसाठी प्रदर्शन खुले होते. दोन दिवस आयोजित या प्रदर्शनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्ट्रीट, लॅण्डस्केप, वाईल्डलाईफ, पीपल्स अ‍ॅण्ड पोर्ट्रेट अशी विविध प्रकारची शंभराहून अधिक छायाचित्रे या प्रदर्शनात पाहावयास मिळाली.

शहरातील कलाप्रेमींना या कलाकृतींचा आनंद घेता यावा, यासाठी एकूण चार सत्रांत हे प्रदर्शन भरविण्याचे ठरले. यापैकी पहिले सत्र १२ मे ला, दुसरे सत्र १८ मे ला तर तिसरे सत्र दि. २६ मे रोजी अयोध्यानगरी, स्टेशन रोड औरंगाबाद येथील वॉकिंग प्लाझाच्या मैदानावर आयोजित करण्यात येईल, असे आयोजकांच्या वतीने यावेळी सांगण्यात आले.

५.५ **तिसरा टप्पा:-** 'अमेझिंग औरंगाबाद : द फोटोथॉन' या फोटो प्रदर्शनाच्या तिसऱ्या टप्प्याचे सत्र रविवारी स्टेशन रोड येथील वॉकिंग प्लाझामध्ये आयोजित करण्यात आले होते.

सुमारे अडीच तास चाललेल्या या प्रदर्शनाला भेट देत अनेक नागरिकांनी हौशी छायाचित्रकारांचे कौतुक केले. हे प्रदर्शन भरविण्यासाठी नितीन गुरव, सुरत बागूल, किरण भाले आदींनी परिश्रम घेतले.

५.६ **चित्रपट चावडी : उंबरठा:-** औरंगाबाद : गिरीश कर्नाड हे भूमिकेची जाण, विलक्षण अभिनयक्षमता आणि शिस्तप्रिय असलेले समर्पणवृत्तीचे कलावंत होते. या कलाकाराने प्रत्येक पिढीतील कलाकारांना अचूक मार्गदर्शन केले. त्यांच्या

व्यक्तिमत्त्वातील प्रत्येक पैलू अनुकरणीय होता, असे प्रतिपादन दिग्दर्शक शिव कदम यांनी केले. ते 'चित्रपट चावडी' उपक्रमात बोलत होते. या उपक्रमाला ज्येष्ठ साहित्यिक रा. रं. बोऱ्हाडे, विभागीय केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम, प्राचार्या रेखा शेळके, प्रतिष्ठानचे निलेश राऊत, सुबोध जाधव यांची उपस्थिती होती.

५..७ **राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१९ विषयावर चर्चासत्र संपन्न :-** केंद्र शासनाच्या वतीने चर्चा व सूचनेसाठी जाहीर करण्यात आलेला राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा मसुदा हा सर्वसमावेशक व शिक्षण प्रक्रियेतील प्रत्येक घटकाचा विचार करून बनवलेला असून, त्यावर कुठल्याच एका राजकीय विचारप्रक्रियेची छाप नाही, हे त्याचे वेगळेपण आहे. वंचित घटक, विशेष व्यक्ती, तृतीयपंथी या सगळ्या सामाजिक घटकांना शैक्षणिक प्रक्रियेत सामावून घेण्याचा विचार यात मांडण्यात आला आहे. यातील तरतुदींचा अभ्यास करून केंद्र शासनाला आपण वैयक्तिक पातळीवर देखील सूचना पाठवू शकतो. तीस जून ही सूचना पाठविण्याची शेवटची तारीख आहे असे प्रतिपादन राज्याचे माजी शिक्षण संचालक व शिक्षण विकास मंचाचे संयोजक डॉ. वसंत काळपांडे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - विभागीय केंद्र औरंगाबाद, महात्मा गांधी मिशन, शिक्षण विकास मंचच्या संयुक्त विद्यमाने २३ जून २०१९ रोजी आयोजित राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१९ या विशेष चर्चासत्रात ते बोलत होते. याप्रसंगी विभागीय केंद्र औरंगाबादचे अध्यक्ष अंकुशराव कदम, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) डॉ. बी. बी. चव्हाण, प्रतिष्ठानचे कार्यक्रम व्यवस्थापक दत्ता बाळसराफ, केंद्राचे कार्यकारिणी सदस्य डॉ. श्रीरंग देशपांडे, डॉ. अपर्णा कक्कड, डॉ. अनुया दळवी, साधना शाह यांची विशेष उपस्थिती होती.

याप्रसंगी डॉ. बी. बी. चव्हाण यांनी शिक्षण धोरण कायदा २०१९च्या महत्त्वाच्या तरतुदींचे विस्तृत सादरीकरण केले. या चर्चासत्रात शंभरहून अधिक मुख्याध्यापक, प्राचार्य, संस्थाचालक, शिक्षक, प्राध्यापक, बाल मनोचिकित्सक, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, पालक यांनी सहभाग नोंदवला. सादरीकरण झाल्यानंतर सर्व उपस्थित प्रतिनिधींनी आपल्या सूचना व अभिप्राय व्यक्त केले.

या धोरणात वय वर्ष ३ ते २५ वयोगटातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाच्या प्रगतीबद्दल तरतुदी करण्यात आलेल्या आहे, त्यात प्रामुख्याने पूर्वप्राथमिक वयोगटाचा समावेश हा आरटीई मध्ये करणे, शालेय शिक्षणाचा आकृतिबंध बदलून तो पूर्वप्राथमिक गटापासून सुरू करणे, राष्ट्रीय व राज्य शिक्षण आयोगाची स्थापना, बीएड चा अभ्यासक्रम दोन व चार वर्षांचा करणे अशा अनेक बाबींचा समावेश आहे. नर्सरी ते पदव्युत्तर शिक्षणाचा विचार यात करण्यात आलेला आहे. आठवीनंतर विद्यार्थ्यांना आपल्या आवडीच्या विषयांची निवड करता येणार आहे, म्हणजेच विद्यार्थ्यांना गणित व विज्ञान बरोबर नाट्य अथवा नृत्यकला शिकता येईल. अशा अनेक तरतुदी असलेल्या या धोरणाच्या मसुद्याचा अभ्यास करून केंद्र शासनाला तीस जूनच्या आत आपणास आपल्या सूचना व अभिप्राय nep.edunic.com या ईमेल आयडीवर पाठविता येतील.

या चर्चासत्राच्या यशस्वितेसाठी विभागीय केंद्राचे सचिव निलेश राऊत, सुबोध जाधव, दीपक जाधव, रुपेश मोरे, राजेंद्र वाळके, प्रवीण देशमुख, त्रिशुल कुलकर्णी, श्रीकांत देशपांडे, महेश अचिंतलवार, विनोद सिनकर, उमेश राऊत आदींनी परिश्रम घेतले.

५.८ **'वारी : एक आनंदयात्रा' छायाचित्र प्रदर्शन व मास्टर क्लास :-** समाजामध्ये जे आहे, तेच आपण टिपण्याचा प्रयत्न करत असतो पाहणाऱ्याला आपल्या फोटोतून विषयाचे आकलन झाले पाहिजे, तरच ती छायाचित्रकारिता बोलकी आणि प्रभावी होते, असा संदेश प्रख्यात छायाचित्रकार संदेश भंडारे यांनी हौशी छायाचित्रकारांना दिला. वारीतून खूप काही शिकायला मिळाले. आपण विठ्ठलाचा एकही फोटो काढला नाही; पण वारकऱ्यांच्या चेहऱ्यावरील निखळ आनंदातच

विठ्ठल दिसला, असेही ते म्हणाले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबाद, एमजीएम पत्रकारिता महाविद्यालय आणि कलर्स ऑफ औरंगाबादतर्फे एमजीएम कलादीर्घा आर्ट गॅलरीत ९ ते १४ जुलै २०१९ दरम्यान संदेश भंडारे यांचे 'वारी : एक आनंदयात्रा' हे छायाचित्र प्रदर्शन भरविण्यात आले आहे. क्लोव्हर डेल स्कूलच्या संचालक अपर्णा कक्कड यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. तत्पूर्वी चित्रपती व्ही. शांताराम सभागृहात संदेश भंडारे यांनी युवा छायाचित्रकारांसाठी मास्टर क्लास घेतला. प्रास्ताविक प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्राचे सचिव निलेश राऊत यांनी केले.

एमजीएम फिल्म आर्ट विभागाचे प्रमुख शिव कदम, डॉ. आर. आर. देशपांडे, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे शहाजी भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.

५.९ **केंद्रीय अर्थसंकल्प, २०१९ : विश्लेषण**:- चंद्रशेखर टिळक : आधार-पॅन लिंकिंग हे फायनान्शियल सर्जिकल स्ट्राईकच.

अर्थसंकल्पाला अनेक कंगोरे आहेत. जे भविष्यातील बदलांची नांदी म्हणवतील. २०१९चा अर्थसंकल्प हा देशाच्या अर्थकारणाची दिशा बदलणारा म्हणवला जाऊ शकतो. आधार-पॅन लिंकिंग हे लोकांना साधा सरकारी विषय वाटत असला तरी तो करचुकव्यांवर सरकारने केलेला सर्जिकल स्ट्राईकच असल्याचे मत अर्थतज्ज्ञ चंद्रशेखर टिळक यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान - विभागीय केंद्र औरंगाबाद, चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रिज अॅण्ड अॅग्रिकल्चर, एमजीएम जनसंवाद व वृत्तपत्रविद्या महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'कार्पोरेट जगतासाठी अर्थसंकल्प २०१९' या विषयावर त्यांनी एमजीएमच्या आइन्स्टाईन सभागृहात आपले विचार १५ जुलै २०१९ रोजी मांडले. इन्कमटॅक्सच्या माध्यमातून सरकारला मिळणारा कर हा ११ लाख कोटींच्या पुढे आहे. त्यामुळे ही यंत्रणा बळकट करण्यासाठी सरकार पाऊले टाकणार आहे. तुम्ही इतका कर भरला आहे, इतका इन्कमटॅक्स शिल्लक आहे, असे एसएमएस यापुढे मोबाईलवर आले तर आश्चर्य वाटायला नको, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाला सिएमआयएचे अध्यक्ष गिरीधरण संगनेरिया, शिवप्रसाद जाजू, राम भोगले, विभागीय केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम, आशिष नहार, रविंद्र कोंडेकर, मुकुंद कुलकर्णी, डॉ. रेखा शेळके, दिपाली चांडक, जगन्नाथ काळे आदींची उपस्थिती होती.

ई-व्हेईकल्सचे धोरण राबवून २०२२ पर्यंत अशी वाहने बाजारात आणण्यासाठी सरकार कार्य करीत असल्याचे अर्थसंकल्पात सांगण्यात आले. देशातील ऑटो कंपन्यांचे यातून नुकसान होईल आणि रोजगार अडचणीत येण्याचा धोका उद्योजक व्यक्त करीत आहेत; मात्र सरकारच्या दृष्टीने सध्या कार्य त्या वेगाने सुरू नाही. दरम्यान, ऑटो क्षेत्राच्या भविष्याविषयी ऑटो विश्वाचे अभ्यासक उमेश दाशरथी यांनी या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून भाषण करताना याबाबत चिंता व्यक्त केली आहे.

लहान गोष्टींतून फरक पडतो, असे आपल्याला क्वचित वाटते, मात्र गंगेबाबत ही गोष्ट घडली आहे. 'नमामि गंगे' प्रकल्पाने शहरातील रोजगाराच्या संधी वाढवल्या. १९९९ मध्ये घाणीचे साम्राज्य असलेल्या गंगेत केवळ १८ बोटी चालायच्या. हा आकडा २०१९ मध्ये १०८८ वर गेला आणि त्यांची युनियन आहे. या एका प्रकल्पाने गंगेच्या काठावर दीड कोटी लोकांसाठी रोजगार तयार झाला, असेही त्यांनी सांगितले.

५.१० **चित्रपट चावडी : रोमियो अॅण्ड ज्युलिएट**:- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबाद व एमजीएम पत्रकारिता महाविद्यालय संचालित एमजीएम फिल्म आर्ट्स विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चित्रपट

चावडी उपक्रमाअंतर्गत शनिवार, दि. २७ जुलै २०१९ रोजी सायं. ६ वा. इटालियन दिग्दर्शक फ्रॅन्को झेफिरेली दिग्दर्शित रोमॅंटिक ट्रॅजेडी फिल्म 'रोमियो अॅण्ड ज्युलिएट' हा चित्रपट चित्रपती व्ही. शांताराम प्रेक्षागृह, एमजीएम फिल्म आर्ट विभाग, एमजीएम पत्रकारिता महाविद्यालय, औरंगाबाद येथे दाखविण्यात आला

१९६८ साली प्रदर्शित झालेला ब्रिटीश-इटालियन चित्रपट 'रोमियो अॅण्ड ज्युलिएट' यांचे लिखाण लियोनार्ड व्हिटींग आणि ओलिविसा हसीने केले आहे. सिनेमास सर्वोत्कृष्ट सिनेमाटोग्राफी, बेस्ट कॉस्च्युम डिझाईन, बेस्ट डायरेक्ट-बेस्ट पिक्चरसाठी नामांकित करण्यात आले होते.चित्रपटात लिओनार्ड व्हिटिंग, ओलिविया हसी, मिलो ओशे, मायकल यॉर्क, जॉन मॅकनेरी, नताशा पॅरी आदी कलाकारांच्या भूमिका आहेत. याप्रसंगी चित्रपट रसिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वितेसाठी डॉ. रेखा शेळके, एमजीएम फिल्म आर्ट विभाग प्रमुख शिव कदम, सुबोध जाधव, उमेश राऊत आदींनी परिश्रम घेतले.

५.११ **बाउल काव्यसंग्रह प्रकाशन सोहळा :-** वास्तवाचा शोध घेण्यासाठी भटकावेच लागते, त्याशिवाय जग कळत नाही. प्रत्येक कवी हा बाउल असतो. जो बाउल नसतो तो कवी होऊच शकत नाही. यानुसार आतापर्यंतच्या कोणत्याही महान कवीचे अंतरंग उलगडून पाहिल्यास त्याच्यातील भटकेपणा, बाउलपणा दिसून येईल, असे प्रतिपादन कवी प्रा. इंद्रजित भालेराव यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबाद, पॉप्युलर प्रकाशन आणि एमजीएम संस्थेतर्फे प्रख्यात कवी तथा अभिनेते सौमित्र उर्फ किशोर कदम लिखित 'बाउल' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा रुक्मिणी सभागृहात दि. ३ ऑगस्ट २०१९रोजी सायंकाळी साडेसहा वाजता रंगला. अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम होते. व्यासपीठावर कवी दासू वैद्य, सहकारी संस्था सहनिबंधक संजय राऊत, पॉप्युलर प्रकाशनच्या संपादक अस्मिता मोहिते, डॉ. श्रीरंग देशपांडे, सुहास तेंडुलकर, डॉ. रेखा शेळके यांची उपस्थिती होती. यावेळी प्रा. भालेराव यांनी 'बाउल' काव्यसंग्रहावर भाष्य केले. रवींद्रनाथ टागोरांपासून आताच्या सौमित्रपर्यंत प्रत्येक कवी हा 'बाउल' आहे. प्रत्येकाने भटकंती करीतच वास्तव जीवनाचे चित्रण आपल्या कवितेत चितारले आहे. आपले संतही बाउलच होते, बाउलांचा देश आहे. सगळे साधू बाउलच होते. कवीही साधूच असतो. जो कवी साधू नसतो, तो संधीसाधू असतो, असेही भालेराव यांनी सांगितले

यावेळी सौमित्र म्हणाले, १७ वर्षानंतर काव्यसंग्रह येत आहे. पहिल्या काव्यसंग्रहाच्या वेळी असणारी धडपड आताही आहे. ही धडपडच जिवंत असल्याचे लक्षण असल्याचे त्यांनी सांगितले. उपनिबंधक संजय राऊत यांनी सौमित्र यांच्या विषयची स्वत:चे अनुभव सांगितले. अध्यक्षीय समारोप अंकुशराव कदम यांनी केला. तत्पूर्वी प्रास्ताविकात प्रकाशक अस्मिता मोहिते यांनी काव्यसंग्रहाविषयींचे नाते स्पष्ट केले. सुरुवातीला महेश देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन महेश अचिंतलवार यांनी केले, तर दिग्दर्शक शिव कदम यांनी आभार मानले.

दु:ख लपवायला कविताच कामी येते.

चित्रपटात किशोर अभिनेता म्हणून उत्तम आहे; पण त्याच्यातील सच्चा सौमित्र कवितांमध्येच उतरला आहे. किशोर अभिनेता म्हणून नव्हे तर सौमित्र बनून अधिक लोकांपर्यंत पोहोचला असल्याचे मतही प्रा. भालेराव यांनी व्यक्त केले. वर्गात शिकविण्यासाठी जाईपर्यंत प्राध्यापकाच्या छातीत धडधड होते. तोपर्यंत तो शिक्षक असतो. जेव्हा ती धडधड थांबते, तेव्हा तो निर्ढावलेला असतो. कवीचेही तसेच असते, असे त्यांनी सांगितले.

५.१२ **कवी सौमित्र 'बाउल' काव्यवाचन दृकश्राव्य कार्यक्रम :-** सभागृह तुडुंब भरलेले.... सर्वत्र अंधार... काही वेळात अंधाराला भेदत प्रकाशकिरणे भेट 'बाउल'वर पडली... आणि मग उजळला अभिनय आणि दृकश्राव्य माध्यमातून

कवितेचा पाऊणतासाचा प्रवास. दऱ्याखोऱ्यातील रस्ते, धडधडत्या मायानगरीची रक्तवाहिनी असलेल्या रेल्वेची वास्तवता, गावातल्या शेवटच्या माणसाचं नातं, कुटुंबातील मोबाईल क्रांती, नात्यातील दुरावा.... हे सर्व सादर करण्याची किमया साधली प्रसिद्ध अभिनेता तथा 'बाउल'चे लेखक सौमित्र उर्फ किशोर कदम यांनी. निमित्त होते प्रकाशन सोहळ्याचे.

बाउल काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाल्यानंतर सौमित्र यांनी दृकश्राव्य स्वरूपात काव्यसंग्रहातील कवितांचे सादरीकरण केले. प्रत्येक कवितेच्या समारोपाला संगीताचा आधार होता. कविता सादर करताना रसिकांना प्रत्यक्ष कवितेच्या विश्वात घेऊन जाणारे चित्र दाखवून खिळवून ठेवण्यात आले. कवीच्या विचारचक्राचा आणि आयुष्याचा प्रवास कसा सुरू होतो, या प्रवासात, एकांतात, लोकांतातही त्याच्या भावविश्वाला जे भिडते, भेडसावते, त्या प्रसंगांचे चित्रण शब्दबद्ध करण्यात आले. आयुष्याचा अविभाज्य भाग बनलेल्या प्रवासात 'वळू नकोस माघारी, दम खाऊ नकोस, मरगळू नको, चालत राहा निर्हेतुक' असा संदेश सौमित्र यांनी काव्यरसिकांना दिला.

'गावातला शेवटचा माणूस, झोपलेला असताना निघावं,'
पाय म्हणलं की रस्ता, रस्ता म्हटलं की,
आपली कमिटमेंट साली एकटेपणाशी असते,
घर जितकं दूर तितकं यिसरायला सोपं जातं,
रस्त्याच्या कडेला उभा राहून तू असाच का रडतो आहेस,
आधी खूप रस्ते होते, खूप चांगले होते...

अशा एकाहून एक सरस कवितांच्या प्रत्येक सादरीकरणाला रसिकांच्या टाळ्यांचा गजर होत होता. अशा या काव्य मैफलीचा शेवट कवी सौमित्र यांच्या सादरीकरणाला दाद देऊनच झाला. या काव्यवेगातील सादरीकरणाचे दिग्दर्शन सचिन शिंदे यांनी केले. संगीत संयोजन रोहित सरोदे यांनी केले. प्रकाश योजना राहूल गायकवाड यांची होती. दृकश्राव्य माध्यमासाठी लक्ष्मण कोकणे यांनी मदत केली. कार्यक्रमाला शहरातील साहित्य, संस्कृती, शिक्षण, समाजकारण आदी क्षेत्रातील दिग्गजांची उपस्थिती होती.

६.१३ **'मेळा' ललित लेखसंग्रह प्रकाशन सोहळा :-** ललित लेखन हा वाङ्मय प्रकार नसून त्याला स्वतंत्र रूप आहे. स्वैर, सैल असला तरी त्यांच्या अंतर्गत तेवढीच संगती असते. ललित लेख हा लेखकाच्या विचार प्रवाहाची अभिव्यक्ती आहे. दासू वैद्य यांना 'मेळा'मध्ये काव्याची भाषा बाजूला ठेवून लालित्यपूर्ण लेखन केले आहे. त्यामुळे काव्य आणि गद्य या दोन्ही प्रकारांत त्यांचे तेवढेच प्रभुत्व दिसून येते, असे प्रतिपादन डॉ. सुधीर रसाळ यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र औरंगाबाद, पॉप्युलर प्रकाशन आणि महात्मा गांधी मिशनतर्फे ४ ऑगस्ट २०१९ रोजी रुक्मिणी सभागृहात दासू वैद्य लिखित 'मेळा' या ललित लेखसंग्रहाचे प्रकाशन डॉ. रसाळ यांच्या हस्ते करण्यात आले. विभागीय केंद्राचे अध्यक्ष तथा एमजीएमचे सचिव अंकुशराव कदम कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. कवी सौमित्र, अस्मिता मोहिते, मुस्तजीब खान, शिव कदम, अभिजीत झुंजारराव यांची व्यासपीठावर विशेष उपस्थिती होती.

डॉ. रसाळ म्हणाले, दासू हे कृषी संस्कृतीतून घडलेले व्यक्तिमत्त्व असून, त्यांनी 'मेळा'च्या माध्यमातून आधुनिक जगाकडे पाहण्याचा प्रयत्न केला आहे. वेगवेगळ्या भावनिक पातळ्यांवर लेखन नेणे हे दासूंचे वैशिष्ट्य असून, पुस्तकांत त्यांनी विलक्षण सांस्कृतिक प्रतिमा वापरून तटस्थपणे लेखन केले आहे.

यावेळी सौमित्र यांनी 'मेळा'मधील विजय तेंडुलकरांना लिहिलेल्या पत्राच्या लेखाचे अभिवाचन केले. मुस्तजीब खान यांनी दासूंचा आणि त्यांच्या साहित्याचा परिचय करून दिला. कवितेत पकडता न आलेले अनुभव ललित

लेखस्वरूपात मांडले असून, 'मेळा' हा तर विषय आणि अनुभवांचा गोपालकालाच आहे, असे मनोगत दासू यांनी व्यक्त केले.

- प्रकाशन सोहळ्यानंतर 'कुठंच काही जळत नाहीये' हा दासू वैद्य यांच्या ललित लेख व कवितांवर आधारित नाट्याविष्काराचा कार्यक्रम सादर करण्यात आला.

- दिग्दर्शन, नेपथ्य प्रकाश योजना अभिजित झुंजारराव यांची होती. राहुल शिरसाट, निखिल खाडे, संकेत जाधव, राजस पंधे, सोनाली मगर, सायली शिंदे, ऋचिका खैरनार या कलाकारांचा यात सहभाग होता आणि ओंकार जाधव यांचे संगीत होते.

५.१४ **दोन हजार औरंगाबादकरांनी दिले अठरा लाखांचे साहित्य**:- पूरग्रस्तांच्या मदतीसाठी अभ्युदय फाउंडेशन, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-विभागीय केंद्र औरंगाबाद, एमजीएमतर्फे नागरिकांना आवाहन केले आणि सुमारे दोन हजार औरंगाबादकरांनी तब्बल १० हजार पाण्याच्या बाटल्या, ६ हजार बिस्किट पुडे, खाद्यान्नाची पाकिटे, चादरी, ब्लँकेट्स, चटया आणि नवेकोरे कपडे असे सुमारे अठरा लाख रुपये किमतीचे साहित्य आणून दिले. मदतीचा ट्रक आणि स्वयंसेवकांची फौज १२ ऑगस्ट २०१९ रोजी कोल्हापूरला रवाना झाला.

सरकारी यंत्रणेच्या भरवशावर विसंबून न राहता ही मदत थेट ग्रामीण भागात नागरिकांच्या हातात पोहचविण्यासाठी 'अभ्युदय'चे स्वयंसेवक आणि एमजीएम पत्रकारिता महाविद्यालयाचे विद्यार्थी सोमवारी सायंकाळी कोल्हापूरच्या दिशेने रवाना झाली. शाहूवाडी, राधानगरी आणि बिद्री या तीन तालुक्यातील खेड्यापाड्यांत हे ट्रक जाऊन मदत पोहचती केली. त्यांना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या स्थानिक शाखेचेही सहकार्य लाभले. प्रतिष्ठानच्या औरंगाबाद विभागीय केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम, सुहास तेंडुलकर, डॉ. रेखा शेळके, 'अभ्युदय'चे अध्यक्ष नीलेश राऊत, सुबोध जाधव, उमेश राऊत, प्रतीक राऊत, मंगेश निरंतर, गणेश घुले, श्रीकांत देशपांडे, मयूर देशपांडे, दीपक जाधव, महेश अचिंतलवार, श्रीराम पोतदार, निखिल भालेराव, ओंकार तेंडुलकर, ज्ञानेश बोद्रे, उमाकांत पांडे, गिरीश जोशी, कस्तुरी जोशी, अक्षय गोरे, कृष्णा जाधव, अतुल राऊत, कचरू जाधव, नवनाथ घोडके यांची यावेळी उपस्थिती होती.

५.१५ **फॅमिली किटची कल्पकता**:- लोकांकडून आलेल्या मदत साहित्याचे एमजीएम नर्सिंग कॉलेजच्या सुमारे २०० विद्यार्थिनी सॉर्टिंग करीत आहेत. एका कुटुंबाच्या गरजेनुसार या साहित्याची फॅमिली किट बनविण्यात येत आहे. अनेकांनी पूरग्रस्तांची खरी गरज ओळखून नव्याकोऱ्या कपड्यांचे जोड आणि अंतर्वस्त्रेदेखील खरेदी करून दिली आहेत.

५.१६ **चित्रपट चावडी : 'पोस्टमन इन द माऊंटन' व 'सिनेमा पॅराडिसो'**:- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबाद व एमजीएम पत्रकारिता महाविद्यालय संचालित एमजीएम फिल्म आर्ट्स विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चित्रपट चावडी उपक्रमाअंतर्गत शुक्रवार, दि. २३ ऑगस्ट २०१९ रोजी सायं ६ वा. चिनी चित्रपट 'पोस्टमन इन द माऊंटन' व शनिवार, दि. २४ ऑगस्ट २०१९ रोजी सायं. ६ वा. इटालियन चित्रपट 'सिनेमा पॅराडिसो' दाखविण्यात आले. यावेळी प्रसिद्ध चित्रपट समीक्षक अशोक राणे यांची विशेष उपस्थिती होती. दरम्यान त्यांनी चित्रपट रसिकांसोबत संवाद साधला.

हू जिआनकी दिग्दर्शित 'पोस्टमन इन माउंटेन्स' हा १९९९ मधील चीनी चित्रपट आहे. पेंग जियानमिंग यांच्या त्याच नावाच्या छोट्या कथेवर आधारित आहे. ही कथा माउंटन मधील पोस्टमन वृद्ध माणसाची कथा सांगते. (टेंग रुजुण) ज्याने ग्रामीण पर्वतीय समुदायांसाठी वर्षानुवर्षे पोस्टमन म्हणून काम केले. सेवानिवृत्त झाल्यावर, तो आपली नोकरी आपल्या मुलाकडे (लियू ये) सोपवितो. परंतु आता चीनच्या ग्रामीण भागात लांब चालण्याच्या मार्गावर लोक मेल पाठवतात आणि या प्रक्रियेत तो मुलगा मेलच्या प्राप्तकर्त्यांकडून बरेच काही अधिक शिकतो. हे चित्रीकरण दक्षिण-पश्चिमी आणि दक्षिणी

हुनानमधील स्विनिंग काउंटी आणि दाव काउंटीमध्ये चित्रित केले गेले. चित्रपटाचा एक भाग डोंग लोकांच्या गावात घडला असून यामध्ये संध्याकाळच्या उत्सवाचा समावेश आहे.

'सिनेमा पॅराडिसो' हा १९८८मध्ये ज्युसेपे तोरानाटोर दिग्दर्शित इटालियन नाटकावर आधारित आहे. या चित्रपटात जॅक पेरिन, फिलिप नोएरेट, लिओपोल्डो ट्रिस्टे, मार्को लियोनार्डी, पशग्नेस नॅनो यांच्या भूमिका असून आणि साल्वोटोर कॅसिओ यांनी संगीत दिले होते. या चित्रपटाची रचना फ्रँको क्रिस्टलडी आणि जिओव्हाना रोमाग्नोली यांनी केली होती, तर संगीतकार एन्निओ मॉरिकोन यांनी त्याचा मुलगा आंद्रेया यांच्यासह संगीतबद्ध केले होते. सर्वोत्कृष्ट परदेशी भाषेच्या चित्रपटाचा अकादमी पुरस्कार या चित्रपटाने जिंकला होता.

यावेळी विभागीय केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम, सचिव निलेश राऊत, कार्यकारिणी सदस्य बिजली देशमुख, विजय कान्हेकर, डॉ. रेखा शेळके, सुहास तेंडूलकर, एमजीएम फिल्म आर्ट विभाग प्रमुख शिव कदम, सुबोध जाधव आदींची उपस्थिती होती.

५.१७ **चित्रपट चावडी : 'हॅम्लेट'** :- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबाद व एमजीएम पत्रकारिता महाविद्यालय संचालित एमजीएम फिल्म आर्ट्स विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चित्रपट चावडी उपक्रमाअंतर्गत शनिवार, दि. २१ सप्टेंबर २०१९ रोजी सायं. ६वा 'हॅम्लेट' हा चित्रपट चित्रपती व्ही. शांताराम प्रेक्षागृह, एमजीएम फिल्म आर्ट विभाग, एमजीएम पत्रकारिता महाविद्यालय, औरंगाबाद येथे दाखविण्यात आला.

शेक्सपियर यांच्या नाटकावर आधारित दिग्दर्शक फ्रॅन्को झेफिरेली दिग्दर्शित युनायटेड स्टेट्स, युनायटेड किंगडम आणि फ्रान्स सह-निर्मिती असलेला हा चित्रपट आहे. चित्रपटात मेल गिब्सन मुख्य भूमिकेत असून ग्लेन क्लोज, अॅलन बेट्स, पॉल स्कोफिल्ड, इयान होलम, हेलेना बोनहॅम कार्टर, स्टीफन डिलेन आणि नॅथॅनियल पार्कर आदी कलाकार आहेत. डेन्मार्कमध्ये टायटुलर राजकुमार आपल्या वडिलांच्या मृत्यूचा शोध घेण्यासाठी राजमहालात परत येतो आणि सुरू होते हॅमलेटच्या सूडकथेची शोकांतिका. चित्रपटाला सर्वोत्कृष्ट आर्ट डायरेक्शन आणि बेस्ट कॉस्च्यूम डिझाईन साठी दोन अकादमी पुरस्कार नामांकने मिळाली.

यावेळी चित्रपट रसिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी डॉ. रेखा शेळके, एमजीएम फिल्म आर्ट विभाग प्रमुख शिव कदम, सुबोध जाधव, उमेश राऊत आदींनी परिश्रम घेतले.

५.१८ **मराठी गझल संमेलन**:- 'असेल इच्छा शेवटची... मरताना माझी फुलांप्रमाणे मिळो दरवळण्याचे बळ' प्रत्येकच व्यक्तीची इच्छा असते की, मरणोपरांत त्याच्या स्मृती दरवळत रहाव्या. हीच भावना मांडणारी ही शायरी २३ सप्टेंबर २०१९ रोजी सरस्वती भुवनच्या गोविंदभाई श्रॉफ ललित कला अकादमीत विशेष लक्षवेधी ठरली. शहरातील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबाद, ध्यास गझल साहित्य समूह आणि अभ्युदय फाउंडेशन तसेच सरस्वती भुवन यांच्या संयुक्त विद्यमाने गझल संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

या गझल संमेलनाचे उद्घाटन प्रा. डॉ. सुधाकर शेंडगे, गझलकार शेख इकबाल मिन्ने, गझलकार राजीव मासरूळकर, निलेश राऊत व गझलकार शिव डोईजोडे यांच्या शुभहस्ते झाले. ''मराठी गझल क्षेत्रात ध्यास गझल साहित्य समूहासारखे समूह महत्वपूर्ण कार्य करत आहेत,'' असे मत शेंडगे सरांनी व्यक्त केले. जीवनाचा संघर्ष, प्रेम, निसर्ग अन् सामाजिक विषयांना हात घालणाऱ्या या गझला खासच रंगल्या. संमेलनाच्या पहिल्या सत्रात महाराष्ट्रातील आघाडीच्या मराठी गझलकारांचा हा मुशायरा रसिकांसाठी पर्वणी ठरला. गझलकार शिव डोईजोडे, जयदीप विघ्ने, रणजित पराडकर, प्राजक्ता पटवर्धन, संजय गोरडे, हर्षल पवार, महेश जाधव यांचे अर्थसंपन्न शब्द अन् सादरीकरणाची लाघवी शैली मुशायराला संसमरणीय करून गेली. 'आपण सगळे मुळात असतो, रस्त्यावरच्या धुळीसारखे, कधी कुठेही येऊ शकतो पायाखाली' या महेश जाधवांच्या गझलेने मानवी जीवनाचे मर्म सांगितले.

'मांडला जाणार बाजार आता, फक्त पैशांवर मते विकली जाणार आता, कर खोट्या कितीही जाहिराती, माल पाहूनच विकला जाणार आता' ही निवडणुकीच्या पोर्श्वभूमीवरील गझल टाळ्यांचा कडकडाट घेऊन गेली. डोईजोडे यांची 'हळू हळू ही दुनियादारी उलगडत जाते, नात्यामध्ये स्वार्थ किती हे समजत जाते.' पटवर्धन यांनी 'सौख्याला मी मृगजल म्हटले, कुठे बिघडले, अन् दु:खाला मी वाकळ म्हटले, कुठे बिघडले' ही गझल दाद मिळवून गेली. पवार यांच्या बापावरील शेराने लक्ष वेधले. पराडकरांचा शेरही दाद घेऊन गेला. गोरडे यांचा 'मलाही लागला आहे जगाचा रंग' हा शेर उंचीवर नेणारा ठरला. आत्माराम जाधव, रमेश ठोंबरे, आत्तम गेंदे, निशांत पवार, चंद्रकांत सिरस्कार, डॉ. राज रणधीर, गिरीश जोशी, इकबाल मिन्ने यांच्या गझलांना अतुल दिवे, श्रीराम पोतदार आणि वैशाली कुरतडीकर यांनी स्वरसाज चढवला. ''तू मला मी तुला साथ मागायची,'' ''गुलाबी गुलाबी हवा होत आहे,'' अशी प्रेमाची शायरीही चैतन्य भरणारी ठरली. ''सांजवेळी सुगंधी कहर पाहिजे,'' गझलेने सांगता झाली.

प्रास्ताविक गिरीश जोशी यांनी केले. महेश अचिंतलवार, प्रा. समाधान इंगळे व कस्तुरी कुलकर्णी - जोशी यांनी सूत्रसंचालन केले. संमेलनाच्या यशस्वितेसाठी निलेश राऊत, सुबोध जाधव, रणजित पराडकर, गिरीश जोशी, रमेश ठोंबरे, राजीव मासरूळकर, गणेश घुले, आत्माराम जाधव, निशांत पवार, आत्तम गेंदे, अजय त्रिभुवन, सुनील उबाळे, ज्ञानेशर कुलकर्णी, स्वप्नील उपाध्ये यांनी परिश्रम घेतले.

५.१९ **अभ्युदयची घोषणा**:- अभ्युदयचे नीलेश राऊत यांनी दरवर्षी ध्यास गझल संमेलनात ख्यातनाम गझलकार 'बशर नवाज' यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दोन पुरस्कार देणार असल्याची घोषणा केली. तरुण गझलकारांसाठी 'युवा गझलकार,' तर ज्येष्ठांसाठी 'गझल गौरव' असे हे दोन पुरस्कार असतील.

५.२० **'महात्मा गांधी : काल, आज व उद्या' विशेष चर्चासत्र**:- जगभरात महात्मा गांधी यांची शतकोत्तर सुवर्ण जयंती साजरी केली जात असताना महात्मा गांधी यांचे विचार जगभरातील सर्वसामान्य व्यक्तींपर्यंत पोहचवले जात असताना एक विशिष्ट विचारसरणी देशाला अजून एक राष्ट्रपिता लादण्याचे काम करीत आहे. परंतु महात्मा गांधी परत एकदा जन्माला घालणे किंवा त्यांची तुलना इतर एखाद्या व्यक्तीशी करणे हे काम कठीणच नाही, तर अशक्य आहे. आगामी काळात ज्या ज्या शक्ती भारतावर नवा राष्ट्रपिता लादण्याचे कार्य करतील त्यांना जनता धडा शिकविल्याशिवाय राहणार नाही. महात्मा गांधी यांचे विचार हे भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळासाठी देखील चिरंतर लागू राहतील. कारण की त्याचा मूळ गाभा हा सत्य व अहिंसेने तयार झालेला आहे. त्याला एक वैचारिक अधिष्ठान आहे, कृतीची जोड आहे. त्यामुळे ते नष्ट करून विशिष्ट विचार धारणेचे व कट्टरतेचे बाळकडू इथल्या नव्या पिढीला देणे शक्य होणार नाही, असे प्रतिपादन महात्मा गांधी - काल, आज व उद्या या विशेष चर्चासत्राच्या निमित्ताने मान्यवरांनी केले.

यशंवतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-विभागीय केंद्र औरंगाबाद यांच्या वतीने महात्मा गांधी यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. दि. २ ऑक्टोबर २०१९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालयाच्या मुख्य सभागृहात सदरील चर्चासत्र संपन्न झाले. प्रा. महेश अचिंतलवार, श्रीकांत देशपांडे व सचिन दाभाडे यांनी आपले विचार या प्रसंगी व्यक्त केले. सुबोध जाधव यांनी प्रास्ताविक तर गणेश घुले यांनी सूत्रसंचालन केले.

५.२१ **चित्रपट चावडीत ओरसेन वेल्स दिग्दर्शित 'फिल्मिंग ओथेलो' व 'ओथेबो' चित्रपटाचे प्रदर्शन**:- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबाद व एमजीएम पत्रकारीता महाविद्यालय संचलीत एमजीएम फिल्म आर्ट्स विभाग यांच्या संयुक्त विद्यामाने आयोजित चित्रपट चावडी उपक्रमाअंतर्गत शुक्रवार, दि. ८ नोव्हेंबर २०१९ रोजी डॉक्युमेंटरी फिल्म 'फिल्मिंग ओथोलो' व शनिवार दि. ९ नोव्हेंबर २०१९ रोजी ओरसेन वेल्स दिग्दर्शित 'ओथोलो' चित्रपट चित्रपती व्ही शांताराम प्रेक्षागृह, एमजीएम फिल्म आर्ट विभाग, एमजीएम पत्रकारिता महाविद्यालय,

औरंगाबाद येथे दाखविण्यात आले.

'फिल्मिंग ओथेलो' ही १९७८ ची डॉक्युमेंटरी फिल्म आहे. ज्यात ओरसेन वेल्स दिग्दर्शित आणि १९५१ सालच्या ओथेलो या चित्रपटाच्या पुरस्काराविषयी त्यांनी अभिनय केला होता. वेस्ट जर्मनने दिग्दर्शित केलेला हा चित्रपट वेस्ट जर्मन टेलिव्हिजनसाठी तयार केलेला शेवटचा पूर्ण चित्रपट होता.

'ओथेलो' (ट्रगेडी ऑफ ओथेलो : द मूर ऑफ वेनिस) शेक्सपियर यांच्या शोकांतीका नाटकाचे रूपांतर करणाऱ्या भूमिका साकारणाऱ्या ओरसन वेल्स यांनी १९५१ ला निर्मित केला आहे. हा चित्रपट मोरोक्को, वेनिस, टस्कनी आणि रोम आणि रोममधील स्केलेरा स्टुडिओमध्ये तीन वर्षांच्या कालावधीत चित्रीत केला आहे. ओरसन वेल्स व्यतिरिक्त, या चित्रपटाता आयगो म्हणून मिशेल मॅकलिअममीर, रॉडेरिगो म्हणून रॉबर्ट कोट, डेस्डेमोनो म्हणून सुझान क्लोटीर, कॅसिओ म्हणून मायकेल लॉरेन्स, एमिलीया म्हणून फे कॉम्पटन आणि बियान्का म्हणून डोरिस डोव्हलिंग यांचा समावेश आहे.

यावेळ दोन्ही चित्रपटास विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. चित्रपटास डॉ. रेखा शेळके, सुहास तेंडुलकर, एमजीएम फिल्म आर्ट विभाग प्रमुख शिव कदम, सुबोध जाधव, गणेश घुले, मंगेश निरंतर आदींची उपस्थिती होती.

५.२२ **बालदिनानिमित्त विशेष जाणीवजागृती सप्ताह बाल दिनानिमित्त सायबर सुरक्षा आणि बाल विश्व याविषयावर जाणीवजागृती कार्यक्रम**:- विकास अध्ययन केंद्र आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र औरंगाबाद यांच्या वतीने बुधवार, दि. १३ नोव्हेंबर २०१९ रोजी नॅशनल उर्दू हायस्कूल, जोगेश्वरी येथे बाल दिनानिमित येथे इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसोबत सायबर सुरक्षा आणि बाल विश्व याविषयावर विकास अध्ययन केंद्र व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या महिला व्यासपीठच्या रेणुका कड यांनी मार्गदर्शन केले. आभासी विश्वापेक्षा खरे जगत खूप सुंदर आहे. मुलांनी समाजमाध्यमाचे जग हे बालकांसाठी घातक असून, त्यापासून दूर रहायला हवे, असे आवाहन रेणुका कड यांनी यावेळी केली. त्यांनी आपल्या विशेष शैलीत मुलांची संवाद साधत सायबर सुरक्षेविषयी माहिती दिली. तसेच अठरा वर्षे वयाच्या आतील मुलांनी समाजमाध्यमावर आपले खाते उघडू नये, समाजमाध्यमावर अनोळखी व्यक्तिंशी मैत्री करू नये, मुलांनी सोशल मिडियाचा वापर करण्यापूर्वी त्याची सुरक्षायंत्रणा आधी समजावून घेतली पाहिजे, असेही त्यांनी मुलांना सांगितले.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षण, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

५.२३ **बालदिनानिमित्त विशेष जाणीवजागृती सप्ताह १५ नोव्हेंबर २०१९**:- आभासी विश्वापेक्षा खरे जगच खूप सुंदर आहे. मुलांनी समाजमाध्यमाच्या आभासी विश्वाऐवजी खऱ्या जगाशी मैत्री वाढवावी. समाजमाध्यमाचे जग हे बागकांसाठी घातक असून, त्यापासून दूर रहायला हवे, असे आवाहन रेणुका कड यांनी केले.

चौराह येथील मराठा हायस्कूल येथे विकास अध्ययन केंद्र आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबाद यांच्यातर्फे बालदिनानिमित्त इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसोबत सायबर सुरक्षा आणि बालविश्व या विषयावर रेणुका कड यांचे व्याख्यान झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक राघवेंद्र यत्नाळकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्यधापिका संध्या पाटील, जे.आर.पुनवटकर उपस्थित होते. कड यांनी आपल्या खास ओघवत्या शैलीत विद्यार्थ्यांशी संवाद साधत सायबर सुरक्षेविषयी माहिती दिली. त्यांनी पुढे आपल्या भाषणात 'अठरा वर्षे वयाच्या आतील मुलांनी समाजमाध्यमावर आपले खाते उघडू नये. समाजमाध्यमावर अनोळखी व्यक्तींशी मैत्री करू नये. समाजमाध्यमांचा वापर करताना त्यावरील आपल्या खात्याची सुरक्षायंत्रणा आधी समजावून घेतली पाहिजे'. अशा सूचना त्यांनी केल्या. डॉ. रूपेश मोरे यांनी सूत्रसंचालन केले.

**सोशल मिडियाचा वापर करताना काळजी घ्या रेणुका कड १७ नोव्हेंबर २०१९**:- 'अठरा वर्षे वयाच्या आतील

मुलांनी समाजमाध्यमावर आपले खाते उघडू नये. समाजमाध्यमावर अनोळखी व्यक्तिंशी मैत्री करू नये. समाजमाध्यमावर अनोळखी व्यक्तिंशी मैत्री करू नये. समाजमाध्यमांचा वापर करताना त्यावरील आपल्या खात्याची सुरक्षायंत्रणा आधी समजावून घेतली पाहिजे', असे आवासन रेणुका कड यांनी केले.

चौराहा येथील मराठा हायस्कूलच्या दुपारच्या सत्रात बालदिनानिमित्त इतत्ता सहावी ते दहवीच्या विद्यार्थ्यांसोबत सायबर सुरक्षा आणि बालविश्व य विषयावर रेणुका कड यांनी मार्गदर्शन केले. त्यावेळ त्या बोलत होत्या. सोशल मिडियापेक्षा खरे जग खुप सुंदर आहे. मुलांनी समाजमाध्यमाच्या आभासी विश्वाऐवजी खऱ्या जगाशी मैत्र वाढवावी. समाजमाध्यमाचे जग हे बालकांसाठी घातक असून, त्यापासून दूर राहायला हवे, असे आवाहन रेणुका कड यांनी केले.

अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक राघवेंद्र यत्नाळकळ होते. प्रमुख पाहुणे उपमुख्यध्यापिका संध्या पाटील, जे. आर. पुनवटकर उपस्थित होते. कड यांनी आपल्या खास ओघवत्या शैलीत विद्यार्थ्यांशी सवाद साधत सायबर सुरक्षेविषयी माहिती दिली. त्यांनी पुढे आपल्या भाषणास अशा सूचना त्यांनी केल्या. डॉ. रूपेश मोरे यांनी सूत्रसंचालन केले.

५.२४ **'सायबर सुरक्षा' आणि 'बाल विश्व' या विषयावर मुलांशी संवाद १८ नोव्हेंबर २०१९:-** 'समाजमाध्यमे अठरा वर्षे वयाच्या आतील मुलांनी वापरू नये. त्यावर अनोळखी व्यक्तिंसोबत मैत्री करू नये तसेच समाजमाध्यमे वापरताना त्यातील धोके लक्षात घेऊन प्रथम समाजमाध्यमांच्या खात्याची सुरक्षा लक्षात घ्यावी' असे प्रतिपादन रेणुका कड यांनी सायबर सुरक्षा आणि बालविश्व या विषयावर मुलांशी संवाद साधताना केले.

औरंगपुरा येथील सरस्वती भुवन प्रशाला येथे विकास अध्ययन केंद्र, आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबाद यांच्यातर्फे बालदिनानिमित्त इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसोबत 'सायबर सुरक्षा आणि बालविश्व' या विषयावर रेणुका कड यांच्या मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी त्या बोलत होत्या. सोशल मिडियापेक्षा खरे जगच खूप सुंदर आहे. मुलांनी समाजमाध्यमाच्या आभासी विश्वापेक्षा खऱ्या जगाशी मैत्री वाढवावी. समाजमाध्यमाचे जग हे बालकांसाठी घातक असून, त्यापासून दूर राहायला हवे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कड यांनी आपल्या खास ओघवत्या शैलीत विद्यार्थ्यांशी संवाद साधत मुलांना समाजमाध्यमांचे धोके लक्षात आणून दिले.

यावेळी शाळेचे मुख्याधापक शिरीष मोरे, शिक्षक विनोद सिनकर तसेच अन्य शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

५.२५ **बालदिननिमित्त 'सायबर सुरक्षा व बालविश्व' या विषयावर रेणुका कड यांचे मार्गदर्शन २० नोव्हेंबर २०१९:-** 'समाजमाध्यमांमध्ये टिकटॉक व फेसबुक वापरणारी अठरा वर्षे वयाच्या आतील मुले सर्वात जास्त आहेत. या वयातील मुलांचे फेसबुक फ्रेंडस् १००० ते १२०० च्या जवळपास आहेत. परंतु या आभासी जगापेक्षा खरे जग खूप सुंदर आहे. समाजमाध्यमे लहान मुलांसाठी खूप घातक असून मुलांनी आभासी विश्वाऐवजी खऱ्या जगाशी मैत्री वाढवावी', असे आवाहन रेणुका कड यांनी केले.

औरंगपुरा येथील शारदा मंदीर कन्या प्रशाला येथे विकास अध्ययन केंद्र आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबाद यांच्यातर्फे बालदिनानिमित्त इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसोबत 'सायबर सुरक्षा आणि बालविश्व' या विषयावर रेणुका कड यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. यावेळी त्या बोलत होत्या. आपल्या देशात सायबर पॉलिसी आहे का ? कायदा कोणता आहे ? समाजमाध्यमातील धोके काय आहेत आदी विषयांवर त्यांनी मुलांशी संवाद साधत मार्गदर्शन केले. महेश अंचितलवार यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.

यावेळी शाळेच मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येन उपस्थित होते.

५.२६ **संभाव्य धोके लक्षात घेऊन लहान मुलांनी समाजमाध्यमे वापरू नये.बालदिनानिमित्त एमजीएम संस्कार विद्यालयात रेणुका कड यांनी साधला संवाद २० नोव्हेंबर २०१९ :-** 'मुले समाजमाध्यमांचा अती वापर करतात, टिकटॉक व फेसबुक वापरणारी अठवा वर्षे वयाच्या आतील मुले सर्वांत जास्त आहेत. या वयातील मुलांचे फेसबुक फ्रेंडस् १००० ते १२०० च्या जवळपास आहेत. मोबाईल इंटरनेटचे ज्ञान मुलांमध्ये अफाट आहे. परंतु यामुळे लहान मुले सायबर गुन्हांना बळी पडत आहेत. त्यामुळे अठरा वर्षे वयाच्या आतील मुलांनी समाजमाध्यमे वापरू नयेत. त्यांचा वापर करण्यापूर्वी त्यातील संभाव्य धोके लक्षात घ्यावे', असे प्रतिपादन रेणुका कड यांनी केले.

बालदिनानिमित्त एमजीएम संस्कार विद्यालय येथे विकास अध्ययन केंद्र आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबाद यांच्यातर्फे 'सायबर सुरक्षा आणि बालविश्व' या विषयावर रेणुका कड यांचा जाणीवजागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. आपल्या देशात सायबर पॉलिसी आहे का ? कायदा कोणता आहे ? समाजमाध्यमातील धोके काय आहेत, आदी विषयांवर त्यांनी मुलांशी संवाद साधत मार्गदर्शन केले. आभासी विश्वापेक्षा खरे जगच खुप सुंदर आहे. मुलांनी समाजमाध्यमाच्या आभासी विश्वाऐवजी खऱ्या जगाशी मैत्री वाढवावी. समाजमाध्यमाचे जग हे बालकांसाठी घातक असून, त्यापासून दूर राहयला हवे, असे आवाहनही रेणुका कड यांनी यावेळी केले. महेश अचिंतलवार यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

५.२७ **बालदिनिमित्त 'सायबर सुरक्षा व बालविश्व' या विषयावर रेणुका कड यांचे मार्गदर्शन २० नोव्हेंबर २०१९ :-** 'गेल्या काही वर्षात माहिती तंत्रज्ञानाने मोठी क्रांती केली आहे. सोशल मिडिया, मोबाईल शिवाय एक क्षणही मुलांना चैन पडत नाही. मात्र तंत्रज्ञानाचा अतिवापराचा गैरफायदा घेत समाजातील विकृतांकडून लहान मुला-मुलींना लक्ष करून त्यांचे शोषण करण्याचे प्रकार वाढले आहेत. त्यामुळे आभासी माध्यमातून होणाऱ्या शोषणाशी सामन करण्यासाठी, समाजमाध्यमांचा सुरक्षीत वापर करण्यासाठी मुलांनी शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन रेणुका कड यांनी केले.

बालदिनानिमित्त 'सायबर सुरक्षा आणि बालविश्व' या विषयावर रेणुका कड यांचा वेणूताई चव्हाण हायस्कूलमध्ये जाणीवजागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. आपल्या विशेष शैलीत विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आभासी विश्वापेक्षा खरे जगच खूप सुंदर आहे. मुलांनी समाजमाध्यमाच्या आभासी विश्वाऐवजी खऱ्या जगाशी मैत्री वाढवावी. समाजमाध्यमाचे जग हे बालकांसाठी घातक असून. त्यापासून दूर राहायला हवे, असे आवाहन रेणुका कड यांनी यावेळी केले. महेश अचिंतलवार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

५.२८ **कोरडवाहू क्षेत्र व इतर प्रश्नां'वरील विशेष चर्चासत्र २०,२१ नोव्हेंबर २०१९ :-** योजना, निधी, यंत्रणा, सुविधा, अंमलबजावणीही मग तरीही शेतीसमोरील वर्षानुर्षांचे प्रश्न कायम का ? असा प्रश्न औरंगाबाद येथे २० आणि २१ नोव्हेंबरला 'कोरडवाहू क्षेत्र व इतर प्रश्न' या विषयावर पार पाडलेल्या चर्चासत्रातून पुढे आला. शासनाचे धोरण, अंमलबजावणी व प्रत्यक्ष स्थिती यामध्ये असलेली 'दरी' व निर्माण होण्याची कारणे व ती 'दरी' दूर करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांची 'जंत्री' या चर्चासत्रातून पुढे करण्यात आली.

रिव्हायटलाइझिंग रेनफेड ॲग्रिकल्चर नेटवर्क (आर.आर.ओ.), यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबाद व एमजीएम कृषी विज्ञान केंद्राच्या संयुक्त विद्यमाने या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील

विविध जिल्ह्यांतून आलेल्या अभ्यासकांसह तज्ज्ञ, कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ज्ञ, शेतकरी, पशुपालक आदींनी या चर्चासत्रात सहभाग नोंदविला.

बुधवारी (ता. २०) झालेल्या पहिल्या सत्रात वायआरए नागपूरचे अजय पराडकर यांनी संरक्षित सिंचन, मनीष राजनकर यांनी मत्स्य व्यवसाय शासनाची धोरणे आणि प्रत्यक्ष स्थिती, कौस्तुभ पांढरीपांडे यांनी चराई धोरण गवत संरक्षण, जैवविविधतेवरील परिणाम, अश्विनी कुलकर्णी यांनी बदलता पिक पॅटर्न आकडेवारीचा खेळ आणि त्याची उत्पादकतेशी सांगड, मिलिंद वाटवे यांनी वन्य प्राण्यांच्या नुकसानीमुळे पिक पद्धतीवरील परिणाम, प्रवीण भुते यांनी वन हक्काचे पट्टे वनजमीन विकास विषयीचे सादरीकरण केले. त्यानंतर त्या प्रत्येक विषयाशी संबंधीत अभ्यासक, शेतकरी, पशुपालक, तज्ज्ञ व जाणकारांच्या बुधवारी व गुरूवारी (ता. २१) गटचर्चा झाल्या. त्यातून समोर असलेल्या सूचनांची 'पोझिशन पेपर' स्वरूपात मांडणी करण्यात आली. या सत्राला कृषिरत्न विजय अण्णा बोराडे व वैरण विकासाचे उपसंचालक गणेश देशपांडे यांची उपस्थिती होती.

''जगण्यासाठी अन्नधान्य ते पिकविण्यासाठी शेती, त्या शेतीतील मातीचे आरोग्य टिकविण्यासाठी शेणखत, शेणखतासाठी जनावर, जनावरं जगविण्यासाठी चारा आवश्यक, हे वर्तुळ समजून घेऊन काम करावे लागेल. योजना व निधीची कमतरता नाही, संवादातून निर्माण झालेली दरी दूर करता येईल,'' असे वैरण विकासचे उपसंचालक गणेश देशपांडे यांनी सांगितले.

५.२९ **आदरणीय यशवंतराव चव्हाण यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन व विशेष व्याख्यान**:- आदरणीय यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या पुण्यतिथी निमित्त सोमवारी (ता. २५ नोव्हेंबर) सकाळी मराठवाडा साहित्य परिषद येथील आदरणीय चव्हाण साहेब यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी विभागीय केंद्र औरंगाबादचे सुबोध जाधव, गणेश घुले, राजेंद्र वाळके, उदय भोसले, ज्ञानेश बोद्रे, मनोज आदमान, बाळू कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सर्व मान्यवरांनी साहित्य परिषद येथे असलेल्या आदरणीय यशवंतराव चव्हाण यांच्या रेखाचित्र प्रदर्शनास भेट देऊन आदरणीय चव्हाण साहेबांच्या कार्याला उजाळा दिला.

''एखादी आपत्ती आली तर शेती हा ज्याचा पूरक व्यवसाय असतो, तोच खूप रडतो; मात्र ज्याचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे त्याला अशा स्थितीतही रडायला वेळ नसतो. शेती करण्यात प्रचंड अडचणी आहेत, परंतु सर्वाधिक संधीही शेतीतच आहेत'' असे मत जुन्नर पर्यटन विकास मॉडेल जगासमोर आणणारे मनोज हाडवळे यांनी सोमवारी (ता. २५) व्यक्त केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबाद आणि एमजजीएम वृत्तपत्रविद्या व जनसंवाद महाविद्यालतर्फे आयोजित 'ग्रामीण भारताचा नवा चेहरा: ग्रामसंस्कृती पर्यटन' या विषयावर हाडवळे यांनी विचार मांडळे. यावेळी विभागीय केंद्राचे अध्यक्ष तथा एमजीएमचे सचिव अंकुशराव कदम, प्राचार्य प्रतापराव बोराडे, प्राचार्य डॉ. रेखा शेळके, सुहास तेंडुलकर, सुबोध जाधव, गणेश घुले यांच्यासह पत्रकरिता तसेच कृषी विभागाचे विद्यार्थी, शिक्षकांची उपस्थिती होती.

हाडवळे म्हणाले, ''आधी जागतिक बाजारपेठेचे लक्ष 'इंडिया' कडे होते; पण आता त्याच वस्तू ग्रामीण भागात विकल्या जात असल्याने त्यांना 'भारत' खुणावू लागलाय. भारताच्या प्रत्येक गावाची काही ना काही वैशिष्ट्ये आहेत. तेथील ग्रामसंस्कृती आपण पर्यटनाच्या माध्यमातून लोकांसमोर आणू शकतो. नावीन्याच्या शोधात लोक हजारो किमीचा प्रवास करून येतात. त्यामुळे ग्रामीण पर्यटनाचे क्षेत्र वाढू शकते. सध्याचा कल आणि स्पर्धेचा विचार करता अत्यंत कमी गुंतवणूक आणि अधिक कल्पकतेत पर्यटन सुरू करता येऊ शकते. आजकाल गावाकडची लोकं शहराची वाट धरू लागली आहेत. ते मग गावाशी नाती तोडू लागतात, त्यांच्या मुलाबाळांना गावाकडच्या मातीचा स्पर्शही नसतो आणि हीच

मुलंबाळं मोठी झाली की पर्यटनासाठी गावाची वाट धरतात. मग तीच तुमच्या-आमच्यासारख्या पर्यटन उद्योजकांसाठी ग्राहक बनतात. लोकं रेस्टॉरंटमधले घरी जेऊ लागली आहेत. यावरून ग्रामीण संस्कृतीचे महत्त्व आपण ओळखायला हवे, 'असे आवाहनही हाडवळे यांनी केले. महेश अचिंतलवार यांनी सूत्रसंचालन केले.

५.३० **चित्रपट चावडीत सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट 'पिंजरा' चे प्रदर्शन ३१ डिसेंबर २०१९:-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबाद ओयोजित चित्रपच चावडी उपक्रमांअंतर्गत मंगळवार, दि. ३१ डिसेंबर २०१९ रोजी व्ही. शांताराम यांनी निर्मिती व दिग्दर्शित केलेला पहिला रंगीत मराठी सर्वोत्कृष्ट चित्रपट 'पिंजरा' सायं.६वा. चित्रपती व्ही. शांताराम प्रेक्षागृह फिल्म आर्ट विभाग, एमजीएम पत्रकारिता महाविद्यालय, औरंगाबाद येथे दाखविण्यात आला.

नुकतेच प्रसिद्ध अभिनेत श्रीराम लागू यांचे निधन झाले. त्यांना श्रद्धांजली म्हणून या चित्रपटाचे प्रदर्शन करण्यात आले. 'पिंजरा' चित्रपटातील त्यांचा अभिनय व त्यांना मिळालेली निळू फुले यांची साथ यामुळे हा चित्रपट सृष्टीतील मानाचा दगड ठरलेला आहे. श्रीराम लागू यांच्या चित्रपट पदार्पणातील हा चित्रपट असून यात अभिनेत्री संध्या प्रमुख भूमिकेत आहे. तमाशावर आधारित हा चित्रपट असून यातील गाणी लता मंगेशकर व उषा मंगेशकर यांनी गायीली आहे. तसेच या चित्रपटास उत्कृष्ट मराठी चित्रपटाचा पुरस्कार मिळालेला आहे.

चित्रपटास चित्रपट प्रेमींनी गर्दी केली होती. यावेळी डॉ. रेखा शेळके, सुहास तेंडुलकर, एमजीएम फिल्म आर्ट विभाग प्रमुख शिव कदम, सुबोध जाधव आदींची उपस्थिती होती.

५.३१ **औरंगाबादच्या वतीने ९३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात गावकथा चा प्रयोग ११ जानेवारी २०२०:-** संत गोरोबाकाका साहित्यनगरी (उस्मानाबाद) मराठी साहित्य संमलेनात शनिवार (ता. ११ जानेवारी) सादर झालेल्या गावकथा या सांस्कृतिक कार्यक्रमाला रसिकांनी भरभरून दाद दिली. या कार्यक्रमात गावातील व्यथांचे चित्र कलाकारांनी उभे केले.

यशंवतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबाद आयोजित रंगदृष्टी (पुणे) निर्मित जाणिवांचा जिवंत गाव 'गावकथा' हा ग्रामीण जीवनात येणाऱ्या अडचणींना वाचा फोडणारा नाट्यप्रयोग ९३व्या अखिलभारतीय मराठी साहित्य संमेलनात सादर करण्यात आला.

शहरी जीवन सुसज्ज होत असताना ग्रामीण भागाला विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. गावशिवारातील शेतात पाणी आहे; पण वीज नाही, वीज आहे, पण पाणी नाही. त्यामुळे शेती आणि शेतकरी उद्ध्वस्त होत असल्याची व्यथा कलाकारांनी मांडली. लहानपणीचे ग्रामीण जीवन अत्यंत सुंदर, खेळकर कसे असते. याचेही सुरेख वर्णन यामध्ये केले आहे. शिक्षण घेऊन ग्रामीण भागातील तरूणांना नोकरी अभावी लग्न वेळेवर करता येत नाही, हा गंभीर विषयही या कथेत येतो. सातत्याने पडणारा दुष्काळ, नापिकी यामुळे आलेले नैराश्य, घरात वाढणारा दैनंदिन खर्च, उत्पादनापेक्षा शेतातील वाढता खर्च, त्यासाठी घ्यावी लागणारी सावकाराची मदत, तरीही तोडकी अपेक्षा धरून घाम गाळणारा शेतकरी, पुन्हा त्याच्या वाट्याला आलेला दुष्काळ आणि अस्मानी संकटे, अशा अनेक समस्यांच्या चक्रव्यूहामध्ये अडकलेला घरातील कर्ता पुरूष मृत्यूला जवळ करतो आणि त्याचे कुटूंब उद्ध्वस्त होते. हे वास्तव 'गावकथा' या नाट्यप्रयोगात गंभीरपणे मांडले आहे. गावातील पुढाऱ्यांची दादागिरी, यातून होणारे नुकसान याचीही मांडणी गावकथेतील कलाकारांनी केली.

५.३२ **अशोक राणे यांच्या आत्मचरित्राचे प्रकाशन १७ जानेवारी २०२०:-** अशोक राणे यांना सिनेमा पाहण्याचे व्यसन जडलेले आहे. हे व्यसन कोणत्याही संस्थेत जाऊन सुटू शकत नाही. आज या व्यसनामुळे चित्रपट समीक्षक, अभ्यासक आणि महोत्सवाचा संचालक पदापर्यंत पोहोचता येऊ शकते याचे उदाहरण म्हणजे अशोक राणे. त्यांच्या 'सिनेमा पाहणारा माणूस' या पुस्तकामुळे अनेक अशोक राणे तयार होतील. अशी अपेक्षा प्रसिद्ध नाट्य-चित्रपट दिग्दर्शक चंद्रकांत

कुलकर्णी यांनी प्रकाशनावेळी एमजीएमच्या व्ही शांताराम सभागृहात शुक्रवारी (ता. १७) व्यक्त केली. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी कवी व लेखक दासू वैद्य, कार्यक्रमाचे तथा यशंवतराव चव्हाण प्रतिष्ठाने विभागीय केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम, लेखक अजित दळवी, दिग्दर्शक ज्ञानेश झोटिंग, सुहास तेंडुलकर, निलेश राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची प्रस्तावना निलेश राऊत यांनी केली.

पुढे बोलताना श्री. कुलकर्णी म्हणाले, की माझ्या पहिल्या नाटकाचा, तर मी त्याच्या पहिल्या गंभीर चित्रपट लेखनाचा मी साक्षीदार आहे. प्रभात चित्रमंडळापासून आमची फक्त ओळख नव्हे तर सातत्याने भेटीगाठी होत असतात. जगभरातील वेगवेगळ्या देशात जाऊन त्यांनी चित्रपट बघितले, अनुभवले. हे चित्रपट फक्त स्वत:पुरते मर्यादित न ठेवता सातत्याने या क्षेत्रातील विद्यार्थी, अभ्यासक, समीक्षक यांच्यासमोर वेगवेगळ्या माध्यमातून पोचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न ते करतात. चित्रपट पाहण्याच्या प्रवासापासून ते महोत्सवाच्या संचालकापर्यंत त्यांनी सर्वोच्च पदापर्यंत मजल मारली आहे. येणाऱ्या पिढीसाठी ते मार्गदर्शक ठरतील. सिनेमा पाहणारा माणूसच्या माध्यमातून त्यांचा प्रवास नक्कीच वाचावा असा आहे.

यावेळी लेखक अजित दळवी म्हणाले की, 'शिक्षकाचं काम काही माहिती किंवा ज्ञान देणे इतकेच नाही. त्याऐवजी त्यांना शोध लावायला लावणे हे प्रमुख काम आहे. त्यातून समाजाला काहीतरी देण्याचे काम शिक्षक व विद्यार्थ्यांकडून होत असते. आज शोध लावायला भाग पाडण्याचे काम अशोक राणे करताहेत. सिनेमाचे वेड या माणसाने सर्वांना लावले.' दासू वैद्य म्हणाले की, 'अशोक राणे म्हणजे चित्रपटांबाबत पछाडलेला व झपाटलेला माणूस आहे. चित्रपट कसा पाहावा यापासून ते सर्व पैलूंद्वारे चित्रपट ते सर्वांसमोर उलगडतात.' कार्यक्रमाचे अध्यक्ष अंकुशराव कदम म्हणाले की, 'अशोक राणे खूप चांगल्या पद्धतीने चित्रपट पाहतात, याबद्दल खरचं कौतुक वाटते. या चित्रपटाच्या पुराव्यादाखल पुस्तकात तिकीटही छापलेले आहेत. छंद माणसाला कुठपर्यंत घेऊन जातात त्याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे अशोक राणे आहेत. यामुळे चित्रपट सृष्टीला नवी दिशा देण्यात काम होईल.'

यावेळी अशोक राणे म्हणाले की, 'माझा जन्म गुजरात, गाव कोकण आणि कर्मभूमी अखख जग आहे. मात्र औरंगाबाद मला माझं वाटतं. औरंगाबादने मला सर्वोच्च अशा चित्रपट महोत्सवाच्या संचालकपदावर काम करण्याची संधी दिली. हे' पुस्तक लिहिण्याबाबतची भूमिका काय आहे, यावर विचार केला तेव्हा लक्षात आले की, सिनेमा पाहणारा माणूस म्हणून संबोधले जायचे. तेव्हा राग यायचा. सिनेमा पाहणे, बोलणे आणि लिहिणे ही सुद्धा एक कला असू शकते. लहानपणापासून मला चित्रपटाने वेड लावले. आयुष्यातील सर्वोच्च आनंदाचे क्षण मला या चित्रपट पाहण्याच्या छंदाने दिले. मी माझ्या आजवरच्या आयुष्यात तृप्त आहे.' कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिव कदम यांनी केले. आभार गणेश घुले यांनी मानले.

## १०.६ विभागीय केंद्र रत्नागिरी

६.१ **स्वच्छता मोहिम :-** कोकणामध्ये पावसाचे प्रमाण जास्त आहे; परंतु या वर्षी कोकणामध्ये भरपूर प्रमाणात पाऊस झाला. ०६ ते ०७ वेळा पूर परिस्थिती निर्माण झाली. चिपळूणमध्येही मोठ्या प्रमाणात पावसाचे प्रमाण होते. घरात, दुकानात पाणी घुसत होते. त्यामुळे नागरिक वैतागले. त्यामुळे घरात व दुकानात मोठ्या प्रमाणात घाण व चिखल येऊन बसला होता. नागरिक व दुकानदारांना दिलासा मिळावा, यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्यकर्ते यांनी शेखर निकम सरांच्या व सभापती पूजा निकम यांच्या मार्गदर्शनाखाली मा. श्री. शरदचंद्रजी पवार कृषि महाविद्यालयातील विद्यार्थी व कार्यकर्त्यांनी दि. १० ऑगस्ट २०१९ रोजी दुकानातील वस्तू लावण्यापासून स्वच्छता व दुकानदारांना आवश्यक ती

सर्व मदत केली. ८० ते ९० जणांच्या ताफ्याने स्वच्छता व सफाई मोहीम चिंचनाक्यातून सुरू केली. नगरपालिका, गांधी चौक, भेंडीनाका, जुना स्टॅण्ड असा संपूर्ण परिसर स्वच्छ केला.

स्वच्छतेसाठी आवश्यक असणारे साहित्य शेखर निकमांनी व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान यांनी उपलब्ध करून दिले.

६.२ **अपंगांसाठी मोफत साहित्य वाटप:-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व सह्याद्री शिक्षण संस्थेचे महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने अपंगांना मोफत साहित्य दि. १.९.२०१९ रोजी वाटप करण्यात आले.

श्रवणयंत्रे, कुबडी, एम. आर. किट, कॅलिपर जयपूर फुट, कमोड चेअर, वॉकर, चष्मे, वॉकिंग स्टीक, अंधचष्मे, ब्रेलकिट इत्यादी साहित्य वाटप करण्यात आले. तसेच ३०० लोकांची जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती.

कार्यक्रमासाठी चिपळूण पंचायत समितीच्या सभापती मा. सौ. पूजा निकम मॅडम उपस्थित होत्या. तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रा. सौ. नलावडे मॅडम तसेच मिलिंद कापडी, सुचय अण्णा रेडीज, रिहाना बिजले, वर्षा जागुष्टे, इ. मान्यवर उपस्थित होते.

६.३ **पुण्यतिथी:-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान-विभागीय केंद्र रत्नागिरी व सह्याद्री शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने माध्यमिक महिला विद्यालय पाग-चिपळूण येथे यशवंतराव चव्हाण यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

प्रथम मा. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रा. मुख्याध्यापिका सौ. नलावडे मॅडम यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. त्यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या जीवन कार्याची, सामाजिक व देश हिताच्या कार्याची सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून न्यू. इंग्लिश स्कूलचे प्रा. शैलेश सुर्वे सर उपस्थित होते.

## १०.७ विभागीय केंद्र, लातूर

७.१ **जाहीर व्याख्यान:-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र लातूरच्या वतीने नवे शैक्षणिक धोरण आणि उच्च शिक्षण या विषयावर भालचंद्र ब्लड बँक सभागृह, लातूर याठिकाणी १२ जुलै २०१९ रोजी जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. जनार्दन वाघमारे तर प्रमुख वक्ते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड चे माजी कुलगुरु ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ पंडित विद्यासागर, माजी खासदार डॉ गोपाळराव पाटील, डॉ नागोराव कुंभार, डॉ. रमेश दापके, प्रा. शाम आगळे हे उपस्थित होते.

डॉ. विद्यासागर म्हणाले, नवे शैक्षणिक धोरण तयार झाल्यामुळे जुने धोरण टाकून द्यायचे असे नाही. जुन्या धोरणातील अनेक चांगल्या गोष्टी पुढे न्यायच्या आहेत. शेवटी विद्यार्थ्यांना सजग नागरिक बनविणे हे नव्या धोरणात अभिप्रेत आहे अशी टिप्पणी त्यांनी यावेळी केली.

प्रास्ताविक डॉ. नागोराव कुंभार, सूत्रसंचालन कोषाध्यक्ष विवेक सौताडेकर तर आभार अॅड. मनोहरराव गोमारे यांनी मानले.

७.२ **अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी:-** विभागीय केंद्राच्या वतीने लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या गंजगोलाई जवळील पूर्णाकृती पुतळयास त्यांच्या जयंतीनिमित्त १ ऑगस्ट २०१९ रोजी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रतिष्ठानचे विभागीय अध्यक्ष तथा माजी कुलगुरु डॉ. जनार्दन वाघमारे, नागोराव कुंभार यांनी साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांचा जीवनपट उपस्थितांच्या

समोर मांडला. याप्रसांगी सचिव प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, कोषाध्यक्ष विवेक सौताडेकर, सदस्य अॅड. मनोहरराव गोमारे तसेच रामकुमार रायवाडीकर, बाळ होळीकर, अॅड. वसंतराव उगले, अॅड. शेखर हाविले, विक्रम कदम आदींची उपस्थिती होती.

७.३ **परिसंवाद:-** विभागीय केंद्र लातूरच्या वतीने साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमिताने भालचंद्र रक्तपेढीच्या सभागृहात अण्णाभाऊ साठे. साहित्य व समाज विषयक चिंतन या विषयावर १० सप्टेंबर २०१९ रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. जनार्दन वाघमारे तर प्रमुख वक्ते प्राचार्य डॉ. विठ्ठल मोरे, प्राचार्य डॉ. माधव गादेकर, डॉ. शिवाजीराव जवळगेकर हे उपस्थित होते. याप्रसंगी अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यिक, सामाजिक व समाजविषयक कार्यावर वक्त्यांनी प्रकाश टाकला.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.शाम आगळे, सूत्रसंचालन कोषाध्यक्ष विवेक सौताडेकर व आभार अॅड. मनोहरराव गोमारे यांनी मानले. कार्यक्रमप्रसंगी अनेक यशवंतप्रेमी नागरिक, प्राध्यापक शिक्षकवृंद मोठया संख्येने उपस्थित होते.

७.४ **हैदराबाद मुक्तिसंग्राम दिन:-** विभागीय केंद्र लातूरच्या वतीने १७ सप्टेंबर २०१९ रोजी लातूरच्या टाऊन हॉल येथील हुतात्मा स्मारकाला पुष्पांजली अर्पण करण्यात आली. तसेच प्रतिष्ठानच्या वतीने उपस्थित स्वातंत्र्यसैनिकांचा आणि मृत स्वातंत्र्य सैनिकांच्या पत्नी यांचा सत्कार करण्यात आला.

७.५ **महात्मा गांधी जयंती:-** महात्मा गांधी यांची जंयती २ ऑक्टोबर २०१९ रोजी साजरी करण्यात आली. याप्रसंगी गोमारे कॉम्प्लेक्स, शिवाजी चौक, लातूर या ठिकाणी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच यानंतर प्रतिष्ठानच्या सदस्यांची बैठक घेण्यात आली. या प्रसंगी सचिव डॉ. नागोराव कुंभार, कोषाध्यक्ष विवेक सौताडेकर, सदस्य अॅड. मनोहरराव गोमारे प्राचार्य रमेश दापके आदी सदस्य उपस्थित होते.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र लातूरच्या वतीने 'महाराष्ट्राची जडणघडण आणि संत सहित्याचे योगदान' या विषयावर जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉक्टर जनार्दन वाघमारे तर प्रमुख व्याख्याते म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबईचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, सचिव प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार सदस्य कुसुम मोरे आदि उपस्थित होते.

विभागीय केंद्र, लातूरच्या वतीने स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या ३५ व्या पुण्यातिथी निमित्ताने त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विभागीय प्रतिष्ठानचे अध्यक्ष माजी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे, सचिव कोषाध्यक्ष विवेक सौताडेकर, सदस्य अँड. मनोहरराव गोमारे, अॅड. शेखर हवेले, वसंतराव उगले आदि उपस्थित होते.

विभागीय केंद्र, लातूरच्या वतीने आयोजित 'महाराजा सयाजीराव गायकवाड : विचार आणि कार्य' याविषयावर जाहीर व्याख्यान दिनांक २५ नोव्हेंबर २०१९ रोजी आयोजित करण्यात आले होते. दिनांक २५ नोव्हेंबर २०१९ रोजी आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्रमुख वक्ते महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबईचे माजी अध्यक्ष बाबा भांड, मंचावर उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे, सचिव डॉ. नागोराव कुंभार, सदस्य डॉ. कुसुम मोरे उपस्थित होते.

विभागीय केंद्र लातूरच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्ताने लातूर शहरातील महात्मा फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित प्रतिष्ठानचे विभागी केंडाचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघामारे सचिव डॉ. नागोराव कुंभार, कोषाध्यक्ष विवेक सौताडेकर, सदस्य अॅड. मनोहरराव गोमारे, अॅड. वसंतराव उगले, शेखर हाविले, अरविंद कांबळे इत्यादी उपस्थित होते.

## १०.८ विभागीय केंद्र, अहमदनगर

८.१ **शेती कट्टा**:- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई–विभागीय केंद्र, अहमदनगर अंतर्गत 'कापूस उत्पादन तंत्रज्ञान' या विषयावर शेतीकट्टाकार्यक्रमाचे आयोजन मु.पो.कोराळे, ता. वहता, येथे ९ एप्रिल २०१९ रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ.एन. के.भुटे, सहाय्यक कीटक शास्त्रज्ञ, कापूस सुधार प्रकल्प, म. फु.कृ. वि. राहुरीहे लाभले होते. या प्रसंगी डॉ. भुटे यांनी कापूस पिकावरील गुलाबी बोंडअळी, ऊस पिकावरील हुमणी तसेच मका पिकावरील लष्करी अळी या विषयी सविस्तर मार्गदर्शन करून कापूस पीक लागवडीसाठी वाणांची निवड, लागवड पद्धत, आंतरमशागत, खत व पाणी व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रण आणि कापूस वेचणी इत्यादी विषयी शेतकरी बंधुंना बहुमोल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रम प्रसंगी श्री.निलेश शेळके, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.तसेच श्री. जनार्दन शेळके, श्रीमती कीर्ती सूर्यवंशी (कृषी सहाय्यक), श्री दादासाहेब शेळके तसेच कृषी महाविद्यालय सोनई, प्राचार्य डॉ. हरी मोरे, प्राध्यापक सोमनाथ दरंदले व परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र, अहमदनगरचे सर्व सन्माननीय सदस्य व कोराळे गावातील शेतकरी बंधूंचे विशेष सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमाचे आयोजन श्री. निलेश शेळके व श्री. जनार्दन शेळके यांनी केले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. हरी मोरे प्राचार्य, कृषी महाविद्यालय, सोनई यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र लिपने यांनी केले.

८.२ **शेती कट्टा**:- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-विभागीय केंद्र, अहमदनगर अंतर्गत 'कापूस उत्पादन तंत्रज्ञान आणि पशू संवर्धन व दुग्ध उत्पादन' या विषयावर शेतीकट्टा कार्यक्रमाचे आयोजन मु.पो.कणोली ता. संगमनेर येथे १६ मे २०१९ रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक प्रा. एम. एच. गावडे, सहाय्यक प्राध्यापक, उद्यानविद्या विभाग, म. फु.कृ.वि. राहुरी व प्रा. विक्रम भय्ये, सहाय्यक प्राध्यापक पशू संवर्धन व दुग्ध शास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, सोनई हे लाभले होते.या प्रसंगी प्रा. एम. एच. गावडे यांनी कांदा लागवड संबंधित खरीप हंगामातील अधिक उत्पादन देणारे वाण, गादिवाफा तयार करताना घ्यावयाची काळजी, रोपांची निवड, जैविक खते व त्यांचे प्रमाण, पाणी व्यवस्थापन, तण नियंत्रण, हिरवळीच्या खताचे महत्त्व, कीड व रोग नियंत्रण, पिकाची काढणी व साठवण करताना कोणती काळजी घ्यावी इत्यादी विषयी शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन करुन शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे निरसन केले. तसेच प्रा. विक्रम भय्ये यांनी 'पशू संवर्धन व दुग्ध उत्पादन ' या विषयांवर मार्गदर्शन करताना भारताचे दूध उत्पादनात जागतिक स्थान, दूध उत्पादनातील संधी, चारा व्यवस्थापन, गोठयाच्या पद्धती, जनावरांचे हवामानातील बदलांपासून संरक्षण करताना कोणती काळजी घ्यावी व कमी खर्चात दूध उत्पादनात वाढ कशा प्रकारे करता येऊ शकते याविषयी सखोल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रम प्रसंगी श्री.शिवाजीराव माने, प्रगतिशील शेतकरी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.तसेच श्री. बापूसाहेब औटी, श्री. संपत शिंदे, श्री. बंटी भाऊ शेरकर, कृषी महाविद्यालय सोनई, प्राचार्य डॉ. हरी मोरे, प्राध्यापक सोमनाथ दरंदले, प्रा. राजेंद्र लिपने व परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र अहमदनगरचे सर्व सन्माननीय सदस्य व कणोली गावातील शेतकरी बंधूंचे विशेष सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमाचे आयोजन श्री. बापूसाहेब औटी व श्री. शिवाजीराव माने यांनी केले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. हरी मोरे प्राचार्य, कृषी महाविद्यालय, सोनई यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र लिपने यांनी केले.

८.३ **शेती कट्टा**:- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई–विभागीय केंद्र, अहमदनगर अंतर्गत 'कापूस पिकावरील किडींचे व्यवस्थापन' या विषयावर १८जून, २०१९ रोजी शेतीकट्टा कार्यक्रमाचे आयोजन मु. पो.शहापूर ता.नेवासा येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक प्रा. सोमनाथ दरंदले, किटकशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, सोनई हे लाभले होते. या प्रसंगी प्रा. दरंदले यांनी कापूस पिकावरील किडींची ओळख, किडीचा जीवनक्रम, अवस्था, किड येण्याची कारणे, किड येऊ नये यासाठी काय खबरदारी घ्यावी ? किड आल्यानंतर ती कशी ओळखावी ? किड नष्ट करण्यासाठी कोणत्या उपायांचा अवलंब केला पाहिजे, किडींचा पिकावर व उत्पादनावर होणारा दुष्परिणाम, तसेच नैसर्गिक पद्धतीने पिकांचे किडींपासून संरक्षण कसे करावे ? याविषयी सविस्तर मार्गदर्शन करून उपस्थित शेतकरी बांधवांच्या प्रश्नांचे निरसन करून शेतकऱ्यांना खरीप पीक उत्पादन वाढीसाठी शुभेच्छा दिल्या.

हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र अहमदनगरचे सर्व सन्माननीय सदस्य व शहापूर गावातील शेतकरी बंधूंचे विशेष सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमाचे आयोजनश्री. विलास शिंदे व श्री. संदिप कोलते यांनी केले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुहास माने, कृषि महाविद्यालय, सोनई यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र लिपने यांनी केले.

८.४ **शेती कट्टा**:- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई -विभागीय केंद्र, अहमदनगर अंतर्गत 'वृक्षसंवर्धन-काळाची गरज' या विषयावर २४ जुलै २०१९ रोजी शेतीकट्टा कार्यक्रमाचे आयोजन मु. पो.नांदूर शिकारी ता. नेवासा जि. अहमदनगर येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून प्रा. सौ. जयाताई गडाख, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनई या उपस्थित होत्या. या प्रंसगी सौ. जयाताई गडाख यांनी वृक्षलागवड तसेच वृक्षारोपण करताना काय काळजी घ्यावी ? वृक्षारोपण करताना पाण्याचे व्यवस्थापन, प्राणी व इतर घटकांपासून वृक्षांचे संवर्धन कसे करावे, निसर्ग संवर्धनातील झाडाची महत्त्वाची भूमिका, प्रदूषण कमी करण्यासाठी उपयुक्त वनस्पतींची जोपासना कशी करावी, वृक्षसंवर्धनाचे फायदे, फळबाग व वनशेतीसाठी भविष्यातील संधी इ. विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

या प्रसंगी सौ.केसरबाई सरोदे, श्री. संतोष लिपने, श्री. मच्छिंद्र लिपने, रखमाजी लिपणे, प्रा. सोमनाथ दरंदले, प्रा. राजेंद्र लिपने व प्रा. श्रीकृष्ण हुरूळे, कृषि महाविद्यालय, सोनई तसेच नांदूर शिकारी व परिसरातील शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र अहमदनगरचे सर्व सन्माननीय सदस्य व नांदूर शिकारी गावातील शेतकरी बंधूंचे विशेष सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमाचे आयोजन श्री. संतोष लिपने, श्री. दत्तात्रय राजमाने, प्रा. संदीप शिरसाठ व विष्णू लिपणे यांनी केले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सोमनाथ दरंदले, कृषि महाविद्यालय, सोनई यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र लिपने यांनी केले.

८.५ **शेती कट्टा**:- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई –विभागीय केंद्र, अहमदनगर अंतर्गत 'कापूस उत्पादन तंत्रज्ञान' या विषयावर ७ ऑगस्ट, २०१९ रोजी शेतीकट्टा कार्यक्रमाचे आयोजन देवटाकळी ता.शेवगाव जि.अहमदनगर येथे करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक प्रा. टी.एम.कोळगे कापूस सुधार प्रकल्प म. फु.कृ. वि. राहुरी हे लाभले होते. या प्रसंगी प्रा. कोळगे यांनी कापूस लागवड संबंधित खरीप हंगामातील अधिक उत्पादन देणारे वाण, लागवड करताना घ्यावयाची काळजी, बियाणांची निवड, पाणी व्यवस्थापन, तण नियत्रंण, कापूस पिकाची वेचणी, साठवण व विक्री करताना कोणती काळजी घ्यावी इत्यादी विषयी शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन करुन शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे निरसन केले.

या कार्यक्रम प्रसंगी प्रगतिशील शेतकरी श्री.सुरेश खरड कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तसेच श्री. बापूसाहेब मेरड, श्री. रमेश खरड, श्री. राहुल बेडके व शिवाजी काकड तसेच प्राध्यापक जयसिंग वाघमारे, प्रा. राजेंद्र लिपने, कृषी महाविद्यालय सोनई येथील सातव्या सत्रातील विद्यार्थी व देवटाकळी गाव आणि परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-विभागीय केंद्र अहमदनगरचे सर्व सन्माननीय सदस्य व देवटाकळी गावातील शेतकरी बंधूंचे विशेष सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमाचे आयोजन श्री. सुरेश खरड व श्री. राहुल बेडके यांनी केले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. राजेंद्र लिपने, कृषि महाविद्यालय, सोनई यांनी केले तर सूत्रसंचालन विद्यार्थी सुमित बाफना यांनी केले.

८.६ **शेती कट्टा**:- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-विभागीय केंद्र, अहमदनगर अंतर्गत 'मुरघास व दुग्ध उत्पादन तंत्रज्ञान' या विषयावर ९ सप्टेबंर, २०१९ रोजी शेतीकट्टा कार्यक्रमाचे आयोजन चितळी ता. पाथर्डी जि. अहमदनगर येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक श्री. ज्ञानेश्वर पवार (कृषिभूषण महाराष्ट्र राज्य) पुनतगाव ता. नेवासा जि. अहमदनगर हे लाभले होते.या प्रसंगी श्री. पवार यांनी मुरघास म्हणजे काय ? मुरघास तयार करण्याच्या पद्धती, आवश्यक निविष्टा तयार करताना घ्यावयाची काळजी, मुरघासचे जनावरांच्या आहारातील महत्त्व तसेच दूध उत्पादनात चाऱ्याचे विशेष महत्त्व, दूध काढण्याच्या वेळा व योग्य पद्धती, जनावरांचा रोजचा आहार इत्यादी विषयी शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे निरसन केले.

या कार्यक्रम प्रसंगी श्री.सोमनाथ धमाळ कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तसेच श्री. शिवाजी ताठे, श्री. नहीम शेख, श्री. सोमनाथ खलाटे, राहुल धमाळ कृषी महाविद्यालय सोनई,प्राचार्य डॉ. हरी मोरे, व प्रा. राजेंद्र लिपने तसेच चितळी गाव व परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-विभागीय केंद्र अहमदनगरचे सर्व सन्माननीय सदस्य व चितळी गावातील शेतकरी बंधूंचे विशेष सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमाचे आयोजनश्री. सोमनाथ धमाळ यांनी केले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृषि महाविद्यालय सोनई,प्राचार्य डॉ. हरी मोरे यांनी केले. तर सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र लिपने यांनी केले.

८.७ **शेती कट्टा**:- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-विभागीय केंद्र, अहमदनगर अंतर्गत 'कांदा उत्पादन तत्रंज्ञान' या विषयावर १० ऑक्टोबर, २०१९ रोजी शेतीकट्टा कार्यक्रमाचे आयोजन मु.पो.मोमीन आखाडा ता. राहुरी जि. अहमदनगर येथे करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक प्रा. एम. एच गावडे, सहाय्यक प्राध्यापक, उद्यानविद्या विभाग,म. फु.कृ. वि. राहुरी हे लाभले होते. या प्रसंगी प्रा. एम. एच गावडे यांनी कांदा लागवड संबंधित खरीप व रबी हंगामातील अधिक उत्पादन देणारे वाण, गादिवाफा तयार करताना घ्यावयाची काळजी, रोपांची निवड, जैविक खाते व त्यांचे प्रमाण, पाणी व्यवस्थापन, तण नियत्रंण, हिरवळीच्या खताचे महत्व, कीड व रोग नियत्रंण, पिकाची काढणी व साठवण करताना कोणती काळजी घ्यावी तसेच शासनाच्या विविध योजना इत्यादी विषयी शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन करुन शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे निरसन केले.

या कार्यक्रम प्रसंगी मोमीन आखाडा गावचे सरपंच श्री. अशोक कोहकडे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तसेच श्री. नामदेव कोहकडे, शिवाजी शिंदे, सूर्यभान शिंदे, तसेच कृषी महाविद्यालय सोनई, प्राचार्य डॉ. हरी मोरे, प्रा. राजेंद्र लिपने व प्रा. जयसिंग वाघमारे व परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-विभागीय केंद्र अहमदनगरचे सर्व सन्माननीय सदस्य व मोमीन आखाडा गावातील शेतकरी बंधूंचे विशेष सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमाचे आयोजन श्री. संदीप शिंदे व श्री. नामदेव कोहकडे यांनी केले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. हरी मोरे प्राचार्य, कृषि महाविद्यालय, सोनई यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र लिपने यांनी केले.

सदर शेतीकट्टा कार्यक्रमाचे सविस्तर नियोजन डॉ. हरी मोरे प्राचार्य,कृषि महाविद्यालय, सोनई यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

८.८ **शेतीकट्टा शनिवार. ०९/११/२०१९ :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र अहमदनगर अंतर्गत 'कांदा उत्पादन तंत्रज्ञान' या विषयावर शेतीकट्टा कार्यक्रमाचे आयोजन जवळा ता. पारनेर जि. अहमदनगर येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक प्रा. एम. एच. गावडे, सहायक प्राध्यापक, उद्यानविद्या विभाग, म. फू. कृ. वि. राहुरी हे लाभरे होते. या प्रसंगी प्रा. एम. एच. गावडे यांनी कांदा लागवड संबंधित उन्हाळी हंगामातील अधिक उत्पादन देणारे वाण, योग्य वाणाची निवड, गादीवाफा तयार करताना घ्यावयाची काळजी. रोपांची निवड, जैविक खते व त्यांचे प्रमाण, पाणी व्यवस्थापन, तण नियंत्रण, हिरवळीच्या खताचे महत्त्व, कीड व रोग नियंत्रण, पिकाची काढणी व साठवण करताना कोणती काळजी घ्यावी तसेच कांदा पिकासंबंधित शासनाच्या विविध योजना इत्यादी विषयी शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन करून शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले.

या कार्यक्रम प्रसंगी 'जवळा' गावचे उपसरपंच श्री. किसनराव रासकर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तसेच श्री. कमलाकर सोमवंशी, श्री. गोरख आढाव, कृषि महाविद्यालय सोनईचे प्रा. राजेंद्र लिपने, प्रा. श्रीकृष्ण हुरूळे, प्रा. स्वप्नाली गायकवाज व परिसरातील शेतकरी उपस्थित होते. हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र अहमदनगर सर्व सन्माननीय सदस्य व जवळा गावातील शेतकरी बंधूचे विशेष सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमाचे आयोजन श्री. प्रदीप सोमवंशी, श्री गोरख आढाव व गौरव सोमवंशी (विद्यार्थी, कृषी महाविद्यालय सोनई) यांनी केले होते. ।

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृषि महाविद्यालय सोनई प्रा. राजेंद्र लिपणे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. श्रीकृष्ण हुरूळे यांनी केले. तर प्रा. स्वप्नाली गायकवाड यांनी आभार मानले.

सदर शेतीकट्टा कार्यक्रमाचे सविस्तर नियोजन डॉ. हरि मोरे प्राचार्य कृषी महाविद्यालय सोनई यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

८.९ **शेतीकट्टा मंगळवार, १०/१२/२०१९ :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र अहमदनगर अंतर्गत 'शेतीपूरक व्यवसाय व्यवस्थापन' याविषयावर शेतीकट्टा कार्यक्रमाचे आयोजन मु. पो. मिरी ता. पाथर्डी जि. अहमदनगर येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. डी. कें. देवकर, सहयोगी प्राध्यापक, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, म. फू. कृ. वि राहुरी हे लाभले होते. या प्रसंगी डॉ. डी. कें. देवकर यांनी दुग्ध व्यवसायातील संधी, गोपालन करताना गाईची निवड कशी करावी, कोणती जात निवडावी, गाईचे संगोपन करत असताना पाणी नियोजन, वाचा व्यवस्थापन, वासराची निगा कशी राखावी, रोग नियंत्रण, दूध वाढीसाठी करावयाचे आवश्यक बदल, गाईपासून मिळणाऱ्या शेणाचे उपयोग व नियोजन, गाईच्या दुधाचे आहारातील महत्त्व, दुधाची वाढती मागणी, दुग्धजन्य पदार्थ तसेच शेळीपालननाचे महत्त्व व नियोजन. कोंबडी पालनातून मिळणारा नफा व शेतीपूरक इतर व्यवसायासंबंधी शेतकऱ्यांना माहिती देऊन शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे निरसर केले. कार्यक्रमासाठी उपस्थित श्री. महादेव लोंढे, तालुका कृषी अधिकार यांनी देखील शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रम प्रसंगी डॉ. हरि मोरे प्राचार्य कृषी महाविद्यालय सोनई हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. श्री. शंकर शिकारे, सोमनाथ शिंदे, कृषी महाविद्यालय सोनईचे प्रा. राजेंद्र लिपने, व परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र अहमदनगर सर्व सन्माननीय सदस्य व मिरी गावातील शेतकरी बंधूचे विशेष सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमाचे आयोजन श्री. सोमनाथ शिकारे व सुवर्ण शिकारे यांनी केले होते. सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र लिपने, कृषि महाविद्यालय, सोनई यांनी केले. सदर शेतीकट्टा कार्यक्रमाचे सविस्तर नियोजन डॉ. हरी मोरे प्राचार्य, कृषि महाविद्यालय सोनई यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

८.१० **शेतीकट्टा मंगळवार, १७ जानेवारी २०२० :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र अहमदनगर अंतर्गत 'हरभरा पीक संरक्षण' या विषयावर शेतीकट्टा कार्यक्रमाचे आयोजन मु. पो. गोयगव्हाण ता. नेवासा जि. अहमदनगर येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक प्रा. सोमनाथ दरंदले, कीटकशास्त्र विभाग कृषी महाविद्यालय, सोनई हे लाभले होते. या प्रसंगी प्रा. सोमनाथ दरंदले यांनी हरभरा पिकावरील घाटे अळी त्याचप्रमाणे हुमणी आणि लष्करी अळी या प्रमुख किडींचे जैविक पद्धतीने नियंत्रण कसे करावे हे सांगताना शेतकऱ्यांना या प्रकारच्या किड शेतात येऊ नये यासाठी काय उपाययोजना कराव्यात, या किडींचा प्राथमिक अवस्थेत प्रतिबंध करण्यासाठी कसे नियोजन करावे, किडींचे मुख्य स्त्रोत, उगमस्थान, ओळख, तसेच त्या नाहीशा करण्यासाठी वापरावयाच्या निविष्ठा प्रादुर्भाव झालेल्या झाडांची काळजी कशी घ्यावी, तसेच किडींचा बंदोबस्त करताना कोणत्या जैविक घटकांचा वापर करावा इत्यादी संबंधित सविस्तर माहिती दिली व शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे निरसन केले. कार्यक्रमासाठी उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. डमाळे साहेब, तालुका कृषी अधिकारी, यांनी देखील शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

या प्रसंगी डॉ. हरि मोरे प्राचार्य कृषी महाविद्यालय सोनई तसेच श्री. महादेव काळे, प्रकाश पवार, संदीप खेडेकर कृषी महाविद्यालय सोनईचे प्रा. सुहान माने व परिसरातील शेतकरी उपस्थित होते. हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र अहमदनगर सर्व सन्माननीय सदस्य व गोयगव्हान गावातील शेतकरी बांधवांचे विशेष सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमाचे आयोजन श्री. मदन काळे यांनी केले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. हरि मोरे प्राचार्य कृषी महाविद्यालय सोनई यांनी केले.सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र लिपने यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. जयसिंग वाघमारे, कृषी महाविद्यालय, सोनई यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र लिपने यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. जयसिंग वाघमारे, कृषी महाविद्यालय, सोनई यांनी केले.

सदर शेतीकट्टा कार्यक्रमाचे सविस्तर नियोजन डॉ. हरि मोरे प्राचार्य कृषी महाविद्यालय, सोनई यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## १०.९ विभागीय केंद्र-अंबाजोगाई

९.१ **युवा ज्योत रॅली:-** युवकांमध्ये राष्ट्रभक्ती, राष्ट्रनिष्ठा जागृत करण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्र-अंबाजोगाईच्या वतीने दि. १४ ऑगस्ट, २०१९ रोजी स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला अंबाजोगाईत युवा स्वतंत्रता ज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अपर पोलीस अधिक्षक स्वाती भौर यांच्या हस्ते रॅलीचा शुभारंभ करण्यात आले. रॅलीमध्ये तरुणाईने उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विविध घोषणा देण्यात आल्या. अंबाजोगाई शहरामध्ये मागील १२ वर्षापासून या युवा स्वतंत्रता ज्योत रॅलीचे नियमितपणे स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला आयोजन करण्यात येते.

यावर्षी अंबाजोगाई नगरपालिका कॉम्प्लेक्समधील विवेक सिंधु कार्यालया समोरुन या रॅलीची सुरुवात झाली. ही युवा

स्वतंत्रता ज्योत रॅली सावरकर चौक - मंडीबाजार - योगेश्वरी देवी मंदीर - शिवाजी चौक - पंचायत समिती – बसस्थानक अशी शहरातील सर्व प्रमुखे रस्त्यावरुन पूर्ण करण्यात आली. यानंतर युवा स्वतंत्रता ज्योत रॅलीचा समारोप संविधानाची शपथ देऊन राष्ट्रगीताने झाला. या युवा स्वतंत्रता ज्योत रॅलीसाठी अपर पोलीस अधीक्षक स्वाती भौर, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्र अंबाजोगाईचे अध्यक्ष अनिकेत लोहिया, उपाध्यक्ष दगडू लोमटे, कोषाध्यक्ष अभिजित जोंधळे, अक्षय मुंदडा, नमिता मुंदडा, अंकुश काळदाते, रवी देशमुख, संतोष शिनगारे, मनीष गोरे, वैजनाथ देशमुख, अनंत अरसुडे, चंद्रकांत हजारे, डॉ. हनुमंत साळुंके, विश्वास नरवडे, रणजीत मोरे, गोविंद टेकाळे, आशिष जाधव, सलीम शेख, यासह मानवलोक संस्थांचे कार्यकर्ते, युवक, ज्येष्ठ नागरिक आदी उपस्थित होते.

९.२ निराधारांचा मेळावा:- मानवलोक, अंबाजोगाई व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्र-अंबाजोगाईच्या वतीने ३ सप्टेंबर २०१९ रोजी निराधारांच्या मेळाव्यात निराधार महिला व पुरुष यांचा मेळावा घेण्यात आला. 'मानवलोक'चे संस्थापक कै. डॉ. द्वारकादास लोहिया यांच्या प्रयत्नाने निराधारांच्या प्रतिमहिना सरकारी मदतीत वाढ झाली. त्या निमित्ताने हा मेळावा आयोजित करण्यात आला होता.

त्यावेळी प्रा. सोमनाथ रोडे, मा. अंकुश काळदाते यांची भाषणे झाली. मेळावा यशस्वी करण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्र-अंबाजोगाईचे अध्यक्ष मा. अनिकेत लोहिया, सचिव डॉ. नरेंद्र काळे, मानवलोकचे मा. लालाकाका आगळे, 'जनसहयोग'चे मा. शाम सरवदे, संजना आपटे इत्यादींनी प्रयत्न केले. यावेळी सुमारे दोन हजार वृध्द निराधार उपस्थित होते.

९.३ **अपरिचित पु.ल.**:- पु. ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'शब्दवेध, पुणे' निर्मित व प्रसिद्ध नाट्यकलावंत व गायक चंद्रकांत काळे यांनी संकलन व दिग्दर्शित केलेला 'अपरिचित पु.ल.' हा आगळावेगळा कार्यक्रम अंबाजोगाईत २१ सप्टेंबर रोजी पार पडला. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्र अंबाजोगाई, योगेशरी शिक्षण संस्थेचे स्वामी रामानंदतीर्थ महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण स्मृती समिती, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित केला होता.

'पुल हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व. त्यांच्या साहित्यातील काही अंश, त्यांनी लिहिलेले लेख, मोजक्या पत्रांना त्यांनी लिहिलेली उत्तरे, त्यांची मिश्किल भाषा, विनोदी किस्से, हजरजबाबी बोलणे, नट, गायक, चित्रपटांची निर्मिती, संगीत नियोजन व गायक म्हणून ते सुप्रसिद्ध होते, या त्यांच्या अपूर्व लिखाण व जगण्यावर आधारित तसेच त्यांच्या अपरिचित साहित्यावर संशोधन करून चंद्रकांत काळे यांनी अपरिचित पु.ल.' हा संगीतमय कार्यक्रम रसिकांच्या समोर आणला.

सुप्रसिद्ध चित्रपट व नाट्य कलावंत नाटककार सतीश आळेकर, गजानन परांजपे व स्वत: चंद्रकांत काळे यांनी पुल यांच्या साहित्याचे वेगवेगळे विषय घेऊन तसे गद्य रूपात साभिनय वाचन करून पुलंच्या एकूण साहित्याला व व्यक्तिमत्त्वाला न्याय दिला.

कधी मिश्किल तर कधी गंभीर वेगवेगळे तुकडे करून त्यांनी वाचन केले. चंद्रकांत काळे यांनी पुलंच्या कवितांचे गायन केले. तबल्यावर अक्षय व हार्मोनियमवर आदित्य मोघे. यशवंतराव चव्हाण स्मृतीचे सचिव दगडू लोमटे यांनी सुरुवातीला प्रास्ताविक केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे विभागीय केंद्राचे सचिव डॉ. नरेंद्र काळे, व कोषाध्यक्ष अभिजित जोंधळे, योगेशरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेश खुरसाळे, यशवंतराव चव्हाण स्मृती समितीचे कोषाध्यक्ष सतीश लोमटे व स्वा. रा. ती. महाविद्यालयाचे प्राचार्य रमेश सोनवळकर यांनी सर्व कलावंताचे स्वागत केले. रसिकांनी अत्यंत योग्य ठिकाणी योग्य दाद देऊन कार्यक्रमात रंगत आणली. नागापूरकर सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. तत्पूर्वी पाहुण्यांनी नाट्य विभागाला भेट देऊन मुलांना मार्गदर्शन केले. संपदा कुलकर्णी व ज्ञानेशर सोनवणे यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी पंडित चौसाळकर उपस्थित होते. या कार्यक्रमास रसिक वर्ग मोठ्या प्रमाणावर उपस्थित होता.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, ठाणे जिल्हा केंद्राच्या वतीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी 'यशदा'मध्ये जे व्याख्याने देतात, त्या श्री. हरीश जाधव यांच्या 'ताण तणाव व्यवस्थापन' शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. उप कार्यकारी अभियंता श्री. प्रकाश मालखेडे यांची पूर्व परवानगी घेऊन दिनांक २० जून २०१९ रोजी सकाळीअकरा वाजता अल्पोपाहार झाल्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्रथेप्रमाणे यशवंतराव चव्हाण साहेबांच्या प्रतिमेला अभिवादन करून केंद्राच्या सचिवांनी उपस्थितांना प्रतिष्ठानची उद्दिष्ट्ये सांगितली. त्यानंतर प्रमुख व्याख्याते श्री. हरीश जाधव आणि श्री. प्रकाश मालखेडे यांचा अध्यक्षांनी शाल, श्रीफळ व पुस्तक देऊन सत्कार केला. त्यानंतर श्री. हरीश जाधव यांनी जवळपास दोनते सव्वा दोन तास एकूण पंचावन्न अधिकारी, कर्मचारी, तांत्रिक सहाय्यक शिपाई अशा उपस्थित शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. तणावाचे प्रकार, त्यामागची कारणे त्यावरील उपाय हे सोदाहरण पटवून सांगितले. हे सर्व करत असताना त्यांनी विविध प्रकारच्या खेळाच्या माध्यमातून तसेच चर्चा करून हसत खेळत शिबिराचा उद्देश सफल केला. खेळात ज्यांनी विजय मिळवला अशांना केंद्रातर्फे पुस्तके भेट देण्यात आली. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान ठाणे जिल्हा केंद्राच्या वतीने सौमय्या आर्ट्स कॉमर्स कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक २९ जून २०१९ रोजी सकाळी ८:३० ते १०:३० यावेळेत 'चला करियरवर बोलू काही' यावर दीपस्तंभ फाउंडेशनचे श्री. यजुर्वेन्द्र महाजन यांचे मार्गदर्शन शिबिर ठेवले होते. प्राचार्या सौ. वीणा मानेकर मॅडम यांनी प्रास्ताविक केल्यानंतर यशवंतराव चव्हाण साहेबांच्या प्रतिमेला वंदन करून अध्यक्षांनी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार केला. त्यानंतर श्री. यजुर्वेन्द्र महाजन सरांनी विद्यार्थ्यांशी वैयक्तिक संवाद साधला. करियर म्हणजे काय ते निवडायचे कसे, कुठले निकष लावावे, स्पर्धा परीक्षेसाठी कशाची गरज असते, त्याची तयारी कशी करायची अशा अनेक गोष्टींवर विद्यार्थ्यांना प्रश्नोत्तराच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. अनेक विद्यार्थ्यांनी त्यांना अनेक प्रश्न विचारले आणि त्यांच्या प्रश्नांची समर्पक उत्तरे उदाहरणासह त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिली. आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

'परिवर्तनाचे पाईक-शरदचंद्र पवार साहेब' विषयावर महाराष्ट्र टाइम्सचे संपादक मा. विजय चोरमारे यांचे व्याख्यान.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्र अंबेजोगाई केंद्राच्या वतीने खा. शरचंद्रजी पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त 'परिवर्तनाचे पाईक शरद पवार साहेब' या विषयावर मुंबई महाराष्ट्र टाइम्सचे उपसंपादक पत्रकार श्री. विजय चोरमारे यांच्या व्याख्यानाचे आजोजन दि. १६ डिसेंबर २०१९ रोजी सायंकाळ ५.३० वा. लोकनेते विलासरावजी देशमुख सभागृह येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री पंडितरावजी दौंड साहेब, काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष व माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, प्रतिष्ठानचे विभागीय केंद्राचे उपाध्यक्ष दगडू लोमटे, सचिव डॉ. नरेंद्र काळे हे उपस्थित होते.

यावेळी सर्वप्रथम मा. यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमाला सुरूवात करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव डॉ. नरेंद्र काळे यांनी केले. यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. राजकिशोरजी मोदी यांनी कार्यक्रमाविषयी मनोगत व्यक्त केले.

यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण पत्रकार श्री. विजय चोरमारे यांनी 'परिवर्तनाचे पाईक शरद पवार साहेब' या विषयावर व्याख्यानाला सुरूवात केली. यावेळी शरद पवार साहेब यांचा प्रचंड अभ्यास करणारे विजय चोरमारे यांनी उपस्थितांना शरद पवार साहेब यांच्या बाबतचे अनेक किस्से सांगितले. पत्रकार विजय चोरमारे यांच्या व्याख्यानातून अंबेजोगाईकरांना शरद पवार साहेब यांच्या विषयी अत्यंत चांगल्या पद्धतीने उलगडा केला. यावेळी शरद पवार साहेब यांच्या सुरूवातीच्या काळापासून महिला आरक्षण डॉ. बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार, पुलोदविषयी

पवार साहेबांची भूमिका अशा विविध निर्णयांवर पवार साहेबांविषयी बहुमोल माहिती दिली. यानंतर कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप माजी मंत्री पंडितरावजी दौड साहेब यांनी केला. यावेळी मा. दौंड साहेबांनी सांगितले, की पत्रकार विजय चोरमारे यांनी सांगितलेले अनेक किस्से मलाही माहीत नव्हते. अशा शब्दातून त्यांनी पत्रकार विजय चोरमोरे यांच्या व्याख्यानाचे व अभ्यासाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूचसंचालन गणेश जाधव यांनी केले, तर उपस्थितांचे आभार नेताजी साळुंखे यांनी मानले. या कार्यक्रमाला अंबेजोगाईतील ज्येष्ठ नागरिक, तरूण व शरद पवार साहेब यांच्यावर प्रेम करणारे कार्यकर्ते उपस्थित होते.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान अंबेजोगाई केंद्र व अभियांत्रिकी महाविद्यालय अंबेजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने आज सायंकाळी ५.३० वा. चित्रपट चावडीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळ चित्रपट चावडीमध्ये 'कास्ट अवे' हा रॉबर्ट झेमेकिस दिग्दर्शित चित्रपट दाखवण्यात आला. हा चित्रपट दाखवण्यात आला. हा चित्रपट पाहण्यासाठी अंबेजोगाईतील युवक व नागरिकांनी सहभाग नोंदविला. या चित्रपट चावडीला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्र - अंबेजोगाईचे सचिव डॉ. नरेंद्र काळे, कोषाध्यक्ष अभिजीत जोंधळे, साहित्यिक अमर हबीब यांची प्रमुख उपस्थिती होती.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई - अंबेजोगाई केंद्राच्या वतीने प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवार चित्रपट चावडीचे आयोजन केले जाणार आहे.

९.४ **चित्रपट चावडी महोत्सव:-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई केंद्र अंबेजोगाई व अभियांत्रिकी महाविद्यालय अंबेजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १४ डिसेंबर २०१९ रोजी चित्रपट चावडीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अंबेजोगाई येथे सायंकाळी ६ वाजता 'कास्ट अवे' हा रॉबर्ट झेमेकिस दिग्दर्शित चित्रपट दाखवण्यात आला. हा चित्रपट पाहण्यासाठी अंबेजोगाईतील युवक नागरिकांनी उपस्थिती नोंदविली. या चित्रपट चावडी उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या अंबेजोगाई केंद्राचे सचिव डॉ. नरेंद्र काळे, कोषाध्यक्ष अभिजित जोंधळे, अमर हबीब, अमृत महाजन, अभिजित लोहिया, बालाजी शेरेकर आदि मान्यवर उपस्थित होते. सदर चित्रपटाचे समीक्षण हे अभिजित जोंधळे यांनी केले. या चित्रपट चावडीचे आयोजन चित्रपट चावडी उपक्रमाचे समन्वयक नेताजी साळुंखे यांनी केले. या चित्रपट चावडीला महाविद्यालयीन तरूणांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या अंबेजोगाई केंद्रातर्फे प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवार चित्रपट चावडीचे आयोजन केले जाणार आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून अंबेजोगाईकरांना दर्जेदार व आशयघन चित्रपटांचा आस्वाद घेता येणार आहे.

९.५ **चित्रपट चावडी महोत्सव:-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई केंद्र अंबेजागाई व अभियांत्रिकी महाविद्यालय अंबेजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २५ जानेवारी २०२० रोजी चित्रपट चावडीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अंबेजोगाई येथे सायंकाळी ६ वाजता 'ग्रॅव्हिटी' हा हॉलिवूड चित्रपट दाखवण्यात आला. या चित्रपट चावडीचे महाविद्यालयीन तरूणांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या चित्रपट चावडीचे आयोजन चित्रपट चावडी उपक्रमाचे समन्वयक नेताजी साळुंखे यांनी केले. या उपक्रमाला प्रतिष्ठानचे विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष अभिजित जोंधळे, नेताजी साळुंखे, अथर्व देशमुख, शुभम गोसावी, रविकिरण देशमुख, अमृत महाजन, सुनील पांडे उपस्थित होते.

९.६ **चित्रपट चावडी महोत्सव:-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई केंद्र अंबेजोगाई व अभियांत्रिकी महाविद्यालय अंबेजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ८ फेब्रुवारी २०२० रोजी चित्रपट चावडीचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अंबेजोगाई येथे सायंकाळी ६ वाजता 'अंगुर' हा चित्रपट दाखवण्यात आला. या चित्रपट चावडी उपक्रमाचे आयोजन चित्रपट चावडी उपक्रमाचे समन्वयक नेताजी साळुंखे यांनी केले. या उपक्रमाला प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष अभिजत जोंधळे. नेताजी साळुंखे, रविकिरण देशमुख, मनोज गिते, गणेश धुमाळ, दीपक साठे, अमृत महाजन, सुनीळ पांडे आदि उपस्थित होते.

### १०.१० विभागीय केंद्र , नांदेड

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या नांदेड विभागीय केंद्राच्या वतीने व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५०च्या जयंतीची वर्षपूर्ती व स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून ज्येष्ठ गांधी अभ्यासक व महात्मा गांधींचे पणतू मा.तूषार गांधी यांचे व्याख्यान दि. २५ नोव्हेंबर २०१९ रोजी नांदेड येथील शंकरराव चव्हाण सभागृहात आयोजित करण्यात आले होते. यावेळी मा. तुषार गांधी यांनी स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या ३५ व्या स्मृतिदिनानिमित्त स्व. यशवंतरावजी आणि महात्मा गांधीजी यांच्या विचारांना आपणास कसे जोडता येईल' या विषयावर आपले विचार व्यक्त करताना म्हणाले, की महात्मा गांधी यांचे विचार जगाला आजही तितकेच प्रेरणादायी आहेत. महात्मा गांधींनी विचार, तत्त्व आणि मूल्यांशी कधीही तडजोड केली नाही. आजचा समाज त्यांच्याकडे प्रेरणा म्हणून बघत असेल तर समाजाने नीतिमूल्यावर अढळ श्रद्धा ठेवताना जे चांगले आहे ते चांगले आणि जे वाईट आहे त्या विरोधात सर्वांनी मिळून आवाज उठवलाच पाहिजे, असे मत व्यक्त केले. तुम्ही कसे राहता, कसे दिसता यापेक्षा तुमचे विचार कसे आहेत हे महत्वाचे आहेत आणि तेच तुम्हाला पुढे घेऊन जातील. केवळ खादी परिधान केल्याने बदल घडणार नाही, तर खादीच्या आत असलेले महात्मा गांधीजींचे विचार आत्मसात करावे लागतील. तसेच आजच्या समाजाने आपल्या परीने जी सत्याची परिभाषा तयार केली आहे. त्यावर जोरदार टिप्पणी केली आणि आजच्या सोशल मीडियाच्या युगात महात्मा गांधी महत्वाचे वाटत नाही हे वास्तवसुद्धा तुषार गांधी यांनी मांडले. गांधी विचारांवर प्रेम करणाऱ्या नागरिकांच्या उस्फूर्त प्रतिसादामध्ये यशवंतराव चव्हाण विभागीय केंद्राचा पहिला समाजभान जागृत करणारा कार्यक्रम मोठ्या गर्दीत पार पडला. यावेळी विभागीय केंद्राचे अध्यक्ष माजी मंत्री कमलकिशोर कदम यांनीही आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी युवकांची उल्लेखनीय गर्दी होती. यावेळी महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रकाशित महात्मा गांधी विशेष अंकाच्या ५०० प्रती वितरित करण्यात आल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सचिव शिवाजी गावंडे, कल्पना डोंगळीकर, शिवानंद सुरकुटवार, बापू दाससी, देविदास फुलारी, डॉ. गीता लाठकर, मनोरमा चव्हाण, यांनी परिश्रम घेतले.

## १०.११ विभागीय केंद्र-ठाणे

११.१ **मी कार्यकर्ता : संवाद संध्या:-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, ठाणे जिल्हा केंद्रातर्फे शनिवार दिनांक १० ऑगस्ट २०१९ रोजी 'मी कार्यकर्ता संवाद संध्या' या कार्यक्रमाचे आयोजन पहिला मजला, मंगला हॉल, ठाणे (पूर्व) येथे करण्यात आले होते. यावेळी सिने-नाट्य जगतातील परोपकारी मित्र मा. श्री. जयवंत वाडकर, 'आनंदयात्री' या संस्थेच्या माध्यमातून विधायक काम करणारे समाजसेतू श्री. किरण वालावलकर, आदिवासींचे तारणहार डॉ. अरुण पाटील, ग्रंथालय चळवळीतील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व श्री. विद्याधर ठाणेकर यांच्याशी सौ. पूर्णिमा शेंडे व प्रा. लतिका भानुशाली यांनी थेट संवाद साधला.

कार्यक्रमाची सुरुवात मा. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस वंदन करून करण्यात आली. संस्थेचे सचिव श्री. अमोल नाले यांनी प्रास्ताविक केल्यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार ठाणे जिल्हा केंद्राचे अध्यक्ष माननीय श्री.

मुरलीधर नाले यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर ''मी कार्यकर्ता: संवाद संध्या''च्या कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रथम डॉ. अरूण पाटील यांनी आदिवासी पाड्यात काम करत असताना त्यांना आलेल्या विविध अनुभवांचे कथन केले. आपला व्यवसाय सांभाळत या क्षेत्रात काम करत असताना आलेल्या अनेक अडचणी त्यांनी यावेळी सांगितल्या. आदिवासी लोकांना काय अडचणी आहेत हे तिथे जाऊन पाहिल्यावरच कळल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. त्यासाठी तिथे जाऊन व त्या लोकांमध्ये मिसळून त्यांनी त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या दृष्टीने त्यांना काय मदत करता येईल हे बघितले व तशी मदत त्यांना पोहचवण्याचे काम आज ते गेली अनेक वर्षे करत आहेत. यावेळी उपस्थित इच्छुकांनी सढळ हस्ते आदिवासी लोकांसाठी मदत करण्याचे आवाहन त्यांनी केले. त्यात जुने कपडे, धान्य, पुस्तके, जुनी भांडी तसेच जीवनावश्यक वस्तू द्याव्यात असे त्यांनी सांगितले.

त्यानंतर सौ. पूर्णिमा शेंडे मॅडम यांनी श्री. विद्याधर ठाणेकर यांच्याशी मोजका पण अत्यंत महत्त्वाचा संवाद साधला. त्यांनी श्री. ठाणेकरांनी विविध संस्थांसाठी केलेल्या कामाचा ऊहापोह लोकांसमोर केला. घोडबंदर रोड येथील रहिवाशांसाठी पुस्तक घ्यायला येणे कठीण असल्यामुळे त्यांनी त्यांच्यासाठी मोबाईल व्हॅन द्वारा आठवड्यातून एकवेळ पुस्तके देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. त्यांच्या १ २ ५ वर्ष जुन्या संस्थेकडे १ ९ व्या शतकातील जीर्णावस्थेतील पुस्तके उपलब्ध आहेत. त्यांचे डिजिटलायझेशन करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी रु. ५ ० लक्ष एवढे अनुदान दिले. त्यांनी या ग्रंथालय क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल लोकांनी त्यांचे टाळ्यांनी कौतुक केले. त्यानंतर प्रा. लतिका भानुशाली यांनी श्री. किरण वालावलकर यांच्या 'आनंदयात्री' या संस्थेच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या विधायक कामावर प्रखरपणे प्रकाश टाकला. त्यांनी लोकांना ज्या पद्धतीने मदत केली ते ऐकून उपस्थितांना देखील आश्चर्याचा धक्का बसला. शेवटी सौ. लतिका मॅडमनी श्री. जयवंत वाडकर या अभिनेत्याशी संवाद साधला. तो संवाद नसून न संपावी अशी एक मुलाखत ठरली. ज्या पद्धतीने त्या श्री. वाडकरजींना विविध प्रश्न विचारत होत्या आणि वाडकरजी त्याला उत्स्फूर्तपणे उत्तराने दाद देत होते. त्यावरून त्यांचे विविध पैलू लोकांसमोर उलगडत जात होते. त्यानंतर प्रतिष्ठानने केलेल्या आवाहनानुसार अनेकांनी सॅनिटरी नॅपकिन, कपडे, बिस्किट्स आणि अनेक गोष्टी मान्यवरांकडे सुपूर्त केल्यात. डॉ. महेश केळूसकरांच्या अध्यक्षीय भाषणानंतर आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमास प्रतिष्ठानचे ठाणे केंद्राचे पदाधिकारी, पत्रकार तसेच रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक २६.११.२०१९ रोजी स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून राम निरंजन झुनझुनवाला महाविद्यालयात 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रीसर्च'चे 'इंटरनॅशनल इयर ऑफ पेरिऑडिक टेबल' या विषयावर यशवंत व्याख्यानमालेचे चौथे पुष्प गुंफले. या व्याख्यानमालेस ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अर्णब भट्टाचार्य यांची प्रमुख उपस्थिती होती. व्याख्याता व विद्यार्थ्यांमध्ये खूपच छान संवाद झाला तसेच श्री भट्टाचार्यांनी आणलेल्या वैज्ञानिक वस्तूचा विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

दिनांक २८.११.२०१९ रोजी सकाळ वृत्तसमूहाबरोबर आम्ही ठाणे पूर्व येथील शिशु विकास मंदिर या शाळेत विद्यार्थ्यांच्या तसेच त्यांच्या पालकांची नेत्र तपासणी केली. याचा उपक्रमाचा पालकांनी खूपच गौरव केला. या उपक्रमाच्या माध्यमातून दर शनिवार १०० वृत्तपत्रांचे वाटप केले आणि त्याचे विद्यार्थ्यांकडून वाचन केले जात होते.

दिनांक १८.०१.२०२० रोजी मकर संक्रांतीच्या औचित्य साधून स्वयंम पुनर्विकास संस्थेच्या विश्वासथ सौ. निता देऊलकर यांच्या अध्यक्षतेखाली विविध क्षेत्रात काम करणाऱ्या पाच महिलांचा रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थ या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सत्कार करण्यात आला. सौ नीता. देऊलकर यांच्या कार्याचा आढावा सौ. अर्चना अडावदकर यांनी त्यांच्या मुलाखतीच्या माध्यमातून उलगडला तर अध्यक्षाच्या हस्ते नृत्य क्षेत्रात नावलौकिक असणाऱ्या सौ. सोनिया परचुरे, अपंग सैनिकांच्या मुलांसाठी काम करणाऱ्या श्रीमती शिल्पा खेर, शैक्षणिक क्षेत्रात काम

करणाऱ्या सौ. मंजुश्री पाटील, वनवासी आश्रम शाळेत आदिवासी मुलांसाठी काम करणाऱ्या सौ. जयश्री आंबीकर आणि पत्रकारितेच्या माध्यमातून समाजसेवा करणाऱ्या सौ.प्रज्ञा म्हात्रे-नांदगावकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळ यासर्व सत्कारमूर्तींनी उत्तराच्या माध्यमातून त्यांच्या कामाचे स्वरूप तर सांगितलेच पण प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले.

## १०.१२ विभागीय केंद्र, सोलापूर

१२.१ **भूपृष्ठावरील जलसाठे कार्यशाळा**:- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-विभागीय केंद्र सोलापूरच्या वतीने 'भूपृष्ठावरील जलसाठे'या विषयावर कार्यशाळेचे आयोजन रविवार दि. २८ जुलै २०१९ रोजी मंगळवेढेकर इन्स्टिट्यूट येथे करण्यात आले होते.

सदर कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी जलतज्ज्ञ श्री अप्पासाहेब पुजारी होते; कार्यक्रमाचे उद्घाटन जलसंपदा विभागाचे निवृत्त प्रधान सचिव श्री.सी.ए.बिराजदार होते. विभागीय केंद्राचे हंगामी अध्यक्ष हाजी युनूसभाई शेख, श्री. धर्मण्णा सादुल सोलापुर महानगरपालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता श्री.संजय धनशेट्टी या उपक्रमाचे समन्वयक व दै.सकाळचे मुख्य उपसंपादक श्री.रजनीश जोशी हे उपस्थित होते.

कार्यशाळेत सोलापूर जिल्हयातील भूपृष्ठावरील जलसाठे, त्यासाठी अवलंबून असणारी जिल्हयातील सिंचनाची परिस्थिती, संपूर्ण पाणीपुरवठा, प्रदूषण व त्यावरील उपाय या विषयावर तज्ज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले व चर्चादेखील झाली. 'जिल्हयातील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था सुधारण्यासाठी वॉटरग्रीडची योजना राबवावी. या योजनेमुळे जिल्हा टँकर मुक्त होईल', असे प्रतिपादन सी.ए.बिराजदार यांनी केले. जिल्हयातील ४३ लाख लोकसंख्येला वर्षभर पिण्यासाठी १०टीएमसी पाण्याची गरज असून प्रत्येक तालुक्याच्या मध्यवर्ती ठिकाणी वॉटरग्रीडद्वारा प्रत्येक गावास मुबलक पाणीपुरवठा होईल आणि त्यातून महसूलदेखील उभा राहील. जलसंधारणापेक्षा याचा खर्चसुद्धा कमी होतो. सध्या राजस्थान, तेलंगणा व मराठवाडयातील 'गोदावरी वर' असे उपाय यशस्वीपणे राबवले जात आहेत.

शेतीसाठी पाण्याचा वापर कसा करावा?जमीन, हवामान व पाण्याची उपलब्धता यांचे नियोजन, ड्रीपचा जास्तीतजास्त वापर आणि त्याला अनुसरून पिकांचे नियोजन यावरही सुद्धा सविस्तर चर्चा झाली. शेतकरी हा केंद्रबिंदू असल्याचे सर्वांनी मान्य केले. वाढत्या शहरीकरणामुळे व उद्योगामुळे होणारे प्रदूषण आणि त्यावरील उपाय याबाबतसुद्धा या कार्यशाळेत चिंतन करण्यात आले. शहर व ग्रामीण भागातून जवळपास ५५ जणांनी या कार्यशाळेत सहभाग नोंदवला.

१२.२ **कायदेविषयक एक दिवसीय व्याख्यानमाल**:- सोलापूर बार असोसिएशन सोलापूर व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या सोलापूर विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय कायदेविषयक व्याख्यानमाला शनिवार १२ ऑक्टोबर २०१९ रोजी सकाळी ८.३० ते ५ या वेळात डॉ. निर्मलकुमार फडकुलेक सभागृह' सिद्धेश्वर मंदिराजवळ सोलापूर केंद्राचे अध्यक्ष युन्नुसभाई शेख, केंद्राचे सदस्य श्री. दत्ता गायकवाड प्रमुख पाहुणे प्रदिपसिंह रजपूत (जिल्हा सरकारी वकील) उपस्थित होते. यावेळी प्रमुख व्याख्याते अँड. डॉ. सुधाकर आव्हाड, अँड डॉ. मकरंद आडकर, अँड डॉ. राजेंद्र अनुभुले यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी जिल्ह्यातील सुमारे २५० वकिलांनी यात आपला सहभाग नोंदवला आणि सदर व्यख्यान मला संपन्न झाली.

१२.३ **'दिवाळी पहाट"** :- मराठी चित्रपट संगीताच्या वाटेने, मराठी इतिहास, मराठी संस्कृती, मराठी परंपरा यांचा शोध घेत आपण कुठून वाट चुकतो आहोत, याचं भान आणणारा कार्यक्रम म्हणजे 'दिवाळी पटाट'.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र सोलापूर व 'द हेरिटेज' सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार

२५ ऑक्टोबर रोजी पहाटे ५.३० वाजता प्रा. विलास पाटील यांच्या सोबतीने 'मराठी पाऊल पडते पुढे...' कार्यक्रमाचे आयोजन द हेरिटेज लॉन ए, गांधी नगर, होटगी रोड, सोलापूर येथे करण्यात आले होते. प्रा. विलास पाटील यांनी हा कार्यक्रम सदर केला.

१२.४ **'चार्ली चॅप्लिन एक महान कलावंत' :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र सोलापूर आयोजित 'चार्ली चॅप्लिन एक महान कलावंत' हा चार्ली चॅप्लिन यांच्या विनोदाचं तत्त्व दर्शवणारा आणि त्याचे तत्त्वज्ञान उलगडणारा कार्यक्रम शनिवार २६ ऑक्टोबर २०१९, सायंकाळी ६ वाजता, ॲम्पी थिएटर, हिराचंद नेमचंद वाचनालय, सोलापूर येथे प्रा. विलास पाटील यांनी सदर केला. त्यातून चार्ली चॅप्लिन यांच्या विविध छटांवर भाष्य त्यांनी केले. सर्व रसिकांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.

१२.५ **'अर्थव्यवस्था खिळखिळी करणारी जीएसटी प्रणाली आजही व्हेंटीलेटरवर' - प्रा. डॉ. अजित जोशी :-** आर्थिक मंदीची सुरूवात २०१६ च्या सुरूवातीपासून झाली, असा स्टेट बँकेचा दावा आहे. सरकारने नोटबंदी केली, मात्र त्याचा परिणाम काय झाला हे आजही माहित नाही. तज्ज्ञांचे सल्ले घेतले नसल्याने धोरणात त्रुटी दिसल्या, हे सिद्ध झालं आहे. काळा पैसा बाहेर आला नाही, भ्रष्टाचार थांबला नाही, या धोरणामुळे असंघटित क्षेत्राच्या गुडघ्याच्या वाट्या फोडल्या गेल्या. श्रीमंतांच नुकसान झालं नाही, मात्र गरिबांना घायाळ केलं. उद्योजकांच्या धोका उचलण्याच्या वृत्तीला धक्का बसला. असं प्रतिपादन सीए डॉ. अजित जोशी यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र सोलापूर व सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड ॲग्रीकल्चर यांच्या संयुक्त विद्यमाने शिवस्मारक सभागृह येथे आजोजित 'राजकीय अर्थकारणाचे परिणाम' या विषयावरील व्याख्यानात डॉ. जोशी बोलत होते. व्यासपीठावर सोलापूर जिह्रा यंत्रमागधारक संघाचे प्रेसिडेंट धर्मण्णा सादूल, अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सोलापूरचे अध्यक्ष युनूस, कोषाध्यक्ष राजशेखर शिवदारे, चेंबरचे अध्यक्ष राजू राठी, राजगोपाल उपस्थित होते. श्री. शिवदारे यांनी प्रास्ताविक केले. दिनेश शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.

डॉ. जोशी म्हणाले, ''आर्थिक क्षेत्रात जगातील अन्य देशांच्या तुलनेत आपल्या देशात महिला मोठ्या प्रमाणावर'' कार्यरत आहेत. ७० व्या दशकात पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. तेव्हा बँकात स्त्रियांना मोठ्या प्रमाणात नोकऱ्या मिळाल्या. कालांतराने स्त्रिया आज बँकांच्या मुख्य पदांवर आहेत. हे राजकीय अर्थकारणाचे उत्तम उदाहरण आहे.

नोटबंदी झाल्यानंतर शेती, उद्योग तसेच असंघटित क्षेत्रातील रोजगारांवर गदा आली. नोटाबंदीचा निर्णय थेटपणे लागू करणे अत्यंत चुकीचे ठरले. नोटबंदीप्रमाणेच जीएसटी लागू करतानाही सरकारकडून घाई झाली. यातूनच देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी झाली.''

१२.६ **पर्जन्यमानावरील कार्यशाळा :-** विभागीय केंद्र सोलापूरतर्फे रविवार दिनांक २ फेब्रुवारी २०२० रोजी सकाळी ९.३० ते ५ पर्यंत 'सोलापूर जिल्ह्यातील पर्जन्यमान' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेमध्ये जिल्ह्यातील पर्जन्यमान, मान्सून आणि तदनुषंगिक विषयावर विविध मान्यवरांनी विचार मांडले कार्यशाळेचे समन्वयक जल अभ्यासक रजनीश जोशी होते. सदर कार्यशाळा मंगळवेढेकर इन्स्टिट्यूट, डफरीन चौक येथे होईल. कार्यशाळेचे उद्धाटन सकाळी साडेनऊ वाजता झाले.

यावेळ वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधील डॉ. सतीश काशीद 'अवर्षणप्रवण सोलापूर जिल्ह्यातील मान्सून अंदाज' या विषयावर, रजनीश जोशी 'सोलापूर जिल्ह्यातील ५० वर्षांतील पर्जन्यमान आणि पुढील वाटचाल' या विषयावर, ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ मयुरेश प्रभुणे (पुणे) हे 'पर्जन्यछायेच्या प्रदेशातील मान्सून' या विषयावर, डॉ. अप्पासाहेब पुजारी (सांगोला) हे 'अवर्षणप्रवण क्षेत्रातील पीकपद्धत' या विषयावर विचार मांडले. या कार्यशाळेत ७० जल अभ्यासकांनी सहभाग नोंदवला.

### १०.१३ विभागीय केंद्र, जळगाव

१३.१ **'माती बुक्का' चे प्रकाशन**:- कवी, साहित्यिक यांना प्रेरणा देण्यासाठी विभागीय केंद्र, जळगांव यांच्या सहकार्याने श्री. ज्ञानेश मोरे (कवी) लिखित 'माती बुक्का' चे प्रकाशन दि. २१.१०.२०१९ रोजी करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. किसन पाटील व केंद्राचे अध्यक्ष श्री. रविंद्र पाटील, प्राचार्य डॉ. अजित वाघ, सचिव प्रा. एन. डी. पाटील इ. मान्यवर उपस्थित होते.

ग्रामीण कृषी संस्कृती, त्यांच्या अडचणी इत्यादी सुबक अशी मांडणी लेखक श्री. ज्ञानेश मोरे यांनी 'माती बुक्का' या कविता संग्रहात केली आहे. असे मत कृषिभूषण श्री. विश्वासराव पाटील (लोहारा) यांनी मांडले. सर्व मान्यवरांनी यथोचित विचार मांडले.

१३.२ **यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार वितरण सोहळा**:- महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री लोकनेते यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या पुण्यतिथी निमीत्ताने यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार सोहळा दि. ३०.११.२०१९ रोजी संपन्न झाला. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने प्रथम कुलगुरू प्रा. डॉ. एन. के. ठाकरे साहेब यांना सदर पुरस्कार आपल्या केंद्रीय मंडळाचे उपाध्यक्ष मा. श्री. अरूणभाई गुजराथी साहेब यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ उभारणीकरिता अहोरात्र परिश्रम घेऊन मोठ्या टेकड्यांवर विद्यापीठाची उभारणी केली. कॉपीचे संपूर्ण उच्चाटन करण्यात त्यांना यश आले. त्यांच्या या उल्लेखनीय कामामुळे त्यांना सदर पुरस्कार देण्यात आला. यावेळी मा. अरूणभाई यांनी मनोगतातून 'जो सन्मान मिळाला आहे तो नशिबाने नाही तर शिक्षण क्षेत्रातील तपस्येमुळे मिळाला आहे. असे गौरवोद्गार काढले. 'ठाकरे' या शब्दाला सध्या 'अच्छे दिन' आले आहे. यावेळी मा.डॉ. एन.के. ठाकरे यांनी कुलगुरू पदासाठी अर्जाची देशातील 'ती' सर्वात वाईट पद्धत ताबडतोब बंद करावी अशी मागणी केली. सापाला घाबरत नाही, राजकारणी दिसला की पळून जातो. आदरणीय चव्हाण साहेबांच्या नावाने मला पुरस्कार मिळाला; मी धन्य झालो असे सांगितले, पुरस्कार रकमेचा धनादेश त्यांनी परत केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थान विभागीय केंद्राचे अध्यक्ष अॅड. रवींद्र पाटील होते, सदर वेळी पुरस्कारमूर्ती मा. डॉ. एन. के. ठाकरे, प्रा. एन. डी. पाटील, कवी ज्ञानेश मोरे, साहित्यिक अशोक सोनवणे, रंगकर्मी शंभू पाटील, डॉ. अर्पणा भट, तसेच शिक्षण क्षेत्रातील प्राचार्य, प्राध्यापक इ. मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रा. एन. डी. पाटील यांनी तर सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र देशमुख यांनी केले.

मा. केंद्र मंडळाच्या सूचनेनुसार वर्षभरात जागतिक महिला दिन. ज्येष्ठ नागरिक दिन, कृषी दिन, जागतिक मृद्रा दिन, मा. साहेबांची जयंती, शिक्षक दिन, कामगार दिन, पुण्यतिथीसह अन्य कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

## १०.१४ विभागीय केंद्र, नवी मुंबई

१४.१ **आषाढस्य प्रथम दिवसे**:- कवी कुसुमाग्रज वाचनालयाच्या संयुक्त विद्यमाने दि. ६ जुलै २०१९ रोजी नवी मुंबई केंद्रातर्फे सायंकाळी ६ ते ८।। मध्ये स्टर्लींग कॉलेज, नेरूळ येथे 'आषाढस्य प्रथम दिवसे' हा साहित्यिक कार्यक्रम घेतला. त्यामध्ये सुमारे २५ कवींनी सहभाग घेतला. अध्यक्ष प्रमोद कर्नांड यांनी 'तिवरे धरण फुटणे'संदर्भातील उपरोधिक कविता सादर केली, त्यास दादही उत्तम मिळाली. रेडिओ जॉकी व तरुण कवी प्रणय चव्हाण याने आपल्या १० उत्तम कविता सादर करून उपस्थित ६० सभासदांची मने जिंकली.

१४.२ **काव्यमय पावसाळी सायंकाळ...**:- 'आषाढस्य प्रथम दिवसे' निमित्ताने कवी कुसुमाग्रज वाचनालय व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, नवी मुंबई केंद्राच्या संयुक्त विद्यमाने काव्य वाचनाचा कार्यक्रम आयोजितकरण्यात आला होता.

कार्यक्रमात यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, नवी मुंबई केंद्राचे अध्यक्ष प्रमोद कर्नाड यांनी खेकडे ही उपहासगर्भ कविता सादर केली. यावेळी आर. जे.व युवा कवी प्रणव चव्हाण,गझलकार आप्पा ठाकूर यासह अनेक नामवंत व तसेच नवकवी सहभागी झाले होते. ललित पाठक, डॉ अशोक पाटील, प्रवीण पाटील यांसह अनेक रसिकांनी त्यांस भरभरुन दाद दिली. प्रज्ञा लालिंगकर यांचे ओघवते सूत्र संचालन कार्यक्रमाची उंची वाढवत गेले.

१४.३ **वृक्षारोपण**:- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे नवी मुंबई केंद्र व नेरूळ-बेलापूर वॉकर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २१ जुलै २०१९ रोजी नेरुळच्या पारसिक हिलवर 'वृक्षारोपण' करण्याचा कार्यक्रम घेण्यात आला. दोन्ही संस्थांचे अध्यक्ष प्रमोद कर्नाड यांनी १०० रोपांचे विविध ठिकाणी रोपण करून त्याचे संवर्धन करणार असल्याचे सांगितले. नवी मुंबई महानगर पालिका सभागृह नेता श्री. रविंद्र इथापे, नगरसेविका सौ. नेत्रा शिर्के, सलुजा सुतार व संदिप सुतार रोपांसह हजर होते. विविध उच्च प्रजातींची १०० रोपे उपस्थित सुमारे १५० सभासद बंधू-भगिनींच्या उपस्थितीत लावून वृक्षारोपणाचा कार्यक्रम यशस्वी करण्यात आला.

१४.४ **करिअर मार्गदर्शन व्याख्यानाला**:- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नवी मुंबई तर्फे 'दहावी व बारावी नंतरचं नवं क्षितीज' या विषयावर प्रा. संदीप नेमळेकर यांचे स्टर्लिग कॉलेज नेरूळ येथे करिअर मार्गदर्शन व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी केंद्राचे अध्यक्ष प्रमोद कर्नाड यांनी २०० हून अधिक उपस्थित विद्यार्थी व पालकांचे स्वागत केले. प्राध्यापक संदीप नेमळेकर व मिलिंद आचार्य यांनी ३ तास सविस्तर मार्गदर्शन केल्यावर विद्यार्थ्यांच्या अनेक करिअर विषयक प्रश्न विचारले असता त्यांनी मार्गदर्शन केले. पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन द्वारे मुलांचा कल पाहून त्यांना उचित मार्गदर्शन झाल्याने पालकवर्ग समाधानी होते.

'भयंकर सुंदर मराठी भाषा' या विषयावर ज्येष्ठ कवीवर्य व्याख्याते प्रा. अशोक बागवे यांचे व्याख्यान दि. १२.१०.२०१९ रोज कुसुमाग्रज वाचनालयाच्या प्रांगणात सायंकाळी ६ वाजता केंद्रांच्या वतीने संपन्न झाले. मराठी भाषेची जी आज मोडतोड चुकीचे व्याकरण, अर्थ, उच्चार करून केली जाते त्यावर उपहासगर्भ विनोदी, अलंकारिक विवेचनातून श्रोत्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

'यूथ कौन्सिल, नेरूळ' या संस्थेस त्यांनी १९८८ पासून नव्या मुंबईत केलेल्या वृक्षारोपण हरितक्रांती, श्रमदान शिबिरे, रक्तदान शिबिरे, व्यक्तिमत्त्व विकास शिबिरे, आरोग्य शिबिरे याशिवाय ग्रामीण पाडे दत्तक घेणे, आदिवासी मुलांचे शिक्षण आदी क्षेत्रात केलेली भरीव कामगिरी लक्षात घेऊन दि. ३०.११.२०१९ रोजी 'यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार २०१९' रोख रू. १५,०००/- व मानपत्र प्रदान करण्यात आले.

ज्येष्ठ कविवर्य अशोक नायगांवकर यांची काव्यमैफल स्टर्लिग कॉलेजच्या सभागृहात आयोजित करण्यात आली. सुमारे ५०० श्रोतेगण काव्यरसात व हास्यविनोदात न्हाऊन निघाले.

दि. ०८.०२.२०२० गजानन लीला चॅरीटेबल ट्रस्ट संचालित अनाथाश्रम, पनवेल येथील ८०० मुलांच्या चित्रकला स्पर्धेस प्रायोजकत्व देण्यात आले.

दि. १५.०२.२०२० रोजी सकाळी ७.३० वाजता Drug Abuse संदर्भात SIES च्या विद्यार्थ्यांनी नवी मुंबई केंद्रातर्फे भव्य रॅली (कॉलेज ते स्टेशन व परत अशी ६ कि.मी.) काढून जागरूकता अभियान राबविण्यात आले.

स्टर्लिग कॉलेज येथे सकाळी ११ वाजता चाणक्या मंडळ परिवारचे अविनाश धर्माधिकारी, IAS यांच्या संस्थेमार्फत ज्युनियर व सिनिअरच्या प्रत्येकी ८० ते १०० मुला-मुलींच्या बॅचसाठी Personality Devalopment and career Guildance या विषयावर प्रत्येकी २ तास मार्गदर्शन सिद्धार्थ धर्माधिकारी व अभिजीत यांच्या तर्फे करण्यात आले.

## १०.१५ विभागीय केंद्र, परभणी

१५.१ **पूरग्रस्त मदत संकलन केंद्राचे उद्घाटन**:- परभणी येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-विभागीय केंद्र परभणी, चतुरंग प्रतिष्ठान परभणी व मॉडेल इंग्लिश एज्युकेशन सोसायटी शारदा महाविद्यालय परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने पूरग्रस्तांसाठी मदत संकलन केंद्र सुरू करण्यात आले आहे. या मदत संकलन केंद्राचे उद्घाटन कृषिभूषण व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते माननीय कांतराव काका झरीकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला यशवंतराव चव्हान प्रतिष्ठान मुंबई चे समन्वयक विजय कान्हेकर, अनिल जैन अध्यक्ष मॉडेल इंग्लिश एज्युकेशन सोसायटी व चतुरंग प्रतिष्ठानचे अध्यक्ष विलास पानखेडे उपस्थित होते. यावेळी झालेल्या कार्यक्रमात बोलताना मा. कांतराव काका देशमुख यांनी पूरस्थितीमुळे झालेली भीषण अवस्था व या परिस्थितीतून सावरण्यासाठी "आम्ही परभणीकर" म्हणून मुक्तहस्ताने मदत करावी असे आवाहन केले. त्यानंतर अनिल जैन, विलास पानखेडे यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

यावेळी झालेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सचिन खडके यांनी तर प्रास्ताविक मा. विजय काणेकर यांनी केले. या कार्यक्रमाला चतुरंग प्रतिष्ठानेचे बालासाहेब फुलारी, रूस्तुमराव कदम, निखिल जैन, श्रीराम गरजे, गंगाधर गायकवाड, धर्मराज शेजुळ, डॉ. प्रशांत मेने, प्रा. भ. पु. कालवे, एकनाथराव मस्के, टी. डी. जाधव, प्रा. डॉ. जाधव, प्रा. डॉ. भगवान पाटील, डॉ. नितीन बावळे, डॉ. रमेश भालेराव, विष्णू वैरागड, प्रा. डॉ. हनुमंत शेवाळे, प्रा. डॉ. दत्ता चामले, प्रा. डॉ. अविनाश पंचाळ, फुलसावंत सर, प्रा. शाम पाठक, सुरेश जयपूरकर, राजाराम मूत्रटकर व तुकाराम पवार यांची उपस्थिती होती.

१५.२ **यशवंत व्याख्यानमाला कार्यक्रम**:- या वर्षीची व्याख्यानमाला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र परभणी व चतुरंग प्रतिष्ठान परभणीच्या संयुक्त विद्यमाने दि. ०८ व ०९ जानेवारी हे दोन दिवस आयोजित करण्यात आली. ०८ जानेवारीला श्री. अरविंद जगताप यांचे 'पत्रास कारण की' या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी त्यांनी मातृभाषेतून संवाद, भावना समृद्ध होतात, बोलीभाषेतून मोकळपणाने सहज व्यक्त होता येते. संवाद कृतीयुक्त हवा, अशी भावना व्यक्त केली. या कार्यक्रमास परभणी शहरातील ज्येष्ठ नागरिकांसह अनेक स्तरांतील अनेकजण बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमास प्रतिष्ठानचे श्रीकांतराव देशमुख, सौ. भावनाताई नखाते, दिलीप श्रृंगारपुतळे, बाळासाहेब फुलारी, विलास पानखडे, प्राचार्य बाळा जाधव, अनिल जैन हे सदस्य उपस्थित होते.

दि. ०९ जानेवारी रोजी दिशा शेख यांचे 'स्त्री-पुरूष समानता व भारतीय समाज' या विषयावर व्याख्यान झाले. या व्याख्यानात त्यांनी स्त्री-पुरूष असमानता ही माणसाने निर्माण केली आहे; निसर्गाने नाही. स्त्रियांच्या समतावादी व्यवस्थेबद्दल मत व्यक्त केले. या व्याख्यानास परभणी परिसरातील प्रतिष्ठित नागरिक, महिला व पुरूष श्रोते उपस्थित होते. प्रतिष्ठानचे श्री. बाळासाहेब फुलारी, अनिल जैन प्रा. इंद्रजित भालेराव, अरूण चव्हाण, श्रीकांतराव देशमुख, सोपानराव अवचार, प्राचार्य बाळासाहेब जाधव, सौ. भावनाताई नखाते, विलास पानखडे हे सदस्य उपस्थित होते.

१५.३ **कॅन्सर प्रबोधन यात्रेचे आयोजन**:-यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र परभणी प्रयास अमरावती, आरंभ अहमदनगर व ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय कॅन्सर प्रबोधन यात्रेचे आयोजन दि. ७ फेब्रुवारी २०२० रोजी वेळ सकाळी १० ते सांय. ५ या वेळेत केले होते. शहरातील विविध महाविद्यालयांतील युवक व युवतींना कॅन्सर कसा होतो व तो झाल्यावर काय करायला पाहिजे, तो कसा बरा होऊ शकतो... याविषयी प्रसिद्ध कॅन्सर प्रबोधनकार मा. डॉ. अविनाश सावजी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अनेक कॅन्सरग्रस्त व्याक्तिंनी त्यांचे अनुभव कथन केले.

या कॅन्सर प्रबोधन यात्रेती सुरूवात अहमदनगर येथून दि. २ फेब्रुवारी २०२० रोजी झाली. ही यात्रा अहमदनगर, बिड, उस्मानाबाद, लातूर, नांदेड असा प्रवास करत दि. ७ फेब्रुवारीला सकाळी ९ वा. परभणीत तिचे आगमन झाले.

दिवसभर शहरातील विविध महाविद्यालयांत या यात्रेचे प्रबोधन व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून मा. सौ. संध्याताई दुधगावकर (प्राचार्य व अध्यक्ष परभणी केंद्र) तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. सौ. भावनाताई नखाते (मा. उपाध्यक्ष जि. प. तथा महिला व्यासपीठ प्रमुख विभागीय केंद्र परभणी) तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रसिद्ध कॅन्सर प्रबोधनकार तथा थोर समाजसेवक मा.डॉ. अविनाश सावजी तथा कॅन्सर प्रबोधन यात्रेचे संयोजक मा. श्री. प्रदीप काकडे (आरंभ अहमदनगर) उपस्थित होते. तर कॅन्सर योद्धा सौ. भाग्यश्री वैद्य व खराटे मामा यांनी कॅन्सरसोबत लढा दिला, तो कसा यशस्वी केला याबद्दल उपस्थित महाविद्यालयीन युवक व युवतींना मार्गदर्शन केले. या कॅन्सर प्रबोधन यात्रेचे आयोजन श्री. विष्णू वैरागड यांनी केले.

१५.४ **जागर मायलेकींचा कार्यक्रमातून कर्तृत्वान महिलांचा सन्मान**:- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई व वाल्मीकी शिक्षण प्रसारक मंडळ पाथरी

भारतातील स्त्रियांनी समाजात सन्मानाने व स्वावलंबी जीवन जगण्यासाठी शिवरायांनी दिलेल्या संस्काराचा वारसा घेऊन मुलींनी उच्चशिक्षण घेऊन प्रशासन सेवेत उत्तम प्रशासन करावे असे मत सौ. भावनाताई नखाते यांनी 'जागर मायलेकींचा' या संकल्पनेअंतर्गत 'आदर्श माता पुरस्कार समारंभ' प्रसंगी मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जि.प. माजी उपाध्यक्ष भावनाताई नखाते तर जि.प. परभणीच्या उपमुख्यकार्यकारी अधिकारी सौ. मनुषा कापसे, परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती मेघनाताई देशमुख, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्र परभणीचे कोषाध्यक्ष मा. विलास पानखडे, मा. बालासाहेब फुलारी यांची उपस्थिती होती. हा कार्यक्रम ता. १९ बुधवार रोजी संपन्न झाला.

प्रारंभी महाराष्ट्राचे आराध्यदैवत रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सामूहिक शिव वंदना घेण्यात आली. जागर मायलेकीचा कार्यक्रमाअंतर्गत कठीण परिस्थितीशी झुंज देत आयुष्यात यशस्वी ठरलेल्या वर्तमान काळातील मायलेकींचा सन्मान प्रतिष्ठानच्या वतीने स्मृती चिन्ह, पुस्तके भेट देऊन करण्यात आला.

सौ. स्मिता अशोक मुक्तावार सौ. चंद्रकला जयराम गोरे, सौ. द्वारका महादेव गिरी, संगिता शामराव रणेर, सुरेखा रावसाहेब गिरान, रूक्मीणीबाई बाळासाहेब गिराम, भारती श्रीराम जोगदंड, सुनिता राजेंद्र मुक्तवार, श्रीमती वैशाली विलासराव कदम, संध्या ज्ञानोबा भिसे, शकुंतला भिमराव काकडे, सिंधुताई शामराव राठोड यांचा गौरव करण्यात आला.

कृषीभूषण पुरस्कार प्राप्त श्रीमती मेघाताई देशमुख यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच सौ. मंजुषाताई कापसे व श्री. विलास पानखडे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन गोपाळ आमले व टी.एस. शेळके, बळीराम चव्हाण यांनी केले. तर आभार उपमुख्याधापक आर. जे. गुंडेकर यांनी मानले.

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| १) | यशवंतराव चव्हाण : विधिमंडळातील निवडक मराठी भाषणे - भाग -१ संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| २) | वाय बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस - विधिमंडळ - भाग -२ संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ३) | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट - वाय बी. चव्हाण - खंड १ ते ४ संपादक : राम प्रधान प्रत्येकी | २५०.०० |
| ४) | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन - ना. धों. महानोर | १०.०० |
| ५) | सह्याद्रीचे वारे - यशवंतराव चव्हाण | २५०.०० |
| ६) | म. जोतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन - प्रा. गजमल माळी | १२.०० |
| ७) | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास - संपादक - वि. स. पागे | ३५.०० |
| ८) | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन - संपादन : अण्णासाहेब शिंदे | २००.०० |
| ९) | महाराष्ट्र : एक दृष्टिकोन - शरदराव पवार - भाषणसंग्रह संपादन : दादासाहेब रूपवते | ७५.०० |
| १०) | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास - संपादन पी. बी. पाटील | १००.०० |
| ११) | नवभारत : परिवर्तनाची दिशा - संपादन : पी. बी. पाटील | १००.०० |
| १२) | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास संशोधन / लेखक - लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३) | महिलांसंबधीचे धोरण : स्वयंसिध्दतेकडे वाटचाल - डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४) | यशवंतराव चव्हाण - चरित्र-लेखक - अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५) | शब्दाचे सामर्थ्य - संपादन : राम प्रधान | ३७५.०० |
| १६) | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी)<br>(यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १७) | बाउंटीफुल बनियान - डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र - खंड ४ (इंग्रजी) बॅ. पी. जी. पाटील | ८००.०० |
| १८) | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९) | अजिंठा - (काव्यसंग्रह) लेखक : ना. धों. महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| २०) | ई बुक (मराठी/इंग्रजी) (यशवंतराव चव्हाण यांचे साहित्य व फोटो) | १५०.०० |
| २१) | यशवंतराव चव्हाण आात्मचरित्र - कृष्णाकांठ | ३००.०० |
| २२) | यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व आणि कर्तृत्व - श्री. गोविंदराव तळवळकर | ५००.०० |
| २३) | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००.०० |
| २४) | शैक्षणिक गुणवत्ता : आव्हान आणि आवाहन - डॉ. वसंत काळपांडे | २००.०० |
| २५) | हवामान बदल आणि महाराष्ट्र | ५०.०० |
| २६) | उपक्रम : वेचक -वेधक - डॉ. वसंत काळपांडे | १००.०० |
| २७) | स्त्री रत्न सावित्रीबाई फुले - श्रीनिवास भालेराव | २०.०० |
| २८) | स्त्रियांचे कायदे, आरोग्य आणि योजना -सुप्रिया सुळे | २०.०० |
| २९) | संवादिनी - सुप्रिया सुळे | २०.०० |
| ३०) | Appraising Schools - डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर | २००.०० |
| ३२) | Yashwantrao Chavan an Autobiography | २००.०० |
| ३३) | शिक्षणव्रती - डॉ. कुमुद बन्सल | ३९५.०० |
| ३४) | शिक्षणकट्टा - बसंती रॉय | २००.०० |
| ३५) | वाटचाल ई-शिक्षणाची - बसंती रॉय | २००.०० |
| ३६) | हवामान बदलास आमचे उत्तर | २००.०० |
| | | १००.०० |

## डीव्हीडी व ऑडीओ कॅसेट्स

१) मी एस. एम. : एस. एम. जोशी यांचा जीवनपट

२) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट

३) प्रवासी पक्षी : सुप्रसिध्दि साहित्यक कुसुमाग्रज यांचा जीवनपट

४) पु. ल. वृत्तान्त : पु. ल. देशपांडे यांचा जीवनपट
वरील चारही व्हिडिओ कॅसट्सची निर्मिती दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी पार पाडली.

६) कॉ. केशवराव जेधे : कॉ. केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शक - श्री. राम गबाले

७) येस आय ॲम कम्युनिस्ट : कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट, दिग्दर्शक - विनय नेवाळकर

८) 'बशर नवाज : ख्वाब, जिंदगी और मै माहितीपट, दिग्दर्शक - जयप्रद देसाई

९) 'जागर हा जाणीवांचा ..... लघुपट, दिग्दर्शक - चंद्रकांत कुलकर्णी"

१०) यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई निर्मित डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित
चित्रपट - यशवंतराव चव्हाण: बखर एका वादळाची.

## चित्रपट

- यशवंतराव चव्हाण... बखर एका वादळाची : दिग्दर्शक - जब्बार पटेल

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई निर्मित संकेतस्थळे

- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे संकेतस्थळ - http://ybchavanpratishthan.org/
- यशवंतराव चव्हाण यांचे समग्र संदर्भ साहित्य - http://ybchavan.in
- धर्मानंद कोसंबी यांचे समग्र साहित्य - http://dharmanandkosambi.com/
- केतकरकृत महाराष्ट्रीय ज्ञानकोश - http://ketkardnyankosh.com/
- महर्षि विठ्ठल रामजी शिंदे समग्र साहित्य - http://virashinde.com/
- इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळाकडे उपलब्ध दुर्मीळ कागदपत्रांचे डिजिटायझेशन - http://vkrajwade.com

**Auditor's Report of YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN,MUMBAI for the Year ended 31st March, 2020**

[Annexure to Report under Section 33(2) and Rule 19 of the Bombay Public Trust Act, 1950]

**Report on the Financial Statements**

We have audited the accompanying financial statements of **Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai** for the year ended **31st March,2020** which comprise the Balance Sheet as at 31st March,2020 and the Income and Expenditure Account for the year then ended, and a summary of significant accounting policies and other explanatory information.

**Trust Management's Responsibility for the Financial Statements**

Trust Management is responsible for the preparation of these financial statements that give a true and fair view of the financial position and financial performance in accordance with accounting standards generally accepted in India. This responsibility includes the design, implementation and maintenance of internal control relevant to the preparation and presentation of the financial statements that give a true and fair view and are free from material misstatement, whether due to fraud or error.

**Auditor's Responsibility**

Our responsibility is to express an opinion on these financial statements based on our audit. We conducted our audit in accordance with the Standards on Auditing issued by the Institute of Chartered Accountants of India. Those Standards require that we comply with ethical requirements and plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free from material misstatement.

An audit involves performing procedures to obtain audit evidence about the amounts and disclosures in the financial statements. The procedures selected depend on the auditor's judgment, including the assessment of the risks of material misstatement of the financial statements, whether due to fraud or error. In making those risk assessments, the auditor considers internal control relevant to the Trust's preparation and fair presentation of the financial statements in order to design audit procedures that are appropriate in the circumstances. An audit also includes evaluating the appropriateness of accounting policies used and the reasonableness of the accounting estimates made by Trust Management, as well as evaluating the overall presentation of the financial statements.

We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our audit opinion.

**Opinion**

In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, the financial statements give the information required by the relevant sections and rules of the Bombay Public Trust Act,1950 in the manner so required and give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India:

I In the case of the Balance Sheet, of the State of Affairs of the Trust as at **31st March,2020** and
ii. In the case of the Income and Expenditure Account, of the **Deficit** for the year ended on that date.

**Report on Other Legal and Regulatory Requirements**

In addition to our report attached in the prescribed form under relevant sections and rules of the Bombay Public Trust Act,1950 and subject to notes on the above.

We report that:

a. We have obtained all the information and explanations which to the best of our knowledge and belief were necessary for the purpose of our audit;
b. In our opinion proper books of account as required by law have been kept by the Trust so far as appears from our examination of those books;
c. The Balance Sheet and Income and Expenditure Account dealt with by this Report are in agreement with the books of account;
d. In our opinion, the Balance Sheet and Income and Expenditure Account comply with the Accounting Standards to the extent applicable;

**Place**: Mumbai
**Date**:- 28th September, 2020

For CVK & ASSOCIATES,
Chartered Accountants
FIRM Regn.No.101745W

sd/-
**S. Y. JOSHI (PARTNER)**
Membership No.032523

## YASHWANTRAO CHAVAN
### Balance Sheet

| Previous Year Rs. | FUNDS & LIABILITIES | Schedule | Rs. | Current Year Rs. |
|---|---|---|---|---|
| | **Trust Fund or Corpus** | | | |
| 45,125,342 | Balance as per last Balance Sheet | | 45,373,342 | |
| 248,000 | Add: Corpus Donations | | 253,000 | |
| **45,373,342** | | | | **45,626,342** |
| | **Other Earmarked Funds:** | | | |
| | Yashwantrao Chavan Centre Building Fund | | | |
| 73,979,834 | 1) Contribution Received | | 73,979,834 | |
| 30,000,000 | 2) Grant Received from Government | | 30,000,000 | |
| 52,500,000 | 3) Transfer from Income & Expenditure A/C | | 52,500,000 | |
| 156,479,834 | | | 156,479,834 | |
| 100,473,584 | Less: Transferred to Income & | | 103,196,826 | |
| **56,006,250** | | | | **53,283,008** |
| 5,000,000 | Contingency Reserve Fund | | 5,000,000 | |
| 50,000,000 | Contingency Fund for Lease Rent | | 50,000,000 | |
| 10,000,000 | Contingency Fund for Property Tax | | 10,000,000 | |
| 10,000,000 | National & State Awards Fund | | 10,000,000 | |
| **75,000,000** | | | | **75,000,000** |
| **6,778** | **Donation Received in Kind - Books** | | | **7,792** |
| | **Current Liabilities** | | | |
| 297,478 | For Expenses | 1a | 383,361 | |
| - | For Advances | 1b | - | |
| 86,245,145 | For Rent and Other Deposits | 1c | 87,137,041 | |
| 1,090,409 | GST Payable | | - | |
| 51,953 | For Sundry Credit Balances | 1d | 46,377 | |
| **87,684,985** | | | | 87,566,779 |
| | **Notes to the Accounts** | 10 | | |
| **264,071,355** | | | | **261,483,921** |

Place: Mumbai
Dated: 28th September, 2020

As per our report of even date
C.V.K Associates
Chartered Accountants
Firm Registration No. 101745W

Sd/-
**S.Y.Joshi**
(Partner)
Membership No.32523

**PRATISHTHAN, MUMBAI** **Charity Comm.Reg. No. F10643**

**As at 31st March, 2020** **Dated 17-9-1985**

| Previous Year Rs. | Property & Assets | Schedule | Rs | Current Year Rs. |
|---|---|---|---|---|
| | **Immoveable Properties** | | | |
| 132,649,061 | Opening Balance | 2 | 132,649,061 | |
| - | Add: Additions | | - | |
| - | Less: Deductions | | - | |
| 104,787,411 | Less: Accumulated Depreciation | | 107,573,576 | |
| **27,861,650** | | | | **25,075,485** |
| | **Landscaping Work** | | | |
| 2,784,215 | Opening Balance | 2 | 2,784,215 | |
| - | Add: Additions | | - | |
| 1,755,251 | Less: Accumulated Depreciation | | 1,858,147 | |
| **1,028,964** | | | | **926,068** |
| | **Furniture, Fixtures,Generator, Computers & Allied Equipments etc.:** | | | |
| 107,447,828 | Opening Balance | 3a | 108,201,223 | |
| 753,395 | Add: Additions | | 897,006 | |
| - | Less: Deductions | | - | |
| 78,821,095 | Less: Accumulated Depreciation | | 82,972,737 | |
| **29,380,128** | | | | **26,125,492** |
| | **Library Books:** | | | |
| 6,797,649 | Opening Balance | 3b | 7,080,361 | |
| 282,712 | Add: Additions | | 338,241 | |
| 4,800,184 | Less: Accumulated Depreciation | | 5,062,026 | |
| 2,280,177 | | | 2,356,576 | |
| 6,778 | Add: Received as Donation | | 7,792 | |
| **2,286,955** | | | | **2,364,368** |
| | **Y.B.Chavan Film** | | | |
| 10,666,981 | Opening Balance | 3c | 10,666,981 | |
| - | Add: Additions | | - | |
| - | Less: Other Deductions | | - | |
| 10,666,981 | Less: Accumulated Depreciation | | 10,666,981 | |
| - | | | | - |
| **150,156,386** | **Investments (at cost)** | 4 | | **150,620,190** |
| | **Advances:** | | | |
| - | Trustees | 5A | - | |
| 377,097 | Employees | 5B | 371,866 | |
| | Contractor | 5C | - | |
| - | Lawyers | 5D | - | |
| 15,783,609 | TDS | 5D | 18,455,913 | |
| 471,616 | Others | | -129,522 | |
| **16,632,322** | | | | **18,698,257** |
| 2,853,403 | Service tax Recoverable from various parties | | 2,201,819 | |
| 2,566,137 | Service tax Receivable - paid under protest | | 2,566,137 | |
| 1,200,734 | Service tax Receivable - paid in advance | | 361,573 | |
| | GST Receivable - Paid in advance | | 1,157,632 | |
| **6,620,274** | | | | **6,287,162** |
| **1,854,157** | **Deposits** | | | **1,876,157** |
| | **Cash & Bank Balances** | | | |
| 7,323,989 | Savings Bank A/c | 6A | 4,528,578 | |
| 774,703 | Current Account | 6B | 1,378,805 | |
| 55,022 | Cash in hand | 6C | 121,701 | |
| **8,153,713** | | | | **6,029,084** |
| | **Income & Expenditure Account** | | | |
| | Balance as per last | | | |
| 11,550,260 | Balance sheet (Surplus) / Deficit | | 20,096,804 | |
| 11,572,369 | Add: Deficit of the Year | | 6,108,096 | |
| | Less: Transferred to contingency fund | | | |
| 23,122,629 | | | 26,204,900 | |
| 3,025,825 | Less: Transfer from Building Fund | | 2,723,242 | |
| **20,096,804** | | | | **23,481,658** |
| **264,071,355** | | | | **261,483,921** |

**For Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.**

Sd/-
**Hemant Takle**
(Treasurer)

Sd/-
**S.G. Kale**
(General Secretary)

**YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN,**
**Income & Expenditure Account for the**

| Previous Year Rs. | Particulars | Schedule | Rs. | Current Year Rs. |
|---|---|---|---|---|
| | **Expenditure in respect of properties** | | | |
| 1,226,310 | Rates, Taxes and Cesses | | 1,226,310 | |
| 10,319,691 | Repairs and Maintenance | | 9,305,812 | |
| 5,495,961 | Salaries (Watch & Ward) | | 5,608,989 | |
| - | Loss on assets written off | | 0 | |
| | Service tax Written off | | 0 | |
| | GST interest | | 0 | |
| 140,632 | Insurance | | 168,718 | |
| **17,182,594** | | | 16,309,829 | |
| **17,372,308** | **Establishment Expenses** | | 16,434,489 | |
| **1,033,300** | **Legal & Professional expenses** | | 406,500 | |
| 35,588,202 | | | 33,150,818 | |
| **(15,346,380)** | **Less: Reimbursement** | | **15,965,139** | |
| **20,241,822** | | | | **17,185,679** |
| **9,106,947** | **Depreciation** | | | **7,302,545** |
| **7,054,723** | **Auditorium Expenses** | 7 | | **7,317,989** |
| | **Expenditure on Objects of Trust:** | | | |
| 10,139,029 | Education excluding common expenses and depreciation | | 11,126,871 | |
| 15,320,804 | Others | 8 | 15,874,012 | |
| **25,459,834** | | | | **27,000,883** |
| | **Surplus carried over to Balancesheet** | | | |
| | **Notes to the Accounts** | 10 | | |
| **61,917,326** | | | | **58,807,096** |

Place: Mumbai
Dated: 28th September, 2020

As per our report of even date
C.V.K Associates
Chartered Accountants
Firm Registration No. 101745W

Sd/-
**S.Y.Joshi**
(Partner)
Membership No.32523

**MUMBAI**
**year ended 31st March, 2020**

**Charity Comm.Reg.No. F10643**
**Date 17-09-1985**

| Previous Year Rs. | Particulars | Schedule | Rs. | Current Year Rs. |
|---|---|---|---|---|
| | **Income** | | | |
| **12,131,609** | **Interest** | | | **11,860,026** |
| | **Donations** | | | |
| 22,420,118 | Auditorium Donations | | 20,042,063 | |
| 4,044,486 | Other Donations | | 2,870,700 | |
| **26,464,604** | | | | **22,912,763** |
| **8,398,324** | **Educational Receipts** | | | **11,746,056** |
| | **Profit on sale of fixed assets** | | | - |
| | **Income from other sources:** | | | |
| 53,600 | Library Membership fees | | 52,900 | |
| 47,388 | Sale of Books | | 40,207 | |
| 2,810,619 | Miscellaneous Receipts Auditorium | | 5,197,402 | |
| 436,813 | Miscellaneous Receipts Others | 9 | 889,647 | |
| 2,000 | Rangswar Membership fees | | - | |
| 0 | Caretaker management fees | | - | |
| **3,350,420** | | | | **6,180,156** |
| 11,572,369 | **Deficit carried over to** | | | **6,108,096** |
| **61,917,326** | | | | **58,807,096** |

**Income outstanding - Interest - Rs. 19,98,667/-**
**For Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.**

Sd/-
**Hemant Takle**
(Treasurer)

Sd/-
**S.G. Kale**
(General Secretary)

## SCHEDULE 1
### YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN,MUMBAI
### CURRENT LIABILITIES AS ON 31ST MARCH 2020

| 2018-19 (Rs.) | Sr. No. | PARTICULARS | (Rs.) | 2019-20 (Rs.) |
|---|---|---|---|---|
| | A | **Expenses** | | |
| 25,919 | 1 | Vibhagiya Kendra Ambajogai | 25,919 | |
| 49,213 | 2 | Vibhagiya Kendra Latur | 49,213 | |
| 49,500 | 3 | Vibhagiya Kendra Ahmednagar | 103,500 | |
| 125,000 | 4 | Vibhagiya Kendra Nashik | 125,000 | |
| 1,500 | 5 | Vibhagiya Kendra Solapur | 681 | |
| 5,605 | 6 | Vibhagiya Kendra Aurangabad | 5,605 | |
| 741 | 7 | Vibhagiya Kendra Jalgaon | 1,582 | |
| 40,000 | 8 | Vibhagiya Kendra Parbhani | - | |
| - | 9 | Vibhagiya Kendra Pune | 48,000 | |
| - | 10 | Vibhagiya Kendra Karad | 23,861 | |
| 297,478 | | | | 383,361 |
| | B | **Advances** | | |
| | C | **Rent and Other Deposits** | | |
| 22,100,000 | 1 | The Council of E.U. Chambers of Commerce in India | 22,100,000 | |
| 9,000,000 | 2 | Maharashtra Economic Development Council | 9,000,000 | |
| 10,100,000 | 3 | Mumbai First | 10,100,000 | |
| 32,600,000 | 4 | Pratham Mumbai Education Initiative | 32,600,000 | |
| 1,000,000 | 5 | The Maharashtra State Co-op Bank Ltd. | 1,000,000 | |
| 200,000 | 6 | CITA | 200,000 | |
| 4,000,000 | 7 | Central Caterers | 4,000,000 | |
| 5,803,634 | 8 | Hall, Art Gallery and Rangswar, Sanskritik Sabhagrih Deposits | 6,367,317 | |
| 329,050 | 9 | Library Deposit | 348,850 | |
| 1,112,462 | 10 | Security, Retention, Earnest Money Deposit | 1,420,874 | |
| 86,245,145 | | | | 87,137,041 |
| | D | **Sundry Credit balances** | | |
| 51,928 | 1 | TDS Payable | 45,725 | |
| 25 | 2 | Others | 652 | |
| 51,953 | | | | 46,347 |
| **86,594,576** | | **TOTAL** | | **87,566,779** |

## SCHEDULE – 2
### YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN, MUMBAI.
### STATEMENT OF IMMOVEABLE PROPERTIES AND DEPRECIATION AS ON 31ST MARCH 2020

| Sr. No | Particulars | ORIGINAL COST | | | | | DEPRECIATION | | | | W.D.V as on 31/03/2020 Rs. | W.D.V as on 31/03/2019 Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Rate of Depreciation | Op. Balance 01/04/2019 Rs. | Addition Rs. | Deduction Rs. | Total Rs. | Op. Balance 01/04/2019 Rs. | Addition Rs. | Deduction Rs. | Total Rs. | | |
| A.) | Immoveable Properties | | | | | | | | | | | |
| 1 | Yashwantrao Chavan Centre Bldg. | 10% | 127,706,008 | - | - | 127,706,008 | 100,473,584 | 2,723,242 | - | 103,196,826 | 24,509,182 | 27,232,424 |
| 2 | Virangula Banglow Karad | 10% | 4,943,052 | - | - | 4,943,052 | 4,313,827 | 62,923 | - | 4,376,750 | 566,302 | 629,225 |
| | Total as on 31st March 2020 | | 132,649,061 | - | - | 132,649,061 | 104,787,411 | 2,786,165 | - | 107,573,576 | 25,075,485 | |
| | | | | | | | | | | | | |
| | Total as on 31st March 2019 | | 132,649,061 | - | - | 132,649,061 | 101,691,672 | 3,095,739 | - | 104,787,411 | | 27,861,650 |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| B.) | Landscaping Work | | | | | | | | | | | |
| 4 | Total as on 31st March 2020 | 10% | 2,784,215 | - | - | 2,784,215 | 1,755,251 | 102,896 | | 1,858,147 | 926,068 | |
| | | | | | | | | | | | | |
| | Total as on 31st March 2019 | 10% | 2,784,215 | - | - | 2,784,215 | 1,640,922 | 114,329 | | 1,755,251 | | 1,028,964 |

## SCHEDULE – 3
## YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN, MUMBAI.
### STATEMENT OF MOVEABLE PROPERTIES AND DEPRECIATION AS ON 31ST MARCH 2020

| | | | ORIGINAL COST | | | | DEPRECIATION | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No | Particulars | Rate of Depreciation | Op. Balance 01/04/2019 Rs. | Addition Rs. | Deduction Rs. | Total Rs. | Op. Balance 01/04/2019 Rs. | Addition Rs. | Deduction Rs. | Total Rs. | W.D.V as on 31/03/2020 Rs. | W.D.V as on 31/03/2019 Rs. |
| A.) | Furniture, Fixtures,Generator, Computers & Allied Equipments etc. | | | | | | | | | | | |
| 1 | Furniture & Fixture | 10% | 27,192,783 | 3,945 | | 27,196,728 | 18,125,048 | 906,966 | | 19,032,014 | 8,164,714 | 9,067,735 |
| 2 | Office Equipment | 15% | 9,800,608 | 519,348 | | 10,319,956 | 6,724,173 | 536,084 | | 7,260,257 | 3,059,699 | 3,076,435 |
| 3 | Computer & Allied Equipment | 60% | 17,015,907 | 373,713 | | 17,389,620 | 16,494,130 | 266,644 | | 16,760,774 | 628,846 | 521,777 |
| 4 | Air-Conditioners | 15% | 14,661,659 | - | | 14,661,659 | 10,272,318 | 658,401 | | 10,930,719 | 3,730,940 | 4,389,341 |
| 5 | Electric Installation | 15% | 16,477,024 | - | | 16,477,024 | 11,159,035 | 797,699 | | 11,956,734 | 4,520,290 | 5,317,989 |
| 6 | Auditorium Equipments | 15% | 13,406,144 | - | | 13,406,144 | 10,653,776 | 412,851 | | 11,066,627 | 2,339,517 | 2,752,368 |
| 7 | Generator | 15% | 1,098,795 | - | | 1,098,795 | 940,932 | 23,679 | | 964,611 | 134,184 | 157,863 |
| 8 | CCTV Camera | 15% | 3,794,825 | - | | 3,794,825 | 2,301,090 | 237,586 | | 2,538,676 | 1,256,149 | 1,493,735 |
| 9 | Ringwell | 15% | 648,475 | - | | 648,475 | 382,323 | 39,923 | | 422,246 | 226,229 | 266,152 |
| 10 | Auditorium Elevator | 15% | 1,580,000 | - | | 1,580,000 | 817,088 | 114,437 | | 931,525 | 648,475 | 762,912 |
| 11 | Devarashtre JanmSmarak | 10% | 2,525,000 | - | | 2,525,000 | 951,181 | 157,382 | | 1,108,563 | 1,416,437 | 1,573,819 |
| | **Total as on 31st March, 2020** | | **108,201,223** | **897,006** | - | **109,098,229** | **78,821,095** | **4,151,642** | - | **82,972,737** | **26,125,492** | |
| | **Total as on 31st March, 2019** | | **107,447,828** | **753,395** | - | **108,201,223** | **74,104,552** | **4,716,543** | - | **78,821,095** | | **29,380,128** |
| B.) | Library Books | | | | | | | | | | | |
| 12 | **Total as on 31st March, 2020** | **10%** | **7,080,361** | **338,241** | - | **7,418,602** | **4,800,184** | **261,842** | - | **5,062,062** | **2,356,576** | |
| | | | | | | | | | | | | |
| | **Total as on 31st March, 2019** | **10%** | **6,797,649** | **282,712** | - | **7,080,361** | **4,546,831** | **253,353** | - | **4,800,184** | | **2,280,177** |
| C.) | Y.B.Chavan Film | | | | | | | | | | | |
| 13 | **Total as on 31st March 2020** | **20%** | **10,666,981** | - | - | **10,666,981** | **10,666,981** | - | - | **10,666,981** | - | |
| | | | | | | | | | | | | |
| | **Total as on 31st March 2019** | **20%** | **10,666,981** | - | - | **10,666,981** | **9,685,998** | **980,983** | - | **10,666,981** | | - |

## SCHEDULE 4
## YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN, MUMBAI
### INVESTMENT AS ON 31ST MARCH 2020

| 2018-19 (Rs.) | Sr. No. | PARTICULARS | (Rs.) | 2019-20 (Rs.) |
|---|---|---|---|---|
| 142,400,000 | 1 | Government of India 8% (Taxable) Bond 2003 | | 142,400,000 |
| 2,467,700 | 2 | Fixed Deposit with The Masharashtra State Co-op. Bank Ltd. | | 2,922,154 |
| 500,000 | 3 | Fixed Deposit with State Bank of India | | 500,000 |
| 1,740,630 | 4 | Fixed Deposit with Karad Janata Sahakari Bank Ltd. | | 1,740,630 |
| 298,056 | 5 | Fixed Deposit with Vishwas Co-op. Bank Ltd. | | 298,056 |
| 100,000 | 6 | Fixed Deposit with Ratnagiri D.C.C.Ltd. | | 100,000 |
| 2,650,000 | 7 | Bank of Baroda | | 2,659,350 |
| **150,156,386** | | **Total** | | **150,620,190** |

**SCHEDULE 5**
**YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN,MUMBAI**
**ADVANCES AS ON 31ST MARCH, 2020**

| 2018-19 (Rs.) | Sr. No. | PARTICULARS | (Rs.) | 2019-20 (Rs.) |
|---|---|---|---|---|
| - | A | **TRUSTEES** | | - |
| 377,097 | B | **EMPLOYEES** | | 371,866 |
| | C | **CONTRACTOR** | | - |
| - | D | **LAWYERS** | | - |
| | E | **OTHERS** | | |
| 15,783,609 | 1 | T.D.S. | 18,455,913 | |
| 2,823 | 2 | Maharashtra Mahila Vyaspeeth | 83,823 | |
| - | 3 | Apang Hakks Vikas Manch | 37,998 | |
| 1,561 | 4 | Shikshan Vikas Manch | 1,561 | |
| - | 5 | Birth Anniversary Advance | 22,382 | |
| 235,000 | 6 | Vibhagiya kendra Pune | - | |
| 75,387 | 7 | Vibhagiya kendra Karad | - | |
| 10,184 | 8 | Nav Maharashtra Yuva Abhyan | 22,184 | |
| 59,434 | 9 | Service Tax | 56,349 | |
| 87,227 | 10 | Others | -353,819 | |
| 16,255,225 | | | | 18,326,391 |
| **16,632,322** | | **TOTAL** | | **18,698,257** |

**SCHEDULE-6**
**YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN, MUMBAI**
**CASH & BANK BALANCE AS ON 31ST MARCH, 2020**

| 2018-19 (Rs.) | Sr. No. | PARTICULARS | (Rs.) | 2019-20 (Rs.) |
|---|---|---|---|---|
| | A | **SAVINGS BANK** | | |
| | 1 | The Maharashtra State Co-op. Bank Ltd. | | |
| 67,602 | | (a) Interest Account No.-49 | 77,488 | |
| 456,098 | | (b) Corpus Account No.-50 | 450,561 | |
| - | | (c) Foreign Contribution.-19775 | - | |
| 64,120 | 2 | State Bank of India- A/c. No. 31501872983 | 22,402 | |
| 1,317,009 | 3 | Bank of Baroda -Auditorium(23) | 258,782 | |
| 2,787,458 | 4 | Bank of Baroda (22) | 823,553 | |
| 84,464 | 5 | The Karad Janata Sahakari Bank Ltd. A/c 6488 (Karad Regional Centre) | 130,461 | |
| 91,562 | 6 | The Karad Janata Sahakari Bank Ltd. A/c 15811 (Karad Regional Centre) | 129,680 | |
| 30,923 | 7 | Union Bank of India Nagpur (Nagpur Regional. Centre) | 29,986 | |
| 283,555 | 8 | Pune Dist. Central Co-op. Bank Ltd. (Krishi Sahakar Vyas Peeth) | 243,476 | |
| 39,151 | 9 | Pune Peoples Co-op Bank Ltd. A/c- 2458 (Pune Regional Centre) | 10,391 | |
| 46,714 | 10 | Dena Bank, Mumbai | 48,165 | |
| 207,437 | 11 | Standard Urban Co. Op. Bank(Aurangabad Regional Centre) | 100,973 | |
| 309,334 | 12 | Ratnagiri Dist. Central Co-op. Bank (Ratnagiri Regional Centre) | 309,334 | |
| 96,486 | 13 | Vishwas Co-op. Bank Ltd., Nashik (Nashik Regional Centre) | 1,766 | |
| 49,047 | 14 | Union Bank of India -Amhednagar Kendra | 96,532 | |
| 15,466 | 15 | Bank of Maharashtra-Thane Kendra | 22,170 | |
| 295,965 | 16 | Solapur Dist. Central Co-op. Bank-Solapur Kendra | 306,591 | |

*Schedule 6 Continued...*

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 26,218 | 17 | State Bank of India - Karad | 8,955 | |
| 1,003 | 18 | Bank of Baroda FCRA A/C 16307 | 1,035 | |
| 282,094 | 19 | State Bank Of India A/C 28 Latur | 282,094 | |
| 67,308 | 20 | State Bank Of India - Jalgaon | 204,529 | |
| 340,219 | 21 | SVC Bank LTD Navi Mumbai | 571,758 | |
| 135,572 | 23 | Parbhani Dist. Central Co-op Bank Ltd. | 93,313 | |
| 229,185 | 24 | State Bank of Hyderabad-Ambajogai/Beed Kendra | 304,583 | |
| 7,323,989 | | | | 4,528,578 |
| | B | **CURRENT ACCOUNT** | | |
| 28,712 | 1 | The Maharashtra State Co-op. Bank Ltd. Account No. 2 | 27,768 | |
| 347,422 | 2 | State Bank of India —A/c. No.- 31504352950 | 154,303 | |
| 398,465 | 3 | Bank of Baroda-Auditorium (1656) | 123,725 | |
| 105 | 4 | Bank of Baroda (1655) | 1,073,009 | |
| 774,703 | | | | 1,378,805 |
| | C | **CASH BALANCE** | | |
| 11,547 | 1 | Main Office | 25,000 | |
| 10,000 | 2 | YCP Academy of Information Technology | 6,000 | |
| 1,371 | 3 | Krishi Sahakar Vyas Peeth,Pune | 32,885 | |
| - | 4 | Konkan Regional Office | - | |
| 146 | 5 | Aurangabad Regional Office | 146 | |
| 3,193 | 6 | Nagpur Regional Office | 14,417 | |
| 781 | 7 | Thane Kendra | 1,722 | |
| 7,618 | 8 | Navi mumbai Kendra | - | |
| 15,547 | 9 | Parbhani vibhagiya kendra | 15,024 | |
| 435 | 10 | Solapur Kendra | - | |
| - | 11 | Navi Mumbai Kendra | 483 | |
| 95 | 12 | Ahmednagar Kendra | 83 | |
| 1,943 | 13 | Ambajogai Kendra | 25,466 | |
| 2,346 | 14 | Karad | 475 | |
| 55,022 | | | | 121,701 |
| **8,153,713** | | **TOTAL** | | **6,029,084** |

**SCHEDULE-7**
**YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN, MUMBAI**
**EXPENDITURE RELATING TO AUDITORIUM OF TRUST AS ON 31ST MARCH 2020**

| 2018-19 (Rs.) | Sr. No. | PARTICULARS | (Rs.) | 2019-20 (Rs.) |
|---|---|---|---|---|
| 5,004,160 | 1 | Salary | | 5,885,766 |
| 287,831 | 2 | Conveyance | | 294,506 |
| 509,920 | 3 | Electricity Charges | | 166,380 |
| - | 4 | Printing & Stationary | | 54,970 |
| 11,814 | 5 | Telephone Charges | | 8,326 |
| 546,400 | 6 | Audio Visual Operating Charges | | 328,950 |
| 453,300 | 7 | Volunteering Charges | | 415,000 |
| 241,298 | 8 | General Expenses | | 100,852 |
| - | 9 | Auditorium Expenses | | 63,239 |
| **7,054,723** | | **TOTAL** | | **7,317,989** |

**SCHEDULE-8**
**YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN, MUMBAI**
**EXPENDITURE ON OBJECTS OF TRUST AS ON 31ST MARCH 2020**

| 2018-19 (Rs.) | Sr. No. | PARTICULARS | (Rs.) | 2019-20 (Rs.) |
|---|---|---|---|---|
| 113,265 | 1 | Birth and Death Anniversary of late Shri Y.B. Chavan. | | 283,856 |
| | 2 | **NATIONAL / STATE AWARDS** | | |
| 200,000 | 1 | Prof N.D.Patil - State Award 2019 | 200,000 | |
| 500,000 | 2 | Dr. Abhijeet Banerjee- National Award 2020 | 500,000 | |
| 700,000 | | | | 700,000 |
| | 3 | **PROGRAMME / WORKS ORGANISED BY KENDRA / UNITS OF PRATISHTHAN** | | |
| 200,000 | 1 | 8th Yashwant International Film Festival | - | |
| 1,398,442 | 2 | 9th Yashwant International Film Festival | 529,830 | |
| - | 3 | 10th Yashwant International Film Festival | 1,367,729 | |
| 95,195 | 4 | Srujan | 94,718 | |
| 236,629 | 5 | Aurangabad Vibhagiya Kendra | 223,964 | |
| 339,502 | 6 | Karad Vibhagiya Kendra | 458,286 | |
| 138,942 | 7 | Konkan Vibhagiya Kendra | - | |
| 298,179 | 8 | Nagpur Vibhagiya Kendra | 314,464 | |
| 273,756 | 9 | Nashik Vibhagiya Kendra | 413,249 | |
| - | 10 | Pune Vibhagiya Kendra | 471,860 | |
| 196,211 | 11 | Latur Vibhagiya Kendra | 58,750 | |
| 146,540 | 12 | Ambajogai Vibhagiya Kendra | 99,874 | |
| 217,047 | 13 | Ahmednagar Vibhagiya Kendra | 101,527 | |
| 213,959 | 14 | Thane Vibhagiya Kendra | 183,010 | |
| 162,824 | 15 | Solapur Vibhagiya Kendra | 131,490 | |
| 71,613 | 16 | Navi Mumbai Vibhagiya Kendra | 98,935 | |
| 143,433 | 17 | Jalgaon Vibhagiya Kendra | 73,621 | |
| 78,881 | 18 | Parbhani Vibhagiya Kendra | 50,281 | |
| - | 19 | Nanded Vibhagiya Kendra | 47,500 | |
| - | 20 | Amaravati Vibhagiya Kendra | 47,500 | |
| 492,064 | 21 | Krishi & Sahakar VyasPeeth | 419,800 | |
| 315,578 | 22 | Legal Aid & Advice Forum | 363,642 | |
| 529,131 | 23 | Maharashtra Mahila VyasPeeth | 538,136 | |
| 1,649,982 | 24 | Nav Maharashtra Yuva Abhiyan | 2,037,800 | |
| 559,978 | 25 | Sanskritik Vibhag | 492,952 | |
| 377,594 | 26 | Shikshan Vikas Manch | 542,859 | |
| 4,436,282 | 27 | Apang Hakka Vikas Manch | 3,360,499 | |
| 50,000 | 28 | Paryavaran Sanvardhan Kaksha | 107,742 | |
| 160,544 | 29 | Senior Citizens Programme | 139,873 | |
| 147,250 | 30 | Vartapatra Expenses | 165,000 | |
| 265,474 | 31 | Vidnyanganga | 256,612 | |
| 358,498 | 32 | Devarashtre Expenses | 373,250 | |
| 102,000 | 33 | Ramesh Chavan Books | 31,875 | |
| 20,625 | 34 | Anand Granthsagar Prakashan | - | |
| 71,320 | 35 | Yoga Classes Expenses | 60,118 | |
| 19,865 | 36 | Book discussion | - | |
| 442,400 | 37 | Digital Classroom Karad Exp | - | |
| - | 38 | Sakal Papers Pvt. Ltd. Lokmanya to Mahatma-Traslation of Book in English | - | |
| 2,500 | 39 | Manacha Mujara | 503,410 | |
| 35,300 | 40 | Mehta publication books | - | |
| 7,500 | 41 | Smita amar shende books | - | |
| 22,500 | 42 | Videsh Darshan | - | |
| 10,000 | 43 | Y V Chandrachur Awards | 10,000 | |
| 14,287,538 | | | | 14,170,156 |
| | 4 | **DONATIONS** | | |
| 200,000 | 1 | Sarvajanik Utsav Samiti, New Delhi | 200,000 | |
| - | 2 | Pradnya Pathshala Mandal - Computerisation of Dharmakosh | 500,000 | |
| 20,000 | 3 | Indian Institution of Public ADMN | 20,000 | |
| 220,000 | | | | 720,000 |
| **15,320,804** | | **TOTAL** | | **15,874,012** |

**SCHEDULE-9**
**YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN, MUMBAI**
**DETAILS OF MISCELLANEOUS RECEIPTS OF TRUST AS ON 31ST MARCH 2020**

| 2018-19 (Rs.) | Sr. No. | PARTICULARS | (Rs.) | 2019-20 (Rs.) |
|---|---|---|---|---|
| - | 1 | MISC RECEIPTS- KRISHI AND SAHAKAR | | 1,400 |
| 69,475 | 2 | MISC RECEIPTS OTHERS | | 37,172 |
| | 3 | MISC. RECEIPTS-DEVRASHTRE | | |
| 209,914 | 4 | YCP MAHA MAHILA VYASPEETH RECEIPTS | | 703,563 |
| 37,784 | 5 | 9TH YIFF RECEIPTS | | - |
| 2,619 | 6 | ROYALTY | | - |
| - | 7 | 10TH YIFF RECEIPTS | | 42,034 |
| - | 8 | Nava Maharashtra Yuva Abhyan Receipts | | 40,848 |
| 117,021 | 9 | Yoga Class Receipts | | 64,630 |
| **436,813** | | **TOTAL** | | **889,647** |

**Schedule 10**
**YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN, MUMBAI**
**ACCOUNTS FOR THE YEAR ENDED 31st MARCH, 2020**

## NOTES TO THE ACCOUNTS

## I. SIGNIFICANT ACCOUNTING POLICIES

### i) Method of Accounting

As per the policy consistently followed by the Pratishthan, items of income and expenditure are accounted on cash basis. Advance receipts are accounted as income on occurrence of events.

### ii) Fixed Assets

Fixed assets are recorded at cost of acquisition or construction and are stated at written down value.

### iii) Investments

Investments are stated at cost.

### iv) Depreciation

Depreciation has been provided at the rates and in the manner prescribed under Income Tax Rules by written down value method, except for Library Books and Distribution Rights of Film.

Library books are depreciated at 10%. It is calculated for the entire year irrespective of the date of addition.

The film based on life achievements of Late Shri. Yashwantrao Chavan for promotion of his thoughts was capitalized in 2014 with the effective life as 5 years and is depreciated using Straight Line method of accounting.

### v) Retirement Benefits

Liability for gratuity and leave encashment on Balance Sheet date will be accounted as and when paid.

### vi) Books Received in donation

Books received as donation have been accounted for as Fixed Assets at Re.1/- per book. The corresponding amount has been treated as Fund.

## II. NOTES ON ACCOUNTS

### i) Contingent Liability

**a)** Lease Charges payable to Government

The Government of Maharashtra has leased an area of 3948.75 sq. metres of land for a period of 99 years for construction of Building. It has also permitted the leasing of area in the building to the extent of 15% for commercial use. The Government of Maharashtra has decided that in such cases the lessee would be required to pay market rent for the proportionate land. This rate is to be reviewed after a period of 15 years. Pratishthan had taken up with the Government not to levy the commercial rate but the Government had not agreed

to the request. The Government of Maharashtra has further directed that the lease rent on this basis should be paid to the Collector of Mumbai.

An area of 821.53 square metres Built-up area (445 sq.metres on 1.5.1994 and 376.53 sq. metres on 15.7.06) has been leased to The Maharashtra State Co-operative Bank Limited on rent of Re.1/- per annum. Out of this area, 195.00 sq. metres was returned to the Pratishthan in April 2000. However, realizing the possible impact of the Government order the Pratishthan has made an appeal to the Chief Minister of Maharashtra pointing out that such action would adversely affect the working of philanthropic trusts which are doing very good work. It has also been suggested that the rent should be at a nominal rate for the first 25 years, 10% of the market rate for the next 25 years and 15% of the market rate thereafter.

In March 2006, the Collector, Mumbai has forwarded a demand for ground rent of Rs.4,09,48,375/- in respect of land area of 812.85 sq. metres corresponding to 1,081.10 sq. metres built up area for the period 1.2.1993 to 31.1.2006. The Government of Maharashtra and the Collector, Mumbai have been informed that the question of ground rent is under consideration of Government as stated above and the matter should be kept pending till final orders are received. However, Collector of Mumbai has sent another letter dt. 14.05.2010 demanding to pay ground rent Rs.4,25,63,683/-. In this connection the President of the Pratishthan has written a letter to the Hon. Chief Minister by his letter dated 10.6.2010 asking that the notice be kept in abeyance. However, the reserve fund of Rs.4.25 crores for meeting the liability of lease rent has been created in the accounts of financial year 2009-2010. An additional provision of Rs.0.75 crores has been created in F. Y. 2018-19 against the said liability.

**b) Income Tax Demands**

A demand notice has been received from Income Tax Authorities for A.Y. 2010-11 amounting to Rs. 51,81,440/- for which appeal is in process. Further demand notice have been received from the Income Tax Authorities for A.Y.2011-12 for Rs.61,44,900/-, for A.Y. 2012-13 for Rs.67,96,940/-, for the A.Y.2013-14 for Rs.71,47,220/-, for the A.Y.2014-15 for Rs.69,61,610/-, for the A.Y.2015-16 for Rs.41,91,450/-, for the A.Y.2016-17 for Rs.37,56,817/- and for the A.Y.2017-18 for Rs.42,47,062/- for which appeal is in process. Pratishthan has also filed Stay application for all the assessment years. However, Pratishthan has received letter from ITO for A.Y.2012-13 stating that Pratishthan's Stay application has been rejected and Pratishthan has been ordered to pay 50% of demand Rs.33,96,470/- in 6 equal installments starting from 15-9-2015 and balance by 15$^{th}$ of every month. As per the advice from the Income Tax Consultant, Pratishthan had appealed to the Commissioner of Income tax against the recovery order of ITO by letter dt.24-8-2015. Commissioner of Income tax (E) by order dated 5-10-2016 has stayed the demand till the disposal of appeal by the first Appellate Authority for A.Y.2010-11 to A.Y.2013-14.

Subsequently, Commissioner of Income tax (E) by order dated 5-10-2016 has stayed the demand till the disposal of appeal by the first Appellate Authority for A.Y.2010-11 to A.Y.2013-14.

However, by order dated 16th January, 2017, Income Tax Authorities have sent a revised demand of Rs.81,93,990/- for the A.Y.2012-13.

We have received Appellate Order dated 26-9-2018 for the A.Y.2010-11, in which they stated that "It is considered that once the income from letting out of the hall is held as income from house property there will be no application of the provisions of the section 11(4A) at all. I have already allowed the Appellant's ground that the income from letting out of the hall is not a business income and thus provisions of section 11(4A) do not apply.

The final appeal is pending for assessment from A.Y. 2011-12 to A.Y. 2017-18 with CIT (E).

c) **Service Tax Demands**

Notice has been received from the Office of the Commissioner of Service Tax-I, Mumbai dt.13th January, 2016. The notice has shown service tax payable of Rs.40,55,866/- for the period from October 2010 to March 2015. The service tax was charged on donations, educational fees/donations, Library membership fees, Rangswar membership fees, caretaker fees and catering donations. Pratishthan has made submissions in this matter by letter dt.20th March, 2016. However Pratishthan has paid Rs. 45,14,534/- which includes Service Tax of Rs. 39,54,010/- as calculated by Pratishthan for the period from October 2010 to March 2015 & balance of Rs 5,60,524/- calculated as interest for the period 2010 to 2011. Interest payable for the period from April 2011 to March 2015 amounting to Rs.15,91,854/- is yet to be paid, pending consideration by the tax authorities on Pratishthan's request for waiver.

Out of Rs.45,14,534/- paid by Pratishthan as Service Tax, Pratishthan has accepted liability of Rs. 19,48,397/- and is in the process recovery of said amount from the consumer of services. The balance amounting to Rs. 25,66,137/- is paid as Service Tax under protest and a personal hearing opportunity has been requested.

Service tax department has issued a show cause notice, dated 7th April 2016, raising a demand of Rs. 96,57,493/- for the period 1st Oct 2010 to 31st March 2015. The said demand amount of Rs. 96,57,493/- includes demand amount of Rs. 40,55,866/- already raised by Service Tax department vide notice dated 13th January 2016. Pratishthan has further paid Rs.41,86,486/- in year F.Y. 2016-17 against this notice for the period from October 2010 to March 2015.

Service tax department by letter dt.11-12-2017, 8-2-2018 and 12-3-2018 sent notice for seeking information for the FY 2015-16, FY 2016-17 and from 1-4-2017 to 30-6-2017. Pratishthan by letter dt.2-4-2018 has provided all the details of the service tax paid during these years.

d) **Property Tax Demand**

A special notice under section 162/sub-section (2) of the Mumbai Municipal Corporation Act 1888 dated 28.3.2009 has been received after the construction of additional floor in the Chavan Centre. The rateable value of the Chavan Centre Building has been shown (from 1-9-2009) as Rs. 35,58,560/- N.P.A. with demand of property tax of Rs. 28,44,777/- for the year 2008-09 and Rs.

40,03,380/- for the year 2009-10 as against the earlier rateable value of Rs. 10,90,055/- and property tax Rs. 12,26,310/- upto the year 2007-08. We have submitted a representation to MCGM against this rateable value. But after further investigation MCGM modified the rateable value from Rs. 35,58,560/- to Rs. 24,71,000/- w.e.f. 1.9.2008. In the meantime Pratishthan has filed the case in the Court of Small Causes against BMC. The matter regarding property tax is pending with The Court of Small Causes at Mumbai. However, the provision of Rs. 50 Lakhs for the liability of property tax has been made in the accounts of financial year 2009-10. Brihanmumbai Mahanagarpalika by their letter no. AA &C/A/20/2011-12 dt. 6th July, 2012 has requested for out of court settlement in the matter. Board of Trustee in its meeting held on 22nd September, 2012 has approved the proposal for out of court settlement. Shri Sharad Kale, General Secretary of the Pratishthan attended the out of court settlement meeting on 31st October, 2012 and expressed the views of the Pratishthan. Now, Brihanmumbai Mahanagarpalika by their letter dt.26th March, 2013 has revised the rateable value to Rs.8,01,800/- for residential purpose and Rs.10,06,360/- for non-residential purpose as recommended by out of court settlement committee subject to withdrawal by the Pratishthan of the appeal in the Court of Small Causes at Mumbai. The matter is being taken up with the Hon. Court of Small Cause at Mumbai. Due to oversight, the Appellant missed the date of the matter, as the Appellant were under impression that the matter is likely to be settled and it will be taken care of by the Advocate on record and for 5 consecutive dates the matter was not attended by the Appellant nor by Advocates and thus the matter was dismissed on 20-12-2014 for want of prosecution. Therefore, Pratishthan has appointed new Advocate and the new case have been restored on 2-7-2016 with Hon. Court of Small Cause at Mumbai. Hon. Court of Small Cause at Mumbai by their order dated 24-1-2019 directed the Pratishthan to pay Rs.2,71,11,935/- within three months in three equal installments as compliance under Section 217(2)(d) of the MMC Act failing which appeal shall be dismissed under Section 217(2)(A) of the MMC Act. Pratishthan have filed a fresh appeal in the matter on 25-3-2019.

As per bill issued by Brihanmumbai Mahanagarpalika, the total disputed outstanding demand for property tax till date, as on 31$^{st}$ March 2019, is Rs 4,97,54,831/-. However, Pratishthan is paying the property tax at earlier rate every year.

Shri Dilip Valse Patil, Trustee had meeting with the Municipal Commissioner, Shri Pravin Pardeshi on 11$^{th}$ July 2019 to discuss the matter. There After several meetings held with Deputy Municipal Commissioner, Shri Vijay Balamvar. As per discussion Pratishthan has sent letter dated 18$^{th}$ September, 2019 elaborating the calculation of payable and paid property tax from the year 1995-96 to 2018-19 by considering the exemption to general tax from retrospective effect i.e. from 1-4-1995 to Brihanmumbai Mahanagarpalika. Total tax payable up to 31-3-2019 is Rs.1,65,12,119/-. However, Pratishthan requested to Brihanmumbai Mahanagarpalika to give concession to pay this property tax in five yearly equal installments and to grant concession in the capital value based property tax increased by 40%.

Shri Sharad Kale, General Secretary of the Pratishthan then met Municipal

Commissioner, Shri Pravin Pardeshi on 10th December 2019 to rediscuss the above three points and Shri Pravin Pardeshi had assured to consider it favourably.

Brihanmumbai Mahanagarpalika by their letter dated 9th March, 2020 informed the Pratishthan to pay Rs.33,02,444/- per year in the month of February subject to exemption in general tax. However, if the exemption is not approved then Pratishthan have to pay full tax for Rs.6,65,46,905/-.

Board of Trustees in its meeting held on 12th March, 2020 has approved to pay arrears of property tax in five yearly equal installment i.e. Rs.33,02,444/-, if Brihanmumbai Mahanagarpalika gives the exemption in general tax. Pratishthan has written to Brihanmumbai Mahanagarpalika the same by letter dated 17th March, 2020.

ii) In the opinion of the Trustees current assets, advances and deposits have value on realization in the ordinary course of the Trust activity approximately the same at which they are stated.

iii) Balances of debtors, creditors, advances and other party accounts are subject to confirmation and consequent reconciliation and adjustments, if any.

iv) The Trust has constructed Yashwantrao Chavan Centre Building out of the amounts received by way of donations or grants. The depreciation on the said building is charged to Income & Expenditure Account. The trust draws the amount equal to the depreciation provided in the books of accounts from building fund.

The accumulated depreciation as at the start of the year on Yashwantrao Chavan Centre Building amounts to Rs.10,04,73,584/-. Accordingly, effect is given as on 31st March 2020 by transferring the amount of provision for depreciation on buildings for the Financial Year 2019-20 from building fund to Income & Expenditure account amounting to Rs.27,23,242/-.

**Signature for Schedules 1 to 10**

**As per Report of even date**
**C.V.K, Associates**
**Mumbai**
**Chartered Accountant**
**Firm Registration No. 101745W**

**For Yashwantrao Chavan Pratishthan,**

**S.Y. Joshi**
**(Partner)**
**Membership No. 32523**
**Place: Mumbai**
**Dated: 28th September, 2020**

**Sd/-**
**Hemant Takle**
**(Treasurer)**

**Sd/-**
**S.G. Kale**
**(General Secretary)**




यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक २०१९ चे विजेते प्रा. एन. डी. पाटील यांना राज्यस्तरीय पारितोषिक प्रदान करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार




यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमात श्री. राम खांडेकर यांच्या 'सत्तेच्या पडछायेत' या पुस्तकाचे प्रकाशन करताना मा. श्री. शरदराव पवार, व्यासपीठावर मा. खा. श्रीनिवास पाटील, उपाध्यक्ष श्री. अरूण गुजराथी व इतर मान्यवर.



# Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

35th Annual Report
2019 - 2020